स्थापना : २९ ऑगस्ट २०१८ । वर्ष : ४ । दिवाळी अंक : १६ ऑक्टोबर ते १५ नोव्हेंबर २०२१ । मूल्य : रू. ५०

पाक्षिक
समाज आणि राष्ट्राच्या नवचरनेसाठी

# द पीपल्स पोस्ट

# अस्वस्थ वर्तमान

दिवाळी विशेषांक


stuvio
Gaming + Interactive + Films + AR/VR
hello@stuvio.co
www.stuvio.co
make unseen seen
We craft and build digital experiences by blending creativity with skills across technology, design, data and content.
Photo by Jose Gil on Unsplash
Game Design & Development
App Design & Development
Website Design & Development
Real Estate 3D Interactive
Corporate Films Product Films
Branding and Content

**पाक्षिक**

समाज आणि राष्ट्राच्या नवरचनेसाठी

# द पीपल्स पोस्ट

स्थापना : २९ ऑगस्ट २०१८ । वर्ष : ४

दिवाळी अंक : १६ ऑक्टोबर ते १५ नोव्हेंबर २०२१ । मूल्य : रु. ५०

संपादकीय : अस्वस्थतेच्या धगीत स्वप्नांची होतेय होरपळ ४

लोकशाही समाजवाद हेच अस्वस्थतेवर उत्तर
– डॉ. रावसाहेब कसबे ६

जातींमधल्या धगीमुळे लोकशाहीची कुचंबणा
– डॉ. नागनाथ कोत्तापल्ले ९

'ग्लोबल व्हिलेज' मधील 'भिंती' अन् भेदरट राष्ट्रवाद!
– दत्ता देसाई १३

'बिच्चारी' जनता घेतेय 'धाकशाही'चा अनुभव
– विजय नाईक २०

सरकारचा पाठीराखा ओबीसी झाला भकास
– प्रा. हरी नरके २६

संदर्भासहित अस्वस्थ वर्तमान...
– यशवंत मनोहर ३४

विकास खुरटल्याने मुस्लिम होतोय अस्वस्थ
– जयदेव डोळे ३८

धार्मिक राष्ट्रवादाची अस्वस्थतेला ऊब
– बी.जी. वाघ ४२

अस्वस्थ होतेय देशाचे संविधान
– प्रा. भगवान माने ४८

लाखाच्या पोशिंद्याचीउपेक्षा न संपणारी
– डॉ. भालचंद्र कांगो ५४

स्त्रियांच्या वाट्याला विघातक स्थिती
– प्रा. माया पंडित ५६

'नाही रे' वर्गाची स्थिती गंभीर
– देविदास तुळजापूरकर ६०

वर्तमानातील अस्वस्थता...भविष्यातील चिंता
– मुक्ता मनोहर ६३

दहशतवाद अन् धार्मिक राष्ट्रवादाने जग अस्वस्थ
– भास्कर नाशिककर ६५

**संपादक**
चेतन शिंदे

**मांडणी व सजावट**
गायत्री ग्राफिक्स्, नाशिक

**मुखपृष्ठ**
सचिन ओव्हाळ

**संपादकीय पत्रव्यवहार**
११, तळमजला, बी ब्लॉक,
लक्ष्मी निवास, जे. के. सावंत मार्ग
यशवंत नाट्यमंदिरासमोर, माहिम (प.)
मुंबई ४०००१६

**संपर्क**
८८८८५४१८२२
९५८८४५११५१

E mail : thepeoplespost2014@gmal.com

(या अंकातील सर्व लेखांचे हक्क सुरक्षित)
* अंकात व्यक्त झालेल्या लेखकांच्या मतांशी संपादक सहमत असलेच असे नाही.

द पीपल्स पोस्ट
8888541822

**• जाहिरात विभाग संपर्क**
९८२१४४५४०९ / ८८०५१५१४५२

**• वर्गणीदारांसाठी संपर्क**

**महाराष्ट्र / मुंबई :**
गजानन आठवले : 9076065215
विदर्भ : आंकुश वाकडे : 9421424242
मराठवाडा : सचिन : 7350091569
कोकण : संकेत तांबे : 7738784132

वर्गणीचा धनादेश, धनाकर्ष
द पीपल्स पोस्ट या नावाने काढावा

हे पाक्षिक, मालक, मुद्रक, प्रकाशक धम्मपाल भीमराव शिंदे यांनी मेत्ता प्रिंटर्स सीटीएस नं. १४४ मिल कॉर्नर, छावणी रोड, बारापुल्ला गेटजवळ, औरंगाबाद ४३१००१ येथे छापून फ्लॅट नंबर ए-४०३, जीएन नं. १०/२, ग्लोरियासिटी, एमएसईबी पावर हाऊसजवळ पडेगाव, औरंगाबाद ४३१००१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. * संपादक चेतन भीमराव शिंदे (पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांची राहील) सर्व वादविवाद औरंगाबाद जिल्हा न्यायालयीन कक्षेत. प्रकाशित झालेल्या लेखकांच्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही क्र. MAHMAR/2018/76460

## संपादकीय

# अस्वस्थतेच्या धगीत स्वप्नांची होतेय होरपळ...



असं कधीच कुणाला वाटलं नव्हतं, की साऱ्या जगावरच अस्वस्थतेचं पांघरूण पसरलं जाईल...

असं कधीच वाटलं नव्हतं, की या जाडजूड पांघरूणाखाली माणसाला श्वास घेणं आणि सोडणं कठीण होईल.

असा कधीच कुणी विचार केला नसावा, की मनुष्य नावाच्या प्राण्यासाठी निसर्गानं उपलब्ध करून दिलेल्या प्राणवायूची टंचाई निर्माण होईल..

असं कधीच वाटलं नव्हतं, की प्राणवायूचा काळाबाजार होईल. सिलिंडरची प्रतीक्षा करत अनेक जीव धडपडतील आणि क्षणात गप्पगार होतील..

असं कधीच वाटलं नव्हतं, की माणसासाठी सुंदर जगाचं स्वप्न पाहणाऱ्या फुले, शाहू, आंबेडकर यांच्या विचारांवर नवी भांडवलशाही रणचंडीप्रमाणे उभी राहील..

असं कधीच वाटलं नव्हतं, की जगण्यासाठी लागणाऱ्या प्रत्येक गोष्टीसाठी म्हणजे अन्न, वस्त्र, निवाऱ्यासाठी चौकाचौकात स्पर्धा सुरू होईल..

असं कधीच वाटलं नव्हतं, की अस्वस्थतेच्या ढगाच्या झुंडीच्या झुंडी येतील आणि माणसाला आतून-बाहेरून हादरवून टाकतील..

असं कधीच वाटलं नव्हतं, की झाडाझुडपाप्रमाणं माणूस कोसळेल.. माणसाला लाभलेल्या आकृतीला तडे जातील.. काचेप्रमाणं त्याचं खळ्ळखट्ट होईल..

असं कधीच वाटलं नव्हतं, की महापराक्रमी माणसाच्या मनगटातील ताकदच निघून जाईल, त्याचं मनगट मोकळं राहील आणि त्याच्या मनगटाची जागा रोबोट घेईल..

असं कधीच वाटलं नव्हतं, की मानवी जीवनात जगण्याऐवजी हगण्याला महत्त्व येईल, पाण्यानं आतडी भरण्याऐवजी दिवसभर स्वच्छतेसाठी हातावरच पाणी ओतावं लागेल..

असं कधीच वाटलं नव्हतं, की माणसासाठी तयार करण्यात आलेल्या कल्याणकारी राष्ट्राच्या पेकाटात नवी भांडवलशाही लाथ घालेल आणि त्याच्या पाठीवर खुल्या मॅरेथॉन स्पर्धा भरवेल..

असं कधीच वाटलं नव्हतं, की माणसाच्या जगण्याचाही इव्हेंट होईल आणि तोंडावर मास्क लावून तो जाडजूड तिकीट लावून दाखवला जाईल..

असं कधीच वाटलं नव्हतं, की धावला तो जिंकला आणि थांबला तो संपला. यातील थांबलेल्यासाठी धावण्यासाठी धावायची घटनात्मक ऊर्जाच संपून जाईल..

असं कधीच वाटलं नव्हतं, की माणसांच्या श्रमातून, घामातून तयार झालेली संपत्ती राष्ट्रे भांडवलशाहीच्या पंजात गहाण टाकतील..

असं कधीच वाटलं नव्हतं, की अर्थसत्ता, धर्मसत्ता, राज्यसत्ता यांची गँग तयार होईल आणि माणसांना स्वातंत्र्य, समता, बंधूतेपासून वळवून त्यांच्या-त्यांच्यातच झुंजी लावेल..

असं कधीच वाटलं नव्हतं, की जाती एवढ्या जागवल्या जातील, की त्या तयार करणाऱ्या माणसाच्या मानेवरच पाय ठेवतील..

असं कधीच कुणाला वाटलं नसावं, की उघडपणे

उद्ध्वस्त केलेली धर्मस्थळे कोणी पाडली हे न्याय व्यवस्थेलाही कळलं नसावं...

असं कधीच कुणाला वाटलं नसावं, की दारिद्र्य, बेकारी, भूकबळी वाढत असल्याच्या काळातही शेअर बाजारातील बैल शेपूट उंच करून चौफेर उधळेल..

असं कुणालाच वाटलं नसावं, की नवी भांडवलशाही शिक्षणाचे, ज्ञानाचे तंत्र बनवून ते ऑनलाईनवर घेऊन जाईल..

असं कधीच कुणाला वाटलं नसावं, की कोरोनाच्या काळात अंत्यसंस्कारासाठी जाण्यासाठी बंदी आणि कुंभमेळ्यात गर्दी करण्याला परवानगी मिळेल..

असं कधीच कुणाला वाटलं नव्हतं, की कोरोनाच्या काळात जगण्यासाठी श्वास मिळवण्यासाठी बाहेर पडलेली माणसं श्वास–श्वासच म्हणत मरतील..

असं कधीच कुणाला वाटलं नसावं, की घंटा वाजवून, दिवा पेटवून कोरोना आणणाऱ्या महाव्हायरसला पळवून लावण्याचा शोध लावेल..

असं कधीच कुणाला वाटलं नसावं, की भाकरीसाठीच्या थाळीत धर्माधिष्ठित राष्ट्रच देण्याचा प्रयत्न करेल..

असं कुणालाच वाटलं नसावं, की माणूस असा आतून–बाहेरून अस्वस्थ होईल आणि त्याच्या खांद्यावरची सत्ता मात्र स्वस्थ असेल..

असं कुणालाच वाटलं नसावं, की क्षणाक्षणाला हजारो स्वप्नं पाहणाऱ्या माणसातील स्वप्नांचं गर्भाशयच खुडून टाकलं जाईल. ऊसतोडणी करणाऱ्या बाया कामाच्या काळात मासिक पाळीमुळे काम बंद होऊ नये म्हणून स्वत:च स्वत:चं गर्भाशय फेकून देतात, चिंध्यांचा गोळा फेकून देतात तसंच स्वप्नं फेकून देण्याचा प्रयत्न अस्वस्थता करेल..

कधीच कुणाला वाटलं नसावं, की आपल्याच खांद्यावर बसवून, उंची वाढवून घेतलेले कारभारी त्यांना प्रश्न विचारण्याच्या कृतीला देशद्रोहाची कृती ठरवतील..

असं कधीच वाटलं नव्हतं, की माणूस कुठं आणि कसा श्वास घेतोय यावर पाठत ठेवली जाईल..

असं कधीच कुणाला वाटलं नव्हतं, की घामाला दाम मागत हजारो शेतकरी रस्त्यावर बसले तरी त्यांना कोणी विचारणार नाही..

असं कधीच कुणाला वाटलं नव्हतं, की कारभाऱ्यांची काही पोरंच शेतकऱ्यांना आपल्या गाडीखाली चिरडतील..

हे होणं शक्य नाही, ते होणं शक्य नाही असं जे काही लोकांना वाटत होतं, ते ते सारं घडताना लोक बघताहेत..

लोकांना असं कधीच वाटलं नव्हतं, की धर्मवादाच्या, मूलतत्त्ववादाच्या गोळ्या अशा फुकट वाटल्या जातील आणि रोगावरची इंजेक्शनं इतकी महाग होतील..

लोकांना हेही ठाऊक नसतं, की अस्वस्थतेचं शेवटचं मुक्कामाचं ठिकाण कोणतं असतं?

अस्वस्थता नसतेच कधी वांझोटी.. तिच्या गर्भाशयातही निर्मितीच्या खूप क्षमता असतात..

अस्वस्थता हे कशाचं तरी असते चिन्हं, कशाचं तरी असते प्रतीक, कोणत्या तरी धगीची असते चाहूल, असं काही लोकांना वाटत नसलं तरी तेही एक असतं वास्तवच..

अस्वस्थतेमुळे माणसाला तडे जातात हेही खरंय आणि त्यातूनच जुळणीचं नवं रसायनही तयार होत असतं, हेही खरंय..

अस्वस्थतेलाही असतो एक अदृश्य चेहरा..

अस्वस्थताही असते बदलाचा एक मोहरा..

अस्वस्थतेचं स्वागत करायचं, की करायचा निषेध..

सागर शांत असतो तेव्हा त्याचा अंतरंग अशांत असतो..

माणूसही नेमका तसाच असतो..

माणूस शोधेल, अस्वस्थता कोण तयार करतं आणि कोणाच्या हातात आहे त्याचं पेटेंट..


माणूसच असतो कर्ता, कर्म आणि क्रियापद..

माणूसच असतो गाण्यातलं ध्रुवपद..

माणूस जागा होत असतो, माणूस चालत असतो, माणूस हात हलवत असतो..

माणूस किती पराक्रमी, किती पवित्र, किती बलवान, त्यालाच स्वातंत्र्य, समता, बंधूतेची भूक असते, हे सातत्यानं सांगत राहायचं असतं..

द पीपल्स पोस्ट या अल्पावधीत परिणामकारक बनलेल्या पाक्षिकानं हेच काम तर स्वीकारलंय... जागल्या बनण्याचं, जागते रहो अशी मनामनात आरोळी ठोकण्याचं... दिवाळी अंकाचा उद्देशही तोच हे लपवण्याचं कारण तरी काय... फुले, शाहू, आंबेडकरी विचारानं नवा माणूस घडवण्याचा प्रयत्न करण्याचंही द पीपल्स पोस्टनं ठरवलंय.. तेही लपवायचं काही कारण नाही, म्हणून अस्वस्थता पकडणारा हा दिवाळी अंक...



# लोकशाही समाजवाद हेच अस्वस्थतेवर उत्तर



**आजच्या साऱ्या मानवी दुःख आणि वेदनांना, अस्वस्थता आणि निकामीपणाला एकच उत्तर आहे, ते म्हणजे भांवडली धार्मिक राष्ट्रवादाचा त्याग आणि लोकशाही समाजवादाची स्थापना.**



डॉ. रावसाहेब कसबे

"तो उत्तम काळ होता, तो सर्वात वाईट काळ होता, ते शहाणपणाचे युग होते, ते मूर्खपणाचे युग होते, ते युग अविश्वासाचं होतं, ते युग विश्वासाचं होतं, तो प्रकाशाचा मोसम होता, तो अंधाराचा मोसम होता, तो आशेचा वसंत ऋतू होता, तो निराशेचा शिशिर ऋतू होता, आपल्यासमोर सर्व काही होतं, आपल्यासमोर काहीही नव्हतं....'' चार्ल्स डिकन्स या प्रतिभावंताचे त्याच्या 'अ टेल ऑफ टू सिटीज' या एकेकाळी गाजलेल्या पुस्तकाची ही सुरुवातीची वाक्ये होती. त्याला पार्श्वभूमी होती इ.स. १७८९ साली झालेल्या फ्रेंच राज्यक्रांतीची आणि कथा होती पॅरिस आणि लंडन या शहरांची. आजच्या जगात कुठेही अशा प्रकारची क्रांती झालेली नाही. उलट संपूर्ण जग एका महाप्रतिक्रांतीच्या जबड्यात अडकले असतानाही डिकन्स यांनी लिहिलेले शब्द आपण व्यवहारात अनुभवत आहोत. यातून जगातील कोणताही देश सुटलेला नाही. भारतासारख्या अविकसित आणि विकसनशीलतेच्या अर्थशास्त्रीय कसोट्यांच्या सीमांवर अडकलेला देश तर यात पूर्णपणे भरडलेला आहे.

याची सुरुवात झाली १९९० च्या दशकात. या दशकाला जगाने एकाचवेळी दोन देणग्या दिल्या. पैकी एक जागतिकीकरणाची आणि दुसरी सांस्कृतिक संघर्षाची. या वास्तवाचे दर्शन घडविले फ्रान्सिस फुकुयामा यांनी १९९२ साली लिहिलेल्या 'द एंड ऑफ हिस्टरी अँड दि लास्ट मॅन' या ग्रंथाने. जगातून कम्युनिझम आणि फॅसिझम यांचे पूर्णपणे उच्चाटन झाले असून उदारमतवादी लोकशाहीचा निर्णायक विजय झालेला आहे, अशी घोषणा करून. त्यामुळे विविध देशांतील मध्यम आणि उच्चवर्गात आनंदोत्सव सुरू झाले. प्रत्येकाला अधिक श्रीमंत होण्याची स्वप्ने पडू लागली. भांडवलाला राष्ट्र-राज्याच्या सीमा राहिल्या नाहीत; ते जगाच्या कानाकोपऱ्यात अभिमानाने अनिर्बंधपणे खेळू लागले. त्यामुळे संपूर्ण जगाचे नेतृत्व सर्वात श्रीमंत देश म्हणून अमेरिकेकडे गेले. अमेरिका आणि सोव्हिएत रशिया यांच्यातील शीतयुद्ध संपले; परंतु हा भ्रमाचा भोपळा लवकरच फुटला आणि जगात एक नवाच संघर्ष सुरू झाला.

## शीतयुद्ध होती जागतिक व्यवस्था

फ्रान्सिस फुकुयामा यांनी केलेल्या स्वप्नरंजनावर पहिला आघात केला तो सॅम्युएल हंटिंग्टन या विचारवंत पत्रकाराने. त्यांनी १९९६ साली 'दि क्लॅश ऑफ सिविलायझेशन अँड दि रिमेकिंग ऑफ वर्ल्ड ऑर्डर' या नावाचा ग्रंथ लिहिला. त्यात फुकुयामा म्हणतात, तो उदारमतवादी लोकशाहीचा विजयसुद्धा जागतिक संघर्षाला मिटवू शकणारा नाही. हंटिंग्टन यांना एका जगाची, वर्गसंघर्ष मिटून इतिहासाचा अंत झाल्याची आणि त्यातून संतुलित आणि आनंदोत्सवी व्यवस्थेच्या उदयाची मांडणीच शंकास्पद वाटली (अर्थात, फुकुयामा यांनी आपल्या जुन्या मतात पुढे सुधारणा केली हेही खरे आहे). फुकुयामा त्यांच्या मांडणीसाठी इतिहासाच्या प्रवाहाची साक्ष देत होते. त्यांच्या मताप्रमाणे पहिल्या महायुद्धाने कम्युनिझम आणि फॅसिझमला जन्म देऊन शतकापासून रुजू लागलेल्या लोकशाही विचारांची पीछेहाट केली. दुसऱ्या महायुद्धाने मानवजातीला एक जागतिक स्वरूपाचे भयानक शीतयुद्ध दिले. १९९० च्या दशकात शीतयुद्धाची समाप्ती होणे म्हणजे जग संतुलित, एकात्म आणि शांतीप्रिय होणे होते. शीतयुद्ध ज्या भांडवलशाही आणि साम्यवाद या तत्त्वप्रणालींच्या आधारावर उभे होते, तो आधारच कोसळल्यामुळे उदारमतवादी लोकशाहीचा विजय अपरिहार्य होता. हंटिंग्टन यांनी याला एक भ्रम मानले. कारण ही सारी स्वप्ने जगात सुरू असलेल्या वांशिक आणि सांस्कृतिक संघर्षांनी उधळून लावलेली आहेत, हे सप्रमाण सिद्ध केले. दुसऱ्या महायुद्धाच्या समाप्तीपासून ते १९८७ च्या दशकाच्या शेवटपर्यंत 'शीतयुद्ध' ही एक जागतिक व्यवस्था होती. शीतयुद्धाच्या समाप्तीनंतर तिच्या जागी कोणती व्यवस्था येणार हा प्रश्न होता आणि जागतिकीकरणाच्या व्यवस्थेने तो सोडविला. आज आपण सर्वजण जागतिकीकरणाच्या अवस्थेत जगत आहोत; परंतु त्याचबरोबर सांस्कृतिक संघर्षही शिगेला पोहचले आहेत.




## दहशतवादाचा प्रारंभबिंदू रथयात्रा

१९९० च्या दशकात भारतीय इतिहासाने एका जुळ्या अपत्याला जन्म दिला. त्यांची नावे होती जागतिकीकरण आणि सांस्कृतिक संघर्ष. भारतात त्याला धार्मिक आणि जातीय संघर्षाचे रूप आले. एकीकडून नरसिंहराव आणि मनमोहनसिंग हे जागतिकीकरणाचे समर्थक बनून संपूर्ण जगाचा भारत एक अविभाज्य भाग बनविण्याच्या प्रयत्नात होते, तर लालकृष्ण अडवाणी राममंदिराच्या नावाने हिंदू आणि मुसलमान यात संघर्ष छेडीत होते. भारताच्या पारतंत्र्याचा काळ केवळ ब्रिटिशांच्या दीडशे वर्षांपूर्वीचा नाही तर तो महम्मद बिन कासिमच्या नवव्या शतकापासूनचा आहे, असे सांगत होते. त्यामुळे इंग्रज जसे भारताचे शत्रू होते तसेच मुसलमानही. म्हणून मुसलमानांविरूद्ध आक्रमक धोरण स्वीकारून त्यांना राजकीयदृष्ट्या दुय्यम दर्जाचे ठरविण्याचे कारस्थान सुरू झाले. भारतात मुस्लिम दहशतवादाचा प्रारंभबिंदू अडवाणींच्या रथयात्रेत आहे. त्यांनी ही भारतीय इतिहासाला दिलेली देणगी होती. तिचे दुष्परिणाम आपण आजही भोगत आहोत. लालकृष्ण अडवाणी ज्या पंतप्रधानपदाच्या खुर्चीसाठी भारताचे बलिदान देत होते, ते पद त्यांच्या राजकीय पक्षाला त्यांच्या प्रयत्नानंतर पंचवीस वर्षांनी मिळाले; परंतु त्या खुर्चीवर दुसरेच बसले आणि अडवाणी मार्गदर्शक मंडळात लुप्त झाले. न्यायदेवतेने त्यांना दिलेली ही यथायोग्य शिक्षा ते भोगीत आहेत. आज हा सांस्कृतिक संघर्ष चहूबाजूंनी पेटलेला आहे. मुसलमान आणि दलितांचे मॉब लिंचिंग, गरीब स्त्रियांवरील बलात्कार यांची संख्या वाढत आहे. कोरोना महामारीच्या काळात लाखो लोक स्थलांतर करीत होते. हे जसे भारतात घडत होते तसेच जगातही. भांडवलशाहीसमृद्ध देश ज्या विकासाचा दावा करीत होते, त्यांच्या दाव्यांचा फुगा प्रत्येक दिवशी फुटत होता. हजारो स्त्री-पुरूष कोरोना महामारीत मरत होते आणि त्यांचे नातलग असहायपणे ते सारे बघत होते.

## ...तर लोकशाही उद्ध्वस्त होईल

आज संपूर्ण जगातील मानवजातीत सुप्तरूपात एक अस्वस्थता आहे. ते आपले जगण्याचे प्रयोजन शोधित आहेत. आपल्या भविष्यात काय आहे, याचा शोध घेत आहेत; परंतु त्यांच्या डोळ्यासमोर अंधार आहे. याची अनेक कारणे आहेत. गेल्या तीनशे वर्षात भांडवलशाही अर्थव्यवस्थेने वस्तुंचे उत्पादन अमाप केले हे खरे; परंतु तिने अशाही गोष्टींचे किंवा वस्तुंचे उत्पादन केले जे जीवनावश्यक नव्हते. त्यामुळे चैनीच्या वस्तुंची चटक लागल्याने अनेक लोक चंगळवादी बनले. ज्यांची आर्थिकदृष्ट्या चैन करण्याची शक्ती नव्हती, ते भ्रष्ट मार्गाने पैसे कमावू लागले. गेल्या दशकाचा भारतीय आर्थिक इतिहास हा आर्थिक घोटाळ्यांचा, बँकांच्या लुटीचा आणि वाढत्या महागाईचा आहे. भारतीय भांडवलदार सत्ताधारी वर्गाने यातून एक मार्ग काढला आहे. त्यांनी सरकारला अशा योजना राबवायला भाग पाडले आहे, ज्यातून भारतातील ऐंशी कोटी लोक किमान जगू शकतील इतके धान्य त्यांना पुरवावे आणि थोडी रक्कम त्यांच्या नावाने त्यांच्या

## देश भोगतोय रथयात्रेचे दुष्परिणाम

भारतात त्याला धार्मिक आणि जातीय संघर्षाचे रूप आले. एकीकडून नरसिंहराव आणि मनमोहनसिंग हे जागतिकीकरणाचे समर्थक बनून संपूर्ण जगाचा भारत एक अविभाज्य भाग बनविण्याच्या प्रयत्नात होते, तर लालकृष्ण अडवाणी राममंदिराच्या नावाने हिंदू आणि मुसलमान यात संघर्ष छेडीत होते. भारताच्या पारतंत्र्याचा काळ केवळ ब्रिटिशांच्या दीडशे वर्षांपूर्वीचा नाही तर तो महम्मद बिन कासिमच्या नवव्या शतकापासूनचा आहे, असे सांगत होते. त्यामुळे इंग्रज जसे भारताचे शत्रू होते तसेच मुसलमानही. म्हणून मुसलमानांविरूद्ध आक्रमक धोरण स्वीकारून त्यांना राजकीयदृष्ट्या दुय्यम दर्जाचे ठरविण्याचे कारस्थान सुरू झाले. भारतात मुस्लिम दहशतवादाचा प्रारंभबिंदू अडवाणींच्या रथयात्रेत आहे. त्यांनी ही भारतीय इतिहासाला दिलेली देणगी होती. तिचे दुष्परिणाम आपण आजही भोगत आहोत.

बँक खात्यावर जमा करावी. अर्थात, ती रक्कमही मतदानाच्या आठवड्यात त्यांच्या हाती पडावी, जेणेकरून त्यांचे मतदान प्रभावित होऊ शकेल. याचा अर्थ, आता भांडवलशाही आपल्या राजकीय पक्षाला सत्तेवर आणण्यासाठी गरीब मतदारांच्या मतांची खरेदी करीत आहे. ही बाब सर्वात जास्त अस्वस्थ करणारी आहे. त्यामुळे लोकशाही तर उद्ध्वस्त होईलच; परंतु भारतीय संविधानही एक कागदी घोडा म्हणून उभे राहील.

## पर्यावरण संतुलन अनिवार्य

या सर्वांच्या पाठीमागे एक फार मोठे कारण आहे आणि ते म्हणजे भांडवलशाही अर्थव्यवस्थेतील विकासाची कल्पना. विकास म्हणजे प्रचंड उत्पादन, जगाच्या पाठीवर ते कुठल्याही प्रदेशात विकण्याचे स्वातंत्र्य आणि त्याच्या किमती ठरविण्याचे हक्क सुरक्षित ठेवणे. अधिक उत्पादनासाठी तंत्रज्ञानाचा मुक्तहस्ते वापर करणे आणि तंत्रज्ञानाची मालकी स्वतःकडे ठेवणे. या तंत्रज्ञानाच्या मालकीमुळे आणि अनिर्बंध स्पर्धेमुळे भांडवलशाहीने संपूर्ण निसर्गाला एक उपभोगाची वस्तू मानून त्याला चहूबाजूंनी कुरतडून काढले आहे; परंतु माणसांना एकेकाळी सुरक्षित ठेवणारा निसर्ग आता त्यांच्यावरच कोपलेला आहे. तो त्याची उग्र रुपे दाखवू लागला आहे. कधी भरपूर पाऊस पाडून, तर कधी जंगलाला वणवे लावून. कधी त्सुनामीच्या लाटा आणून, तर कधी तापमानात वाढ करून. पृथ्वीचे तापमान दोन अंश सेल्सिअसने वाढले तर अर्धीअधिक पृथ्वी सागराने वेढली जाईल. त्यामुळे आज जगाला त्याच्या विकासाच्या कल्पनेचा पुनर्विचार करणे ही तातडीची गरज आहे. बौद्ध धर्मात एक सम्यक आजीविकेचे तत्त्व आहे. म्हणजे आपले जीवन सुख आणि समाधानाने कसे जगता येईल याचा एक मार्ग आहे. अष्टांग मार्गात त्याचा समावेश आहे. या सम्यक आजीविकेच्या मार्गाने जगाने वाटचाल केली तर त्याला निसर्गाचे अतिरिक्त शोषण करावे लागणार नाही. निसर्गात आज माणसांच्या सर्व गरजा भागविण्याचे असंख्य स्त्रोत आहेत. आपल्या आवश्यक गरजेइतका त्या स्त्रोतांचा उपयोग केला तर निसर्ग मुक्त हस्ताने मानवी गरजा पूर्ण करू शकेल. कारण माणूस हा निसर्गाचेच अपत्य आहे आणि त्याचे संगोपन करण्याची जबाबदारी त्याने त्याच्या जन्मावेळीच ठरविलेली आहे. म्हणून कार्ल मार्क्स यांनी म्हटले होते, की 'निसर्ग हा माणसाचे निरिन्द्रिय शरीर आहे'. 'नेचर इज दि इनऑर्ग्यानिक बॉडी ऑफ अ मॅन'. त्याला जर माणसाने जखमी केले तर माणूसच जगणार नाही. म्हणून आज माणसाच्या जीवंत राहण्याची पूर्व अट ही पर्यावरणातील संतुलनावर अवलंबून आहे.

यापूर्वी सांगितल्याप्रमाणे तंत्रज्ञानाच्या मालकीमुळे भांडवलशाहीने माणसांच्या श्रमशक्तीला उत्पादन प्रक्रियेतून बाजूला फेकून दिले आहे. त्याची जागा यंत्रशक्तीने घेतली आहे. त्यामुळे कोट्यवधी लोक बेकार झालेले आहेत. ते आपल्याला कोरोनाकाळात सर्व प्रसारमाध्यमांतून भेटलेले आहेत. त्यापैकी काही स्थलांतर करताना मरून पडलेले दिसले आहेत, तर काहींचे शव गंगेच्या पाण्यावर तरंगताना पाहिली गेली आहेत. त्यापैकी उरलेले कोट्यवधी लोक आज भांडवलशाहीच्या दृष्टीने 'निरूपयोगी' (युजलेस) ठरलेले आहेत. त्यांचे काय करायचे, ही भांडवलशाहीला सतावणारी एक प्रचंड समस्या आहे. त्यासाठी एकतर त्यांना गुलाम बनवून गुलामगिरीच्या पद्धतीचे पुनरुज्जीवन करावे लागेल किंवा हिटलरने जसे गॅसचेंबरमध्ये लाखो ज्यूंना विषारी वायूने मारून टाकले तसे मारावे लागेल.

कोरोनाचा विषाणू हा निसर्गनिर्मित आहे, की मानवनिर्मित याचा शोध अद्याप लागलेला नाही. त्यावर केले गेलेले उपचार हे मूलभूत स्वरूपाचे नव्हते तर केवळ लक्षणाधारित (सिम्टोमॅटिक) अंगाने केले गेले होते, हेसुद्धा या ठिकाणी लक्षात ठेवले पाहिजे. आज या निरूपयोगी जनतेची संख्या वाढत आहे. आपण या व्यवस्थेत पूर्णपणे निरूपयोगी ठरलो आहोत, ही भावना आज प्रत्येक बेकार तरूणाच्या अंतःकरणाला वेदना देत आहे. त्यामुळे सारी तरूणाई अस्वस्थ आणि उदास बनलेली आहे. ते समाजापासून तुटले आहेत. बेकारीमुळे कुटुंबापासूनही तुटले आहेत. त्यांचा स्वतःचाच स्वतःवर विश्वास राहिलेला नाही. एक तर व्यसनाधीन होणे, त्याच्या पूर्तीसाठी छोटे-मोठे गुन्हे करणे किंवा आत्महत्येव्यतिरिक्त त्यांच्यापुढे अन्य कोणताही पर्याय शिल्लक नाही. ही सारी माणसे परात्म झालेली आहेत. जगण्याच्या प्रक्रियेत ते मूक बनून जगाला न्याहाळण्याचा प्रयत्न करीत आहेत; परंतु त्यांच्या डोळ्यातील दुःखाश्रूंनी त्यांची दृष्टी अधू केलेली आहे. परात्म, एलियनेटेड माणसांचे जगणे हे जीवंत मढ्याचे जगणे असते. त्यांना जागृत कसे करायचे, हा आजचा सर्वात मोठा प्रश्न आहे. त्यांना त्यांच्या गुलामीची, परात्मतेची आणि उपयोगशून्यतेची जाणीव करून देणे हीच सर्वात मोठी मानवी सेवा ठरणार आहे. आपण या व्यवस्थेला बदलू शकत नाही याची वेदना आणि अस्वस्थता अनेक विचारवंतांना जाणवत आहे. त्यासाठी एक मोठा संघर्ष होऊ घातलेला आहे. त्यात सर्व विचारवंत, तत्त्वज्ञ, कलाकार आणि साहित्यिक उत्साहाने भाग घेतील, अशी सुरक्षितता त्यांना देणारी संघटना हवी आहे. हे काम अनेक देशांत झालेल्या क्रांतिकारी परिवर्तनात त्यांनी केलेले आहे. उद्याही ते त्यांना करावे लागेल. कारण बदल हा निसर्गाचा स्थायीभाव आहे. सिद्धार्थ गौतम बुद्धाने असे म्हटले होते, की 'विचाराशिवाय माणसाच्या मनाला अस्तित्व नसते आणि गतिशिवाय त्याच्या शरीरालाही'. धम्मपद याच्या साक्षीला आहे. त्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी त्यांच्या 'स्टेट्स अँड मायनॉरिटीज...' या जाहीरनाम्यात लोकशाही समाजवादी व्यवस्थेचे प्रारूप ठेवलेले होते. आज त्याची पाने पुन्हा एकदा समजून घेण्याची वेळ आली आहे. आज आपण सुरक्षित आहोत असे ज्यांना वाटत असेल, त्यांनी या भ्रमात राहू नये. आज ते सुपात असतील; परंतु उद्या ते जात्यात भरडले जातील हे निश्चित आहे. आजच्या साऱ्या मानवी दुःख आणि वेदनांना, अस्वस्थता आणि निकामीपणाला एकच उत्तर आहे, ते म्हणजे भांवडली धार्मिक राष्ट्रवादाचा त्याग आणि लोकशाही समाजवादाची स्थापना.

**(लेखक ज्येष्ठ विचारवंत आणि साहित्यिक आहेत)**

# जातींमधल्या धगीमुळे लोकशाहीची कुचंबणा



**आतून भ्यालेल्या, अस्वस्थ जाती जे काही करीत आहेत, त्यातून भारतीय लोकशाही आतून पूर्णतः पोखरून निघत आहे आणि भांडवली अर्थव्यवस्था उन्मत्त होत निघाली आहे.**



डॉ. नागनाथ कोत्तापल्ले

कुठल्या कारणांनी का होईना, संतांना जातीसंस्थेविरूद्ध बंडखोरी करता आली नाही; परंतु जातीसंस्थेमध्ये होणारी त्यांची घुसमट, त्यामुळे येणारे दुःख त्यांच्या अभंगांमधून ठायीठायी व्यक्त झाले आहे. पुढे आधुनिक कालखंडात मात्र जातीसंस्थेमुळे वाट्याला येणारे दुःख अधिक धारदारपणे व्यक्त होऊ लागले. एवढेच नाही, तर जातीसंस्थेच्या जोखडातून मुक्त झाल्याशिवाय लौकीक जीवन सुखी होणार नाही, असे सांगितले जाऊ लागले. जातीसंस्थेविरूद्ध एल्गार पुकारला गेला. स्पृश्य-अस्पृश्य आणि उच्च-नीचभाव याविरूद्धचे पाऊल म्हणून 'सत्यशोधक समाजा'ची स्थापना करण्यात आली. त्यासाठी 'सत्यशोधक धर्मपुस्तक' तयार करण्यात आले. आर्य समाजाने स्वतंत्र धर्माची घोषणा केली नाही. ते हिंदू धर्माला चिकटून राहिले; परंतु त्यांनी जातीसंस्थेची सर्व बंधने झुगारून दिली. म्हणजे मध्ययुगापासून किंवा त्याही आधीपासून जातीसंस्थेच्या जोखडाला झुगारून देण्याचे प्रयत्न झाले. आधुनिक काळात त्याला काही प्रमाणात मूर्त स्वरूप मिळाले. म. गांधी, महर्षी वि.रा. शिंदे यांनी अस्पृश्यतेविरूद्ध भूमिका घेतल्या, कार्य केले. मात्र डॉ. बाबासाहेब आंबेडकर या झंझावाताने साऱ्यांना खडबडून जागे केले. पुढे दलितांना खेडी सोडायला सांगितले. शेवटी जातीसंस्थेतून मुक्ती मिळविण्यासाठी धर्मांतर केले. स्वातंत्र्यानंतर भारतीय राज्यघटना स्वीकारण्यात आली. त्याप्रमाणे अस्पृश्यता पाळणे हा गुन्हा ठरला. अस्पृश्य जातींच्या दुःखाचे कारण जसे सामाजिक आहे, तसे आर्थिकही आहे. हे लक्षात घेऊन दलितांसाठी राखीव जागा आणि शिक्षणासाठी शिष्यवृत्ती असे काही धोरणात्मक निर्णय घेण्यात आले. परिणामी स्पृश्य-अस्पृश्य भाव पुष्कळच कमी झाला. जातीय भावना मात्र मोठ्या प्रमाणात कमी झाली नाही. असे असले तरी जाती निरर्थक आहेत, माणसानेच हितसंबंधांच्या रक्षणासाठी निर्माण केलेल्या आहेत. याची जाणीव सामान्य माणसांना होऊ लागलेली होती. मानवी संबंधांमध्ये पुष्कळच मोकळेपणा आलेला होता. दलितांवर अन्याय अत्याचार होत होते. तरी त्यांच्या बाजूने उभे राहणारेही खूप लोक होते. हा 'सामाजिक अपराध' आहे, अशी सर्वसाधारण भावना होती.

हे सारे चित्र साधारणतः १९८५-९० पर्यंत होते. येथे त्यापूर्वीच्या सामाजिक इतिहासाचा अत्यंत धावता आणि स्थूल आढावा घेतला आहे. कारण आपल्याला सद्यःस्थितीबद्दल बोलायचे आहे.

## समाजात भिनले विष

आजचे चित्र एकदम उलट दिशेला म्हणजे भूतकाळाकडे तोंड करून उभे असल्याचे दिसेल. मध्ययुगामध्ये आपापल्या जातीला चिकटून राहिलेच पाहिजे, अशी धार्मिक बंधने होती. ही बंधने पाळले जात आहेत की नाही ते शासकीय यंत्रणा पाहत होती. एखादा जातीबाहेरचे काही काम करू लागला तर त्याला लगेच शिक्षा मिळत होती. अशा शिक्षेची विपुल उदाहरणे मध्ययुगात सापडतात; परंतु स्वातंत्र्यानंतर कोणाला कोणताही व्यवसाय-नोकरी करण्याची रीतसर परवानगी मिळाली. शिक्षणाचे प्रमाण वाढून पूर्वाश्रमीच्या अस्पृश्यांसह बहुजनांना जातीबाहेरचे व्यवसाय-नोकऱ्या करता येऊ लागल्या.

आणखी एका महत्त्वाच्या बाबीचा उल्लेख केला पाहिजे. ती बाब म्हणजे, 'लोककल्याणकारी राज्य' या संकल्पनेवर शासनाचा विश्वास होता. त्याचे पुष्कळच फायदे गोरगरीब, शोषित, वंचित आणि दलितांना झाले, यात काही शंका नाही. शिवाय कामगारांना कायदे करून पुष्कळच संरक्षण दिले गेले; परंतु आश्चर्याची आणि दुःखाची गोष्ट अशी, की ज्या जातीसंस्थेने आम्हाला नागविले असे म्हटले जात होते, त्या जातीसंस्थेच्या आश्रयाला दलित-बहुजनांसह सारेच जात आहेत. स्वातंत्र्यानंतर जन्मलेल्या पिढीला जातीसंस्थेच्या बंधनांमुळे कोणत्या यातना भोगाव्या लागत होत्या, ते त्यांना माहीत नाही. घोटभर पाण्यासाठी तडफडणारी माणसे त्यांनी पाहिली नाहीत. धर्माच्या गारूडातून कशी लूट होत असे, हेही त्यांनी पाहिले नाही. त्यांना भारताच्या भव्यतेची खोटी स्वप्ने हितसंबंधी मंडळी दाखवीत



आहेत आणि ते त्याला बळी पडत आहेत. अनेक दलित मंडळी अत्यंत प्रतिगामी विचारांच्या जाळ्यात सापडली आहेत. ज्यांनी भारतीय राज्यघटना ही 'गोधडी' आहे असे म्हटले होते, आजही जे राजधानीच्या ठिकाणी भारतीय राज्यघटना जाळतात, ज्यांचा हिंसेवर नितांत विश्वास आहे आणि ते जाहीरपणे सांगतातही, त्यांच्या कच्छपी काही दलित आणि बहुजन लागले आहेत. हे सारे अचंबित करणारे आहे. त्याहीपेक्षा अचंबित करणारी गोष्ट म्हणजे बहुजनांना अंधश्रद्धेच्या, खोट्या इतिहासाच्या खोड्यातून सोडविण्यासाठी अथक प्रयत्न केले, त्यांच्या खुनात बहुजन समाजातील तरूण असल्याचे दिसते. हे का व कसे झाले, याचा नीट विचार केल्याशिवाय या देशाला भवितव्य नाही. दुःखाची गोष्ट अशी, की कळीच्या मुद्यांच्या अनुषंगाने कोणालाही विचार करावयाचा नाही. कोणाकडून किती तुकडे मिळतात, एवढाच विचार सध्या सुरू आहे. म्हणजे संपूर्ण समाज पुन्हा जातीसंस्थेच्या खोड्यात अडकत चालला आहे. समता नको 'समरसता' हवी असे म्हणणाऱ्यांच्या कच्छपी बहुसंख्य समाज लागला आहे. म्हणजे समाजात विष पुरेसे भिनले आहे.

## जातींवरच राजकारण

या देशात इंग्रज दीडशे वर्षे राहिले ते 'फोडा आणि झोडा' या नीतिमुळे. खरे तर, त्यांना फोडण्याचे कार्य करावेच लागले नाही. आम्हीच असंख्य जातींमध्ये विभागलेलो होतो. आजही भांडवलदारी व्यवस्थेला गोरगरीब आणि श्रमिकांचा एकोपा नको असतो. श्रमिक, वंचित, बहुजन जितके विभागलेले, तितकी त्यांची मौज अधिक. जातीसंस्थेचे महत्त्वाचे वैशिष्ट्य काय, तर शोषितांमधल्या विविध घटकांना जवळच येऊ देत नाही.

जाती या लोकशाहीच्या विरोधी आहेत, असे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सांगितलेले आहे. याचा अर्थ, विचारांच्या पायावर राजकारण केले पाहिजे आणि समस्त जनतेचे कल्याण हा तिचा हेतू असला पाहिजे; परंतु आज 'माणसांना वाटणाऱ्या' जातींच्या पायावरच राजकारण सुरू झालेले दिसते. म्हणजे आम्ही जातीसंस्थेच्या खोड्यात पूर्णतः अडकून पडलो आहोत. याचे अत्यंत झगझगीत उदाहरण पहावयाचे असेल तर उत्तर प्रदेशाकडे पाहता येईल. तेथे बहुसंख्य राजकीय पक्ष जातींच्या आधारेच उभे राहिलेले आहेत, असे दिसते. स्थूल मानाने असे दिसते, की जातीगणिक एक एक राजकीय पक्ष उत्तर प्रदेशात आहे. समाजवादी पक्ष प्रामुख्याने यादवांचा पक्ष आहे, असे दिसते. बहुजन समाज पक्ष हा प्रामुख्याने चर्मकारांचा पक्ष आहे. राजभर, निषाद पार्टी, पासवान यांचा पक्ष हे त्या त्या जातींचे पक्ष आहेत, असे म्हणता येईल. अर्थात, इतर जातींचे लोक आपल्या पक्षात यावेत यासाठी हे सारेच पक्ष प्रयत्न करतात. म्हणूनच मायावती 'हाथी नही गणेश है' असल्या घोषणा देतात. अर्थात, इतर जातीतील लोक या पक्षात आले तरी ते अल्पसंख्य राहणार, हे उघड आहे. एवढेच नाही तर, केंद्रातील भाजपा सरकारही आपल्या मंत्रिमंडळात किती ओबीसी मंत्री आहेत, याची जाहिरात करतेय. उत्तर प्रदेशात ब्राह्मणांची बऱ्यापैकी संख्या आहे म्हणून सारे पक्ष परशुरामाचे मंदिर उभे करण्याची घोषणा करतात. एवढेच नाही तर, आंदोलक शेतकऱ्यांवर गाडी चढविणाऱ्या आणि शेतकऱ्यांना मारणाऱ्या गुन्हेगाराचे वडील ब्राह्मण आहेत, मंत्री आहेत. वस्तूतः गृहराज्यमंत्री असलेल्या मंत्र्याच्या मुलाची चौकशी पोलिस कसे करू शकतील, हा साधा प्रश्न आहे; परंतु ज्याच्यावर खुनासारखे असंख्य गुन्हे प्रलंबित असताना, त्याला मंत्री म्हणून हटविले जात नाही. याचे कारण काय? तर ब्राह्मण मते गमवावी लागू नयेत म्हणून. येथे दोन महत्त्वाचे प्रश्न उपस्थित होतात. एक म्हणजे, एखाद्याच्या ताब्यात एक संपूर्ण जातच्या जात राहू शकते का? म्हणजे रहावी का? ब्राह्मण मतदारांनी गुन्हेगाराला पाठीशी घालावे का? आणि दुसरा प्रश्न म्हणजे गुन्हेगार असूनही त्याला मंत्रीपदी केवळ ब्राह्मण आहे म्हणून ठेवावे का? हे तर मनुस्मृतीप्रमाणेच झाले की! उत्तर प्रदेशातील काही राजकीय पक्षांच्या अनुषंगाने येथे काही निर्देश केले. आणखीही काही राजकीय पक्ष असतीलच. या पार्श्वभूमीवर प्रत्येक प्रांतातील पक्षांकडे पहावयास हरकत नाही.

## मनात जात कायम

हे झाले राजकीय पक्षांच्या संदर्भात. आपल्या वैयक्तिक जीवनात काय आहे? नातेसंबंध पाहताना पदर जुळतो की नाही ते आवर्जून पाहिले जाते. नुसती जातच नाही, तर पोटजातही पाहिली जाते. कुठल्याही जातीमध्ये किमान साडेबारा जाती असतात. नातेसंबंधच नाही, तर मतदान करतानाही पोटजात पाहिली जाते. एखाद्या पक्षाचे जेव्हा अनेक तुकडे होतात, तेव्हा त्यामागे पोटजात तर नाही ना, असा प्रश्न उपस्थित करून शोध घ्यावा. यातूनच 'ऑनर किलिंग' सारखे प्रकार घडताना दिसतात. तसेच परजातीच्या गुणी तरूणांचे खून होतानाही दिसतात. जातीय भावना किती टोकाला पोहोचलेली आहे, हे अशा घटनांमधून लक्षात येते. यामध्ये केवळ उच्च जातीचेच लोक आहेत असे नाही. ब्राह्मण महासंघ, मराठा महासंघ, वैश्य वाणी संघटना अशा उच्च व धनिक जातींच्या संघटना आहेत. प्रस्थापित व्यवस्थेने त्यांना जे संरक्षण दिलेले होते, लोकशाहीमुळे त्याला तडे

जात आहेत. ते संघटना बांधताना दिसतात; परंतु परंपरेने ज्यांचे कायम शोषण केले, त्या जातीही आपापल्या संघटना तयार करून जातीय जोर दाखवीत आहेत. पूर्वाश्रमीच्या अस्पृश्य जातीही यात मागे नाहीत. एक दलित जात काँग्रेसबरोबर असेल तर दुसरी जात भाजपबरोबर असते. तिसरी जात शिवसेनेबरोबर असते. साऱ्या दलित जाती एकत्र का येऊ शकत नाहीत, हा कळीचा प्रश्न आहे. येथे नेतृत्वाची भांडणे तर असतातच, पण इतिहासातील जातीजातींमधील क्षुद्र हेवेदावेही असतात. एकंदरीत काय, की उच्च आणि धनवान जात असो, की निर्धन आणि तळाची जात असो, त्यांना परस्परांच्या विरोधात उभे राहण्यात सार्थक वाटत आहे. अंतिमतः हे सर्वांसाठी विनाशकारी आहे, हे कोणीही लक्षात घेत नाही. हे एवढ्यावरच थांबत नाही, साऱ्याच जातींमध्ये स्वतःच्या जातींबद्दल अभिमान ओतप्रोत भरून वाहतो आहे. मागचा इतिहास विसरून अमूक रक्त कसे श्रेष्ठ आहे, हे कडोनिकडीने सांगत आहेत. आज मंगळावर जाण्याची स्वप्ने बाळगणाऱ्या भारतातील सामान्य माणसालाही सगळ्यांचे रक्त लालच असते, हे कळू लागलेले आहे. 'मी अमूक रक्ताचा आहे' असे ते अभिमानाने तर सांगू लागलेच आहेत, पण आपल्या जातीचा दुराभिमानही बाळगत आहेत. थोडे सोशल मीडियावर चक्कर टाकली तर काय दिसते? प्रत्येक जातीच्या दोन-चार संघटना व्हॉट्सॲपवर असतात. हे ग्रुप्स केवळ त्यांच्या जातीपुरतेच असतात. (म्हणजे विज्ञान तंत्रज्ञानाचा वापरही आपण मध्ययुगीन मूल्ये जपण्यासाठीच करतो आहोत!) तसेच 'होय मी आमच्या जातींच्या लेखकांचे साहित्य तेवढेच वाचतो' अशी दर्पोक्ती किंवा 'जातीचा दुरभिमान असू नये, पण अभिमान असावा' असा सुभाषितवजा ज्ञानदानाचा प्रकार दिसतो. म्हणजे मध्ययुगात 'जातीसाठी माती खावे' असे होते. आता मंगळावर जाण्याच्या युगात आम्ही तेच गिरवीत आहोत. या साऱ्यांना जातीचा पोकळपणा जाणवत नसेल, असे नाही. तरीही माणसे मध्ययुगात का जाऊ इच्छित आहेत? खरोखरच त्यांना जातीसंस्थेचा काळाकुट्ट इतिहास माहीत नसेल का? म्हणजे सर्व अत्याधुनिक सुविधा घ्यायच्या, भारतीय स्वातंत्र्याची आणि राज्यघटनेने दिलेल्या सर्व संधी उपभोगायच्या, तरी मनात जातीचे (आणि धर्माचेही) जंतू वाढू द्यायचे, याचे कारण काय आहे, हा खरा प्रश्न आहे.

अर्थात, शेकडो वर्षांच्या परंपरांनी भारतीय माणसाचे अवकाश जातीने बंदिस्त केलेले आहे, त्याला जातीबाहेरचे काही दिसत नाही, हे एक त्याचे उत्तर आहे. दुसरे म्हणजे, संकटाच्या वेळी आपल्या जातीचीच माणसे धाऊन येतात, येऊ शकतात असे त्याला वाटते व त्यात तथ्यही बरेच आहे; परंतु आज चित्र काहीसे बदललेले आहे. आणीबाणीच्या प्रसंगी जातीबाहेरची माणसेही परस्परांना मदत करताना दिसतात. तरीही माणसे जातीच्या परिघातच फिरताना दिसतात. विशेषतः नातेसंबंध स्थापित करताना ते जातीचा परीघ ओलांडू इच्छित नाहीत. हेही एक वेळ समजून घेता येईल. पण अभिमान कशासाठी? त्यातून निर्माण होणाऱ्या कडव्या संघटना कशासाठी?

### तात्पुरते सुख मिळवण्याचा प्रयत्न

एखादी खूप जुनी आणि खोलवरची जखम असावी, तिच्यावर खपली धरली की ती आतून हुळहुळावी व त्यावरून हात फिरवला की बरे वाटावे, अशी काहीशी स्थिती जातीसंस्थेची झालेली आहे. सध्या त्या जखमेवरून हात फिरवून म्हणजे अभिमान धरून तात्पुरते सुख मिळविण्याचा प्रयत्न साऱ्याच जाती करीत आहेत.

## सर्वत्र अस्वस्थता

उच्च जातींसंदर्भातील एक कारण सांगता येईल. त्यांना परंपरेने जे काही आपसूक मिळायचे ते आता मिळत नाही. उदाहरणार्थ, ग्रामीण भागात मेलेली गुरे ओढण्याचे काम दलित जाती करीत होत्या. आता त्यांनी गावकीची कामे सोडली. त्यामुळे नगण्य मोबदल्यात होणारी कामे होईनाशी झाली. म्हणजे त्यांचे आर्थिक नुकसान झाले. दुसरी गोष्ट म्हणजे, साऱ्याच जातीचे लोक शिकून शहाणे होत असल्यामुळे उच्चवर्णीयांची एकाधिकारशाही संपली. तेव्हा उच्चवर्णीयांना पुन्हा एकाधिकारशाही निर्माण करायची असेल तर जातीच्या संघटना आवश्यक वाटणे स्वाभाविक आहे. त्यालाच 'देशीवाद' म्हणतात; परंतु परंपरेने शोषित जातींना जातींचा अभिमान का वाटत आहे? अगदी छोट्या-छोट्या नगण्य संख्या असणाऱ्या जातींच्या संघटनांचा काय उपयोग होणार आहे?

या प्रश्नांचा विचार करताना असे लक्षात येते, की नव्या तंत्रज्ञानाच्या काळात, आक्रमक भांडवलदारीच्या काळात साऱ्याच जाती (मग वरच्या असतील किंवा शोषित-वंचित असतील) मनातून भ्यालेल्या आहेत. विशेषतः जागतिकीकरणानंतर भारतभरात प्रचंड अस्थैर्य निर्माण झाले आहे. वाढत्या विषमतेचे बळी प्रामुख्याने शोषित-वंचित जाती होत असल्या तरी उच्चवर्णीय जातींना सर्व आलबेल आहे, असे वाटेनासे झाले आहे. परंपरेने मिळणाऱ्या साऱ्या सुखसुविधा तर संपल्या आहेतच, पण भविष्यात काय मांडून ठेवले आहे याची चिंता त्यांनाही ग्रासून राहिलेली आहे. एक प्रकारचे अस्थैर्य, भीती सर्वांच्या मनात निर्माण झालेली आहे. साऱ्याच जाती आतून अस्वस्थ झालेल्या आहेत. यातून बाहेर पडण्याचा मार्ग (सगळ्याच जातींना) 'राखीव जागा' आहे, असे वाटू लागले आहे. अर्थात, एकेकाळी भरपूर शेती असणाऱ्या जातींमध्ये वाटण्या होत होत कसताही येणार नाही एवढीच जमीन उरली आहे. परिणामी त्यांना दारिद्र्य आलेले आहे. म्हणजे काही जाती आर्थिक गर्तेत फेकल्या गेल्या आहेत. त्यामुळे मोठमोठे मोर्चे काढणे व आपल्या प्रश्नांकडे लक्ष वेधून घेण्याचे प्रकार सुरू झालेले आहेत. आपल्या राखीव जागांवर आक्रमण होऊ नये म्हणून प्रतिमोर्चे निघालेलेही आपण पाहिले आहेत.

## धर्माचं ध्रुवीकरण

येथेच आणखी एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे, की आज बहुसंख्य जातींमध्ये एक धनिकांचा वर्ग निर्माण झालेला आहे. हा

तुलनेने छोटा असेल (त्याच्यापेक्षा दरिद्री वर्ग अधिक असेल) पण धनिकांचा वर्ग निर्माण झालेला आहे, ही वस्तुस्थिती आहे. अशा अवस्थेत खरा लढा कोणता सुरू व्हायला हवा? तर सर्व जातीतील वंचित-शोषितांनी एकत्र येऊन एकूणच अर्थव्यवस्थेविरूद्ध लढा पुकारला पाहिजे. पण तसे होत नाही. साऱ्या वंचितांची आणि शोषितांची विभागणी जातीसंस्थेमुळे सहज होऊन जाते आणि धनिक वर्ग पुन्हा जातीच्या आश्रयाने सुखाने शोषण करीत राहतो. अशा खऱ्या लढ्यापासून भारतातल्या सर्वच जाती पळ काढताहेत आणि आपापल्या जातींच्या आश्रयाला जात आहेत. एक प्रकारे हे पलायनच आहे आणि या पलायनाला निवडणुका हातभार लावत आहेत. निवडणुकांमध्ये अधिकाधिक मते कोणाला मिळतात, हेच महत्त्वाचे ठरते. म्हणून धर्माचे ध्रुवीकरण केले जाते. असे ध्रुवीकरण करून सत्ता मिळविता येऊ शकते, हे काही पक्षांनी सिद्ध केलेले आहे. अर्थात, धर्माचे ध्रुवीकरण करायचे असेल तरी जाती विभागलेल्या राहणेही गरजेचे आहे, असे राजकारण्यांना वाटते आणि नेमके हेच हेरून जाती आपल्या संघटना काढून दबावगट निर्माण करीत आहेत. म्हणजे निवडणुकांमध्ये पैसे मोठ्या प्रमाणात वाटले जातात, हे आता लपून राहिलेले नाही. तसेच जातींच्या म्होरक्यांना तुकडे टाकून ती ती जात आपल्या दावणीला बांधता येऊ शकते, हेही राजकारण्यांनी ओळखले आहे आणि अशी परिस्थिती तर भांडवलदारी अर्थव्यवस्थेसाठी अत्यंत सोयीची असते. मग उद्योगपती विभागणी करणाऱ्या, ध्रुवीकरण करणाऱ्या उमेदवारावर-पक्षावर पैशांची उधळण करतात. (त्याची सव्याज वसुली कशी करावी ते त्यांना माहीत असते.)

याचा अर्थ असा, की आतून भ्यालेल्या, अस्वस्थ जाती जे काही करीत आहेत, त्यातून भारतीय लोकशाही आतून पूर्णतः पोखरून निघत आहे आणि भांडवली अर्थव्यवस्था उन्मत्त होत निघाली आहे. परिणामी प्रचंड अशी आर्थिक विषमता निर्माण झालेली आहे. फक्त ज्यांचे शोषण होत आहे, त्यांनाच त्यांच्या जातीच्या अभिमानामुळे जाणवत नाही. त्यामुळे ते आपल्या प्रश्नांची उत्तरे नको तेथे शोधत आहेत. थोडक्यात असे म्हणता येईल, की एखादी खूप जुनी आणि खोलवरची जखम असावी, तिच्यावर खपली धरली की ती आतून हुळहुळावी व त्यावरून हात फिरवला की बरे वाटावे, अशी काहीशी स्थिती जातीसंस्थेची झालेली आहे. सध्या त्या जखमेवरून हात फिरवून म्हणजे अभिमान धरून तात्पुरते सुख मिळविण्याचा प्रयत्न साऱ्याच जाती करीत आहेत. सध्या या सुखाची नशा इतकी आहे, की जखमेवरती इलाज करणेच आपण विसरून गेलो आहोत! •••

**(लेखक डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे माजी कुलगुरू आणि साहित्यिक आहेत)**




# 'ग्लोबल व्हिलेज' मधील 'भिंती' अन् भेदरट राष्ट्रवाद!




**पूर असो वा गरिबी, बेरोजगारांचे स्थलांतर असो वा देशांच्या विवाद्य सीमारेषा, उपाय काय? तर भिंत बांधा! पण मोदींची भिंत हा अपवाद नाही, तर तो 'नियम' बनतो आहे.**



दत्ता देसाई

या पृथ्वीतलावर मानवी इतिहासात सतत भिंती उभारल्या गेल्या आहेत. त्या विविध भूमिका अदा करत आल्या आहेत. आदिम अवस्थेत मानवाने भिंत उभारण्याचा शोध लावला आणि तो क्रांतिकारी ठरला. घरपण आणि संरक्षण, ऊब आणि साठवणूक, थोडे खाजगीपण तरीही सामूहिक-'समुदाय' जीवन, जगण्याला आकार येणे आणि संस्कृतीचा विस्तार होणे हे घडू लागले. गड-किल्ले आणि बुरूज व खंदक (खंदकांना 'जमिनीत घुसलेल्या उलट्या भिंती' म्हणायला हरकत नाही!) अशा अनेक रूपात या 'भिंती' उभारल्या गेल्या. या अशा उभारल्या जाणाऱ्या भिंतींमुळे अर्थात पुढेपुढे अनेक प्रश्न निर्माण झाले. त्या 'वेगळेपण' आणि अलगतावाद, संचय आणि सत्ताकेंद्र, आक्रमणाचा आणि वर्चस्वाचा आधार असेही कार्य पार पाडू लागल्या!

## भिंती हा वैश्विक विषय

मानवी जग देवघेव करत आणि एकत्र येत असतानाच उभ्या होणाऱ्या भिंती हा एक जगड्व्याळ विषय आहे. इतिहासातील तीन उदाहरणे पाहाण्यासारखी आहेत. दोन हजारांहून अधिक वर्षांपासूनची जेरुसलेममधील 'पश्चिम भिंत' वा 'रूदन भिंत' (wailing wall- पण ही शब्दयोजना अपमानास्पद मानली जाते) वा 'अल-बुराक भिंत'या नावाने ओळखली जाणारी ही एक बहुधर्मिय भिंत आहे. ती ज्यू आणि इस्लामधर्मीय या दोघांसाठी पवित्र वा पूज्य स्थळ आहे. तिथे इश्वराचे वास्तव्य आहे असे ज्यू मानतात. इतिहासात झालेला त्यांच्या मंदिरांचा विध्वंस आणि अवमान याबद्दल या भिंतीसमोर येऊन ते अश्रू ढाळतात. तर महंमद पैगंबरांचे स्वर्गारोहण झाले तेव्हा त्यांचा या जागेला स्पर्श झाला असे इस्लामधर्मीय मानतात. ही भिंत असलेले जेरुसलेम शहर हे ज्यू, इस्लामी तसेच ख्रिश्चनधर्मीय आणि ब्रिटिश व युरोपीय सत्ता, तुर्की सत्ता, अमेरिकी महासत्ता, इस्रायल आदि सत्तांच्या तणावाचे केंद्र राहात आली आहे. अगदी विसाव्या शतकातही ही भिंत म्हणजे धार्मिक तणाव आणि हिंसाचार यांचे स्थळ बनून राहात आली आहे.

इसवी सन पूर्व सातव्या शतकापासून ते इसवी सनाच्या १७ व्या शतकापर्यंत वेळोवेळी बांधली गेलेली चीनची भिंत हे तर जगातील एक आश्चर्य मानले गेले आहे. युरेशियन स्तेप प्रदेशातून होणारे भटक्या टोळ्यांचे हल्ले व मंगोल प्रदेशासह अनेक ठिकाणांहून येणारी परचक्रे रोखण्यासाठी सुमारे वीस हजार किमी एवढ्या एकंदर लांबीची ही भिंत विविध चिनी सम्राटांनी बांधली! तिने या साम्राज्यांचे, तेथील 'सभ्यते'चे (महासंस्कृतीचे) संरक्षण केले आणि तिची बरीचशी अलगता जोपासली. इतकी की आता देवघेव रोखणाऱ्या, अडथळा उभा करणाऱ्या आणि अलगता वा फारकत टिकवणाऱ्या कोणत्याही प्रत्यक्ष वा आभासी रचनेला 'चिनी भिंत' म्हणून ओळखले जाते. अगदी आधुनिक व्यवस्थापनामध्येही या संकल्पनेचा वापर केला जातो! चीन, आजवर 'बांबूच्या पडद्या' आड असलेली 'समाजवादी' सत्ता, आता अमेरिकेला आव्हान देणारी एकविसाव्या शतकातील महासत्ता बनली आहे. जगाचा आजवरचा सत्ता-तोल डळमळीत करणारा, एकीकडे युरोप-अमेरिका-ऑस्ट्रेलिया-जपान-भारत आणि दुसरीकडे चीन असा नवा जागतिक संघर्ष धुमसत आहे. ही भिंत अर्थातच तो थांबवू शकत नाही!

## भिंतीआड दडले होते शोषण

साधारण दीडशे वर्षांपूर्वी भारतात एक अद्भूत 'भिंत' उभी केली गेली होती. ही भिंत तेव्हाच्या पंजाबमध्ये सिंधू नदी काठापासून सुरू होऊन कानपूर, तिथून दक्षिणेकडे बऱ्हाणपूर, पुढे पूर्वेकडे वळून ओरिसातील संबलपूर म्हणजे महानदीपर्यंत असे. काटेरी झाडे-झुडपे आणि अधेमधे मातीचे ढिगारे यांनी बनलेले कुंपण-कम-भिंत असे ते प्रकरण होते. सरकारी भाषेत ही 'इनलॅंड कस्टम्स लाईन' होती. या 'भिंती'त दर चार मैलांवर एक पोलिस-कम-कस्टम्स चौकी असे. ही 'भिंत' सांभाळायला एका टप्प्यावर बारा हजार कर्मचारी होते. ही भिंत ओलांडणाऱ्या कोणाही प्रवाशाकडे मीठ हा मौल्यवान पदार्थ सापडल्यास त्याला जबर जकात आकारली जाई. माणसे इथली, जमीन इथली, काटे आणि झुडपे इथली, मीठ इथले पण ते याच प्रदेशात इथल्याच माणसांनी एकीकडून दुसरीकडे नेल्यास जकात द्यावी लागे! आणि तीही कोणाला? तर परकीय ब्रिटिश वसाहतवादी

सत्तेला! ही होती एक साम्राज्यवादी 'भिंत'ज्या सत्तेची भाषा होती 'मागास' संस्कृतींना आणि समाजांना प्रगतीचा मार्ग दाखवण्याची! प्रत्यक्षात या भिंतीआड दडले होते भयावह वर्चस्व आणि शोषण! हे विविध मार्गांनी घडले जगभरच्या वसाहतींमध्ये. ज्या जखमा, जी शोषणपद्धती आणि जी उतरंड आजही मध्य-दक्षिण अमेरिका, अख्खा आफ्रिका आणि बहुतांश आशिया यामध्ये प्रभाव व वर्चस्व टिकवून आहे. तेथील असुरक्षितता, दैन्य, विषमता आणि अशांतता यांचे ते एक महत्त्वपूर्ण कारणही आहे.

इतिहासात अशी असंख्य उदाहरणे आहेत. धर्माचा उदय, त्याची प्रतिके आणि उपासना पध्दती असो वा साम्राज्यांची उभारणी, त्यांचा कारभार आणि संरक्षण असो, वा शोषण आणि उतरंड टिकवून धरणे असो, या प्रत्येकात 'भिंती' गुंतलेल्या होत्या आणि त्या तत्कालिन तणाव वा संघर्षाच्या निदर्शक होत्या. पण त्यांच्या उभारणीचे कारण आणि परिणाम हे दोन्ही थेट दिसत होते, ते फसव्या भाषेत गुंडाळलेले नव्हते. या साऱ्याला तोंड देत विविध खंडातील आणि एकंदर जगातील माणसे आणि वस्तू व उत्पादने, कल्पना आणि ज्ञान, समाज आणि संस्कृती, समूह आणि जीवनपध्दती हे एकत्र येत होते. पुनःपुन्हा उभ्या केल्या जाणाऱ्या अशा 'भिंतीं'वर धडका देत आणि त्यांना तोडत ही जगाची एकजूट घडवण्याची माणसांची धडपड सतत चालूच राहात आली आहे.

## विस्फोटक-विक्षुब्ध अस्वस्थता

आधुनिक पूर्व इतिहासातील या घटना व या भिंती आणि वर्तमानातील अशा घटना व भिंती यात एक महत्त्वपूर्ण फरक आहे. या ऐतिहासिक घटना 'जग एक आहे' अशा घोषणा करत, त्याचवेळी त्यात कोलदांडा घालणाऱ्या आणि बाहेरून आक्रमक पण आतून भेदरट अशा संकुचित 'राष्ट्रवादा'च्या निदर्शक नव्हत्या. त्यावेळी अजून राष्ट्रवाद जन्मला नव्हता आणि त्यात पॉलिश्ड दुटप्पीपणा आणि फसवेपणा आलेला नव्हता. वर्तमान जगातील संकुचित राष्ट्रवाद आणि त्याच्या 'भिंती' हे मात्र एकीकडे भ्रमजाल आहेत, तर दुसरीकडे ते कधी नव्हे एवढे विस्फोटक व विक्षुब्ध अस्वस्थता दर्शवत आहेत. आजही विस्फोटक-विक्षुब्ध अस्वस्थता का आहे हा खरा प्रश्न आहे.

आज आपण ज्या वर्तमानात जगत आहोत ते वर्तमान चार-दोन वर्षांचे नाही. देशांच्या आणि समाजांसंदर्भात इतिहासच नव्हे तर वर्तमानही वर्षांत नव्हे, तर दशकांत मोजावे लागते. आपले आजचे वर्तमान हे किमान चार दशकांचे आहे. तसेच हे वर्तमान केवळ स्थानिक वा 'राष्ट्रीय' नाही, तर ते आता क्षणोक्षणी आणि खरोखरी जागतिकही आहे. या अस्वस्थ वर्तमानाची मुळेही एका महाविसंगतीत दडली आहेत. साधारण चार दशकांपूर्वी वर्तमान जागतिकीकरणाची प्रक्रिया गतिमान झाली. त्यावेळी 'ग्लोबल व्हिलेज'ची कल्पना मोठा गाजावाजा करत जगभरात मांडली गेली. सार्वत्रिक संपन्नता, विकासाची समृध्दी व सर्वांना न्याय देणारे आणि आजवरच्या सर्व 'भिंती' मोडणारे असे एक नवे जग निर्माण करण्याचा वायदा यामध्ये होता. जगातल्या सीमा आणि समस्या जणू कायमच्या संपुष्टात येणार होत्या आणि हे 'खेडे' म्हणजे


डोनाल्ड ट्रम्प यांच्या अहमदाबाद भेटीत त्यांच्यापासून आमची गरिबी लपविण्यासाठी मोदी सरकारने भिंत बांधली होती.

जणू एक शांत, निरागस, परिपूर्ण (idyllic) असे मानवी जग बनणार होते!

असे मानवी 'ग्लोबल व्हिलेज' जर आकाराला आले असते तर ते सर्वांनाच हवे होते. ही केवळ कवी-कल्पना नव्हती व नाही. जगभरात तशा आर्थिक-तंत्रवैज्ञानिक-उत्पादक अफाट शक्यता निर्माण झाल्या आहेत आणि त्याचवेळी अशा तीव्र पर्यावरणीय-राजकीय-सामाजिक गरजा उभ्या होत आहेत, की ज्या सोडवायच्या तर सर्व जगाने एक व्हावे लागेल. पण घडते आहे उलटेच! अख्खे जग नव्या-जुन्या भिंतींनी आणखी विभागले जात आहे. गळेकापू स्पर्धा, टोकाची उतरंड आणि भीषण विषमता यांनी ते चिरफाळले जात आहे. असुरक्षितता, दहशत आणि भय यांत ते लडबडले आहे. अगदी प्रत्येक व्यक्तीपासून ते प्रत्येक समाज, सर्व देश आणि अख्खे जग एका अनिश्चिततेत ढकलले गेले आहे, अशा 'वर्तमाना'त की जिथे आशादायक 'भविष्य' हे अंधारात गाडले जात आहे.

## राष्ट्रवाद भेदरट का?

आजच्या 'वर्तमाना'च्या बुडाशी ही महाविसंगती खदखदते आहे. त्यामुळे आज गरज आहे ती हे अस्वस्थ वर्तमान दोन्ही शिंगांनी हातात घेऊन त्याच्याशी झुंजण्याची. पण त्याऐवजी प्रयत्न सुरू आहेत ते हे सर्व प्रश्न आणि या साऱ्या विसंगती 'भिंतीं'मागे दडवून आणि दडपून जगाचा गाडा पुढे रेटण्याचे. हे सर्वच राष्ट्रांत सुरू आहे, मग ती श्रीमंत महासत्ता असो, वा ते अतिगरीब राष्ट्र असो, ती लोकशाही असो वा हुकूमशाही. सर्वात कडी म्हणजे अशा प्रयत्नांना मुलामा दिला जातो आहे तो कथित 'राष्ट्रवादा'चा, जो वास्तवात आहे-भेदरट राष्ट्रवाद! अर्थात, इथे एक प्रश्न पडू शकतो. मोदींपासून ट्रम्पपर्यंत, बोल्सनारोपासून पुतीनपर्यंत आणि चीनपासून चिलीपर्यंत जगभर सर्वजण एवढा वीरश्रीयुक्त राष्ट्रवाद बोलत आहेत, आपापल्या महान देशाच्या व त्याच्या सुरक्षेच्या नावाने सतत शड्डू ठोकत आहेत, की आज जगभर सर्वांचाच राष्ट्रवाद आक्रमक आणि टोकदार झालेला दिसतो आहे. पण मग प्रश्न असा येतो, की असा 'वीरश्रीपूर्ण', 'आक्रमक' आणि 'तेजःपुंज' राष्ट्रवाद हा भेदरलेला

कसा काय बरे असू शकतो? त्याला 'भिंतीं'ची गरज का भासते आहे? हा राष्ट्रवाद जर भेदरट असेल, तर मग तो तसा का आहे? याचा आणि आजचे वर्तमान अस्वस्थ असण्याचा नेमका संबंध काय आहे?

गेल्या वर्षी फेब्रुवारी-मार्च (२०२०) मध्ये अहमदाबादमध्ये उभारल्या जाणाऱ्या एका भिंतीची चर्चा सगळीकडे गाजत होती. केवळ भारतीय माध्यमांमध्येच नव्हे तर जगातही ती गाजली! निमित्त होते 'नमस्ते ट्रम्प' महाकार्यक्रमाचे! पृथ्वीच्या थेट 'उलट्या' बाजूचा, 'पश्चिमे'चा आणि खऱ्या अर्थी जागतिक महासत्तेचा मुखंड डोनाल्ड ट्रम्प भारतात येणार होता. त्याची आणि पूर्वेकडच्या या देशात, भारतात, स्वतःला महासत्ता म्हणवून घ्यायला आतुर बनलेल्यांचे मुखंड मोदी, या दोघांची अहमदाबादमध्ये गळाभेट होणार होती! या महान मंगल प्रसंगानिमित्त अहमदाबादमध्ये ४०० मीटर लांबीची आणि ४ फूट उंचीची भिंत उभी केली जात होती. कारण काय? तर कार्यक्रम स्थळाकडे जाताना वाटेतील 'झोपडपट्टी' म्हणजे गरीब वस्ती ट्रम्पच्या नजरेला पडू नये यासाठी हा आटापिटा होता! देशातील आणि जगातील सत्ताधाऱ्यांचे आणि प्रस्थापित वर्गांचे वर्तमान अस्वस्थ करणारे एक भीषण वास्तव-गरिबीअहे भिंतीआड चिणून 'मारण्या'चा हा प्रयत्न होता.

## प्रत्येक समस्येवर 'भिंती'च उपाय

जपानचे पंतप्रधान बुलेट ट्रेन प्रकल्पाच्या उद्घाटनासाठी आले होते, तेव्हा हिरव्या कापडांनी अहमदाबादेतील गरिबी झाकली गेली होती. हे पूर्वीही अनेकदा केले गेलेले आहे. दिल्लीत 'कॉमनवेल्थ गेम्स'च्या काळातही हे केले गेले होते. 'स्मार्ट सिटी'च्या नावाने हे अनेक शहरांमध्ये केले जात आहे. पश्चिम घाटाची पर्यावरणीयदृष्ट्या वाट लावून झाली, त्यावर उपाय नाही. दशकानुदशके चर्चा करून नदी खोरे नियोजन कागदपत्रांच्या ढिगाऱ्यात जिरवले गेले. हवामानबदल लक्षात घेऊन एकंदर आखणी करण्याची आत्यंतिक गरज आहे हे आपल्या गावी नसल्यासारखी इथली सरकारे वेड घेऊन पेडगावला जात राहिली आहेत. लोकजागृती व लोकसहभाग हे सारे धाब्यावर बसवले आहे. असे करून आमचे 'बुध्दिमान' सत्ताधारी पूर-नियंत्रणाच्या नावाने नदीच्या दोन्ही काठाने भिंती बांधण्याची अफलातून कल्पना हवेत सोडत आहेत! त्याची कंत्राटे देऊन कोटीच्या कोटी जिरवण्याचे मनसुबे यात दडलेले असणार यात काय शंका? पूर असो वा गरिबी, बेरोजगारांचे स्थलांतर असो वा देशांच्या विवाद्य सीमारेषा, उपाय काय? तर भिंत बांधा! पण मोदीची भिंत हा अपवाद नाही, तर तो 'नियम' बनतो आहे. विद्यमान भारतीय आणि एका अर्थी जागतिक स्थितीचे ते प्रतिकात्मक चित्र आहे. जगभरात अनेक देशांमध्ये हे होत आहे. खुद्द अमेरिकेत मेक्सिकोतून येणाऱ्या लोकांना अडवण्यासाठी मेक्सिको-यूएसए सीमेवर भिंत उभारण्याचे धोरण ट्रम्पने अध्यक्ष असताना जाहीर केले व ते कामही सुरू केले. उद्या काश्मीरप्रश्न किंवा पाकिस्तान आणि चीनशी असणारे सीमावाद व तणाव हे राजकीय शहाणपणाने मिटवता न आल्याने मोदींनी या सर्व ठिकाणी नव्या भिंती उभारण्याचा कथित 'देशभक्त' प्रकल्प हाती घेतला तर आश्चर्य वाटायला नको! याचे कारण हिंदुत्ववादी



मेक्सिकोतून येणाऱ्या लोकांना अडवण्यासाठी अमेरिकेने मेक्सिको सीमेवर उभारलेली ही भिंत.

सकाळ-संध्याकाळ-त्रिकाळ संध्या केल्याप्रमाणे ज्याला गौरवतात त्या इस्रायलचा 'आदर्श' समोर आहेच.

## महासत्तांचे राजकारण

इस्रायलने जबरदस्तीने ताबा मिळवलेल्या पॅलेस्टाईनच्या भूभागावर एक भिंत उभी केली आहे. जर्मनीतील 'बर्लिन भिंत' कोसळल्यावर पुढे तीनच वर्षांत (१९९२) ही भिंत उभारण्याची कल्पना इस्रायलने मांडली. या काळात 'पाडलेल्या' बर्लिन भिंतीवर जगात प्रचंड चर्चा झाली, मात्र पुढच्या दशक-दीड दशकात इस्रायलने 'उभारलेल्या' भिंतीकडे जागतिक चर्चा आणि माध्यमे यामध्ये सोयीस्करपणे बरेचसे दुर्लक्ष केले गेले आहे. 'इस्रायली वेस्ट बँक बॅरिअर किंवा वॉल' या नावाने ही भिंत ओळखली जाते. ही भिंत काटेरी तारांची ३ ते ८ मीटर उंचीच्या पिरॅमिड आकाराची आणि सलग एकापाठोपाठ एक अशा तीन कुंपणांची आहे. या कुंपणाची एकूण रुंदी ६० ते १०० मीटर एवढी असेल, तर योजलेली एकूण लांबी ७०८ किमी एवढी आहे. इस्रायल याचे वर्णन 'दहशतवादविरोधी संरक्षक भिंत' असे करते तर पॅलेस्टिनी लोकांचे म्हणणे आहे, की ही भिंत 'वंशवादी अलगतावाद' किंवा वर्णभेद ('ॲपारथाईड') जोपासते. वास्तवात, इस्रायलची ही एक आत्यंतिक वर्चस्ववादी आणि क्रूर कृती आहे. 'इंटरनॅशनल कोर्ट ऑफ जस्टीस'ने या कृतीचे वर्णन 'आंतरराष्ट्रीय कायद्याची पायमल्ली' असे केले, तर २००३ मध्ये 'युनो'च्या सर्वसाधारणसभेने १४४ विरुध्द ४ अशा मतांनी मागणी केली, की 'आंतरराष्ट्रीय कायद्याचे उल्लंघन करणारी ही भिंत तत्काळ हटवावी'. पण इस्रायल ढिम्म आहे. तेलाचे राजकारण आणि आंतरराष्ट्रीय भूसामरिक व्यूहनीती यासाठी अमेरिकेला आणि पाश्चात्य साम्राज्यवादी शक्तींना इस्रायलचा हा आगाऊपणा हवाच आहे. ही भिंत म्हणजे केवळ अरब प्रदेशातील 'मुस्लिम विरुध्द ज्यू' वा/आणि 'मुस्लिम विरुध्द ख्रिश्चन' एवढाच

संघर्ष नाही, तर हा जागतिक वर्चस्ववादाचा आणि संघर्षाचा एक आविष्कार आहे. दहशतवादाची निर्मिती, वापर आणि निमित्त करण्यात महासत्तांचे राजकारण कसे काम करत असते, हे पुरेसे लक्षात घेतले तर हे उघड दिसते!

या पार्श्वभूमीवर अमेरिकी कळपात इस्त्रायल छाप सामील होण्याच्या उद्देशाने आणि महासत्तेच्या भ्रमात मोदी सरकारने यदाकदाचित 'भिंती' उभारण्याची भेदरट भूमिका घेतली तर ते त्यांच्या सुमार बुध्दीला साजेसेच ठरेल! ते त्यांच्या उच्चवर्गीय-वर्णीय आर्थिक-राजकीय हितसंबंधांनाही पोषक ठरेल यात शंका नाही. अशा 'भिंती' उभारण्यासाठी जनतेच्या पैशातून हजारो-लाखो कोटींची कंत्राटे अंबानी-अदानीला दिली गेली आणि तेही 'देशकार्य' म्हणून गौरवले गेले तर अचंबा वाटायला नको! कारण अशा प्रकारेच तर अंबानी हा आशियातील पहिल्या क्रमांकाचा व जगातील पहिल्या पाचातील धनाढ्य बनला आहे. यापूर्वी कोणाला माहितीदेखील नसलेला अदानी गेल्या चार-सहा वर्षांत देशातील तिसऱ्या क्रमांकाचा धनाढ्य व्यक्ती बनला आहे. देशातील ७५ ते ७७ टक्के जनता आजही दारिद्र्यरेषेखाली आहे आणि विकासाच्या सर्व निर्देशांकात म्हणजे मानवी हक्क, लोकशाही, भूक, भ्रष्टाचार, स्वातंत्र्य, आनंद अशा बाबतीत भारताची घसरण न बघवण्याइतकी होत चालली आहे. दुसरीकडे, दर आठवड्याला भारतात नवे अब्जाधीश उत्पन्न होताहेत आणि त्यांच्या संपत्तीत दरदिवशी कोट्यवधी रुपयांची भर पडते आहे. या सामाजिक-आर्थिक भिंतीत भर घालण्यासाठी कदाचित सीमेवर आणि उद्या देशात अंतर्गत 'भिंतीं'ची गरज सत्ताधाऱ्यांना भासली तर आश्चर्य वाटू नये!

## अस्वस्थता वाढतेच आहे

अशा या भिंतींचा वापर कशासाठी केला जातो आहे? त्यांच्या कथित उद्दिष्टाप्रमाणे त्या खरोखरी 'सुरक्षितता' पुरवताहेत का? कोणाला? की त्यातून वेगळाच उद्देश साधला जातो आहे? त्या खरे तर ज्यामुळे उभ्या होत आहेत ते भीषण वास्तव दडवण्यासाठी आणि दडपण्यासाठीच त्यांचा वापर केला जातो आहे. असे हे तिरपागडे प्रकरण आहे. त्या एकीकडे लोकांचे वांशिक-धार्मिक 'राष्ट्रीय' पूर्वग्रह बळकट करण्यासाठी उभ्या केल्या जाताहेत, तर दुसरीकडे त्या जनतेला काहीतरी 'दाखवण्या'साठी म्हणजे लोकांच्या 'नजरे'त भरणारे, 'प्रेक्षणीय', 'नेत्रदीपक' उपाय म्हणून उभ्या केल्या जाताहेत. 'कडक' आणि गंभीर उपाय केल्याचे नाटक उभे करण्यासाठी त्या उभ्या केल्या जाताहेत.

या भिंती काही ठिकाणी जमिनीवर प्रत्यक्ष उभारल्या जात आहेत. त्या खरे म्हणजे आर्थिक जीवनात विषमता, शोषण आणि चंगळवाद यांच्या मर्यादा बळकट करणाऱ्या आहेत. तर सामाजिक-सांस्कृतिक जीवनात उभ्या केल्या जाणाऱ्या भिंती या विविध 'अस्मितादर्शक' भिंती आहेत. त्या मुख्यतः वैचारिक व आभासी अंगांनी घट्ट केल्या जात आहेत. त्यात जात आणि धर्म, वंश आणि राष्ट्र यांचा हुशारीने वापर केला जातो आहे. या भिंती उत्तरोत्तर सार्वत्रिक होताहेत. या सर्व प्रकारच्या भिंतीना व्यक्तींना, ना आम वर्गांना, ना देशांना, ना समाजजीवनाला खऱ्या अर्थी कोणता सकारात्मक आधार देत



**अहमदाबादमध्ये उभारलेली ही भिंत भारतातच नव्हे तर जगभरातच चर्चेचा विषय ठरली होती.**

आहेत. त्या मुख्यतः नकारात्मक भूमिका बजावताहेत. तरीही भिंती उभ्या होताहेत, प्रश्न आणि दऱ्या वाढताहेत. सामाजिक अस्वस्थता मात्र वाढतच चालली आहे.

वर्तमान जागतिकीकरणातील विसंगती अशी की १९८९ मध्ये 'बर्लिन भिंत'कोसळली, जर्मनीची विभागणी संपुष्टात आली आणि ते 'राष्ट्र' एक झाले. पण त्याचवेळी 'राष्ट्रांच्या सीमा न जुमानणारे' जागतिकीकरण गतिमान झाले. पश्चिम युरोपात जर्मन राष्ट्र एकत्र येणे हे त्याचवेळी दोन समाजव्यवस्थांमधील फरक संपुष्टात येणे ठरले, समाजवाद आणि भांडवलशाही यातील भेद संपणे ठरले. आता 'भिंतींचे युग' संपले असे भासवले जाऊ लागले. पूर्व युरोप आणि सोव्हिएत रशिया येथील 'पोलादी पडदा' (किंवा 'भिंत') पुढच्या दोन वर्षात कोसळली. कारण तिथली समाजवादी व्यवस्थाच कोसळली. प्रस्थापित भाषेत जिला 'लोकशाही' म्हटले जाते. पण खरे तर, जी भांडवली व्यवस्था आहे तिचा त्या प्रदेशात वेगाने विस्तार होत गेला. मात्र जग एक खेडे होण्याचे राहूच द्या, या प्रदेशात नवनव्या भिंती उभ्या होऊ लागल्या. झेकोस्लावाकियाचे दोन तुकडे झाले, युगोस्लावियाचे पाच देश बनले तर सोव्हिएत युनियनचे पंधरा तुकडे झाले. आजवर तणावाबरोबरच काही एक परस्पर-सहकार्यावर आधारलेल्या 'समाजवादी' देशांमध्ये आता परस्परांतीलतीव्र स्पर्धा आणि काही वेळा तर द्वेष व शत्रुत्व यावर आधारलेल्या नव्या 'राष्ट्रवादी' भिंती उभ्या झाल्या आहेत. पूर्व युरोप आणि रशियन प्रदेशातील काही देश हे पश्चिम युरोप-अमेरिका यांच्या नेतृत्वाखालील 'नाटो' गटात सामील झाले आहेत आणि एकमेकांवर डोळे वटारू व बंदुका रोखू लागले आहेत. नव्या 'भिंती' अधिकच ताठर होत आहेत. नव्याने आलेली ही असुरक्षितता, भीती आणि अस्वस्थता आता अर्थातच नव्या म्हणजे भांडवली 'राष्ट्रवादा'च्या भिंतीआड आसरा घेऊ लागली आहे!

या भागातील जुन्या 'भिंती' आणि 'पडदे' कोसळणे आणि नवे उभे होणे यातून या प्रदेशात पूर्वीपेक्षा अधिक सुरक्षितता आणि 'स्वस्थता' आली असती तर मग हरकत नव्हती.पण प्रत्यक्षात काय घडले? साधारण १९८७-८८ सोव्हिएत रशियात आंतरराष्ट्रीय दारिद्र्यरेषेखाली

असलेली संख्या ३ टक्क्यांवरून पुढच्या दहा वर्षांत २० टक्क्यांवर म्हणजे साधारण ९ कोटींवर पोहोचली. पूर्व युरोपसह रशियात गुन्हेगारी, मादक पदार्थ व दारूची व्यसनाधीनता आणि आत्महत्या यांचे प्रमाण प्रचंड वाढले. 'समाजवाद' कोसळल्यानंतर काही वर्षांत एकट्या सोव्हिएत युनियनमध्ये ७० लाखांहून अधिक अकाली मृत्यू घडले. पूर्व युरोप-सोव्हिएत युनियन या प्रदेशातील काही देशांमध्ये राष्ट्रीय सकल उत्पादन हे १९९० ते २००० या काळात ५० टक्क्यांनी घटले. तर रशियाचे राष्ट्रीय सकल उत्पादन हे २००० मध्ये १९८७-८८ आधीच्या उत्पादनाच्या केवळ ३० ते ५० टक्के एवढ्यावर उतरले.

## समाजवाद कोसळल्याने जग अस्थिर

आधी पूर्व युरोपिय राष्ट्रांनी आणि मग रशियाने काही प्रमाणात आर्थिक पुनर्उभारणी व विकास केला. या भागात लोकांनी मोठ्या प्रमाणावर बहुपक्षीय राज्यपध्दती आणि बाजारपेठी अर्थव्यवस्था यांचे स्वागत केले. पण काही अभ्यासकांनी अलीकडे म्हणजे अगदी २०१६ आणि २०१९ मध्ये दाखवल्याप्रमाणे जागतिकीकरण-खासगीकरण-निर्नियंत्रण यावर आधारलेल्या बाजारवादी ('नवउदारमतवादी') अर्थकारणामुळे या देशांमध्ये अनेक उत्पात झाले व हादरे बसले. आज वरच्या इथल्या 'समाजवादी' व्यवस्थेत वेळोवेळी अनेक त्रुटी आणि विकृती निर्माण होत गेल्या होत्या हे जरी खरे असले तरी ती काही एका प्रमाणात नियोजनबध्द व्यवस्था होती. तिच्यामध्ये सर्वांना रोजगार, शिक्षण, आरोग्य, निवास यांसह मूलभूत हक्कांची शाश्वती होती. आजवर जगातील कोणत्याही अगदी प्रगत औद्योगिक-श्रीमंत अर्थव्यवस्थेनेही जे साधले नव्हते, ते इथे घडवले गेले होते. या व्यवस्थेत पुढच्या टप्प्यात साचलेपण आणि दमन हे आले, पण तरीही त्यात मर्यादित अर्थी का होईना एक प्रकारची मूलभूत जीवनाची हमी व 'स्वस्थता' होती. ती आता पूर्णपणे उधळली गेली. जागतिकीकरणाने त्या जागी नवी सुरक्षितता वा सार्वत्रिक हमी न येता बाजारवादी-स्पर्धात्मक-शत्रुभावी व्यवस्थेची अस्थिरता व असुरक्षितता आली आहे. भांडवली जगाच्या अस्थिरतेला पर्याय देऊ शकणारी 'समाजवादी' व्यवस्था कोसळल्याने संपूर्ण जगच अस्थिर बनले.

यासोबतच जगाच्या आणखी दोन मोठ्या भागांतील तुलनात्मक स्थैर्य वेगाने कोसळले. एक तर प्रगत औद्योगिक-श्रीमंत देशांमधील कल्याणकारी कार्यक्रम गुंडाळण्यात येऊ लागले. दुसऱ्या महायुध्दात आम जनतेने जो अपरिमित त्याग केला, त्या पार्श्वभूमीवर आणि लोकशाही हक्कांचा विस्तार होण्यासाठी तेथील जनतेने केलेल्या मागण्या याची परिणती होती. शिवाय आपली जनता समाजवादाकडे वळू नये यासाठीही सत्ताधारी वर्गांनी कल्याणकारी कार्यक्रम राबवले होते. पण १९८० पासून पुढे व खास करून १९९० नंतर जसा समाजवाद कोसळला तसे हे कार्यक्रम गुंडाळले गेले. या देशांमध्ये मोकाट बाजारवाद गतिमान झाला. सट्टेबाज वित्तभांडवल वर्चस्व गाजवू लागले. त्यामुळे या अर्थव्यवस्थांमध्ये मोठ्या प्रमाणावर अस्थिरता आली.



**इस्रायलने जबरदस्तीने ताबा मिळवलेल्या पॅलेस्टाईन भूभागावर काटेरी तारांची भिंत उभी केली.**

मोठ्या लोकसंख्येला अनिश्चितता आणि असुरक्षितता यांना तोंड द्यावे लागू लागले. 'तिसऱ्या जगात' म्हणजे जगातील शंभर-सव्वाशे 'मागास', गरीब-अतिगरीब, विकसनशील देशांमध्ये तर आणखी गंभीर अवस्था आली. १९८० मध्ये हे सारे देश सर्वोच्च परकीय कर्जाच्या सापळ्यात अडकले. समाजवादी गट स्वतःच कोसळल्याने या देशांचा मोठा आधारच संपुष्टात आला. नव्या आर्थिक धोरणांनी जी मुक्त बाजारपेठ प्रभावी बनवली, ती बहुसंख्य आम-कष्टकरी जनतेला आणखी अस्थिर व असुरक्षित करणारी होती. गेल्या तीन दशकांत यावर इतके लिहिले गेले आहे आणि प्रत्यक्ष अनुभवले आहे, की इथे त्यावर जास्त चर्चा करण्याची गरज नाही.

पण जगात यातून दोन गोष्टी घडल्या. एक म्हणजे या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादाची जी प्रगतिशील, लोकाभिमुख व डावी/समाजवादी रूपे होती ती आता निष्प्रभ झाली. जागतिकीकरणाचाच नव्हे तर कथित 'मुक्त' बाजारपेठेचा गाडा चालवणारे मुख्य राजकीय साधन राष्ट्र-राज्य म्हणजे राष्ट्रांची शासने हीच आहेत. त्यांना जनतेचा पाठिंबा व आधार निदान औपचारिक तरी मिळवूनच वर्तमान व्यवस्था चालवणे शक्य आहे. मग त्यासाठी आता उपलब्ध पर्याय होता उजव्या राष्ट्रवादाचा! धर्म वा जमात, जात वा 'वंश', संकुचित अस्मिता आणि विशिष्ट समूहांचा द्वेष, परकियांविषयी भयगंड आणि पोकळ पण हिंस्र आक्रमकता यांच्यावर तोललेला राष्ट्रवाद. पण या राष्ट्रवादाचे स्वरूपच नकारात्मक असल्याने खुद्द त्या त्या देशातले उरलेसुरले समाजस्वास्थ्यदेखील गमावले गेले! हे फक्त 'मागास' वा अविकसित देशांमध्ये घडले असे नाही. अमेरिका, जर्मनी, फ्रान्स, ब्रिटन, ऑस्ट्रेलियासह सर्व प्रगत देशांमध्ये हेच होताना दिसू लागले.

दुसरे, जगातील बलदंड भांडवली देश आणि नंतर अगदी भारतासारख्या अन्य देशांतील राज्यसंस्था व प्रमुख राजकीय पक्ष हे सतत समाजवाद/साम्यवाद या 'शत्रू'चे भय दाखवून जनतेचा पाठिंबा मिळवत होते व स्वतःचे राजकारण-अर्थकारण-युध्दकारण चालवत होते. पण १९९० पासून पुढे तो 'शत्रू' संपल्याने आता

काय करायचे हा प्रश्न उभा झाला. मग 'दहशतवाद' हा शत्रू उभा केला गेला. अरब आणि इस्लामी देशांमध्ये दुसऱ्या महायुध्दानंतर 'समाजवादी' वा 'मुक्तिदायी' असा प्रगतिशील व जनवादी इस्लाम जोर धरू लागला होता. या 'डाव्या' विचाराला संपवण्यासाठी अमेरिका व युरोपीय सत्तांनी देशोदेशींचे राजे व हुकूमशहांना फूस दिली. इस्लामचा वापर करून प्रतिगामी शक्ती व संघटना वाढतील अशी व्यूहरचना केली. थोडक्यात, 'राजकीय' इस्लाम आणि दहशतवाद यांना वाढवण्याचे काम सुरू केले. १९८० पासून पुढे सोव्हिएत रशियाच्या विरोधात अफगाणिस्तान-पाकिस्तान- सौदी अरेबिया यांचा वापर केला गेला. काश्मीर प्रश्नावरून भारत-पाकिस्तान यांच्यात जो तणाव होता, त्यातही दहशतवाद हा मुद्दा बनला. जागतिक पातळीवर 'सभ्यता वा महासंस्कृतींमधील संघर्ष' ('क्लॅश ऑफ सिविलायजेशन्स') यावर आधारित वैचारिक-राजकीय मांडणी आणि जागतिक व्यूहरचना केली जाऊ लागली. त्यात धर्म, संस्कृती आणि भूसामरिक हितसंबंध यांचे तद्दन चुकीचे पण स्फोटक कॉकटेल बनवले गेले. अमेरिका विरुध्द अल-कायदा व अमेरिका विरुध्द तालिबान असे संघर्ष उभे केले गेले. अमेरिका-युरोप-जपान यांनी छेडलेले इराकविरोधी युध्द आणि जागतिक पातळीवरील 'दहशतवादविरोधी युद्ध' ('वॉर ऑन टेरर') असे भय आणि आतंक यांनी भरलेले पर्व सुरू झाले.

पाठोपाठ आले २००८ चे वित्तीय महाअरिष्ट. गेल्या शतकातील १९२९-३३ च्या महामंदीनंतरचे जगभरात सर्वात मोठी आर्थिक अस्थिरता आणि असुरक्षितता आणणारे अरिष्ट. या सोबतच जागतिकीकरणाची आरती ओवाळणारे पर्व संपुष्टात आले. 'भिंतीं'चे आणि भीतीचे युग आणखी विस्तारू लागले. १९७० नंतर दोन ठळक अरिष्टे समोर येऊ लागली होती, ती आता अक्राळविक्राळ बनू लागली. एक होते पर्यावरणीय अरिष्ट. गेल्या तीन-चार दशकांत ते अधिकच तीव्र झाले आहे. जागतिक तापमानवाढ/हवामान बदल, ऊर्जा-अरिष्ट, जैवविविधतेचा ऱ्हास, इत्यादी अंगांनी.

दुसरे, १९७० नंतर युरोप-अमेरिकेत हलक्या पावलांनी येऊ लागलेल्या 'संरचनात्मक अरिष्टा'ने जागतिक स्वरूप धारण केले. प्रचंड केंद्रीकरण आणि विषमता वाढवणारे, चंगळवाद आणि हलाखी वाढवणारे अरिष्ट. जागतिकीकरण भांडवलाचे पण 'भिंती' मात्र श्रमिकांसाठी, ही विसंगती तीव्र झाली. अगदी आवश्यक ते व तेवढे वगळता अन्य श्रमिकांना अडवण्यासाठी उजवा राष्ट्रवाद वापरला जाऊ लागला. जागोजागची नैसर्गिक साधने आणि तेथील श्रम हे स्वस्तात वापरण्यासाठी 'राष्ट्रवादा'चा देशांतर्गत आणि देशाबाहेर आक्रमक अस्मितावादी वापर वाढला. त्यासाठी धर्मासह विविध अस्मिता कामी येऊ लागल्या. वर्चस्वशाली धर्म वगळता अन्यधर्मिय, कष्टकरी, दलित-मागास जाती-जमाती, विविध अल्पसंख्याक तसेच डावे-पुरोगामी यांच्याविरोधात हा राष्ट्रवाद वापरला जाऊ लागला. त्यांच्याविरोधात व बाहेरून तो आक्रमक असला, तरी आतून तो अतिशय घाबरलेला असा 'राष्ट्रवाद' आहे. हा भेदरट राष्ट्रवाद ही



### भीती आणि भिंती यांचा कळस

अलिकडच्या कोरोना साथीने तर भीती आणि 'भिंती' यांचा कळस गाठला. सत्ताधारी वर्गांनी याचा वापर लोकशाहीचे अपहरण आणि संपत्तीचे केंद्रीकरण करण्यासाठी केला. लोकांना रोबो (यंत्रमानव) बनवण्यासाठी केला.

आजच्या आत्यंतिक अरिष्टाची परिणती आहे. हे अरिष्ट आणखी व्यापक व विध्वंसक आहे. पर्यावरणीय व संरचनात्मक या दोन्ही अरिष्टांची परिणती म्हणून गेल्या दोन दशकांत जगभर विविध रोगसाथी उफाळत आहेत. अलिकडच्या कोरोना साथीने तर भीती आणि 'भिंती' यांचा कळस गाठला. सत्ताधारी वर्गांनी याचा वापर लोकशाहीचे अपहरण आणि संपत्तीचे केंद्रीकरण करण्यासाठी केला. लोकांना रोबो (यंत्रमानव) बनवण्यासाठी केला. त्याचवेळी इथून पुढे जगाचा विकास कसा होईल आणि मानवजातीचे भवितव्य काय याविषयी जगभर वैचारिक कोंडी निर्माण झाली आहे. सत्ताधारी वर्गांकडे आणि त्याच्या बुध्दिवंत-विचारवंतांकडे यावर उत्तर नाही!

## नियोजनाअभावी अनिश्चितता, निराशा

उत्पादन आणि तंत्रज्ञान, माध्यमे आणि माहिती यांची अफाट वाढ होते आहे. मात्र दिवसेंदिवस राजकीय आणि नैतिक ऱ्हास होतो आहे. आजची व्यवस्था तो थांबवू शकत नाही. शाश्वत आणि समताधिष्ठित तसेच आरोग्यदायी विकासाकडे वाटचाल करण्यासाठी आवश्यकती सर्वसाधने, विज्ञाने, विचार, आराखडे आणि मनुष्यबळ आज जगात जागोजागी उपलब्ध आहे. पण त्यासाठी कोणतेही नियोजन नसल्याने सर्वत्र एक अनिश्चितता आणि निराशा, चिडचिड आणि अतिभावनाशीलता भरून राहिली आहे. एक स्फोटक सामाजिक व सांस्कृतिक मनोभंग आणि विक्षुब्धता सर्वत्र खदखदते आहे.

या साऱ्यामुळे भेदरट राष्ट्रवादाचा आधार घेण्याची वेळ जगभरच्या सत्ताधाऱ्यांवर आली आहे. एवढे शक्तिशाली राजकीय सत्ताधारी एवढे का भेदरलेले आहेत, याची जी कारणे आपण चर्चिली त्याच्या मुळाशी एक व्यवस्थात्मक मुद्दा आहे. हे पायाभूत कारणही लक्षात घेतले पाहिजे. भांडवल ही शक्ती आता राजकीय सत्ताधाऱ्यांच्या म्हणजे राष्ट्रीय राज्यसंस्थांच्या नियंत्रणापलिकडे गेली आहे. तिच्यावर राज्य करणे व तिला शिस्त लावणे हे त्यांना अशक्य बनत चालले आहे. हे मुख्यतः बहुराष्ट्रीय व देशी-विदेशी मक्तेदारी-कार्पोरेट भांडवलाविषयी खरे आहे. पण त्याचवेळी हेही खरे आहे, की हे भांडवल आता शेती आणि जंगले, खाणी आणि पाणी, महानगरे आणि खेडी, हवा आणि भावना

## आता खऱ्या राष्ट्रप्रेमाची गरज

आता खऱ्याखुऱ्या राष्ट्र'प्रेमा'ची कास धरली पाहिजे, जे देशातील प्रत्येक व्यक्तीला न्याय, समता व सर्व प्रकारची समृध्दी देईल, जे आंतरराष्ट्रीय सहकार्य, सहजीवन व बंधू-भगिनीभाव वाढवेल, जिथे भीती आणि भिंती यांचे राज्य नसेल!

असे सर्वत्र प्रभावी बनले आहे. त्याच्याशी जोडून, या वातावरणात स्थानिक व मध्यम-छोटे भांडवलदेखील आता त्या त्या पातळीच्या 'राज्य'कारभार करणाऱ्या, सत्ताकेंद्रांवर स्वार होते आहे. या सर्व सत्ताकेंद्रांचे या भांडवलाशी साटेलोटे आहे हे खरे, पण त्या 'नात्यात' आता भांडवल व त्याचे पिट्टू हे पूर्ण व मनमानी वर्चस्व गाजवत आहेत. त्यामुळे 'राज्यकारभार' यंत्रणा व राज्यसंस्था निष्प्रभ आणि पोकळ होत आहे. यातूनच एक प्रकारचे अराजक आज अनुभवाला येते आहे.

## ...तर जग अस्वस्थच राहणार

एकेकाळी भांडवल हे काही प्रमाणात प्रगतिशील होते. त्याने एका अर्थाची 'ऑर्डर', 'शिस्त', निश्चितता, 'व्यवस्था' व काही एक 'सुरक्षितता' आणली. औपचारिक व कायद्यासमोर समता आणली. काही एक सामाजिक न्यायाची पावले टाकली. आता भांडवल हीच शक्ती जर नियंत्रणाबाहेर जात असेल आणि या साऱ्याला जर छेद देत असेल, तर मग राजकीय सत्ताधारी कितीसे प्रभावी राहाणार? त्यांचा आत्मविश्वास कितपत टिकणार? ते अर्थपूर्ण राष्ट्रवाद आणि राष्ट्राला स्थैर्य, स्वस्थता व सुरक्षितता कुठून देणार? 'ग्लोबल व्हिलेज'वादी म्हणजे जागतिकीकरणवादी सामाजिक, आर्थिक शक्ती हीच जर अराजक पसरवणारी, त्यासाठी संकुचित 'अस्मितां'चा वापर करणारी, अनेक विसंगतींनी भरलेली आणि अस्थिरता निर्माण करणारी असेल, मग वर्तमान जग हे अस्वस्थच असणार नाही काय?

राष्ट्र एक समुदाय म्हणून जसजसे अधिकाधिक चिरफाळले जात आहे तसतशी 'राज्य-संस्था' निष्प्रभ बनत आहे. त्यामुळे सत्ताधारी भेदरले आहेत. दुसरीकडे, आजवरचा लोकशाहीचा बरा-वाईट अनुभव, समता व प्रतिष्ठा मिळवण्याची तीव्र इच्छा आणि विकासाने जाग्या केलेल्या आकांक्षा यामुळे लोक जुन्या पध्दतीने जगायला तयार नाहीत. विद्यार्थी-युवक, कामगार-शेतकरी, दलित-ओबीसी, आदिवासी-भटके, अल्पसंख्य आणि स्थलांतरित, स्त्री-पुरुष आणि अन्य लैंगिक कल असलेले समूह, विविध वर्णांचे/रंगांचे आणि संस्कृतींचे असे सर्वजण आज अस्वस्थ आहेत. समाज माध्यमांपासून ते रस्त्यांपर्यंत ते 'व्यक्त'होताहेत, दडपशाहीला झुगारून उभे राहताहेत. त्यामुळेही सत्ताधारी भेदरले आहेत. जगभर सर्वत्र 'नागरिकत्वा'चा प्रश्न उकरून काढला जातो आहे तो या भेदरट सत्ताकारणापोटी. भारतात सीएए-एनआरसी म्हणजे नागरिकत्व कायद्याचा प्रश्न भाजपा-रास्वसंघाने मूलतः या संकुचित राजकारणातूनच उभा केलेला आहे. आपापल्या देशातील आणि जगातील सांस्कृतिक व राजकीय बहुविधता, बहुधार्मिकता, बहुभाषिकता, बहुअस्मिता स्वीकारण्याऐवजी ती दडपण्याचा वा तिला परिघावर ढकलून देण्याचा प्रयत्न हे सत्ताधारी वर्ग करत आहेत. सर्व प्रगत तंत्रज्ञान वापरून आणि कोरोनाचे निमित्त करून पाळत-यंत्रणा बळकट करण्याचे जगभरच्या सत्ताधाऱ्यांचे प्रयत्न आहेत. माणसे रोबो व्हावीत असा हा प्रयत्न आहे, पण तसे व्हायला जगभरची जनता नकार देत आहे. त्यातूनही सत्ताधाऱ्यांमध्ये अस्वस्थता आहे, ती अस्वस्थता ते स्वार्थापोटी जनतेमध्ये पसरवत आहेत. त्याचे भय तयार करून सत्ता टिकवण्याचे हे प्रयत्न आहेत. खरे तर मानवसमाज म्हणून, कोणतेही राष्ट्र म्हणून आणि खास करून भारत एक देश म्हणून, आपली खरी शक्ती बहुविधतेमध्ये आहे. तिचा स्वीकार आणि विकास हा लोकशाही पध्दतीने व समता जोपासत केल्यास आपल्याला भेदरट राष्ट्रवादाची गरज नाही. पण वर्तमान सत्ताधाऱ्यांच्या ते सोयीचे नसल्याने देशच्या देश हे दुभंग मनोभूमिकेत ढकलले गेले आहेत.

भांडवल आज एकीकडे केंद्रीकरण आणि अराजकता (बाजाराची व एकंदर) जोपासते आहे. तसेच ते दुसरीकडे अतिगतिमानता, क्षणभंगुरता व अनिश्चितता पसरवत आहे. भांडवलाची आणि उत्पादनांची गुंतवणूक व उलाढाल ही जास्तीत जास्त वेगाने व्हावी आणि नफा कमाई ही क्षणोक्षणी व्हावी, ही त्याची गरज आहे. लोकांनी सतत वस्तू व उत्पादने, भ्रम व कल्पना वापरून फेकाव्यात आणि 'नव्या'च्या मागे धावत राहावे ही भांडवलाची गरज तीव्र बनली आहे. त्याच्या परिणामी माध्यमांपासून लोकांच्या मानसिकतेपर्यंत सर्वत्र चंचलता आणि अस्वस्थता, अतिभावनाशीलता आणि विक्षुब्धता, विखंडित जाणिवा व तुकड्या तुकड्यात जगण्याची वृत्ती, क्षणभंगुरता व असुरक्षितता, नैराश्य आणि मनोरुग्णता यांचा प्रभाव वाढलेला आहे. यावर 'उपाय' वा 'आधार' म्हणून प्राचीन वा 'देशीवादी' संस्कृतीकडे वळा, जात-धर्म-वंश-पुरुषप्रधान संस्कृतीला कवटाळा असा फसवा विचार, उजवा अस्मितावाद व भेदरट सांस्कृतिक राष्ट्रवाद देत आहे. आपापल्या वेगळेपणाची फुशारकी मारणारे जगभरचे सारे याबाबतीत एका साच्यातून काढलेले गणपती आहेत. त्यांच्या भाषा, राजकीय आशय व शैली, त्यांच्या प्रतिमा व प्रसिध्दी तंत्रे, त्यांची धोरणे व त्यांच्या धमकावण्या, त्यांचे 'शत्रू' व 'मित्र' या साऱ्यांत हे उजवे साम्य सहज दिसून येते. यांचा आव आणि अभिनिवेष मोठा असला तरी त्यांचा राष्ट्रवाद भेदरलेला आहे. कारण या राष्ट्रवादाचे 'अवतार'कार्य संपलेले आहे. एवढेच नव्हे तर, तो आता पूर्णतया दमनकारी, विध्वंसक आणि नकारात्मक बनला आहे. आता गरज आहे नव्या राष्ट्रविचाराची आणि जाणिवेची. राष्ट्र'भक्ती'ची वा संकुचित राष्ट्र'वादा'ची सद्दी संपली आहे. आता खऱ्याखुऱ्या राष्ट्र'प्रेमा'ची कास धरली पाहिजे, जे देशातील प्रत्येक व्यक्तीला न्याय, समता व सर्व प्रकारची समृध्दी देईल, जे आंतरराष्ट्रीय सहकार्य, सहजीवन व बंधू-भगिनीभाव वाढवेल, जिथे भीती आणि भिंती यांचे राज्य नसेल! ●●●

**(लेखक सामाजिक कार्यकर्ते व अभ्यासक आहेत)**

# 'बिच्चारी' जनता घेतेय 'धाकशाही'चा अनुभव



**सरकारमध्ये निवडून दिलेल्या लोकांवर 'धाकशाही' अनुभवण्याची वेळ कधी नव्हे ती आली आहे. गेली सात वर्षे 'बिच्चारी' जनता अस्वस्थतेच्या धगीत होरपळत आहे.**



**विजय नाईक**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना व त्यांच्या भाजपच्या अनुयायांना आत्मस्तुतीच्या न्यूनगंडानं पछाडलय. इंदिरा गांधी यांच्या काळात त्यावेळचे काँग्रेसचे अध्यक्ष देवकान्त बरूआ यांनी 'इंदिरा इज इंडिया,' असा नारा दिला होता. तो देशात बराच गाजला, तसाच कमालीचा वादग्रस्तही ठरला. 'पंतप्रधान म्हणजेच देश व देश म्हणजेच पंतप्रधान', असे समीकरण केवळ त्या नेत्याचे खुशमस्करेच करू शकतात. बरूआ त्यांच्यातीलच एक होते. हा नारा इंदिरा गांधी यांना व त्यांच्या अनुयायांना सुखावणारा होता. तथापि, इंदिरा गांधी या देश नव्हे, की देश म्हणजे त्या नव्हेत, हे आणीबाणीनंतर झालेल्या सार्वत्रिक निवडणुकांनी दाखवून दिले. विरोधी पक्षांच्या दिवाळखोरीमुळे त्या १९८० मध्ये पुन्हा सत्तेत आल्या, हे त्यांच्या ओसरून पुन्हा वाढलेल्या लोकप्रियतेचं निदर्शक होतं.

कोरोनाच्या काळात साधूसंतांसारखी दाढी वाढविल्याने मोदी यांचं व्यक्तिमत्व संन्याशासारखं दिसू लागलं; परंतु अलीकडे अमेरिकेचे अध्यक्ष जो बायडन यांची वॉशिंग्टन येथे भेट घेताना व संयुक्त राष्ट्रसंघाच्या आमसभेत भाषण करताना त्यांनी दाढी बरीच ट्रिम केल्याचं आपल्याला पाहावयास मिळालं.

## व्यक्तिपूजेचं स्तोम

२०१४ मध्ये सत्तेत आल्यापासून मोदी यांनी एक नियम पाळलाय. उत्तमोत्तम, पण साधे कपडे परिधान करून जितकं जास्तीत जास्त 'प्रझेंटेबल' दिसता येईल, तितकं दिसायचं. त्यामुळे परकी पाहुणा असो, की सामान्य जनता वा विचारवंत, यांच्यावर त्यांचं पहिलं इम्प्रेशन चांगलं पडतं. त्यांचं व्यक्तिमत्व भारदस्त आहे, यात शंकाच नाही. किंबहुना, त्यामुळे ते कुठेही गेले, तरी आपल्या अस्खलित हिंदी व इंग्रजी भाषेत केलेल्या मुद्देसूद भाषणातून चमकतात. त्यांच्यात 'पॉवर ऑफ पर्सुएशन' आहे, हे नाकारता येत नाही.

देशात मोदीभक्तांची कमी नाही. पुण्याच्या मयूर मुंडे या भाजपच्या कार्यकर्त्याचंच उदाहरण पाहा. या रियल इस्टेट एजन्टनं १५ ऑगस्ट रोजी दीड लाख रुपये खर्चून पुण्यात त्यांचा अर्धपुतळा असलेलं मंदिर उभारलं. मुंडे म्हणाले, "जो नेता अयोध्येत राम मंदिर उभारणार आहे, त्याचं मंदिर असलच पाहिजे." घटनेतील जम्मू काश्मीरविषयक ३७० वे कलम रद्द करणे, राम मंदिराची उभारणी व ट्रिपल तलाकचा कायदा रद्द करणे या कामगिरीचे त्याने वर्णन केले. त्यावर काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेसने जोरदार टीका करताच मंदिर बंद करण्यात आलं. मोदींचा अर्धपुतळाही हलविण्यात आला. राष्ट्रवादीचे नेते प्रशांत जगताप यांनी, 'मंदिर बांधून व्यक्तिपूजेचं स्तोम' माजविण्याच्या वृत्तीवर टीका केली. या घटनेला विनोदाची झालर होती. राष्ट्रवादीचे कार्यकर्ते औंध येथील या मंदिरापुढे गेले व त्यातील तथाकथित देवाला पेट्रोल, डिझेलच्या किमती कमी करण्यासाठी याचना करू लागले. पूजेसाठी त्यांनी बाटलीभर इंधनही आणलं होतं. पण, तोवर मूर्ती नाहीशी झालेली होती. प्रत्यक्षात मात्र 'देव' कोपलेला होता, तो इतका की त्यानं पेट्रोल व डिझेलच्या किमती कमी तर केल्या नाहीच, उलट त्या तीन आकड्यांवर नेऊन ठेवल्या. याची सर्वाधिक झळ बसते आहे, ती २०१४ व २०१९ मध्ये मोदी व भाजपला विक्रमी मतदान करणाऱ्या मध्यमवर्ग व शेतकऱ्यांना. त्यांची अस्वस्थता संपलेली नाही. तोंड बांधून बुक्क्यांचा मार खावा, अशी परिस्थिती झालीय.

मोदी यांना न भूतो न भविष्यती असं बहुमत दोन्ही निवडणुकांत प्राप्त झालं. आता २०२४ मध्ये तिसऱ्या वेळी त्याची पुनरावृत्ती व्हावी, या दिशेनं मोदी-शहा रणनीती आखत आहेत. त्यामुळे त्यांच्या अनुयायांना आणखी चेव आलाय. कोरोनाचे लसीकरण सुरू होताच लसीकरणाच्या प्रत्येक प्रमाणपत्रावर मोदी यांचे छायाचित्र छापण्याचे आदेश आरोग्य मंत्रालयाने दिले. त्यावर टीका झाली, तरी त्याची दखल घेण्याची गरज मोदींना भासली नाही. देशात जे काही चांगलं घडतय, ते केवळ मोदी यांच्यामुळे, असं चित्र रंगविण्याची स्पर्धा, केंद्र सरकारमधील मंत्रालये व भाजपप्रणित राज्य सरकारे यांच्यामध्ये चालली आहे. जे काही चांगले नाही, उदा. शेतकरी आंदोलन, उत्तर प्रदेश व अन्य राज्यांतून ढासळलेली कायदा व सुव्यवस्था, भाववाढ इ.




## गरिबांच्या हालाशी सरकारला काय?

नोटाबंदीनंतर व कोरोनाच्या काळात शहर सोडून शेकडो मैल पायपीट करीत गावाकडे चालणाऱ्या कामगारांबाबत सरकारला दया आली नाही. त्यांचे दुःख समजले नाही, की कोरोनाच्या भयानक लाटेत आरोग्यव्यवस्थेत झालेल्या वाताहतीत सहानुभूती दाखविणे जमले नाही. या साऱ्यांचाच परिणाम जनतेत एक उदासीनता पसरण्यात झालाय. ती उदासीनता संपलेली नाही. त्यावर सरकारच्या समर्थकांचे प्रत्युत्तर म्हणजे ''मुंबईच्या रोखेबाजारातील निर्देशांकाने तब्बल साठ हजारांचा आकडा ओलांडलाय. सारे काही अलबेल असताना, निराशेचे कारणच काय?'' याचे उत्तर द्यावयाचे झाले, तर सरकारच्या उद्योगधार्जिण्या धोरणाकडे वळावे लागेल. बँकांकडे पाहावे लागेल. गेल्या तीन-चार वर्षांत बँकातील ठेवींवर व बचत खात्यावर मिळणाऱ्या व्याजाचे दर आठ टक्क्यांवरून जेमतेम चार-पाच टक्क्यांवर येऊन पोहोचलेत. एकीकडे जीवनावश्यक वस्तूंच्या दरात सातत्यानं होणारी वाढ व दुसरीकडे, घटत जाणाऱ्या उत्पन्नाचा ताळमेळ लावणे मध्यम व निम्नमध्यम वर्गाला कठीण झालं आहे, तिथं मजुरीवर पोट भरणाऱ्या कामगार, शेतमजूर व गरिबांचे काय हाल होत असतील, याची कल्पना करता येत नाही.

सारे विरोधकांच्या माथ्यावर मारले जात आहे. या सरकारची आठ वर्षे संपली, तरी आधीचे काँग्रेस सरकारच जबाबदार होते, असे लोकांच्या मनावर बिंबविले जात आहे.

## खुशमस्कऱ्यांच्या उचापती

या सरकारचे यूएसपी काय आहेत? यात पहिला क्रमांक मोदी, दुसरा हिंदुत्व व तिसरा सबका साथ, सबका विकास और सबका विश्वास हा नारा. मोदी यांच्या काळात भारत 'विश्वगुरू' झाला हे बिंबविणे, त्याच दृष्टीने अलीकडे मोदी यांचा ७० वा वाढदिवस व त्यांच्या राजकीय जीवनाला पूर्ण झालेली वीस वर्षे यांचा उदोउदो होत आहे.

अशा मुहूर्तावर पंतप्रधानांच्या अनुयायांना वेगवेगळ्या कल्पना सुचणे साहजिक. याचसंदर्भात ८ ऑक्टोबर रोजी औरंगाबादहून आलेली ही महागडी बातमी पहा. ती म्हणजे, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेचे अध्यक्ष अनिल सहस्त्रबुद्धे यांनी जारी केलेली मोदी यांचे कॉफी टेबल बुक अभियांत्रिकी महाविद्यालयांनी खरेदी करण्याची शिफारस. प्रत्येक प्रतीची किंमत तब्बल दहा हजार रुपये असलेले हे पुस्तक महाविद्यालयांच्या माथी मारले जात असल्याची चर्चा शिक्षण वर्तुळात सुरू झाली आहे, असे वृत्तात म्हटले होते. पुस्तकाचे नाव 'नरेंद्र मोदी हारबिंजर ऑफ प्रॉस्पॅरिटी अँड अपोसल ऑफ वर्ल्ड पीस,' असे आहे. त्यात सर्वत्र मोदी यांची छायाचित्रे आहेत. 'कॉफी टेबल बुक' हे सर्वसाधारणतः जागतिक परिषदांतून, मोठमोठ्या हॉटेल्समधून ठेवण्यात येते. त्याच्या संकल्पनेमागे येणाऱ्या जाणाऱ्याला, प्रवाशाला रिकामपणी ते चाळता यावे, असा हेतू असतो. अशी पुस्तके ताजमहाल, निरनिराळी ऐतिहासिक व रम्यस्थळे, खजुराहो, अजिंठा, वेरूळ येथील लेणी व राष्ट्रसंघातर्फे जागतिक ठेवा म्हणून दर्जा दिलेली स्थळे, याबाबत छापलेली असतात. अर्थातच, त्यासाठी वापरण्यात येणाऱ्या अत्यंत उच्चप्रतीच्या गुळगुळीत कागदामुळे, त्यातील छायाचित्रे, वर्णन आदी व हार्ड कव्हरमुळे त्यांची किंमत अव्वाच्या सव्वा असते.

मोदी यांचे जीवन पारदर्शक असल्याने त्यांच्याविषयी देशाला किंबहुना जगाला हवी त्यापेक्षा अधिक माहिती झाली आहे. मग, 'कॉफी बुक' खरेदी करावे,' असा दबाव कशासाठी? 'ही केवळ शिफारस आहे, सक्ती नव्हे,' असा वरवर मुलामा असला, तरी औरंगाबाद येथील एका अभियांत्रिकी महाविद्यालयास हे पुस्तक आल्यावर 'कदाचित, भेट म्हणून आले असावे,' असा महाविद्यालयाच्या प्राचार्यांचा समज झाला; परंतु त्यासोबत दहा हजार रुपयांचे देयकही असल्याने ही रक्कम कोरोनाच्या काळात खर्चावी का, असा प्रश्न प्राचार्यांपुढे निर्माण झाला आहे, असे बातमीत म्हटले होते. ४.२ किलोग्रॅमचे हे पुस्तक अमेरिकेत छापलेले आहे. येथे प्रश्न उपस्थित होतो, तो अभियांत्रिकी काय अन्य कोणत्याही विद्यापीठाने ते विकत का घ्यावे? दुसरे म्हणजे, मोदी यांना इतकीच गरज भासत असेल, देशातील महाविद्यालयांतील वाचनालयांत त्याच्या प्रती विनामूल्य का भेट दिल्या जात नाहीत? 'कॉफी बुक'च्या प्रती स्वखुषीने खरेदी करणारे एक तर त्यांचे श्रीमंत चाहते असतील वा खिशाला टाच लाऊन खरेदी करणारे त्यांचे भक्त असतील. ही बळजबरी कशासाठी?

## लसीकरणाचे श्रेय अन् तज्ज्ञांचा अवमान

शिक्षणाचे कोरोनामुळे आधीच बारा वाजलेले. या क्षेत्राला आलेली मरगळ संपणार केव्हा, हा प्रश्न विद्यार्थी जगतापुढे आहे, तर ऑनलाईन शिक्षणामुळे पालकांच्या चिंता वाढल्यात. तासन्‌तास डोळ्यापुढे संगणक व हातात मोबाईल फोन ठेऊन अभ्यास करणाऱ्या बैठ्या सवयीमुळे विद्यार्थ्यांतील स्थूलता वाढतेय. मैदानी खेळ खेळण्याची सवय कायमची मोडतेय. त्याचा परिणाम त्यांचे व पर्यायी कुटुंबाचे आरोग्य धोक्यात येण्यात होतोय. कोरोनाने जगातच 'वर्क फ्रॉम होम'ची संस्कृती आणल्याने त्यातून केव्हा बाहेर पडता येणार, हा प्रश्न सर्वांपुढे आहे. या स्थितीतही मोदींच्या उदोउदोचा वारू जोरात धावतोय. उदाहरणार्थ, विद्यापीठ अनुदान आयोगाचा (यूजीसी) फतवा. काही महिन्यांपूर्वी आयोगानं देशातील सर्व विद्यापीठे व कॉलेजना आदेश पाठविला, की मोदी यांनी विनामूल्य कोरोनाची लस उपलब्ध करून दिल्यामुळे त्यांचे आभार मानणारे फलक त्यांच्या परिसरात जागोजागी लावले पाहिजेत. दिल्ली विद्यापीठ व जम्मू काश्मीरमधील माता वैश्नोदेवी विद्यापीठाने असे पोस्टर्स लावल्याची छायाचित्रे प्रसिद्ध झाली. त्यावरील वाक्य असे, "व्हॅक्सीन फॉर ऑल. फ्री फॉर ऑल. वर्ल्डस् लार्जेस्ट व्हॅक्सिनेशन कॅम्पेन. थँक यू पीएम मोदी." असे सांगण्यात येते, की शिक्षण मंत्रालयाने त्यासाठी दबाव आणला. आदेशपालन करण्याव्यतिरिक्त यूजीसीपुढे पर्याय उरला नाही. शिवसेनेच्या प्रवक्त्या प्रियंका चतुर्वेदी, स्वराज इंडियाचे अध्यक्ष योगेंद्र यादव, विद्यापीठातील प्राध्यापक यांनी यावर जोरदार टीका केली. शिवाय, लस जेव्हा उपलब्ध झाली, तेव्हा ती 'फ्री फॉर ऑल' नव्हतीच. त्यासाठी प्रत्येकाला प्रारंभी सातशे ते आठशे रुपये मोजावे लागले. नंतर दर अडीचशे रुपयांपर्यंत कमी झाले.

२०१४ मध्ये भाजप सत्तेत आल्यापासून देशातील प्रत्येक क्षेत्र पोखरून काढण्याचे काम सुरू आहे. जवाहरलाल नेहरू विश्वविद्यालय, हैदराबाद विश्वविद्यालय, पश्चिम बंगालमधील जाधवपूर विश्वविद्यालय, जामिया मिलिया विद्यापीठ यामध्ये सर्रास राजकीय हस्तक्षेप करून तेथील वातावरणात ढवळाढवळ करण्यात आली. देशभक्ती रूजावी म्हणून जेएनयूच्या परिसरात रणगाडा आणून ठेवण्यात आला. रणगाडा पाहिला, की युद्धाची आठवण येते. पण लगेच देशभक्ती जागृत होईलच, याची खात्री नाही. तेव्हा, ही कल्पना माथी मारण्याचे प्रयोजन काय? कोरोनामुळे जवळजवळ सर्व शिक्षणसंस्था गेले दीड दोन वर्षे बंद असल्याने विद्यार्थ्यांचे मोठे नुकसान झाले. येती अनेक वर्षे ते भरून निघण्याची शक्यता नाही. या दिवसांत विशेष डूख धरण्यात आला, तो जागतिक कीर्तीच्या शिक्षणतज्ज्ञांवर. रोमिला थापर या प्रख्यात इतिहासकार. त्यांना त्यांच्या शिक्षणाचे, अनुभवाचे तपशील विचारल्याने जेएनयूचे हसे झाले. थापर यांचे स्थान मात्र कायम राहिले. जे जे विचारवंत, शिक्षणतज्ज्ञ सरकारला विरोध करतात, त्यांना वेचून वेचून त्यांचा अपमान करण्याची मोहीमच हाती घेण्यात आली. त्यामुळे, 'हस्तक्षेप राजकीय स्वरूपाचा आहे,' अशी जोरदार टीका होत आहे.




## सत्तेचा उन्माद अन् बळीराजाबद्दल अनास्था

कोरोना संकटाचा बराच लाभ सत्तारूढ पक्षाला झालाय. कसा ? या महामारीमुळे सरकारला आरोग्याच्या नावाखाली जनतेवर अनेक बंधने लादण्याची संधी मिळाली. माणसं घरात जायबंदी झाली. प्रारंभीच्या काळात मोदी यांनी घेतलेल्या टाळेबंदीच्या निर्णयाचे थाळ्या वाजवून स्वागत करण्याचे आवाहन खुद्द मोदी यांनी केले व लोकांनी ते पाळलेही. त्यामुळे सरकारला समाधान मिळाले खरे; परंतु कोरोनाची घोडदौड थांबली नाही. आपल्याच प्रयत्नांचे ढोल बजावण्यात सरकार मग्न राहिले. गाफिलता वाढली. दुसरी लाट आली व प्राणवायूअभावी व कोरोनामुळे माणसं मुंग्यांसारखी मरू लागली, तेव्हा कुठे सरकारला जाग आली. तोवर वेळ निघून गेली होती. तरीही उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ आपल्याच तोऱ्यात होते. डॉक्टर्स व रुग्णालयांनी 'प्राणवायू नाही,' अशी तक्रार करणे त्यांना पसंत नव्हते. अशा डॉक्टरांवर कारवाई करण्यास त्यांनी मागेपुढे पाहिले नाही. केंद्र व राज्य सरकारचे अनेक पातळ्यांवरील अपयश व ढिसाळपणा जगापुढे येत होता. देशांतर्गत एकप्रकारची भयप्रद शांतता होती. आपल्याकडे म्हण आहे, तसा स्वर्ग खरोखरी दोन बोटे उरला होता. दारापुढे केव्हा यमराज येऊन उभा राहील, याची शाश्वती नव्हती. मृत्यूचं तांडव सुरूच होतं. अशा परिस्थितीत सरकारविरूद्ध कोणतीही राज्यव्यापी, देशव्यापी मोहीम अथवा आंदोलन उभं राहू शकलं नाही. उभे राहिले ते फक्त शाहीनबागेतील मुस्लिम महिलांचे आंदोलन व दिल्लीच्या सीमेवर येऊन ठेपलेले पंजाब, हरियाना व उत्तर प्रदेशातील शेतकऱ्यांचे आंदोलन. शाहीनबागेतील मुस्लिम महिलांच्या मागे 'पाकिस्तानातील तत्त्व' आहेत व शेतकऱ्यांच्या आंदोलनामागे 'खलिस्तानी', असे आरोप करण्यात आले. वस्तूतः ही दोन्ही आंदोलने उत्स्फूर्त अशी होती. त्यातील महिलांचे आंदोलन मागे घेण्यात आले असले, तरी दिल्लीच्या वेशीवर गेली दीड दोन वर्षे येऊन बसलेल्या हजारो शेतकऱ्यांचे आंदोलन मागे सरलेले नाही.

दोन्ही बाजू इरेस पेटल्यात. 'केंद्राने शेतीविषयक केलेले तीन कायदे रद्द करावेत,' ही शेतकऱ्यांची मागणी कायम आहे. दुसरीकडे,



'ते कायदे रद्द होणार नाहीत,' ही केंद्राची ठाम भूमिका आजही कायम आहे. त्यातूनच अलीकडे भडका उडाला तो लखीमपूर खेरी येथील घटनेचा. ''केंद्रात आपलंच सरकार आहे. त्यामुळे आपण कसेही वागलो, काहीही बोललो, चिथावण्या दिल्या, हिंसाचार केला, तरी आपलं कुणी काही वाकडं करू शकणार नाही,'' असा आत्मविश्वास सत्तारूढ पक्षाच्या नेत्यांत व कार्यकर्त्यांत आला आहे. केंद्रीय पातळीवरील मंत्र्यांनी भाषणे करायची व पक्ष कार्यकर्त्यांनी स्थानीय पातळीवर कायदा हाती घ्यायचा, हे राजरोसपणे चालले आहे. पोलीस यंत्रणा निर्ढावलीय. परिणामतः विरोधकांना उचलून कोणतेही कारण न दाखविता, तुरूंगात डांबण्याचे, त्यांना तिथं दिवसेंदिवस खितपत ठेवण्याचे प्रकार वाढलेत. दमनचक्र वेगात फिरत आहे. त्यात आयकर विभाग, एनआयए (नॅशनल इन्व्हेस्टीगेटीव एजन्सी), एनबीसी (नॅशनल नार्कोटिक ब्यूरो, सीबीआय, एनफोर्समेन्ट डायरेक्टोरेट या संस्थांचा रोज वापर होताना दिसतो. अशा परिस्थितीत, न्याय मागण्यासाठी न्यायालय हे एकच माध्यम उरल्याने अन्याय झालेल्या साऱ्यांचीच धाव त्याकडे चालू आहे. सरकारने मुस्लिम महिलांविषयक ट्रिपल तलाकचा कायदा रद्द केला, तथापि, अल्पसंख्याकांची व दलितांची मारहाण, अत्याचार, पक्षपात थांबलेले नाही.

## पंतप्रधान संवेदनाहीन

सरकारनुसार, 'इंडिया स्पेन्ड' या संस्थेने केलेल्या पाहणीत २०१४ ते २०१७ या काळात जातीय दंग्यांच्या संख्येत २८ टक्क्यांनी वाढ झाली. त्याला बनावटी बातम्या (फेक न्यूज), अफवा कारणीभूत होत्या. भारताचे 'लिंचिस्तान' असे वर्णन का केले जाते, याचा गंभीरपणे विचार करण्याची वेळ आली आहे. २०१३ ते २०१७ दरम्यान २,९२० हिंसक जातीय व धार्मिक घटना घडल्या. त्यात ३८९ लोकांचा मृत्यू झाला, तर ८,८९० लोक जखमी झाले. गृहमंत्रालयाची ही अधिकृत माहिती असून, ती 'नॅशनल क्राईम्स रेकॉर्ड ब्यूरो'ने संकलित केलेली आहे. उत्तर प्रदेशात 'आपल्या कारकीर्दीत कोणतेही जातीय दंगे झाले नाहीत,' असा दावा करणाऱ्या मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या राज्यात ६४५ घटना घडल्या. त्यांची संख्या ४७ टक्क्यांनी वाढली. २०१४ मधील संख्या १३३ घटनांवरून २०१७ मध्ये १९५ वर गेली. मानवाधिकारांची पाहणी करणाऱ्या 'ह्युमन राइट्स वॉच' या संस्थेनुसार, 'सामाजिक भय, द्वेष व हिंसाचार यात वाढ झाली आहे.'

अलीकडे उत्तर प्रदेशातील लखीमपूर खेरी येथील घटनेचे पडसाद देशभर उमटले. आदल्या दिवशी शेतकऱ्यांपुढे जाऊन त्यांना धमकावणारा केंद्रीय गृहराज्यमंत्री मिश्रा यांचा मुलगा आशिष मिश्रा याने आपल्या साथीदारांसह दुसऱ्याच दिवशी शेतकऱ्यांच्या जमावात गाड्या घुसविल्या. त्यामुळे चार जण जागच्या जागी ठार झाले. प्रक्षुब्ध जमावाने गाडीचालक व भाजपच्या कार्यकर्त्याला चेचले. एकूण आठ जण ठार झाले. घटना घडली, तेव्हा मोदी व मुख्यमंत्री आदित्यनाथ लखनौमधील समारंभात एकत्र होते. तथापि, मोदी यांनी त्याविषयी ब्रही काढला नाही. मृतांबाबत सहानुभूती व्यक्त करणे तर सोडाच; परंतु ट्विटरचा सतत वापर करणाऱ्या पंतप्रधानांनी त्याविषयी काही बोलू नये, की लखीमपूर खेरीला भेट देऊ नये, यापेक्षा अधिक निर्दयता ती कोणती! जनतेच्या प्रश्नांबाबत ते अधिकाधिक संवेदनाहीन होत चालले आहेत, असे तर नव्हे? 'तो मी नव्हेच,' असे सांगणारा आशिष मिश्रा एकाएकी आठवडाभर गायब कसा झाला? त्याला पोलिसांनी ताबडतोब का अटक केली नाही? या घटनेची सर्वोच्च न्यायालयाने स्वतःहून (सुओमोटू) दखल घेतल्यावर उत्तर प्रदेश सरकारची चक्रे सुरू झाली व त्याला अटक करण्यात आली. येत्या काही दिवसांत त्याला निर्दोष ठरविण्यासाठी व जामीन मिळविण्यासाठी सरकारची सर्व शक्ती पणाला लागेल, हे आपल्याला दिसेलच. कोणतीही दंगल, हिंसाचार झाला, की 'लॉ विल टेक इट्स ओन कोर्स', असे सरकारचे उत्तर असते. हा 'कोर्स'

पूर्ण होईपर्यंत असे अनेक प्रकार घडलेले असतात आणि आधीचे प्रकरण मागे पडलेले असते, हे वर्षानुवर्षे घडत आलय. त्यामुळेच राजकारणी नेहमी जनतेच्या 'शॉर्ट मेमरी'वर अवलंबून असतात.

## पारदर्शकतेचे वावडे

सरकारने प्रकाशात न आणलेली अथवा दाबून ठेवलेली माहिती मिळविण्याचा हक्क नागरिकाला माहिती अधिकार कायद्याखाली मिळाला आहे. प्रत्यक्षात परिस्थिती विपरित आहे. सतर्क नागरिक संघटन या संस्थेने केलेल्या पाहणीनुसार, जून २०२१ अखेरपर्यंत माहिती मागणारे सव्वा दोन लाख अर्ज प्रलंबित होते. याबाबत प्रसिद्ध झालेल्या माहितीत, माहिती न देणाऱ्या राज्यांमध्ये महाराष्ट्राचा पहिला क्रमांक आहे. त्याखालोखाल उत्तर प्रदेश, केंद्रीय माहिती आयोग, राजस्थान, ओडिशा, तेलंगणा, पश्चिम बंगाल, केरळ, मध्य प्रदेश व आंध्र प्रदेश यांचा क्रमांक लागतो.

पारदर्शकतेचे सरकारला वावडे आहे, हे वरील आकडेवारीवरून सातत्यानं दिसून येतय. दुसरीकडे, पँडोरा पेपर्समधून अनेक वित्तीय सांगाडे बाहेर येत आहेत. पेगॅससचे तंत्रज्ञान वापरून देशातील असंख्य प्रतिष्ठित नागरिक व विरोधकांवर पाळत ठेवली, हे सूर्यप्रकाशाएवढे स्वच्छ असले, तरी ते तंत्रज्ञान खरेदी केले होते की नाही, हेदेखील केंद्र सरकार सांगण्यास तयार नाही. कुणाकुणावर पाळत ठेवण्यात आली, त्यांची नावे प्रसिद्ध होऊनही. या तंत्रज्ञानाचा गैरवापर करून तब्बल ५० हजार मोबाईल फोन्समध्ये सरकारने ढवळाढवळ केली. माहिती अधिकार कायद्याखाली माहिती विचारली असता, सुरक्षेच्या कारणाखाली ती देण्याचे सरकारने टाळले. उलट फ्रान्स, मोरोक्कोसारख्या देशांनी त्याबाबत तत्काळ चौकशीचे आदेश दिले.

## अयोध्येतील अशांतता

आता अयोध्येतील साधूसंतांच्या आखाड्याकडे पाहू. अयोध्येतील अखिल भारतीय आखाडा परिषदेचे मुख्य महंत नरेंद्र गिरी यांनी त्यांच्या बाघंबरी मठात आत्महत्या केली. या सनसनाटी घटनेने संतमहंतांचं विश्व ढवळून निघालं. कारण त्यांचं व्यक्तिमत्व अत्यंत आदरणीय होतं. अयोध्येतील राममंदिर उभारणी, मथुरा, काशी येथील मोहिमा यांना त्यांचा पाठिंबा होता. 'अयोध्येप्रमाणे काशी, मथुरा येथील मशिदींना पाडून तिथं मंदिरं उभारावी,' या मोहिमेत ते आघाडीवर होते. फास लावून घेण्याचं कारण आनंद गिरी या शिष्यासह अन्य शिष्यांबाबत ते नाराज व दुःखी होते. आत्महत्येसंदर्भात लिहिलेल्या चिठ्ठीत त्यांनी हे म्हटले आहे. त्यानंतर आनंद गिरी याचे परदेश प्रवास, तेथील उंची हॉटेल्समध्ये वास्तव्य, उंची गाड्या चालविणे व ऐशोआराम करणे याबाबत अनेक छायाचित्रे व व्हिडिओ वाहिन्यांवरून दाखविण्यात आले. अयोध्येच्या हनुमानगढी मंदिराचे मुख्य पुजारी महंत राजू दास यांच्यानुसार, यामागे कटकारस्थान असून त्याची उच्चस्तरीय चौकशी झाली पाहिजे. या घटनेला दोन आठवडे उलटलेत. पुढे काय झाले? चौकशी कशी चालू आहे? कुणाकुणाला जबाबदार धरले जात आहे? याबाबतचे तपशील प्रकाशात येणे गरजेचे आहे. या प्रकरणामागे आखाड्याकडे असलेल्या शेकडो एकर जमिनीचा व त्यावरील अधिकाराचा वाद आहे, असेही सांगितले जाते. या घटनेने निर्माण झालेली अयोध्येतील अशांतता अद्याप संपुष्टात आलेली नाही.



## आर्यन प्रकरण दिशाभूल करण्यासाठी?

सरकारला जबाबदार धरणाऱ्या प्रसंगाकडून दुसऱ्या घटनांकडे लोकांचे लक्ष वळविण्याचे तंत्र सरकारने अवगत केले आहे. याचे ताजे उदाहरण म्हणजे, गुजरातमधील मुंद्रा बंदरात अफगाणिस्तानातून चोरट्या मार्गाने आलेल्या २१ हजार कोटी रुपयांच्या ३ हजार किलो हेरॉईन (मादक पदार्थ)ची महसूल खात्याच्या गुप्तचर विभागाने केलेली जप्ती. टालकम पावडरच्या नावाखाली ती आली. त्याबाबत सहा लोकांना अटकही झाली; परंतु इतक्या मोठ्या प्रमाणावर ती आयात करणाऱ्यांवर नेमकी काय कारवाई होत आहे, हे जनतेसमोर आलेले नाही. वृत्तानुसार, अफगाणिस्तान-इराणमार्गे अफगाणिस्तानातील मे. हसन हुसेन लि. तर्फे विजयवाडा (आंध्र) येथील आशी ट्रेडिंग कंपनीने हेरॉईन आयात केले. या व्यवहाराचे पितळ उघडे पाडण्याची गरज आहे. अफगाणिस्तानात आता तालिबानचे सरकार आले आहे. तेथील अर्थव्यवस्थेला हातभार लावण्यासाठी तालिबान पुन्हा अफूची शेती व अन्य मादक पदार्थांच्या निर्यातीकडे वळणार, हे स्पष्ट दिसत आहे. त्यावर लक्ष केंद्रीत करण्याची गरज आहे. उलट, ब्यूरोचा रोख मुंबईच्या बॉलिवूडमधील अभिनेता शहरूख खानचा मुलगा आर्यन खान व त्याच्या सहकाऱ्यांकडे वळलाय. त्यामागे मुंद्रा बंदरात जप्त केलेल्या हेरॉईनकडे लोकांचे दुर्लक्ष व्हावे, असा सरकारचा प्रयत्न असल्याचा आरोप काँग्रेस व अन्य विरोधी पक्ष करीत आहेत. मोठ्या माशाला सोडायचे व छोट्यांना पकडून आपण फार मोठी कामगिरी करतोय, असं दाखवायचं, याकडेच अधिक कल आहे.

## लोकशाहीतील 'धाकशाही'

मोदी यांनी अलीकडे एका मुलाखतीत सांगितले, की टीकाकारांना मी 'मिस' करतो. ''बट अनफॉर्च्युनेटली द नंबर ऑफ क्रिटिक्स इज व्हेरी फ्यू. मोस्ट पीपल ओन्ली लेव्हल ॲलिगेशन्स द पीपल हू प्ले गेम्स अबाऊट परसेप्शन्स आर मोअर इन नंबर.'' पंतप्रधानांच्या दाव्याची कारणे वेगवेगळी आहेत. त्यांच्यावर टीका करणारे पत्रकार, वाहिन्या, संकेतस्थळे यांच्याविरूद्ध त्यांच्या सरकारने गेल्या काही वर्षात सर्व प्रकारच्या कारवाया करून त्यांना 'टीका कराल, तर खबरदार,' असा उघडउघड इशाराच दिला. त्यांच्याविरूद्ध देशद्रोहाचे खटले भरले. टीकाकारांवर ट्रोलर्सना सोडले. अनेक पत्रकारांना तुरूंगात टाकले. अलीकडे मॅगसेसे पारितोषिक विजेते नामवंत सामाजिक कार्यकर्ते हर्ष मांडेर यांच्याविरूद्ध चौकशीचा ससेमिरा लावण्यात आला. एनकेन प्रकरेण, बहुतेक वाहिन्यांना सरकारधार्जिणे बनविले. अशा परिस्थितीत टीकाकारांची संख्या कमी होणे साहजिक. पंतप्रधान सर्वेसर्वा आहेत, सर्वशक्तीशाली आहेत. ते 'एकाधिकारशहा आहेत, हुकुमशहा आहेत,' अशी टीका विरोधी पक्ष करतात. त्यांना मोदी यांचे हे वरील उत्तर आहे, असे गृहित धरले, तरी त्यांच्या सरकारविषयी जनमानसात गेल्या सात वर्षात लोकशाहीतील 'धाकशाही'ची जी प्रतिमा तयार झाली आहे, ती पुसून टाकता येणार नाही. त्यांना टीका सहन होत नाही, असेच दिसते. उदा. पिलिभीतचे भाजपचे खासदार वरूण गांधी यांनी शेतकऱ्यांची बाजू घेऊन 'लखीमपूर खेरी येथील घटना हिंदू व शिखात तेढ निर्माण करणारी आहे. शेतकऱ्यांचे खून करण्यात आले,' असे ट्विट करताच, त्यांना तसेच मनेका गांधी यांना भाजपच्या राष्ट्रीय कार्यकारिणीतून काढण्यात आले. सुब्रमण्यम स्वामी यांनाही कार्यकारिणीतून काढण्यात आले. हा पक्षांतर्गत टीकाकारांना इशाराच आहे. 'पक्षात लोकशाही आहे,' असा दावा गृहमंत्री अमित शहा भलेही करोत; परंतु काही रास्त मुद्यांवर अथवा जनप्रक्षोभाबाबत मोदी-शहा यांच्यावर टीका करण्याची भाजपतील कुणाचीही शामत नाही, हे स्पष्ट दिसते.

## काश्मीर चिघळतेय

देशाच्या या अस्वस्थतेत रोज कोणत्या न कोणत्या घटनांची भर पडत आहे. जम्मू काश्मीरमधील परिस्थिती रूळावर येण्याची शक्यता दुरावत चाललीय. तेथील 'रेझिस्टन्स फोर्स' या संघटनेच्या अतिरेक्यांनी ७ ऑक्टोबर रोजी सरकारी शाळेतील हिंदू प्राचार्य श्रीमती सुपिंदर कौर (४६) व काश्मिरी पंडित दीपक चांद (३८) यांची दिवसाढवळ्या गोळ्या घालून हत्या केली. काश्मीरच्या खोऱ्यात हिंदू व शिखांचे पुनर्वसन करण्याच्या केंद्राच्या योजनेला त्यामुळे मोठा धक्का बसला आहे. घटनेतील ३७० वे कलम रद्द झाल्यावर ''काश्मीरच्या खोऱ्यातील परिस्थितीत शांततेच्या दिशेनं कायापालट झाला आहे,'' असा दावा केंद्र सरकार करीत आहे. प्रत्यक्षात तेथील परिस्थिती दिवसेंदिवस चिघळत चालल्याचे हे लक्षण होय. त्यांची हत्या करण्याच्या अवघे दोन दिवस आधी तीन नागरिकांची हत्या झाली. त्यात काश्मिरी पंडित व मेडिकल शॉपचे मालक एम.एल.बिंद्रू यांचा समावेश होता. जम्मूत शांतता दिसत असली, तरी ती वादळापूर्वीची आहे, असे दिसते.




कारण, हिवाळा येतो, तसे पाकिस्तान, दुर्गम पीर पांजाल पर्वतराजीतून अतिरेक्यांना घुसवायला सुरूवात करतो. त्यांच्या हिंसक कारवायांमुळे खोऱ्यातील शांतता पुन्हा भंगते. लडाखमध्ये आजही चीनचा धोका कायम आहे. तेथे चीनी सैन्याची पुन्हा मोर्चेबांधणी सुरू झाल्याचे नुकतेच लष्करप्रमुख जनरल मनोज नरवणे यांनी सांगितले. ''अफगाणिस्तानातून पाकिस्तानमार्गे काश्मीरच्या खोऱ्यात दहशवादी येणार नाही,'' असे कोणतेही आश्वासन तालिबान सरकारने भारताला दिलेले नाही. अशा परिस्थितीत मोदी व भाजप यांची वाटचाल कशी चालू आहे, याचे चपखल विश्लेषण माजी पंतप्रधान डॉ. मनमोहनसिंह याचे वृत्तपत्रीय सल्लागार हरिश खरे व माजी उपपंतप्रधान लालकृष्ण अडवाणी यांचे राजकीय सल्लागार सुधींद्र कुलकर्णी यांनी १७ सप्टेंबर रोजी 'द हिंदू' या दैनिकाला दिलेल्या मुलाखतीत केले आहे. भारतीय जनता पक्षात 'काँग्रेस संस्कृती रूजली आहे,' असे त्यांचे म्हणणे. काँग्रेसमध्ये सारे काही 'हाय कमांड'च्या हाती असते. त्या 'हाय कमांड'मध्ये सोनिया गांधी, राहुल गांधी व प्रियंका गांधी वड्रा हे तीन नेते आहेत. तर, भारतीय जनता पक्षात मोदी व शहा हे दोन नेते म्हणजे पक्षाची 'सुपर हाय कमांड' आहे. केंद्रातील मंत्रिमंडळ बदल असो, की भाजपचे राजकीयदृष्ट्या अस्थिर राज्य असो, तेथे नेताबदल करायचा असेल, तर मोदी-शहा यांच्याशिवाय पान हालत नाही. याचाच अर्थ, काँग्रेसच्या 'हाय कमांड' संस्कृतीवर कितीही टीका केली, तरी तिचाच अवलंब मोदी-शहा यांना करावा लागत आहे. गुजरात, उत्तराखंड, कर्नाटक व आसाममध्ये नेतृत्वबदल करावे लागले. गैरकाँग्रेसी सरकारे अस्थिर करण्यासाठी काँग्रेस जे तंत्र अवलंबित होती, तेच तंत्र भाजप महाराष्ट्र, राजस्थान, छत्तीसगढ या काँग्रेसच्या नेतृत्वाखाली असलेल्या राज्यांमध्ये अवलंबित आहे. काँग्रेस, तृणमूल काँग्रेस यातील भ्रष्ट नेत्यांना प्रवेश देऊन पावन करीत आहे. संघराज्य पद्धतीला त्यामुळे तडा जातोय, याकडे सत्तारूढ पक्ष जाणूनबुजून दुर्लक्ष करीत आहे, असा निष्कर्श काढायचा काय?

तामिळनाडू, ओडिशा, महाराष्ट्र, पश्चिम बंगाल, तेलंगणा, आंध्र प्रदेश, झारखंड, केरळ, दिल्ली, मेघालय, मिझोराम, नागालँड या राज्यात असलेल्या गैरकाँग्रेसी व गैरभाजप प्रादेशिक पक्षांच्या सरकारांनी देशाची संघराज्य पद्धती टिकवून ठेवल्याने सत्तारूढ पक्षाच्या एकाधिकारशाहीत लोकशाहीचे 'ओॲसिस' टिकून आहे. आजच्या अस्वस्थ वर्तमानाला त्यामुळेच, भविष्यात 'चांगले दिवस' येतील, अशी आशा करायला हरकत नाही. ●●●

**(लेखक दिल्लीस्थित ज्येष्ठ पत्रकार आहेत)**

# सरकारचा पाठीराखा ओबीसी झाला भकास




**आरएसएस आणि भाजपचा ओबीसी पाठीराखा आहे. तरीही तो विकासाच्या बाबतीत अजून शून्यातच अडकला आहे. आता तेथूनच अस्वस्थतेची वादळे घोंघावत आहेत.**



**प्रा. हरी नरके**

लोकसंख्येच्या पन्नास टक्क्यांहून अधिक ओबीसी म्हणजे निम्म्याहून अधिक भारत. मनूने शूद्र ठरवलेला आणि हरवलेला एक मोठा जनसमूह. इथल्या धर्म-परंपरांनी बळी ठरवलेला समूह. तसा तो सर्वच दृष्टीने मागास म्हणून ओबीसी. समाजात संपत्ती निर्माण करणारा पण त्यात वाटा नसणारा, धर्माच्या रक्षणासाठी वापरला जाणारा पण तेथेही प्रतिष्ठा नसणारा, जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत आपली जगण्याची साधने नवभांडवलशाहीच्या वरवंट्याखाली गमावून बसलेला समाज. लोकशाही आणि स्वातंत्र्यात त्याचा विकास कसा करायचा याची काही सूत्रे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी राज्यघटनेत कोरून ठेवली होती. पण त्याच्या अंमलबजावणीला खूप काळ लागला. तोपर्यंत ओबीसीला अज्ञान, दारिद्र्य आणि पिळवणुकीने घेरले होते. तोच आत्महत्येत, बेकारीत आणि दारिद्र्यात आघाडीवर होता. सत्तर-ऐंशीच्या दशकात त्याच्यात थोडी जागृती आणि जुजबी संघटनही होऊ लागले. मंडल आयोग आला आणि ओबीसीसाठी राखीव जागांच्या निमित्ताने विकासाची एक खिडकी उघडली गेली. तिची सारखी उघडझाप होऊ लागली. त्यामुळे ओबीसी प्रचंड अस्वस्थ झाला. त्याला आपलं भविष्य अंधारमय दिसू लागलं. गेले काही दिवस तर ही अस्वस्थता टोकाला पोहोचलीय.

महाराष्ट्रात आणि इतरत्रही विविध आरक्षण प्रश्नांनी उचल खाल्लेली आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निकालामुळे गेलेले ओबीसी व मराठा आरक्षण, राज्य सरकारने रद्द केलेले अनु. जाती, जमातींचे पदोन्नतीतील आरक्षण, धनगर व मुस्लिम समाजांची आरक्षणाची मागणी, मद्रास उच्च न्यायालयाने रद्द केलेले उच्चजातीयांचे (ई. डब्ल्यू.एस.) आर्थिक आधारावरील आरक्षण असे अनेक प्रश्न ऐरणीवर आल्याने माहौल आरक्षणमय झालेला आहे. एक अभूतपूर्व अस्वस्थता निर्माण झाली आहे.

मोदी सरकारने सामाजिक न्याय हा विषय राज्य व केंद्र असा दोघांचा असताना ऑगष्ट २०१८ मध्ये १०२ वी घटनादुरुस्ती करून राज्यांचे अधिकार काढून घेतले. त्यामुळे मराठा आरक्षण रद्द झाल्याने आक्रोश वाढला. मोदी सरकारला १२७ वी घटनादुरुस्ती करून राज्यांना १९५० पासून असलेले हे अधिकार पुन्हा द्यावे लागले. ही चूकदुरुस्तीची नामुष्की म्हणजे मोदी सरकारने राज्यघटनेची चेष्टा चालवलेली आहे. अवघ्या तीन वर्षांत एकाच गोष्टीसाठी दोनदा घटनादुरुस्ती करण्याची वेळ सरकारवर का आली? घटनादुरुस्ती हा काय पोरखेळ आहे का? २००७ पासून मिळत असलेले अ.भा. कोट्यातील २७ टक्के ओबीसी वैद्यकीय आरक्षण जे मोदींनी २०१७ साली अचानक बंद केले होते, ते परत द्यावे लागल्याची नामुष्की ओढवल्यानेच अब्रु वाचवण्यासाठी केंद्रीय मंत्रिमंडळात ओबीसी मंत्री घ्यावे लागले. मोदींच्या लोकप्रियतेला ओहोटी लागलेली आहे. देशातील सर्वात मोठ्या राज्यातील म्हणजे उत्तर प्रदेशातील निवडणुका तोंडावर आहेत. तिथे योगींनी इतका बट्ट्याबोळ करून ठेवलाय, की भाजपाचा प. बंगाल होणार हे उघडपणे दिसते आहे. अशावेळी वरवरच्या मलमपट्ट्या करण्याची वेळ केंद्रावर व त्याच्या मातृसंस्थेवर आली आहे. आरक्षणमुक्त भारताचा झेंडा खांद्यावर घेऊन निघालेल्या मातृसंस्थेला नुकतेच आपण आरक्षणाचे समर्थक असल्याची राजकीय घोषणा करावी लागलेली आहे. काळाने घेतलेला हा सूड आहे.

## आरक्षण गेल्यावर वटहुकूम

गेली अनेक महिने ओबीसी अस्वस्थ आहे. पंचायत राज्यात त्याला गेली २५ वर्षे मिळणारे सर्व राजकीय आरक्षण सर्वोच्च न्यायालयाने एका निकालाने अचानक काढून घेतले. ते कोणामुळे गेले, याबाबत सत्ताधारी व विरोधक आरोप-प्रत्यारोपांची धुळवड खेळत आहेत. पाच जिल्हा परिषदांमधले आरक्षण गेल्यावर राज्य सरकारने नुकताच ओबीसी आरक्षणाचा वटहुकूम काढलेला आहे. पाच जिल्हा परिषदांमध्ये याआधीच आचारसंहिता लागू झालेली असल्याने हा अध्यादेश पूर्वलक्ष्यी प्रभावाने लागू होऊ शकत नाही. तो जानेवारी-फेब्रुवारीत ज्यांना आपण मिनी विधानसभा म्हणतो

त्या मुंबई, ठाणे, पुणे, नागपूर या १८ महानगर पालिकांना व २४ जिल्हा परिषद निवडणुकांना लागू होईल.

राज्याने वारंवार मोदी सरकारकडे समाजिक-आर्थिक-जात जनगणना २०११-१४ चा डेटा मागितला. पण केंद्र सरकारने हटवादीपणा करून तो दिलाच नाही. त्यामुळे आरक्षण गेल्याचा राज्यातील सत्ताधाऱ्यांचा आरोप आहे. तर केंद्राचा याच्याशी संबंधच नाही. हा इंपिरिकल डेटा राज्याने जमवायचा आहे, असे राज्यातील विरोधक म्हणत राहिले. केंद्राकडील हा डेटा मिळाला असता तर राज्याचे काम सोपे झाले असते. त्यामुळे आरक्षण वाचवता आले असते ही वस्तुस्थिती दडवण्याचा भाजपाचा आटापिटा चालूय. कष्टकरी व महिला वर्गाचे प्रतिनिधी राजसत्तेत असल्याशिवाय लोकशाही राज्यव्यवस्था खऱ्या अर्थाने भक्कम होणार नाही, असे मत गांधी-नेहरू-आंबेडकर मांडत असत. या सूत्रावर आधारलेली राज्यघटनेची ७३ व ७४ वी दुरुस्ती राजीव गांधी व नरसिंहराव यांच्या प्रयत्नातून झाली. त्यातून पंचायत राज्यातील महिला व ओबीसी आरक्षण १९९४ साली काँग्रेस सरकारचे मुख्यमंत्री असलेले शरद पवार व ओबीसी नेते छगन भुजबळ यांच्यामुळे आले.

महाराष्ट्रातील सुमारे ५६,००० ओबीसी नेत्यांना आरक्षण गेल्याने आपापली पदे गमवावी लागली. यापूर्वी सुमारे तीन लाख कुटुंबांना या राखीव जागांचा लाभ झालेला होता. ही सर्व साडेतीन लाख मंडळी ग्रामपंचायत ते महानगरपालिका स्तरावरची छोटीमोठी नेतेमंडळी आहेत. त्यांच्यामागे जनता आहे. ही जनता रस्त्यावर आली तर कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला असता. पण हा वर्ग विस्कळीत आहे, अर्धशिक्षित आहे. आपल्या हक्कांची पुरेशी जाणीव त्याला नाही. त्याला धार्मिक गोष्टीत अडकवून ठेवण्यात आलेले आहे. जेव्हा गुलामालाच आपल्या गुलामीची जाणीव नसते, तेव्हा बंड होत नसते. या निकालाला साडेसहा महिने झाले, पण ज्यांच्या जागा गेल्यात त्या सर्व लोकप्रतिनिधींनासुद्धा याची माहिती झालेली नाही. इतर राज्यांमध्येही सामसुम आहे. अज्ञानात सुख असते, असे म्हणतात. त्याचा अनुभव हे ओबीसी घेत आहेत. देशातील सुमारे नऊ लाख ओबीसी प्रतिनिधींच्या जागा या निकालाने गेलेल्या आहेत. ओबीसी हा प्रगत, प्रबळ आणि जागृत वर्ग असता तर या निकालाने देशात भडका उडाला असता, उद्रेक झाला असता. अर्थात, सगळेच काही झोपलेले नाहीत. नवजागृत तरूण वर्ग संतप्त आहे. ही परिस्थिती का उद्भवली? ती टाळण्याचा काही उपाय आहे का? महाविकास आघाडी सरकारपुढे आता कोणते पर्याय आहेत? सरकार ते उपाय योजणार की जुगाड बनवून तात्पुरती मलमपट्टी करणार?

सर्वोच्च न्यायालयाने पंचायत राज्यातील निवडणुका पुढे ढकलण्याचा अधिकार राज्य सरकारला नसल्याचा निर्वाळा नुकताच दिलेला आहे (११ सप्टेंबर). राज्य निवडणूक आयोगाने त्याबाबत योग्य तो निर्णय घेऊन सहा आठवड्यांत सर्वोच्च न्यायालयाला अहवाल सादर करावा, असेही निकालात म्हटलेले आहे. गेल्या १९ जुलैला ज्या पाच जिल्हा परिषदांमध्ये मतदान होणार होते, ते आता आयोगाच्या नव्या




वेळापत्रकानुसार पार पडेल. या ठिकाणी ओबीसींना कोणतेही आरक्षण असणार नाही. गेल्या २५ वर्षांतील या पहिल्याच अशा निवडणुका असतील, की ज्यात ओबीसींना २७% ऐवजी शून्य टक्के आरक्षण असेल. (आता निवडणुका झाल्या आहेत.)

## आरक्षणाने काय साध्य होते?

हातामध्ये कौशल्ये असलेल्या बलुतेदारांना सत्तेची चव कळते. कौशल्ये आणि राजकीय ज्ञान यांची जोड मिळल्याने स्वातंत्र्यानंतर खऱ्या अर्थाने भटके-विमुक्त, इतर मागास बहुजन समाज यांचा आवाज राजसत्तेत उमटू लागला. १९९४ ला मिळालेला हा राजकीय आवाज आता बंद करण्याची प्रक्रिया सुरू झालीय. के. कृष्णमूर्ती यांच्या कर्नाटकातील एका याचिकेवर निकाल देताना सर्वोच्च न्यायालयाचे तत्कालीन मुख्य न्यायाधीश के. बालकृष्णन यांच्या अध्यक्षतेखालील पाच सदस्यांच्या घटनापीठाने ओबीसी-भटक्यांचे हे २७ टक्के आरक्षण वैध ठरवले. मात्र त्याची अंमलबजावणी करताना त्रिसूत्रीचे पालन करण्याचा आदेश दिला होता. २०१० सालच्या या निकालाने ओबीसींची खानेसुमारी, मागासलेपण व प्रतिनिधित्व यांची माहिती जमा करायला सांगितली. हा इंपिरिकल डेटा जमवण्यासाठी सरकारला आदेश दिला जावा म्हणून महात्मा फुले समता परिषदेने २०१० साली सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. नाशिकचे तत्कालिन खासदार समीर भुजबळ यांनी लोकसभेत ओबीसी जनगणनेचा प्रस्ताव मांडला. त्याला भाजपाचे लोकसभेतील तत्कालीन उपनेते गोपीनाथ मुंडे यांच्यासह सर्वपक्षीय १०० खासदारांचा पाठिंबा मिळाल्याने मनमोहन सिंग सरकारने २ ऑक्टोबर २०११ रोजी ही जनगणना (सामाजिक-आर्थिक-जात जनगणना २०११) हाती घेतली. स्वातंत्र्यानंतर साठ वर्षांनी प्रथमच ती होत असल्याने तीनचार वर्षे हे काम संथगतीने केले गेले. २०११-१४ च्या सामाजिक जनगणनेतील आकडेवारी ही राष्ट्रीय संपत्ती आहे. मात्र लोकशाही पद्धतीने निवडून आलेले मोदी सरकार ५२ टक्के ओबीसींच्या विरोधात वागून लोकशाहीची उघड पायमल्ली करीत आहे.

साडेआठ महिन्यांपूर्वी विकास किसन गवळी व इतर या प्रकरणाचा निकाल आला. फडणवीस सरकारने ३१ जुलै २०१९ रोजी काढलेला सदोष अध्यादेश रद्द करून सर्वोच्च न्यायालयाने या पाच जिल्हा परिषदांच्या ओबीसी आरक्षित जागा १५ दिवसांत रद्द कराव्यात व त्या

जागा खुल्या समजून त्यावर पोटनिवडणुका घ्याव्यात, असा आदेश निवडणूक आयोगाला दिला. त्यानुसार राज्य निवडणूक आयोगाने १९ जुलैला तिथे मतदान घेण्याची याआधीच अधिसूचना काढली होती. मात्र ठाकरे-पवार सरकार सर्वोच्च न्यायालयात गेले. कोरोनामुळे निवडणुका पुढे ढकलाव्यात अशी विनंती करण्यात आली. न्यायालयाने तो अधिकार आयोगाला दिला. अडीच महिने निवडणुका पुढे गेल्याही. पण मिळालेल्या या वेळेचा सदुपयोग सरकारने केला नाही. हा निकाल फक्त याच पाच जिल्हा परिषदांना व तोही त्यातील अतिरिक्त जागांना म्हणजे ५०% च्या वरील जागांना लागू असल्याचा प्रचार केला गेला. प्रत्यक्षात हा निकाल सर्वोच्च न्यायालयाने राज्यघटनेच्या कलम १४२ मधील विशेष अधिकारात दिलेला असल्याने तो महाराष्ट्रासह सर्व देशाला लागू होता. या निकालानुसार घटनादुरुस्ती ७३ व ७४ नुसार १९९४ साली पंचायत राज्यात दिले गेलेले ओबीसी आरक्षण वैध ठरले असले तरी त्याची अंमलबजावणी करताना त्रिसूत्रीचे पालन करणे आवश्यक केले गेले. त्यासाठी सरकारने ओबीसींचे मागासलेपण ठरवणे, प्रतिनिधित्व निश्चित करणे, अनुसूचित जाती व जमातींना लोकसंख्येच्या प्रमाणात आरक्षण देऊन झाल्यावर ५०% च्या मर्यादेनुसार ज्या जागा शिल्लक असतील, तेवढ्याच ओबीसींना देणे बंधनकारक केले गेले. हा निकाल फक्त पाच जिल्ह्यांपुरता मर्यादित नसून तो देशातील सर्व राज्यांना लागू आहे. एकट्या महाराष्ट्र राज्यातील सुमारे २८ हजार ग्रामपंचायती, ३५० पंचायत समित्या, ३६७ नगर परिषदा, नगर पालिका, नगर पंचायती, कटकमंडळे, ३४ जिल्हा परिषदा व २७ मनपा यात हे ओबीसी आरक्षण आहे. या निकालाने राज्यातील वरील सर्व ठिकाणच्या सुमारे ५६ हजार ओबीसी जागा बाधित झालेल्या आहेत.

## राजकीय पक्षांच्या केवळ वल्गना

महाराष्ट्रात महात्मा फुले समता परिषदेने याबाबत राज्यभर जागृती केली. प्रमुख राजकीय पक्षांनी मात्र राजकीय वल्गना करण्यापलिकडे आणि ओबीसी मतदारांना पुळका दाखवण्यापलिकडे काहीही केले नाही. राजकीय पक्षांना ओबीसींची मतपेढी हवीय, मात्र ओबीसी जागृत व्हावा, स्वतंत्रपणे त्याने विचार करावा, त्याचे जैविक नेतृत्व तयार व्हावे, त्याचा सर्वांगीण विकास व्हावा असे त्यांना वाटत नाही. या परिस्थितीची पुरेशी माहिती आपल्या आमदारांना राज्यातील एकाही प्रमुख राजकीय पक्षाने दिलेली नाही. ओबीसी असल्यामुळेच ज्यांना मंत्रीपदे मिळाली. त्यातले छगन भुजबळ वगळता इतर ओबीसी मंत्री चूप आहेत. ज्या ग्रामीण खात्याचा हा वटहुकूम आहे, त्या खात्याचे मंत्री हसन मुश्रीफ यांनी या विषयावर गेल्या साडेसहा महिन्यांत ब्र उच्चारलेला नाही. सरकारमधील मंत्र्यांना हा विषय काय आहे याची खबर नाही. ती मिळवण्याची गरजही वाटत नाही. बहुतेक सर्व आमदार आणि पक्षप्रवक्ते अंधारात आहेत. ओबीसी खात्याचे मंत्री विजय वडेट्टीवार फक्त राजकीय भाषणबाजी करण्यात दंग आहेत. मंत्र्याचे काम बोलायला हवे. मंत्र्याने मात्र कमी बोलले व जास्त केले पाहिजे. पण इथे फक्त मुक्ताफळे उधळली जात आहेत. आता तर इंपिरिकल डेटा हा आपल्या खात्याचा विषयच नसल्याचा खुलासा करून त्यांनी जबाबदारी झटकलीय.




मंत्रीपरिषदेत सामुदायिक जबाबदारी असते, हेही ते विसरलेत. राज्य मागासवर्ग आयोगाकडून इंपिरिकल डटा जमा करण्यासाठी लागणारी शासकीय यंत्रणा, प्रशिक्षण, सुविधा आणि निधी याबाबतचा त्यांना प्राप्त झालेला प्रस्ताव गेले दीड महिने मंत्रालयात पुढेच सरकलेला नाही. ज्यांच्या नाकर्तेपणामुळे हे आरक्षण गेले त्या भाजपाची आक्रमक नौटंकी चालूय. ते केवळ पुतणा-मावशीचे प्रेम आहे. आरक्षणाचे कसाईच कैवारी असल्याचे जबरदस्त सोंग वठवित आहेत. दुसरीकडे, सत्ताधारीही केवळ तोंडाने गंभीर असल्याची भाषणबाजी करतात, पण त्यांची कृती मात्र तशी नाही. हे सगळे राजकीय पक्ष एकत्र आले आणि ओबीसी आरक्षणाशिवाय निवडणुका घेऊ देणार नाही अशा राजकीय वल्गना करू लागले. राज्यघटनेने निवडणुका पुढे ढकलण्याचे अधिकार सरकारला दिलेले नाहीत. त्यामुळे आलेला निकाल अभिप्रेतच होता. आम्ही गेले साडसहा महिने ओरडून हे सांगत होतो.

## ...तर आरक्षणच गेले नसते

साडेसहा महिन्यांपूर्वी आलेला निकाल अकरा वर्षांपूर्वीच्या के. कृष्णमूर्ती (२०१०) निकालावर आधारित आहे. तेव्हाच हे पंचायत राज्यातील ओबीसी आरक्षण गेलेले होते. गेल्या अकरा वर्षात त्यादृष्टीने काय घडले? समीर भुजबळ यांनी २०१० सालीच संसदेत इंपिरिकल डेटा अर्थात ओबीसी जनगणना करण्याचा प्रस्ताव मांडला. त्याला गोपीनाथ मुंडे यांच्यासह सर्वपक्षीय १०० ओबीसी खासदारांचा पाठिंबा मिळवण्यासाठी छगन भुजबळ यांनी केलेले राजकीय लॉबिंग यशस्वी झाले. सामाजिक, आर्थिक, जातजनगणना २०११-१४ मध्ये पार पडली. सहा महिन्यांत होणाऱ्या कामाला मुद्दाम चार वर्षे लावली गेली. दरम्यान, मनमोहनसिंग सरकार गेले आणि मोदी सरकार आले. मोदी आपण ओबीसी असल्याचा प्रत्येक निवडणूक सभेत ढोल वाजवतात. पण त्यांच्या मातृसंस्थेचा विरोध असल्याने त्यांनी गेली सात वर्षे हा इंपिरिकल डेटा दाबून ठेवलाय. ज्या कामासाठी देशाचे ५,००० कोटी रुपये खर्ची पडले, ती माहिती सर्वोच्च न्यायलयाला मोदी सरकारने वेळीच दिली असती तर हे आरक्षण गेलेच नसते. न्यायालय म्हणते, 'डेटा नाही तर आरक्षण नाही'. मोदी सरकार म्हणते, 'डेटा देणार नाही'. म्हणजे आरक्षणमुक्त भारताकडे निघालेल्या मातृसंस्थेच्या आदेशानुसार सारे काही चालू आहे. या आकडेवारीत चुका असल्याच्या वावड्या भाजपातर्फे उठवल्या गेल्या. डेटात चुका आहेत, हे एक वाक्य सांगायला मोदी

सरकारने एक महिना का मागून घेतलाय? राज्याने नव्याने केलेल्या रिट याचिकेवर मोदी सरकार वेळकाढूपणा का करतेय? देशात १८७१ पासून गेली दीडशे वर्षे जनगणना होत आहे. या खंडप्राय देशात हजारो भाषा, पंथ, प्रदेश, जाती, धर्म त्यामुळे माहिती देणारे व घेणारे (नोंदवणारे) यांच्यात अंतर पडते. या माहितीत ८ ते १० टक्के चुका असतातच, पण त्या स्वीकारल्या जातात.

सर्वोच्च न्यायालयाने मोदी सरकारला आदेश देऊन हा डेटा महाराष्ट्राला द्यायला लावला, तर पुढील निवडणुकीतले ओबीसी आरक्षण वाचू शकते. दुसरा पर्याय म्हणजे, राज्याने ओबीसी आयोगामार्फत हा डेटा नव्याने जमवणे. महाविकास आघाडी सरकारने हा आयोग नेमायलाच १५ महिने उशीर केला. पुढे आमच्या शिफारशीनुसार आयोगाला 'समर्पित आयोग' म्हणून जनगणनेचे हे काम दिले गेले. मात्र आयोगाच्या निधी, यंत्रणा व कर्मचारीविषयक प्रस्तावावर महाविकास आघाडी सरकार गेले दीड महिना निष्क्रिय आहे. म्हणून मग वटहुकुम काढावा लागला. जिथे विद्युतवेगाने काम करायला हवे तिथे साडेसहा महिने वाया घालवण्यात आलेत. प्रत्येक दिवस महत्त्वाचा असताना या कामाचा मागासवर्ग आयोग व मंत्रालय पातळीवर समन्वय करण्यासाठी कोणतीही यंत्रणा सरकारने उभारलेली नाही. आयोगाकडे कर्मचारी नाहीत, निधी नाही, समन्वय नाही, मग हे काम कसे होणार? ठाकरे सरकारनेच ओबीसी आरक्षण घालवल्याचा आक्रमक डंका पिटून विरोधक आघाडी सरकारला दोषी धरणार. ओबीसी मतदार त्याला भुलणार. ते ठाकरे सरकारच्या विरोधात जाणार. सरकारने मंत्रालय पातळीवर ज्येष्ठ व अनुभवी आय.ए.एस. अधिकाऱ्यांची टीम नेमून नियंत्रण कक्षामार्फत युद्धपातळीवर जनगणनेचे हे काम केले तरच हे आरक्षण कायमस्वरुपी वाचेल. या दोन पर्यायांशिवाय तिसरा कोणताही टिकाऊ पर्याय ठाकरे सरकारकडे नाही.

वटहुकुम काढणे हे महाविकास आघाडी सरकारचे जुगाड आहे. हे आरक्षण वाचवण्यासाठी फडणवीस सरकारने केलेलीच क्लृप्ती पुन्हा केलेली आहे. यातून आजचे मरण उद्यावर ढकलले जाईल. निवडणुका घेतल्या जातील. मग कोणीतरी त्याला न्यायालयात आव्हान देईल. न्यायालय तो अध्यादेश रद्द करील. जिंकलेल्या सर्व ओबीसी प्रतिनिधींचे आरक्षण पुन्हा काढून घेतले जाईल. म्हणजे पुन्हा फसवणूकच ओबीसींच्या पदरात पडणार. आपण सरकार आहोत म्हणजे आपण काहीही करू शकतो, या अविचारातून या सरकारने बाहेर पडायला हवे. घटनात्मक तरतुदी बारकाईने समजाऊन घ्यायला हव्यात. सरकारला तोंडघशी पाडायला टपलेल्या विरोधी पक्षाच्या हाती आपले सुकाणू सरकारने द्यायला नकोत. अन्यथा या सरकारला मतपेटीद्वारे किंमत चुकवावी लागेल. ओबीसी मतदार या तीन सत्ताधारी पक्षांपासून कायमचा दुरावेल. अद्याप वेळ गेलेली नाही. मात्र प्रत्येक दिवस नि तास विद्युतवेगाने काम करायला हवे. कायमस्वरुपी उपाययोजना करण्यासाठी केंद्राकडून डेटा मिळवावा किंवा राज्य मागासवर्ग आयोगामार्फत ताबडतोब जनगणना करावी. आपली शासकीय यंत्रणा हे काम तीन महिन्यांत करू शकते, गरज आहे ती राजकीय इच्छाशक्तीची. तिचा मात्र अभाव दिसतोय.

### पुन्हा फसवणूकच ओबीसींच्या पदरी पडणार

**वटहुकुम काढणे हे महाविकास आघाडी सरकारचे जुगाड आहे. हे आरक्षण वाचवण्यासाठी फडणवीस सरकारने केलेलीच क्लृप्ती या सरकारने केलेली आहे. यातून आजचे मरण उद्यावर ढकलले जाईल. निवडणुका घेतल्या जातील. मग कोणीतरी त्याला न्यायालयात आव्हान देईल. न्यायालय तो अध्यादेश रद्द करील. जिंकलेल्या सर्व ओबीसी प्रतिनिधींचे आरक्षण पुन्हा काढून घेतले जाईल. म्हणजे पुन्हा फसवणूकच ओबीसींच्या पदरात पडणार.**

## 'ओबीसीं'चे मारेकरी?

आठ आठवड्यांत सर्वोच्च न्यायालयाला ओबीसीचा इंपिरिकल डेटा (वस्तुनिष्ठ माहिती) देतो, असे फडणवीसांनी कोर्टाला वचन दिले, त्यानंतर पुढचे आठ आठवडे तेच सत्तेवर असतानाही त्यांनी ती माहिती न्यायालयाला दिली नाही म्हणून ओबीसी आरक्षण गेले. (पाहा-पंकजा मुंडे यांचे केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांना पत्र) आरक्षणमुक्त भारत हा रा. स्व. संघाचा अजेंडा असल्यानेच त्यांनी ओबीसींची माहिती जमवण्याच्या मनमोहनसिंग सरकारच्या निर्णयाला पत्रक काढून विरोध केला. (पाहा-संघाचे सरकार्यवाह भय्याजी जोशी यांचे २४ मे २०१० चे पत्रक). तीन महिन्यांत डेटा जमवला नाही तर राजकीय संन्यास घेण्याच्या वल्गना करणारे फडणवीस २०१४ ते २०१९ या काळात पाच वर्षे (साठ महिने) सत्तेवर होते. तेव्हा तर कोरोनाही नव्हता, मग का जमवला नाही त्यांनी हा डेटा? कोणत्याही परिस्थितीत अनु. जाती, जमाती व ओबीसी (विमुक्त भटके व विमाप्र यांच्यासह) यांचे राजकीय आरक्षण ५० टक्क्यांच्यावर जाता कामा नये, असे सर्वोच्च न्यायालयाने अनेकवार सांगितले असतानाही फडणवीसांनी लोकसंख्येच्या प्रमाणात ओबीसी आरक्षणाचा अध्यादेश काढल्यानेच आदिवासीबहुल जिल्ह्यांमध्ये ओबीसी आरक्षण ५० टक्क्यांच्यावर १ ते ८ टक्के गेले नि अतिरिक्त आरक्षण नुसते न घालवता सगळेच ओबीसी आरक्षण संपवण्याची कुटील नीती खेळली गेली. ५० टक्क्यांवरचे आरक्षण तर कायमचेच गेलेले आहे, ते आता मिळणार नाही; परंतु त्याच्या आतलेसुद्धा ओबीसी आरक्षण तीन अटींची पूर्तता करेपर्यंत गेलेले आहे. आज रोजी भाजपाशासित उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, गुजरात, कर्नाटक अशा कोणत्याही राज्यांत तिथल्या भाजपा सरकारने हा डेटा जमा केलेला नाही. असे का? (विकास गवळी निकाल लागून साडेसहा महिने होऊन गेलेत.) काँग्रेस सरकारने २०११ ते २०१४ मध्ये जमवलेला ओबीसी डेटा फडणवीसांनी मोदींकडे १ ऑगस्ट २०१९ ला पत्राद्वारे मागितला. तो मिळाला नाही. पुढची तीन महिने

फडणवीसांचीच सत्ता होती. का नाही जमवला त्यांनी त्या तीन महिन्यांत डेटा? तेव्हा तर कोविडचीही अडचण नव्हती. (पाहा- मुख्यमंत्री फडणवीस यांचे केंद्रीय नीती आयोगाचे राजीव कुमार यांना पत्र). २०११ च्या सामाजिक गणनेचा डेटा सदोष असल्याने कोणालाही द्यायचा नाही हा निर्णय मनमोहनसिंग सरकारचा होता, अशी लोणकढी थाप भाजपावाले मारत आहेत. हा निर्णय तर १८ जून २०१८ ला मोदी सरकारने घेतलाय (पाहा- केंद्र सरकारचे फडणवीस सरकारला २० नोव्हेंबर २०१९ चे लेखी उत्तर). तरीही दिल्ली उच्च न्यायालयाच्या निवृत्त न्यायमूर्ती रोहिणी यांना मोदींनी हा डेटा दिला. रोहिणी आयोगाच्या शिफारशींमुळे यापुढे तेली, कुणबी, माळी, धनगर, वंजारी, आग्री, भंडारी, कुंभार, नाभिक या जातींना २७ टक्के आरक्षण मिळतेय. त्यात छटणी करून फक्त २ टक्केच मिळणार आहे. रोहिणी आयोगाला डेटा दिलेला नाही, असा युक्तीवाद फडणवीस करतात. या आयोगात रजिस्ट्रार जनरल यांना मोदी सरकारने सदस्य केलेले आहे. त्यांच्या ताब्यातच हा डेटा आहे. तो वापरता यावा म्हणून तर त्यांना पदसिद्ध सदस्य केलेय. रोहिणी आयोगाला ही आकडेवारी दिलेली नाही हा त्यांचा दावा लटका ठरतो. मोदी जी आकडेवारी ओबीसींची कत्तल करण्यासाठी न्या. रोहिणी या हायकोर्टाच्या निवृत्त न्यायमूर्तींना देतात, तीच माहिती देशातील नऊ लाख ओबीसी पदाधिकाऱ्यांचे राजकीय आरक्षण वाचवण्यासाठी सर्वोच्च न्यायालयात बसलेल्या विद्यमान न्यायमूर्तींना (जे न्या. रोहिणी यांचे बॉस आहेत) बंद पाकिटातून का देत नाहीत? कारण ओबीसी आरक्षण घालवायचेच होते. ओबीसीचा त्रिसूत्री आणि वस्तुनिष्ठ माहिती जमवण्याचा मूळ निकाल मे २०१० मधला आहे. म्हणून तर छगन भुजबळ, समता परिषद, कै. गोपीनाथ मुंडे, समीर भुजबळ यांनी संसदेत ५ मे २०१० ला ओबीसीचा डेटा जमवण्याचा ठराव पास करून घेतला होता. तीच माहिती मोदींनी गेली सात वर्षे दाबून ठेवलेली आहे. (पाहा- केंद्र सरकारचे फडणवीस सरकारला पत्र, दि. २० नोव्हेंबर २०१९ आणि पाहा- के. कृष्णमूर्ती केस, २०१०)

## खोटे बोलण्यात मोदी-फडणवीस पटाईत

शब्दच्छल करणे, बुद्धीभेद करणे, सराईतपणे खोटे बोलणे यात मोदी-फडणवीस पटाईत आहेत. फक्त महाराष्ट्रातले आरक्षण गेलेय, बाकी राज्यांतील शाबूत आहे असा प्रचार फडणवीस आणि आशिष शेलार करतात. कलम १४२ ची जी माहिती लॉच्या पहिल्या वर्षाच्या विद्यार्थ्यांना असते, ती जर यांना नसेल तर मग यांच्या वकिलीच्या पदव्या बोगस असल्या पाहिजेत. उद्धव ठाकरे सरकारने ओबीसींचा इंपिरिकल डेटा जमवण्यासाठी राज्य मागासवर्ग आयोग स्थापन केलेला आहे. त्याच्याकडे हे काम २९ जून २०२१ च्या अधिसूचनेद्वारे सोपवलेले आहे. (पाहा-राज्य सरकारची अधिसूचना) आयोगाने काम सुरू करून या जनगणनेच्या कामासाठी लागणारा कर्मचारी वर्ग, निधी, यंत्रणा यांचा प्रस्ताव शासनाला पाठवलेला आहे. भाजपा, संघातले ओबीसी नेते हे सत्तेचे लाभार्थी असल्याने



ते भाजपाचा बचाव करीत आहेत. त्यातून त्यांचे करिअर होईलही; पण ओबीसींची कत्तल होईल. फडणवीसांनी कालपर्यंत अडगळीत फेकलेले भाजपातले हे ओबीसी नेते आता अचानक प्रकाशझोतात आणलेत. ही पेशवाईनीती आहे मोदी फडणवीसांची, ती ओळखा. कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ होऊ नका. ओबीसी समाज जागा झाल्यावर तुम्हाला माफ करणार नाही.

दरम्यान, ओबीसी जनगणनेची मागणी अनेक राज्ये करीत असल्याने ती यापुढे दडपणे मोदी सरकारला शक्य नाही. ओबीसी जनगणना ही या समूहाच्या सर्वांगीण विकासाची गुरुकिल्ली आहे. ब्रिटिशांनी भारत जिंकला तेव्हा पहिले काम केले ते म्हणजे दर १० वर्षांनी त्यांनी जातनिहाय जनगणना सुरू केली. ज्यांच्यावर राज्य करायचे त्यांचा अभ्यास करण्यासाठी जनगणना आवश्यक आहे, असे त्यांना वाटले. १८७१ ते १९३१ अशी साठ वर्षे हे काम नियमितपणे होत असे. १९४१ च्या महायुद्धात ते विस्कळीत झाले. स्वातंत्र्यानंतर नेहरू सरकारने फक्त अनुसूचित जाती व जमाती यांची जातनिहाय तर इतर सर्वांची एकत्रित गणना करण्याचे धोरण स्वीकारले. यातून ओबीसींवर पहिला अन्याय झाला. विद्यमान केंद्रीय राज्यकर्त्यांनाही जातीनिहाय जनगणना नकोय. कारण त्यांना कोट्यवधी ओबीसींना अंधारात ठेऊन त्यांची लूट करायची आहे. त्यांना समकालीन वास्तव कळले तर ते धार्मिक गुलाम राहणार नाहीत, म्हणून संघ परिवाराला ओबीसी जनगणना नकोय. म्हणूनच मोदी सरकारने २०११ च्या विशेष सामाजिक-आर्थिक-जात गणनेचे आकडे सात वर्षे दडवून ठेवलेत.

१९४६ साली डॉ. बाबासाहेबांनी त्यांच्या 'शूद्र पूर्वी कोण होते?' या ओबीसीविषयक पुस्तकात ओबीसी जनगणनेची मागणी केली. ओबीसीच्या अडीअडचणी कळण्यासाठी ती गरजेची आहे असे त्यांनी लिहिले. पहिल्या राष्ट्रीय मागासवर्ग आयोगाने (कालेलकर कमिशन) १९५५ साली स्वतंत्र ओबीसी जनगणनेची मागणी केली. १९८० साली दुसऱ्या राष्ट्रीय मागासवर्ग आयोगाने (मंडल आयोग) स्वतंत्र ओबीसी जनगणनेची पुन्हा शिफारस केली. १९९४ साली नियुक्त केलेल्या राष्ट्रीय मागासवर्ग आयोगाने ओबीसी जनगणना कशी आवश्यक आहे, हे सरकारला तिसऱ्यांदा पटवून दिले. २०१० च्या ५ मे रोजी संसदेत समीर भुजबळ, गोपीनाथ मुंडे व १०० खासदारांनी ओबीसी जनगणनेचा ठराव केला. त्यासाठी छगन भुजबळ यांनी राजकीय लॉबिंग करण्यासाठी खूप परीश्रम घेतले. त्यातून २०११ ते

२०१४ दरम्यान ओबीसी जनगणना करण्यात आली. संसदेतील चर्चा, जनगणनेची गरज नि महत्त्व यावरचे प्रा. हरी नरके यांचे ३०० पानी पुस्तक २०१२ साली प्रकाशित झाले. त्यावेळी हरी नरकेंनी लिहिलेला, 'ओबीसी वर्गाचे प्रश्न सोडवण्यासाठी जनगणना अत्यावश्यक' हा 'द हिंदू'मधील इंग्रजीतील लेख या कामाचा बीजनिबंध ठरला. मोदी ज्या विकास परिषदेचे सदस्य होते, (गुजरातचे मुख्यमंत्री म्हणून) तिने व केंद्रीय नियोजन आयोगाने ओबीसीचे शिक्षण, रोजगार, निवारा, आरोग्य यासाठी धोरणे आखण्यासाठी ओबीसी जनगणना करावी असा ठराव केलेला आहे. त्यावर मोदींची सही असूनही आता त्यांनी या भूमिकेपासून पलटी मारलेली आहे. वाजपेयी सरकारच्या कार्यकाळात संसदेच्या सामाजिक न्याय विभागाच्या स्थायी समितीने (सुमित्रा महाजन समिती) ओबीसी जनगणनेची शिफारस केलेली होती. महाराष्ट्र विधानसभेचे तत्कालीन अध्यक्ष नाना पटोले यांनी विधानसभेत ओबीसी जनगणनेचा स्वतः ठराव मांडला, तो सर्वानुमते मंजूर झाला. महाराष्ट्राच्या २८८ आमदारांनी एकमताने केलेली ही मागणी धुडकावणारा परिवार ओबीसीचा व लोकशाहीचा विरोधक आहे. २०१८ साली तत्कालीन गृहमंत्री राजनाथ सिंग यांनी २०२१ च्या नियमित जनगणनेत ओबीसी डेटा जमा करण्याची घोषणा केली. मात्र संघ परिवाराने कडवा विरोध केल्याने पुढे घूमजाव केले गेले.

## ओबीसीद्रोही मोदी सरकार

शेकडो परिषदा, आंदोलने, संस्था, संघटना ओबीसी जनगणनेचा आग्रह धरीत असताना एकटा परिवार या विरोधात आहे, म्हणून जनगणना न करणारे मोदी सरकार ओबीसीद्रोही ठरते. जोवर ओबीसी जनगणना नाही, तोवर या मागास समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी निधी मिळणार नाही. धोरणे आणि योजना बनणार नाहीत. सगळी सोंगे आणता येतात, पैशाचे सोंग आणता येत नाही. आज आपण ओबीसी असल्याचा प्रत्येक निवडणूक प्रचारसभेत ढोल पिटणारे मोदी ओबीसींना दरडोई दरमहा दीड रुपया देतात. तोही निधी त्यांनी यावर्षीपासून (इ.डब्ल्यू.एस.कडे) उच्चजातीय आर्थिक दुर्बलांकडे वळवून ओबीसींची फसवणूक केलेली आहे. स्वातंत्र्यानंतर अनुसूचित जाती, जमातींच्या अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण, आरोग्य, वीज, सडक, पाणी यासाठी अर्थसंकल्पातील निधी लोकसंख्येच्या प्रमाणात राखून ठेवला जातो. हा स्वतंत्र (उपघटक) योजनेचा पैसा ग्रामपंचायतींपर्यंत खाली दिला जातो व त्यातून या समाजाच्या समस्या सोडवल्या जातात. १९९० साली विश्वनाथ प्रताप सिंग यांनी मंडल अहवाल लागू केला. त्यांचे सरकार भाजपाने पाडले. व्ही. पी. सिंग सरकार असते तर १९९१ पासून ओबीसींची स्वतंत्र गणना झाली असती. २००१ साली असलेल्या भाजपा सरकारने (वाजपेयी) हे काम टाळले. आता २०२१ लाही आम्ही ते करणार नाही, अशी घोषणा परवाच मोदी सरकारने केलेली आहे. ज्या देशात कोंबड्या, बकऱ्या, मेंढरे, गाई, म्हशी यांची गणना होते, तिथे ओबीसींची होऊ नये म्हणजे, हे सरकार त्यांना या प्राण्यांपेक्षाही हलके समजते.

आरक्षणापेक्षा मुख्य प्रश्न सर्वांगीण विकासाचा आहे. तो ओबीसींचा घटनात्मक हक्क आहे. तो नाकारून मोदी सरकार शतकानुशतके मागास राहिलेल्या या कारागिर वर्गाला बलुतेदार-आलुतेदारांना शिक्षण, रोजगार, आरोग्य, निवारा नाकारीत आहे. त्यामुळे ओबीसी आज स्वातंत्र्याच्या ७५ वर्षांनंतरही मागासच आहे. त्याला तसेच ठेवण्याचा कट केलेले लोक ओबीसी जनगणना करीत नव्हते. तामिळनाडूने ती केलेली आहे. त्यामुळे हे राज्य आज देशात मानव विकास निर्देशांकात प्रथम क्रमांकावर आहे. महाराष्ट्रही लवकरच त्यांच्या पावलावर पाऊल टाकणार, असा मला विश्वास वाटतो.



### ७४ वर्षांनंतरही उपेक्षाच

देशाला स्वातंत्र्य मिळून ७४ वर्षे झाली तरी देशाच्या राजसत्तेत तमाम भटके विमुक्त, (अ,ब,क,ड) व विशेष मागास प्रवर्ग आणि ओबीसी यांना २/४ टक्केसुद्धा प्रतिनिधित्व मिळालेले नाही. आपला भारतीय समाज जातीपातींनी बनलेला आहे. आपली सामाजिक जाणीव ही मूलत: जातजाणीव आहे. त्यामुळे जो तो समाज स्वत:पुरते बघतो. ज्यांच्या हाती राजसत्ता, त्यांच्या हाती देशाच्या तिजोरीच्या चाव्या. त्यामुळे त्यांचाच विकास. रोजगार, आरोग्य, शिक्षण आणि प्रशासन यात तेच. माध्यमात तेच. परिणामी जे राजसत्तेत गैरहजर, त्यांचा आवाज उमटतच नाही.

## ओबीसी प्रश्नावर बीजेपीमध्ये दुही ?

ओबीसी आरक्षण आणि राजकारण यावर इंडिया टुडेचे डेप्युटी एडीटर कौशिक डेका यांची मुखपृष्ठ कथा प्रकाशित झालेली आहे.

## हा तिढा सुटेल का? कसा?

हा तिढा सोडवण्याचा कोणताही सोपा उपाय उपलब्ध नाही. आजवर बलुत्यावर जगण्याची सवय लागल्याने ओबीसी (बारा बलुतेदार–अठरा आलुतेदार) लढण्याची सवय गमावून बसलाय. त्याला २४ तास नि ३६५ दिवस धार्मिक गुंगीत संमोहित नि भ्रमित करण्यात आलेले आहे. त्याच्या फायद्याच्या गोष्टींचेही धड त्याला आकलन नाही. आरक्षण ही मरू घातलेली व्यवस्था आहे. खासगीकरण आणि देश विकण्याच्या या काळात फार लवकरच ते संपणार आहे. अशावेळी खरा मुद्दा आहे, तो सर्वांगीण विकासाचा. त्यासाठी ओबीसी जनगणना अत्यावश्यक आहे. पण ती सहजासहजी होऊ दिली जाणार नाही. लोकसंख्या माहीत नाही म्हणून अर्थसंकल्पात वाटा मिळणार नाही. आज मोदी सरकार महिन्याला दरडोई अवघा दीड रुपया ओबीसीला देते. मोदींनी तोही ओबीसी–भटक्यांचा शिक्षणविकास निधी उच्चजातीयांकडे वळवला आहे. (पाहा–अर्थसंकल्प परि. ५० व ५०.०१, https://www.indiabudget.gov.in/) ओबीसीचा हक्काचा पैसा सरकारने ई.डब्ल्यू.एस.कडे वळवून ओबीसींचा विश्वासघात केलेला आहे. त्यांची ही कृती म्हणजे मातृसंघटनेच्या आदेशावरून ओबीसींशी केलेला द्रोह आहे. तरीही उच्चजातीय संघ परिवार आणि भाजपाचा खरा पाठीराखा ओबीसीच आहे. त्याला तिथून दूर करण्यासाठी खूप काम करावे लागेल. दक्षिणेचाच रस्ता त्यासाठी धरावा लागेल. नवजागृत तरूण पिढी हे काम करू शकेल, अशी आशा करूयात.

(२०/०९/२०२१) या लेखात त्यांनी अनेक बाबींवर प्रकाशझोत टाकलेला आहे. देशभरात ओबीसी जागा होतोय, वेग कमी असला तरी प्रक्रिया सुरू आहे. सत्ताधारी भाजपमध्ये यावरून असंतोष खदखदत असून या तथाकथित शिस्तबद्ध पक्षाचे ओबीसी नेते श्रेष्ठींचे मत डावलून ओबीसीहिताचे मुद्दे मांडू लागलेत. ही दुही दिवसेंदिवस वाढत चाललेली आहे. उच्चजातीयांचा हा पक्ष आपले उच्चजातीय मुख्यमंत्री/नेते बदलून पुन्हा एकदा ओबीसी वास्तवाकडे जातोय का? महाराष्ट्रात देवेंद्र फडणवीसांचे नेतेपद धोक्यात आहे का? त्यांची विकेट यूपी निवडणुकांच्या आधीच उडणार का? या पक्षाची मातृसंस्था एकजातीय थिंक टँकवर चालते. या चाणक्यांना माघार घ्यावी लागतेय का? की ही फक्त निवडणूक रणनीती आहे? या आरक्षणमुक्त भारतवाल्यांना ४४% ओबीसी का मतदान करतात? असे अनेक प्रश्न हा लेख उभे करतो.

स्थानिक स्वराज्य संस्थांमधले २७ टक्के आरक्षण राज्यातील सर्व भटके विमुक्त, (अ,ब,क,ड) व विशेष मागास प्रवर्ग आणि ओबीसी यांना मिळून एकत्रित होते. शिक्षण आणि शासकीय नोकऱ्या यात भटके विमुक्त, (अ,ब,क,ड) यांना ११ टक्के, विमाप्र यांना २ टक्के व ओबीसी यांना १९ टक्के असे स्वतंत्र आरक्षण असले तरी राजकीय आरक्षण मात्र या तिघांनाही एकत्रित असे दिलेले आहे व ते ३२ टक्के नसून २७ टक्केच आहे. त्यामुळे निवडणुकीत विजाभज, विमाप्र व ओबीसी यांना एकाच मतदारसंघातून निवडणूक लढवावी लागते. त्यांना वेगळे वेगळे आरक्षण मिळत नाही. त्यांच्यावर कुऱ्हाड बसली असली तरी हे लाभार्थी व समाज, जाती, वर्ग सारेच गप्प आहेत. गाढ झोपेत आहेत बिचारे! डोक्यावरचे छप्पर गेले तरी निद्रेत असलेले हे सगळे समाज राजकीयदृष्ट्या किती मागासलेले आहेत ते दिसतेच आहे.

देशाला स्वातंत्र्य मिळून ७४ वर्षे झाली तरी देशाच्या राजसत्तेत तमाम भटके विमुक्त, (अ,ब,क,ड) व विशेष मागास प्रवर्ग आणि ओबीसी यांना २/४ टक्केसुद्धा प्रतिनिधित्व मिळालेले नाही. आपला भारतीय समाज जातीपातींनी बनलेला आहे. आपली सामाजिक जाणीव ही मूलत: जातजाणीव आहे. त्यामुळे जो तो समाज स्वत:पुरते बघतो. ज्यांच्या हाती राजसत्ता, त्यांच्या हाती देशाच्या तिजोरीच्या चाव्या. त्यामुळे त्यांचाच विकास. रोजगार, आरोग्य, शिक्षण आणि प्रशासन यात तेच. माध्यमात तेच. परिणामी जे राजसत्तेत गैरहजर, त्यांचा आवाज उमटतच नाही. इंग्रजी राजवट आपण का घालवली? तर ती परकी होती. गोरे गेले पण आले ते काळे कोण होते? आहेत? मूठभर त्रैवर्णिक सत्तेत आले. आरक्षणामुळे थोडी जागृती अनुसूचित जाती–जमातींची झाली. पण त्यांनाही त्यांचा हक्काचा वाटा मिळालेला नाहीच. मंडल आयोगामुळे व ७३/७४ व्या घटनादुरुस्तीमुळे भटके विमुक्त (अ,ब,क,ड) व विशेष मागास प्रवर्ग आणि ओबीसी यांना आत्ता कुठे मिळू लागले. नाही तर ते काढूनही घेतले गेले, पण ना कुणाला खंत ना खेद, ना सोयरसूतक.

## आरक्षण गेल्याचा सर्वच मागासांना फटका?

या आरक्षणाचा फायदा असा झाला, की तमाम भटके विमुक्त (अ,ब,क,ड) व विशेष मागास प्रवर्ग आणि ओबीसी यांचे राजकीय प्रशिक्षण होऊ लागले. राजसत्ता काय असते ते यांना कळू लागले. त्यांच्यात राजकीय महत्त्वाकांक्षा जाग्या होऊ लागल्या. ते चक्क विधानसभा व लोकसभेला उमेदवारी (तिकीटं) मागू लागले. त्यामुळे मालक लोकांची राजसत्तेवरची व गावगाड्यावरची पकड ढिली होऊ लागली. अनु. जाती, जमाती, अल्पसंख्याक व हे घटक मिळून पंचायत राज्यात राजकारणाची नवी समिकरणं बनू लागली. हे काळ्या इंग्रजांना कसे खपावे? हे आरक्षण गेल्याने यापुढे विजाभज, विमाप्र, ओबीसी यांचे राजकीय प्रशिक्षण, जागृती आणि प्रतिनिधित्व जाणार. पुन्हा एकदा सगळी राजसत्ता उच्चजातीय मालक लोकांच्या हातात एकवटणार. अनु. जाती, जमातीही पुन्हा मागे फेकल्या जाणार.

●●●

**(लेखक राज्य मागासवर्ग आयोगाचे व केंद्रीय नियोजन आयोगाच्या सल्लागार गटाचे माजी सदस्य आहेत.)**


Vishwadharmi
Prof. Dr. Vishwanath D. Karad
Founder, MIT Group of Institutions, Pune
President, MIT-ADT University, Pune
आपको दीपावली की हार्दिक शुभकामनाएं | एवं दीपोत्सव
आपके जीवन को सुख, समृद्धि, सुख-शांति, सौहार्द एवं
अपार खुशियों की रोशनी से जग-मग करे |
मैं आपको दीपावली के त्यौहार पर हार्दिक शुभकामनाएं देता हूं |
Prof. Dr. Mangesh T. Karad
Executive President and Vice Chancellor
MIT Art, Design & Technology University, Pune
शुभं करोति कल्याणं आरोग्यं धनसंपदा |
शत्रुबुद्धि-विनाशाय दीपज्योती नमोऽस्तुते ||
On this auspicious and sparkling festival of lights,
may the glow of shining lamp bestow upon you
happiness, abundance of joy, tranquility, opulence and grandeur.
Best Regards,
Prof. Dr. Mangesh T. Karad
Executive President &
Vice-Chancellor
MIT Art, Design and Technology University, Pune.
Mr. Sanju Chavan
Pubilc Relations Officer
MIT Art, Design and Technology University, Pune.

# संदर्भासहित अस्वस्थ वर्तमान...



**स्वत:ला भारतीय म्हणवणाऱ्यांचा भारत अस्वस्थ आहे. त्यात असंख्य जागृत स्त्रिया आहेत. साहित्यिक-विचारवंत आहेत. कार्यकर्ते आहेत.**



**यशवंत मनोहर**

'पेराल ते उगवेल' असे व्यवहारात म्हटले जाते. तरी जे पेरले जाते ते नेहमी उगवतेच असेही नाही. पण खूपदा पेरले तेच उगवते हेही खरेच आहे. 'अग्नीचा आदिबंध' या माझ्या कवितासंग्रहातील पुढील ओळी मला यानिमित्ताने आठवल्या. त्या ओळी अशा आहेत-

**'बंधो! वावर पडीक कसे दिसते?**
**इथे तर संविधान पेरले होते!**
**पेरले ते उगवले नाही**
**की उगवले ते जगवले नाही?'**

पेरले तेच उगवते हेही खरे. पेरले ते उगवतेच असेही नाही आणि उगवले तरी ते जगवले जाते असेही नाही.

## एक:

आजच्या वर्तमानाचा काही भाग पेटतो आहे आणि याच वर्तमानातील काही हात त्या भागाला आग लावीत आहेत. म्हणजे अस्वस्थतेची आग पूर्ण वर्तमानालाच लागली आहे असे नाही. वर्चस्वाची तृष्णा आणि अज्ञानाचा भयंकर रेटा यांची व्याधी जडलेला एक मूलतत्त्ववादी वर्तमान या वर्तमानात आहे. हा मूलतत्त्ववादी वर्तमान स्वस्थ आहे आणि ही त्याची स्वस्थता अधिकच वृद्धिंगत करण्यासाठी तो बाकीच्या वर्तमानाला अस्वस्थतेची आग लावतो आहे. स्वस्थ व्हायचे असेल तर आमच्यासारखे व्हा अन्यथा तुमच्या हट्टाप्रमाणे अस्वस्थतेच्या वणव्यात जळत राहा. नेहमीप्रमाणेच आजच्या वर्तमानाचीही अशी फाळणी झालेली आहे. एक अस्वस्थ वर्तमान आहे आणि त्याला अस्वस्थ करणारा याच वर्तमानात दुसरा स्वस्थ वर्तमान आहे. म्हणजे एक क्रूर स्वस्थता आहे आणि तिने घडवलेली अस्वस्थता आहे.

## दोन:

मूठभर जेत्यांच्या वर्चस्वाचे समाजतंत्र मान्य नसलेल्या बंडखोरांना वैदिक जेत्यांनी शूद्र आणि अतिशूद्र या छळछावण्यांमध्ये डांबले. आमचे ऐकाल तर स्वस्थ व्हाल अन्यथा अस्वस्थतेत जळण्याची शिक्षा भोगत बसा. असे हे अस्वस्थतेचे आणि स्वस्थतेचे रचित आहे. स्वस्थतेवाल्यांनी मनुस्मृती पेरली. ती उगवली आणि त्यांनी ती जगवली. हे बदलावे यासाठी समतावाद्यांनी सूर्य पेरला पण मनुवाद्यांनी तो नीट उगवूही दिला नाही आणि उगवला तो नीट जगवूही दिला नाही. वर्तमानात आज जे अस्वस्थ आहेत, त्यांच्या अस्वस्थतेचा उगम इथे आहे.

## तीन:

अस्वस्थता मानवी जीवनात अनेक पातळ्यांवर वावरते. ती अनेकदा निखळ व्यक्तिगत वा कौटुंबिक पातळीवर वावरते. अशी अस्वस्थता प्रत्येकच माणसाला कुरतडत असते. इथे आपण आजच्या सामूहिक अस्वस्थतेचे अन्वर्थन करीत आहोत. ही अस्वस्थता धर्मतृष्णेने निर्माण केलेली आहे. ही धर्मतृष्णाच आज राजकारणतृष्णा आणि समाजकारणतृष्णा झालेली आहे. स्वतःला भारतीय म्हणवणाऱ्या, भारताच्या संमिश्र संस्कृतीचा वारसा जपू इच्छिणाऱ्या लोकांची अपार घुसमट आज होत आहे. ही भारतमनस्कता, सहिष्णुमनस्कता आणि सलोखामनस्कता आज कधी नव्हे इतकी अस्वस्थ झालेली आहे. भारतातील बहुविधतेला, संमिश्रतेच्या परंपरेला आणि सममूल्यतेच्या श्रेष्ठतम वैश्विक नीतिला लावली जाणारी आग ही माणसे बघत आहेत आणि बेचैनीची आग त्यांनाही लागत आहे.

## चार:

ही सर्वोपकारक मनांची सभ्य माणसे हे बघत आहेत की आज देशाचे भारत आणि हिंदुस्थान असे विभाजन होत आहे. उदारमनस्क बहुविधता आणि अनुदार एकविधता असे देशाचे विभाजन होत आहे. मूलतत्त्ववाद आणि मुक्ततत्त्ववाद मूठभर अभिजन आणि पंचाऐंशी टक्के बहुजन असे देशाचे विभाजन होत आहे. ते बघत आहेत, की मनुभक्त आणि संविधाननिष्ठ असे देशाचे विभाजन होत



आहे. स्वतःला आम्ही भारताचे लोक म्हणवणारे आणि स्वतःला आम्ही हिंदुस्थानी लोक म्हणवणारे असे विभाजन करण्याचे प्रयत्न सुरू झालेले आहेत आणि सर्वसमावेशक भारतीय म्हणून जगू इच्छिणारी माणसे आज अपार अस्वस्थ झाली आहेत.

स्वतःला भारतीय म्हणवणाऱ्यांचा भारत अस्वस्थ आहे. त्यात असंख्य जागृत स्त्रिया आहेत. साहित्यिक-विचारवंत आहेत. कार्यकर्ते आहेत. मुस्लिम, आदिवासी, बौद्ध, भटके-विमुक्त, शीख, ख्रिश्चन आहेत आणि वरील सर्वच समूहांमधील कोट्यवधी बेरोजगार तरुण-तरुणी आहेत. हा सर्वच उजेडगाम्यांचा भारत अस्वस्थ आहे. आपल्याभोवती एक अपूर्व तमोयुग गुंडाळले जाते आहे, असे या सर्वांनाच वाटत आहे.

## पाच :

विषमतेच्या सवयींमुळे आपली गुलामी आपल्याला चिकटून राहते असे वाटणाऱ्या अनेकांनी विषमतेच्या सवयी सोडल्या. पण ज्यांचे हितसंबंध विषमतेतच सुरक्षित आहेत, त्यांना समता, सभ्यता, सलोखा आणि संविधानच मान्य होत नाही. अंधश्रद्धांना बुद्धिप्रामाण्य मान्य होत नाही. धर्मांधांना धर्मनिरपेक्षतेची आणि जातींना जातिविहीनतेची माणुसकी मान्य होत नाही. श्रेणीभक्तांना एकश्रेणीमयता मान्य होत नाही. सर्वांना समन्याय, सर्वांना समसन्मान आणि सर्वमानवसमभाव नाकारणारी वर्णव्यवस्था आणि तिचे अधिक संवर्धन करण्यासाठी निर्माण केलेल्या जाती इथे आहेत. तो मनुधर्मच आहे. या धर्माचे हिंदू राष्ट्र निर्माण करण्याचा खटाटोप या सर्व अस्वस्थतेमागे आहे.

## सहा:

आपल्याकडे धर्मविभाजन होते. जातिविभाजन होते. पोटजातीविभाजन होते. पक्षविभाजन होते. पण या सर्व विभाजनांमुळेच सर्वहारा आणि सर्वशोषक असे विभाजन होत नाही. गरीब आणि श्रीमंत, ब्राह्मण आणि ब्राह्मणेतर, शोषक आणि शोषित यांचा मूल्यवर्ग एकच असतो. त्यांचा धर्म एकच असतो. पुरुषसत्ताक आणि स्त्रीसत्ताक यांचा मूल्यवर्ग एकच असतो. शोषणसत्ताकाला भक्कम करणारे शोषितही इथे आहेत आणि पुरुषसत्ताकाचे संरक्षण करणाऱ्या स्त्रियाही इथे आहेत. वर्चस्ववाद्यांची शोषकमूल्ये आणि शोषितांच्या मुक्तीची क्रांतिमूल्ये असे मूल्यवर्ग इथे निर्माण होत नाहीत. शोषकांची मूल्ये शोषितांनाही आपली प्रमाणमूल्ये वाटतात. त्या मूल्यांसाठी ते प्राण द्यायलाही तयार असतात. इथे सर्व संघर्ष होतात, फक्त मूल्यसंघर्ष होत नाही. त्याला कारण आहे धर्म! धर्मराष्ट्र निर्माण करण्याच्या प्रयत्नांमुळे आज देशावर अस्वस्थतेचे काळे ढग दाटून आलेले आहेत. त्यामुळे देशात मूल्यवर्गांची बांधणीच शक्य होत नाही. वीस टक्के विरुद्ध ऐंशी टक्के हे लोकांचे वर्गीकरण होते. बहुजन-अभिजन असे विभाजन होते, पण ते परिवर्तनविरोधी मूल्ये आणि व्यवस्था बदलणारी मूल्ये असे विभाजन होत नाही. त्यामुळेच धर्माचा मुखवटा घालून शोषणव्यवस्था उच्छाद मांडते आणि राष्ट्रवादाचा मुखवटा घालून धर्म विनाहस्तक्षेप धुडगूस घालतो. परिवर्तनवादी भारतीयांच्या आजच्या चरम अस्वस्थतेचा उगम इथे आहे.

## सात:

देशात आज हिंदुत्ववादी विरुद्ध हिंदुत्ववादी असा खेळ खेळला जातो आहे. हा सत्तासंघर्ष आहे आणि या संघर्षात सत्ता कोणत्याही गटाच्या हातात गेली तरी ती व्यवस्थेच्या बाहेर जात नाही. पण या आपसी खेळामुळे भारतीयत्वावर कोसळणारे अरिष्टच अधिक भक्कम होण्याची शक्यता आहे. सत्तेतही हिंदुत्ववादीच आणि विरोधी पक्षातही हिंदुत्ववादीच अशी आजची स्थिती आहे.

त्यामुळे एक गोष्ट घडते ती ही, की सत्तेसाठी हे सर्व गट आपापले हिंदुत्व अधिकच कडवे करीत राहतात. जो गट जास्तीत जास्त कडवा होईल तो धार्मिकांना, धर्माने गोठवलेल्यांना म्हणजे मूलतत्त्ववाद्यांना अधिक प्रिय होईल. त्यामुळे संविधानाला अभिप्रेत मतदारांची संख्या अत्यल्प होत जाईल आणि हिंदुत्ववादी मतदारांची संख्या वाढत जाईल. हे सर्वच पाट हिंदू राष्ट्राच्या निर्मितीलाच मिळत जातील.

## आठ:


भारतीयांना म्हणजे संविधाननिष्ठ धर्मनिरपेक्षवाद्यांना अस्वस्थतेच्या खोल डोहात ढकलणारे आणखी कडवे राजकारण पुढे जन्माला येण्याची शक्यता आहे. भाजपचे हिंदुत्व, शिवसेनेचे हिंदुत्व आणि मनसेचे हिंदुत्व अशी तीन हिंदुत्वे आपण महाराष्ट्रात बघत होतो. उद्धव ठाकरे म्हणतात तसे भाजपाचे हिंदुत्व नवहिंदुत्व वगैरे नाही. ते वेदांमधील वर्णव्यवस्थेइतके जुनेच हिंदुत्व आहे. ते मनुची सही असलेलेच हिंदुत्व आहे आणि उरलेली हिंदुत्वेही तशीच आणि जुनीच आहेत. आता या तीन हिंदुत्वांच्या जोडीला चौथे हिंदुत्व नव्याने पुढे येत आहे. रोहित पवारांच्या रूपाने ते पवार घराण्यातून पुढे येत आहे. त्यांनी अठ्ठ्याहत्तर मीटर उंचीचा भगवा ध्वज तयार केला आणि हिंदूचा भगवा अधिक भगवा करणार अशी घोषणा केली. यावर कोणीही थोरले पवार बोलले नाहीत. म्हणजे भारतीय संविधाननिष्ठांना अधिकच अस्वस्थ करणाऱ्या नव्या धर्मांध राजकारणाची ही चाहुल आहे. म्हणजे धर्मांधतेची स्पर्धा आता अधिकच तीव्र होत जाणार याची ही चिन्हे आहेत. ही स्पर्धा जिंकण्यासाठी प्रत्येक गट आपले हिंदुत्व अधिकाधिक कडवे करीत जाणार. हे संकेत धर्मनिरपेक्ष भारतीयांना अस्वस्थतेच्या आणखी मोठ्या काळ्या विवरात ढकलणारे ठरू शकतात. संविधानाच्या पंचविसाव्या अनुच्छेदातील धर्मातीत शासनव्यवस्थेची, त्यातील सद्सद्विवेकाची आणि ऐहिक कल्याणाच्या नीतिची इथे कोणतीही क्षिती बाळगलेली दिसत नाही. कारण एकधर्मी राष्ट्रनिर्मितीच्या प्रक्रियेला भारताच्या संमिश्रसंस्कृतीच्या वारशासकट धर्मनिरपेक्षता आणि सममूल्यता या गोष्टी मान्यच नसतात.

## नऊ:

पुष्यमित्राच्या ब्राह्मणी राजवटीचा, तेराव्या शतकातील यादव राजवटीचा आणि अठराव्या शतकातील पेशवाईचा मनुस्मृती हाच कायदा होता. आजच्याही धर्मांध राजकारणाच्या आजच्या प्रयत्नांमधून त्याच कायद्याचे पुनरुज्जीवन करण्याचा खटाटोप सुरू आहे असे म्हणता येईल. क्रमाने अधिकाधिक तापदायक होत जाणाऱ्या अस्वस्थतेचा उगम अधिकाधिक धर्मांध होत जाणाऱ्या राजकारणात आहे.

## दहा:

वर्तमानाला आग लावणाऱ्या स्वस्थतेचे अनेक हात आहेत.



स्त्रिया, मुस्लिम, बौद्ध, आदिवासी, भटके-विमुक्त, बेरोजगार तरुणतरुणी, साहित्यिक, विचारवंत यांच्यापैकी व्यवस्थापरिवर्तन करू पाहणारे लोक गुन्हेगार ठरत आहेत. पानसरे, दाभोलकर, कलबुर्गी, गौरी लंकेश यांच्या हत्यांचे कारण त्यांनी घेतलेला व्यवस्थापरिवर्तनाचा ध्यास हेच आहे. सत्य बोलणे, बाणेदार असणे, बुद्धिवादी असणे, कणा बाणेदार असणे किंवा ताठ मानेने जगणे या गोष्टी गुन्हेगारीच्या सदरात दाखल होत आहेत. खोटेपणाला खोटे म्हणणे, अतार्किकाला अतार्किक म्हणणे, वाईटाला वाईट म्हणणे गुन्हा ठरत आहे. संविधानवादी माणसे सांविधानिक पदांवर टीका करीत नाहीत कारण ही पदे धर्मनिरपेक्षच आहेत, पण त्या पदांवर नियुक्त केलेल्या आणि त्या पदाची सांविधानिक नीती न पाळणाऱ्या व्यक्तींवर टीका करतात. पण अशी टीका सोयीने पदावरची मानली जाते. म्हणजे संविधानाची प्रतिष्ठा राखा, संविधाननीती पाळा असे म्हणणे हाही गुन्हा ठरतो आहे. विचार करण्याचे विस्मरण झालेली माणसे विचार करणाऱ्यांच्या विरोधात जात आहेत. हा विभाजनाचाच एक प्रकार आहे. या अस्वस्थ वर्तमानात अस्वस्थता पसरवणारे लोक मात्र स्वस्थ आहेत. आपल्या देशाला आज असे दुभंगलेपण आलेले आहे. अपूर्व महागाई, अपूर्व दहशत आणि अपूर्व धर्मसत्ता यामुळेही अस्वस्थ वर्तमानाची अपूर्व वाताहत सुरू झालेली आहे.

## अकरा:

म्हणजे शेतकऱ्यांच्या आंदोलनाला समर्थन देणारे आणि हे आंदोलन दडपू पाहणारे अशा दोन प्रकारच्या मानसिकतांचा हा वर्तमान आहे. महागाईत जळणारे आणि महागाईची आग भडकवणारे असे दोन प्रकारचे लोक इथे आहेत. नोटाबंदीचे समर्थक आणि विरोधकही याच वर्तमानात आहे. बलात्कारांचे समर्थक आणि विरोधक याच वर्तमानात आहेत. मुस्लिमांच्या, बौद्धांच्या आणि आदिवासींच्या हत्यांचे समर्थक आणि या हत्याचे विरोधकही इथे एकाच वेळी आहेत. रेल्वे, रेल्वे स्टेशने, विमानतळे अशा खूप गोष्टी विकण्याचे समर्थकही इथे आहेत आणि विरोधकही इथे आहेत. वर्तमानाला असे पराकोटीचे अगतिकपण आज आले आहे.

शेतकऱ्यांच्या मार्गात खिळे ठोकणे, वाहने घालून त्यांना

मारणे ही व्यवस्थेच्या दडपेगिरीचीच प्रतीके आहेत. स्त्रिया आणि शूद्रातिशूद्र यांच्या माणुसकीच्या मार्गात धर्माने असेच खिळे ठोकले



होते. व्यवस्थाविरोधात जाणाऱ्या हजारो भिक्खूंची कत्तल पुष्यमित्राने केली होती. खांडववनात लाखो नाग लोकांना जाळले होते. आजची ही सर्व तंत्रे अशी परंपरेतूनच मिळविली जातात.

## बारा:

संविधानाने राजे, हुकूमशहा, आर्थिक दरोडेखोर, सामाजिक जुलूमशहा आणि धार्मिक एकाधिकारशहा निर्माण होण्याचे सर्वच मार्ग बंद केलेले आहेत. आता सर्व लोकच देशाचे अनुशासक आहेत. देश लोकांच्या मालकीचा आहे. त्यातील संसाधने लोकांची आहेत. देशातला पैसा लोकांच्या मालकीचा आहे. देश कोणा व्यक्तीचा, पक्षाचा वा धर्माचा नव्हे. देश नावाच्या या महासंपत्तीवर देशातील प्रत्येक भारतीय नागरिकाचे नाव छापलेले आहे. हा देश कोणालाही विकता येत नाही. देश विकणे म्हणजे देशातील लोक विकणे. पण विद्यमान विक्रीपर्वामुळेही वर्तमानाला भयंकर भगदाडे पडत आहेत. संविधानभारत भांडवलदार आणि संघ यांच्या घशात टाकणे सुरू झाले आहे आणि धर्मश्रद्धेच्या गडद धुक्यामुळे स्वस्थ लोकांना हे गिळंकृतिकरण दिसत नाही.

## तेरा:

या सर्व अस्वस्थतेचे कारण मनुस्मृतीमधील ब्राह्मणवर्चस्वी समाजरचना निर्माण करण्याच्या खटाटोपात दडले आहे. हे कारस्थान लोकांना अविद्येमुळे म्हणजे अज्ञानामुळे कळत नाही. जोतीबा फुले म्हणतात त्याप्रमाणे–

**'विद्येविना मती गेली, मतीविना नीती गेली,**
**नीतिविना गति गेली, गतिविना वित्त गेले**
**वित्ताविना शूद्र खचले**
**इतके अनर्थ एका अविद्येने केले.'**

हे अज्ञान माणसांना बंड करू देत नाही. ही अविद्या असंख्य माणसांना त्यांचे शोषण होत असतानाही अस्वस्थ होऊ देत नाही. ते स्वस्थ राहतात आणि स्वस्थ व्यवस्थेत सहभागी होतात. वर्तमानाची अस्वस्थता या वाढत्या स्वस्थतेमुळेही वाढत आहे.

## चौदा:

स्वस्थतेचा एक परिणाम असाही संभवतो, की ती व्यवस्था मजबूत करते आणि वाढत जाते. कारण अज्ञानाचा विकास केला जातो. मग स्वस्थ माणसे अधिकच अज्ञानमनस्क होत जातात. अस्वस्थतेचेही दोन परिणाम संभवतात. एकतर ती वाढत जाते आणि माणसांना ती पूर्ण निष्क्रिय, पूर्ण उदास, पूर्ण हतबल आणि पूर्ण प्रेतवत करीत जाते. ही वांझ, निर्मितीशून्य आणि थांबलेली अस्वस्थता असते. या अस्वस्थतेची भीती व्यवस्थेला कधीच वाटत नाही. उलट अस्वस्थतेचा दुसरा परिणाम व्यवस्थेला धोक्याचा वाटत असतो. कारण अस्वस्थतेच्या आगीत जळणारी माणसे कधीतरी अस्वस्थता जाळणारी आगच हातात घेतात आणि अस्वस्थतेला पेटवून देतात.

खरे हे आहे की कितीही अवरोध आले तरी जीवन बदलतेच. समाजाला एका ठिकाणी फार वेळ थांबवताही येत नाही वा त्याला मागेही नेता येत नाही. जीवनाचा प्रवास अधिक निर्दोषतेच्या दिशेनेच होत असतो. हे जीवनाचे डायनॅमिक्स कोणालाही नाकारता येत नाही. फक्त त्या त्या वेळी क्रांतीची एखादी ठिणगी पडण्याची गरज असते आणि अशी ठिणगी कधीतरी पडतेच.

**'एखाद्या निमित्ताची ठिणगी पडेल,**
**पेटून उठावे रान तसा बर्फ पेट घेईल.**
**आणि सामूहिक झालेल्या आगीला समजावणे कठीण जाईल.**
**भुकाच होतील कडाडते उठाव**
**अंधारात वाहणाऱ्या वस्त्यांना येतील उजेडाच्या फांद्या**
**खुद्द झाडेच तोडतील कुऱ्हाडींची मस्ती.**
**अगतिक चांदण्यावरील बलात्कार**
**अख्ख्या माणुसकीलाच आपली नासधूस वाटेल**
**यावेळी उफाळलेला ज्वालामुखी साराच माज जाळून टाकील.**
**हे आयुष्यभर थोडे थोडे मरणारे जीव**
**अंगार होतील, पेटवतील मरणांची भीती**
**मातीतून उगवणाऱ्या स्वप्नांमधे नवी स्वप्ने उगवून येतील.**
**या धुमसणाऱ्या अशांत वस्त्या**
**सहनशीलतेचा करार चुलीत फेकतील**
**आणि सशस्त्र ढगांमधून जग बदलणारा पाऊस बरसेल.**
**वस्त्या अंगावरील पहाड फेकतील**
**नद्यांना येतील आंदोलनांचे पूर**
**आणि बंद पडतील उलट्या काळजांचे कारखाने**
**... निमित्ताच्या एखाद्याही ठिणगीने.''** (युगमुद्रा : २०१६)

आज अस्वस्थता निर्माण करणारी स्वस्थता अधिक बेबंद झाली आहे आणि अस्वस्थता आज व्यवस्थांतरासाठी एखाद्या निमित्ताच्या ठिणगीची प्रकर्षाने वाट पाहत आहे. ●●●

**(लेखक ज्येष्ठ साहित्यिक आणि विचारवंत आहेत)**

# विकास खुरटल्याने मुस्लिम होतोय अस्वस्थ



**मुस्लिमांवर चिटकवलं गेलेलं धार्मिक कट्टरतेचं लेबल आणि हिंदुत्ववाद्यांच्या राजकारणामुळे प्रगतीत आलेलं खुरटलेपण या कारणांनी मुस्लिमांमध्ये अस्वस्थता आहे.**



जयदेव डोळे

गैरसमज, संशय, अविश्वास, शंका यामुळे भारतातला मुसलमान अस्वस्थ होत असतो. गेल्या सात वर्षांत ज्या तऱ्हेने भाजपचे मोदी सरकार मुसलमानांची शत्रू म्हणून हेटाळणी करीत निघाले आहे, ते पाहता तिच्यात आलेले टोक सोडता काही नवीन नाही हे समजते. कारण दुसरे सरसंघचालक माधव सदाशिव गोळवलकर यांनीच मुसलमानांना अंतर्गत धोका म्हणून ठेवले आहे, तेही अगदी लिहून. त्यामुळे हिंदुत्ववाद्यांचे सरकार आपल्या जीवावर उठणार याची कल्पना साधारण राजकीयदृष्ट्या जागृत मुसलमानाला होती. त्याप्रमाणे अनुभवही येत गेले. झुंडीने ठेचून ठार करणे, त्यावेळी गोहत्या, गोमांस, गोवाहतूक आदी असिद्ध आरोप करून वातावरण पेटवणे, देवळे वा मंदिरे यांची विटंबना केल्याचा संशय व्यक्त करणे, चार बायका व डझनभर अपत्ये असल्याचा प्रचार करणे, पाकिस्तानाला फितूर होण्याचा संशय सतत घेत राहणे, एकगठ्ठा मतदान केल्याचा आरोप करीत राहणे, कोविड-१९ या संसर्गजन्य रोगाचा फैलाव केल्याचा दोष देणे, लव्ह जिहादचा प्रयोग करीत राहण्याचा संशय पसरवणे आणि धर्मांतरास उत्तेजन देणे आदी प्रकार राजरोस, नियमित आरंभले. अनेक राज्ये या पक्षाच्या ताब्यात गेली व तिथे मुसलमानांवर अनेक निर्बंध येत चालले. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, गेल्या सात वर्षात भाजपने एकाही मुसलमानाला ना लोकसभेसाठी उमेदवारी दिली, ना विधानसभांसाठी. ज्यांना स्वधर्मीय नागरिकांत काहीही प्रभाव नाही असे दोन मुस्लिम नेते मात्र भाजपने गोठ्यात गाय जशी असते तसे पाळले आहेत. त्यांना राज्यसभा व मंत्रीपद दिले की पक्षाचे काम भागते. शिवाय आम्ही मुसलमान शत्रू ठरवत नाही, असा प्रचारही करता येतो. प्रत्यक्षात त्यांची खच्ची बेसुमार व बेगुमान चालू आहे.

## सहवासाला पारखे

दहशतवादाचे जणू प्रत्येक मुसलमानाला बाळकडू मिळते असा भयंकर प्रचार तर गेल्या सात वर्षांत इतका केला या मंडळीने, की बस्स! धर्मांधता, धर्मवेडेपणा फक्त मुसलमानांत असल्याचाही भरपूर गहजब त्यांनी केला. रॅडिकल, फॅनाटिक, मिलिटंट, रॅबिड, इन्टॉलरंट ही इंग्रजी विशेषणे आणि त्यांची विविध भाषांतली रुपे ही केवळ मुसलमानांसाठी जन्मल्याचे दाखले ते देत राहिले. हिंसा, रक्तपात, भडकपणा साहजिकच या विशेषणांपाठोपाठ येत राहिले. थोडक्यात, सामान्य गैरमुस्लिम भारतीयाला मुसलमान म्हणजे दुष्ट, अमानुष व उलट्या काळजाचाच असतो, असे वाटू लागले. सबब, हिंदूबहुल भागात मुसलमानांना ना घरे मिळू लागली, ना नोकऱ्या. 'सेल्समन नॉट अलाऊड' अशा पाट्या वसाहतींच्या फाटकांवर लटकू लागल्या, त्या यांच्यासाठीच. अशा वसाहतींमधून ड्रायव्हर, इस्त्रीवाला, मोलकरीण, वॉचमन, लिफ्टमन, माळी, मोटार धुणारा, धोबी, दूधवाला, भाजीवाला, पेपर टाकणारा, घरकाम करणारा आदी प्रकारच्या कामांतून मुसलमान वगळला जाऊ लागला. शाळा, कॉलेजेस तर फार पूर्वीच 'आमची-त्यांची' करण्यात आलेली. त्यामुळे मुस्लिम व बिगरमुस्लिम सहवासाला पारखे झाले. एकमेकांना अनोळखी झाले.

आता मुस्लिम व बिगर मुस्लिम यांच्या 'अजनबी' असण्याला 'नैसर्गिक', स्वाभाविक स्वरूप आले आहे. बालपणापासून ना कुणी मुस्लिम मित्र वा मैत्रिण, ना शेजारी-पाजारी, ना श्रमिक म्हणून ओळख. ही फाळणी घडवण्यात संघ परिवाराचा मोठा वाटा आहे. काँग्रेसवाल्यांनीही आपली अध्यातमध्यात नसलेली भूमिका पार पाडून कधी कशात हस्तक्षेप केला नाही. त्यामुळे आज मुसलमानांची जी अवस्था झाली आहे, तिने मुसलमानच काय कोणताही संवेदनशील भारतीय अस्वस्थ होईल. पण खरी अस्वस्थता जिवंत राहण्यासाठी केवढा खटाटोप करावा लागतो त्यामधून उगवली आहे. बेकारी, गरिबी, अल्पशिक्षण, अनारोग्य आणि एकारलेला रहिवास त्याला कारण आहे.

## प्रगतीत खुरटलेपण

उद्योगधंद्यांचे आणि नोकऱ्यांचे सारे क्षेत्र असे धार्मिक साखळ्यांनी आवळलेले की तिथे प्रवेशच दुरापास्त. बडी शहरे कदाचित या साखळ्या मानत नसतील. कारण परस्पर सहकार्य तिथे अनिवार्य

असते. खेरीज निष्ठा, प्रामाणिकपणा, कौशल्य, श्रमण्याची तयारी यात कमतरता असत नाही. पण जिथे भाजपचे राजकारण व्यापार वा उद्योग बगलेत दाबून असते, तिथे अन्यधर्मीय वर्ज्य असतात. असा अप्रत्यक्ष व सुप्त बहिष्कार परस्परांना आणखी अलग करून टाकतो. सहधर्मियांत असा कितीसा व्यापारवृद्धीचा उपक्रम शिल्लक असणार?

शिक्षणाचे माध्यम त्या त्या राज्याच्या भाषेतच पाहिजे. हे मंजूर असूनही त्या शाळांत जर प्रवेशच दिला जात नसेल तर बोलायचे-लिहायचे कसे त्या प्रादेशिक भाषेत? त्यामुळे नाईलाजास्तव उर्दू वा इंग्रजी माध्यम स्वीकारावे लागून तुटकपणात आणखी वाढ होत राहते. शाळांमध्ये सहवास वाढतो, परस्पर परिचय होतो, संस्कृतीचे आदानप्रदान होते, शत्रूमित्र भाव स्पष्ट होतो. गैरसमज, अफवा यांचा निचरा होतो. महाविद्यालये व विद्यापीठांत शिकायला जाणाऱ्या मुसलमानांची संख्या अत्यंत विदारक. उच्चशिक्षण घेऊ पाहणाऱ्या अनेकांना आर्थिक अडचणी आडव्या येतात. परिणामतः व्यक्तिमत्व विकास, सामाजिक प्रगती यांत खुरटलेपण कायमचे.

कौशल्ये आणि आत्मविश्वास यांत कमालीची मर्यादा येत असल्याने मुसलमान आपोआप मागे पडत नाही. तो मुद्दाम सगळीकडून नाडला जातो. त्याने समाजाच्या मध्यधारेत म्हणजे हिंदूंच्या, बहुसंख्याक आर्थिक-सामाजिक-राजकीय विचारव्यवहार यात उतरूच नये, असे अडथळे तयार केल्यावर तो मागासलेला राहणार नाही तर काय?

## खिजगणतीच नाही

मुसलमान असा एकाकी पाडला गेल्यावर त्याला दिलासा अथवा पर्याय धर्मातच सापडतो, असा एक समज आहे. तो अर्धाअधिक खरा मानूया. कारण गेल्या ३० वर्षांत जो आर्थिक व तंत्रज्ञानात्मक बदल झाला, त्यात मुस्लिम मध्यमवर्गही संख्येने वाढला. इंग्रजी भाषा, व्यावसायिकरण, शहरीकरण, नवी कौशल्ये व तज्ज्ञता आणि आधुनिकता यांचा स्वीकार खूप झाला आहे. याचा अर्थ तो समाजवादी, सेक्यूलर, चंगळवादी होऊन बसला नाही. तो अत्यंत व्यवहारी, लवचिक आणि सावध झाला आहे. वरकरणी तो त्याच्या सामूहिकतेमध्ये विलीन झाला असे वाटत असतानाच तो आत्मकेंद्री, व्यक्तिवादी, स्वार्थी आणि संधीसाधू बनला आहे. सर्वत्र मध्यमवर्ग असाच असतो. वेळप्रसंग पाहून तो आपल्यात बदल घडवत असतो. बहुसंख्याक हिंदू जर कम्युनल म्हणजे जातीयवादी झाला असेल, तर बचाव म्हणून आपणही धर्मातच सुरक्षितता शोधली पाहिजे, हे तो जाणतो. पण त्याचबरोबर धर्मातिरेक आणि धर्मबाहुल्य किती नुकसानकारक असते याची जाणीव त्याला आंतरराष्ट्रीय घडामोडींमधून होत राहते. लोकशाहीविना आपलाच काय, कुणाचाच उद्धार होणार नाही याचा अनुभव तो घेत राहतो. त्यामुळे त्याच्या लेखी पाकिस्तान अथवा सौदी अरेबिया, इंडोनेशिया वा बांगलादेश यांची किंमत शून्य असते. मग उगाचच, पाकिस्तानात जाऊन राहा असे त्याला कुणी म्हटले, की तो अस्वस्थ होतो. बुरख्यामधूनही सुशिक्षित तरूणींची अस्वस्थता लपत नसते. मुलगी शिकली तर अख्खे घरही शिकते, याचा प्रत्यंतर मुस्लिमांना आला आहे. मुलीदेखील अन्यधर्मीय मध्यमवर्गीय



मुलींसारखेच जगू पाहत असतात. त्याही चतूर, सावध व स्वाभिमानी असतात. कुठे परंपरा पाळायची, कुठे नवता स्वीकारायची याचे संतुलन त्यांना चांगले जमू लागले आहे. तरीही अस्वस्थता कशाची? देशाच्या मध्यधारेत त्यांना अजूनही खिजगणतीत धरले जात नाही. त्यांची प्रतिमा अद्यापही अल्पशिक्षित, धार्मिक, संसारी व अकुशल अशीच आहे. आपला धर्म त्या लपवू पाहात नाहीत. तसा तो आपल्या प्रगतीच्या आड येऊन डोक्यावर बसू पाहत असेल तर त्या तसेही होऊ देत नाहीत.

## तेही तेवढेच जबाबदार

धर्म व मुसलमान यांचे नाते अभिन्न असते, असा ग्रह होण्याला मुसलमानही तेवढेच जबाबदार आहेत. कारण त्यातील बहुसंख्य मुल्ला, मौलवी आदी धर्मगुरू यांच्या श्रेष्ठत्वास आव्हान देत नाहीत. मग होते असे, की ही धर्मगुरू मंडळी त्यांना हवे ते निवेदन प्रसिद्धीस देतात आणि असे दाखवतात, की या संपूर्ण मुसलमानांच्या भावना आहेत. आपण एका लोकशाही, प्रजासत्ताक, धर्मनिरपेक्ष, सार्वभौम देशाचे नागरिक म्हणून जगतो. त्या जगण्यावर धर्माची बंधने का म्हणून व किती स्वीकारायची, असा विचार करणारेही खूप असतात. पण आपण एकटे पडू अशा भयाने ते गप्प राहतात. त्यांचे हे भय एक प्रकारे मूकसमर्थन असल्याचा समज हिंदुत्ववादी करवून घेतात आणि आणखी गैरसमज पसरवतात. तालिबानचेच घ्या. त्यांची सत्ता अफगाणिस्तानात पुनः स्थापित झाल्यावर मोजक्या मुस्लिम धर्मगुरूंनी त्याचे स्वागत केले. झाले! अवघा मुसलमानच त्या तालिबान्यांच्या पाठीशी उभा असल्याचे लोक मानू लागले. कारण धर्मगुरू चुकीचे आहेत, असे म्हणायचे धैर्य फार कुणी दाखवू शकले नाही. इंग्रजी माध्यमांत काहींनी धर्मगुरूंचे म्हणणे खोडले. पण ते असे किती लोकांपर्यंत पोचणार?

यामागची एक गोष्ट आपण लक्षात घेतली पाहिजे. मुसलमान त्यामुळेही अस्वस्थ होत असतो. मुसलमान एक आहे असा दावा कुणी उलेमा करो की अमीर, अनेक वर्गात, पंथांत आणि पोटजातींत जसा हिंदू विभागला गेला आहे, तसा मुसलमानही आहे. मोगल, तुर्क, पठाण, इराणी, अरबी हे जसे प्रादेशिक भेद आहेत तसे शिया-सुन्नी वगैरेही आहेत. त्यांच्यातही पंथ आहेत. त्यांच्या मशिदीही वगेळ्या असतात. ज्या जातींनी इस्लाम स्वीकारला, त्यांची वैशिष्ट्ये व त्यांचे व्यवसाय

धर्मांतरानंतरही कायम राहिले. त्यांच्यात विवाह फार कमी होतात. सय्यद-शेख-पठाण-कुरेशी-मोमिन-बागवान-अन्सारी आदी जाती परस्परांशी बेटीव्यवहार क्वचितच करतात. उच्चवर्गात असे भेद पाळले जात नाहीत व त्याला तसा काही फरकही पडत नाही. काश्मीरच्या मुसलमानांच्या समस्यांसाठी तमिळ मुस्लिम मोर्चा काढत नसतात आणि आसमच्या मुसलमानांसाठी गुजराती मुसलमान. सर्व राज्यांतले मुस्लिम मतदार त्या त्या राज्यातल्या परिस्थितीनुसार मतदान करीत असतात. त्यांचे मतदान एकगठ्ठा असते तर मुस्लिम लीग नामशेष झाली नसती आणि काँग्रेस दुबळी. आमच्या औरंगाबादेत मजलिस-ए-इत्तेहादूल मुस्लिमीन या पक्षाला हिंदूंनीही मते दिली. अगदी हिंदुत्ववाद्यांनीही! त्यामुळे ती एक 'व्होटबँक' आहे हा अत्यंत खोटा व मानहानीकारक प्रचार आहे. पण तो सतत होत असल्याने मुसलमान अस्वस्थ होतो. म्हणूनच सुदूर अफगाणिस्तानात कोण सत्तेवर आले अन् गेले याची खंत वा आनंद सामान्य मुसलमानाला का असेल? सारे जग इस्लाममय करावे आणि परधर्मियांना काफीर मानावे या आज्ञा पाळायला जावे, की आपण आपला प्रपंच शांतपणे, सुखात चालवित राहावे, असा विचार सामान्य मुसलमान करणार! तो थोडाच आंतरराष्ट्रीय घडामोडींची चिंता करीत रोज घराबाहेर पडतो? त्याचे शिक्षण, त्याची गरज, त्याच्या अपेक्षा व त्याची आर्थिक स्थिती त्याच्या आयुष्याच्या दोऱ्या असतात. हिंदूंच्या जशा असतात तशा. त्या कापून टाकत धर्मराज्यस्थापनेत कुणी का निघेल? १८ कोटींपैकी जेमतेम २०० मुसलमान 'आयसिस'मध्ये भारतातून सामील झाले. याचा अर्थ कसा लावायचा मग? तरीही मुसलमान सारे एक या आरोपातून व भावनेतून मुसलमान सुटू शकत नाही. त्यावेळी तो अस्वस्थ होतो. मतदानाचे निर्णय मशिदीत ठरतात हा आणखी एक अपप्रचार. तसे म्हणणे म्हणजे स्वतंत्र विचारशक्ती, स्वार्थ आणि दूरदृष्टी यांचा त्यांच्यात अभाव आहे, असे मानणे होय. 'अपनी कौम' प्यारी असतेच; परंतु त्याही पलीकडे व्यक्ती म्हणून काही विचार, मते, अनुभव असतात. तरीही कडवे, माथेफिरू, धर्मपिसाट अशा व्यक्ती निर्माण होत राहतात आणि त्यांनी सर्व धर्म व्यापलेले आहेत. त्यांची संख्या मूठभर असते, हे वास्तव स्वीकारायचे नसते. पॉप्युलर फ्रंट ऑफ इंडिया, स्टुडंट्स इस्लामिक मूव्हमेंट ऑफ इंडिया या छापाच्या संघटना उदयास येऊन अस्तास जात असतात.

## इतिहासाचा जाच कायम

इतरांनी आमच्या धर्मात लुडबूड का करावी, या प्रश्नानेही मुसलमान अस्वस्थ होत असावेत. कायदे आणि समाजसुधारणा यांचे नाते अतूट. सुधारकांना चळवळ, आंदोलन, प्रचार यांचा पाया लागतो. तो हिंदू समाजाला भक्कम आहे. साहजिकच ज्या वेगात व प्रमाणात हिंदू धर्मसुधारणा झाल्या, तसे इस्लाममध्ये क्वचित दिसते. त्यामुळे हिंदूंप्रमाणे मुसलमानांनी झटपट बदलावे अशी अपेक्षा बहुतेक मुस्लिम निकामी करतात. पुन्हा जुना मुद्दा येथे उगवतो. साहचर्य, परस्परविश्वास, प्रेम, आदर आणि सौहार्द गमावलेल्या वातावरणात सुधारणांच्या सूचनांमध्ये काही कारस्थान तर नाही ना, असा संशय मुसलमान घेणारच. त्यामुळे सुधारणांसाठी आपली कृती आणि वर्तन तितके अनुकरणीय व विश्वासार्ह आहे काय, याचा अंतर्वेध हिंदूंनी घ्यायला हवा. मोजकेच पुरोगामी, डावे हिंदू पक्के सुधारक असतात, म्हणूनही मुसलमान साशंक होतो. संख्येच्या बळावर ते पुरोगाम्यांची ताकद जोखतात. कारण अगदी सरळ आहे. मोक्याच्या क्षणी कोण, किती, केवढे मदतीस येतील याचा म्हणजे सुरक्षिततेचा विचार आधी केला जात असावा; सुधारणांमुळे किती सोपे आयुष्य होईल याचा नाही. मराठवाडा वगळता उर्वरित महाराष्ट्रात मुसलमान मराठी भाषा, संस्कृती व इतिहास यांशी घट्ट जोडलेला आहे. त्यामुळे तिथला मुसलमान आत्मनिर्भर जास्त असून तो एकंदर राजकीय वातावरणामुळे अस्वस्थ होतो. धर्म, परंपरा यांचा बडिवार जेवढा मराठवाड्यात आढळतो तेवढा अन्यत्र नाही. एमआयएमचे प्रस्थ या भागात कदाचित त्यामुळेच निर्माण झाले. प. महाराष्ट्र, मुंबई, कोकण या भागांना जो सुधारक, क्रांतिकारक आदींचा वारसा मिळाला त्याचा परिणाम तेथील मुसलमानांच्या मोकळ्या, निर्भय व चौकटबाह्य वर्तनात आढळतो. तो अनेक ठिकाणी आघाडीवर असतो. मराठवाड्यातला मुसलमान त्याने अस्वस्थ होतो. तो अद्याप इतिहासाच्या जाचातून मुक्त होताना दिसत नाही.



### भाकरी की स्वातंत्र्य, याचा पेच

१४ ऑगस्टला तालिबानने काबूल काबीज केल्यावर दोनेक दिवसांनी 'टीव्हीवरच्या एका बातमीत' एक अफगाण पुरूष सायकलीला तालिबानी झेंडे अडकवून विकत होता. पोटासाठी आपण काय करत आहोत याचा विचार तो गरीब, कष्टकरी कशाला करील? जे पुढ्यात येईल ते स्वीकारून त्यावर रोजीरोटी कमवावी हा जगाचा रिवाज असतो. पण येथेच पेच असतो, भाकरी की स्वातंत्र्य याचा. भाकरी कधी मिळेल, ना मिळेल. स्वातंत्र्य मात्र एकदा निघून गेले की परत फिरेल, याची शाश्वती नसते. हा प्रश्न अधिक अस्वस्थ करणारा आहे. तो अनेकांना छळतो आहे.

अशा परिस्थितीत काही तरक्कीपसंद मुसलमान एका घडामोडीने अस्वस्थ होताना आढळतात. कुणी कुणाच्या धर्मात व रितीरिवाजात हस्तक्षेप करायचा नाही, या बोलीवर आपोआपच कट्टर विचारांचे पक्ष, संघटना, संस्था बळकट होत जातात. त्यामुळे जुने मुद्दे हटता हटत नाहीत. सारे वाद अखेर धर्मापाशी येऊन थांबतात. डाव्यांसारखे तिरस्कारवादी आणि 'धर्मभ्रष्ट' भाजपवाले व शिवसैनिक नसतात. सबब, या हिंदुत्ववाद्यांनाही बळ मिळते आणि त्यांना अशा मुसलमानांची मते पडतात. हिंदुत्ववादी आणि कट्टर इस्लामी या दोन्ही धारांचे मुख्य विरोधक साम्यवादी, पुरोगामी, आधुनिकतानिष्ठ, विज्ञानवादी, तर्ककठोर आणि अनुभवनिष्ठ असतात. तालिबान्यांनी आधी कम्युनिस्ट घालवले, नंतर भांडवलशाही. पण हे करता करता लोकशाही स्वातंत्र्ये गमावत निघाले ते अफगाणी सामान्य नागरिक. आज त्यांच्या इच्छेची पर्वा न करता २० वर्षांपूर्वीची तीच जंगली, सनातनी राजवट त्या देशावर येऊन बसली. पुरूषांपेक्षा अफगाणी स्त्रिया या रानटी राजवटीवर संतापलेल्या आहेत. कारण स्वातंत्र्य, समता, न्याय यांची चव त्यांनी चाखली.

## अजूनही तो अस्वस्थच

आज विचारी व आधुनिक मुसलमान त्याला ना अमेरिकन साम्राज्यवाद हवा, ना पुरोगामी समाजवादी व्यवस्था, असा दुहेरी नकार देत जगतो आहे. त्याची ही अस्वस्थता त्याने स्वतःहून ओढवलेली आहे. स्वतंत्र देशी भारतीय विचार तो मानतो, असेही आढळत नाही. म्हणजे गांधी, नेहरू, लोहिया, जेपी आदींचा अनुयायी म्हणवून घ्यायला तो धजेनासा झाला आहे. तो जिन्नांचा पाठीराखा कधीच नव्हता. पण गांधीही त्याने स्वीकारण्याची चिन्हे नाहीत. इतःपर काँग्रेसचा मतदार म्हणून त्याची ओळख त्या पक्षासारखीच सर्व विचारांच्या काठावरची होऊन बसली. त्यामुळे काँग्रेस पक्ष जसजसा खचत चालला, तसा भारतीय मुस्लिम सैरभैर आणि बावरलेला होत चालला. अजूनही तो तसाच अस्वस्थ आहे.

संघ परिवार व भाजप यांच्या दबावामुळे जवळपास सारे पक्ष धर्म, परंपरा, अंधश्रद्धा यांवर ठोस न बोलण्याची भूमिका स्वीकारतात. सत्तेचे राजकारण जणू समाज सुधारणांचे राजकारण नसते असा साऱ्यांचा समज झालेला आहे. ते मुसलमानांमधल्या जीर्णमतवादी गटाच्या फायद्याचे ठरते. त्यामुळे हा गट मुसलमानांच्या कट्टर धर्मप्रियतेचा गाजावाजा करीत राहतो. प्रत्यक्षात पाच वेळा नमाज, बुरखा आणि हलाल-हराम यांसारख्या गोष्टी सार्वजनिक जीवनव्यवहारात अनेकदा अडचणीच्या ठरत असतात, हेही चाणाक्ष मुसलमान जाणतो. पण काय करणार? समुदायात राहायचे असते. बहिष्कृत केले म्हणजे? मुसलमानांची स्वतःहून एक गफलत अशी होत राहते, की व्यक्ती म्हणून संवैधानिक अस्तित्व गौण ठरते आणि धार्मिक समुहाचा प्रतिनिधी ही ओळख ठळक होत जाते. त्याचा परिणाम वैयक्तिक स्वातंत्र्य, हक्क, अपेक्षा, स्वप्नपूर्ती अशा अनेक बाबींवर होतो. त्यामुळे नागरिकत्व अधुरे व कायम खुरटलेले राहते. अनेक गोष्टी लपूनछपून करण्यात मग सारी ऊर्जा खर्च होते. धर्माचे अवडंबर कितीही माजवले तरी गुन्हेगारी, खोटेपणा, दुटप्पीपणा, बेजबाबदारपणा, कायदेभंग, अनीतिमान वर्तन इत्यादी थोडेच थांबले?




### ओढवून घेतलेली अस्वस्थता

आज विचारी व आधुनिक मुसलमान त्याला ना अमेरिकन साम्राज्यवाद हवा, ना पुरोगामी समाजवादी व्यवस्था, असा दुहेरी नकार देत जगतो आहे. त्याची ही अस्वस्थता त्याने स्वतःहून ओढवलेली आहे. स्वतंत्र देशी भारतीय विचार तो मानतो, असेही आढळत नाही. म्हणजे गांधी, नेहरू, लोहिया, जेपी आदींचा अनुयायी म्हणवून घ्यायला तो धजेनासा झाला आहे. तो जिन्नांचा पाठीराखा कधीच नव्हता. पण गांधीही त्याने स्वीकारण्याची चिन्हे नाहीत.

हा पेच कित्येक मुस्लिमांना किंकर्तव्यमूढ करीत राहतो आणि सतत 'आपल्याला काय त्याचे?' या वृत्तीचा स्वीकार केल्यामुळे एकाकीपण व तुटलेपणही येऊन कोसळते. हिंदुत्ववादी नेमका या दुहेरीपणाचा लाभ घेतात व राष्ट्रद्रोहापासून जहालमतवादापर्यंत वाटेल ते आरोप करीत सुटतात. त्यानेही अस्वस्थता प्रचंड वाढते. याचा अर्थ हे हिंदुत्ववादी तेवढे राष्ट्रवादी आणि त्यागी अन् बाकी सगळे बिनकामाचे असा प्रचार यशस्वी होतो. पण या लबाड, ढोंगी हिंदुत्ववाद्यांची तोंडे गप्प करायलाही कुणी पुढे येत नाही. आमच्यासारख्या त्यांच्या टीकाकारांना मुसलमान ओळख दाखवत नाही. न जाणो आमची धर्म-जात-विषमता-ईश्वर-परंपरा आदींवरची टीका त्यांना त्यांच्या समाजापासून तोडेल काय, अशी भीती त्यांना वाटते. कुणी आम्हाला गौरवाने अथवा आमचा मतदारसंघ बनावे अशी आम्हासारख्यांची इच्छा नसते. आमचे भांडण धर्माच्या आधाराने माणसाला गुलाम करण्याविरूद्ध, माणसाचे स्वातंत्र्य हिरावण्याविरूद्ध आणि स्त्री-पुरूषांच्या आर्थिक स्वातंत्र्यासाठी आहे, धर्म कोणताही असो. जम्मू व काश्मीरमध्ये आता हिंदू व शीख यांच्या हत्या दहशतवादी करीत सुटले आहेत. त्यांचा निषेध करणे आमचेच काय, प्रत्येक भारतीयाचे कर्तव्य आहे. तो केलाही जात असतो. गांधींच्या खुनानंतर पेढे वाटले, तसे कुणी वाटत नाही. •••

**(लेखक ज्येष्ठ माध्यमतज्ज्ञ आहेत)**

# धार्मिक राष्ट्रवादाची अस्वस्थतेला ऊब



**देशात धर्म व संस्कृतीच्या नावाखाली राजकीय व्यवस्थेचे गुन्हेगारीकरण झाले असून बुद्धिजीवींच्या तडजोडवादी भूमिकेमुळे धार्मिक राष्ट्रवाद फोफावला आहे.**



**बी.जी. वाघ**

भारत एक अशांत देश आहे, अस्वस्थ आहे, भयग्रस्तही आहे. भयग्रस्ततेची अनेक कारणे आहेत. कोविडची साथ, बेरोजगारी, दारिद्र्य, भविष्यकालीन अनिश्चितता. अफगाणिस्तानात अमेरिकेसारख्या देशाने धर्मांध सत्तेपुढे गुडघे टेकले. जगाचे राजकारण भयावहरित्या सत्ताकांक्षी झाले आहे. जागतिक व्यवस्था आमूलाग्र पद्धतीने बदलत आहेत. त्यातून काही अनैतिक, अभद्र युत्या जन्माला येतात. आपले राजकीय व आर्थिक हितसंबंध सांभाळणे हाच त्यामागील हेतू असतो. कधी काळी लोकप्रिय असलेला उदारमतवाद, लोकशाही समाजवाद, नवमार्क्सवाद, मानवतावाद मागे पडून सामूहिक सत्तावाद (Collectivism), अतिरेकी राष्ट्रवाद, बहुसंख्याकवादी धर्मवाद, धार्मिक राष्ट्रवाद वाढले आहेत. त्याची बहुविध कारणे आहेत. त्यामुळे माणूस, मानवतावाद हे मूल्य मागे पडले आहे. जागतिकीकरणामुळे माणसाची नैतिक व बौद्धिक उंची वाढलेली नाही. तो अधिक स्वार्थी, संकुचित, असहिष्णू झाला आहे.

जागतिकीकरण ही एक शोषणपद्धती आहे, जिला आपण विकास म्हणतो. ती नष्ट करते आहे सामाजिक व राष्ट्रीय सुसंवाद, नैसर्गिक समतोल व शांतता. ती निसर्गाचे, नैसर्गिक साधनसंपत्तीचे व गरिबांचे शोषण करते. या व्यवस्थेत माणूस खुजा झालेला आहे. आपल्याला शेळीच्या समुदायात राहायचे असेल तर शेळीच व्हावे लागेल, असे आईनस्टाईनने म्हटले आहे. व्यक्तीपेक्षा धर्म व राष्ट्र श्रेष्ठ असे म्हणणारे लोक या संकल्पनेद्वारे माणसांचा छळ करतात. हिटलरने ते केले. त्यासाठी ते धर्म वा वंशाचा शस्त्रासारखा वापर करतात. आईनस्टाईनचे वरील मत माणसांना बोन्साय करण्याची जी राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक प्रक्रिया आहे, तिच्याविरूद्ध आहे. जातीसाठी माती खाणारा भारतीय समाज, धर्मासाठी आपली अक्कल गहाण ठेवणारे विचारवंत, भयग्रस्त व उदासीन मध्यमवर्ग, सत्तेसाठी मानवी मूल्यांना पायदळी तुडविणारे राज्यकर्ते हे माणसाचे रुपांतर शेळीत करू पाहत आहेत. माणसांचा तो स्वतंत्र, निर्भय सूर कुठेही ऐकू येत नाही. ऐकू येते ते रांगेत चालणाऱ्या शेळीचे बेंबाटणे. माणसाचा तो सद्सद्विवेकाचा निर्भय सूर आपणच निर्माण केलेल्या व्यवस्थेने गिळंकृत करून टाकला आहे. थोरोने विचारले आहे, की माणसाला सद्सद्विवेकबुद्धी का असते? आपण आपल्या लोकप्रतिनिधींना निवडून देतो, ते त्यांनी आपल्या सद्सद्विवेकाचा गळा घोटावा म्हणून नव्हे. लोकशाही म्हणजे सद्सद्विवेकाचे स्वातंत्र्यच होय. ते भारतात अभावानेच आढळते. आपल्या दूषित धर्मदृष्टीमुळे ते नष्ट झाले आहे. भारतातील सर्व समस्यांच्या मुळाशी धर्म आहे. भ्रष्टाचार, बलात्कार, राष्ट्रीय समदृष्टीचा अभाव, अवैज्ञानिक अंधश्रद्ध प्रवृत्ती, जातीय व धार्मिक दंगली, जातमानसिकता हे सर्व या धर्मातूनच येते. पुरूषसत्ताक जीवनपद्धती, सरंजामशाही मूल्यांविषयी आदर, स्त्री, दुर्बल, दलितांना छळण्याची मानसिकता धर्मव्यवस्थेतूनच येते. धार्मिक राष्ट्रवाददेखील परधर्मियांविषयी द्वेष व घृणेवर उभा आहे. परधर्मियांविषयी एक प्रकारची भीती व आकस त्यामागे आहे.

## जगभरात प्रतिगामी विचारांची वावटळ

इतिहासाचे ओझे फेकून दिल्याशिवाय भारतीय मन मुक्त होणार नाही. कारण इतिहासाचे विकृतीकरण धार्मिक द्वेष पसरवण्याचे एक साधन आहे. त्यातून धार्मिक संघटना उभ्या राहतात व त्या अधिकाधिक द्वेष पसरवण्याचे काम करतात. जे. कृष्णमूर्तींनी म्हटले आहे, की संघटित धर्म वा धार्मिक संघटना कधीही सत्याची स्थापना करू शकत नाहीत. उलट त्या हिंसेला जन्म देतात. जितकी संघटना वा धर्म कट्टर, तितका तो अधिक हिंसक असतो. त्यामुळे मूळ धर्मातील सत्य, ज्ञान या संकल्पनाही बदलतात. धार्मिक विचारांनी समाजाला गुलाम करणे हे धर्माचे काम नव्हेच. ते धार्मिक संघटनांचे, मुल्ला-मौलवींचे, पुरोहितांचे काम आहे. त्यासाठी नवीन धार्मिक प्रतीक, प्रतिमा, दंतकथा (चूँही) निर्माण करणे आवश्यक असते. प्रभावशाली कल्पना माणसाला आवडतात. त्या व्यवहार्य की अव्यवहार्य, खऱ्या की खोट्या हे तपासण्याची त्यांना आवश्यकता वाटत नाही. असा काळ सध्या राजकारणात, समाजकारणात व धर्मकारणात आहे. त्याला पोस्ट ट्रुथ

(Post Truth) असे म्हणता येईल. समाजाला भावनाशील करणे व त्याच्याकडून आपल्याला हवे तसे वदवून घेणे, समाजात एक भावनिक उन्माद निर्माण करणे व लोकांकडून हवे तसे काम करवून घेणे, त्याला धार्मिक व राष्ट्रीय कर्तव्याचा दर्जा देणे आणि जो कोणी त्याला विरोध करील त्याला नेस्तनाबूद करण्यासाठी वैचारिक दहशत निर्माण करणे ही काही त्याची लक्षणे म्हणता येतील. जगभर उजव्या व प्रतिगामी विचारांची वावटळ उठली आहे. भारतही त्याला अपवाद नाही. जग अधिक संकुचित झाले आहे. सर्वसाधारण माणसाची विचारशक्ती कुंठीत करणे किंवा बधीर करणे त्यासाठी आवश्यक असते. धर्म व राष्ट्र या संकल्पनांचा बेमालूम वापर त्यासाठी करावा लागतो. भारत मुळात धार्मिक देश असल्यामुळे ते सहज शक्य होते.

माणसे जेव्हा विचार करणे थांबवतात व बलदंड सत्तांपुढे माना टाकतात, तेव्हा विनाशाची वेळ आलेली असते, तेव्हा सत्य बोलणे गुन्हा असतो आणि असत्यावर विश्वास ठेवणे श्रद्धा असते. माणसांचा आत्मविश्वास नष्ट झालेला असतो आणि ते एका तालासुरात गाऊ लागतात. त्यावेळी आत्म्याचा तो निर्भय स्वर त्यांनी राज्यकर्त्यांकडे गहाण ठेवलेला असतो. आपल्या सुरक्षिततेसाठी जेव्हा लोक आपले स्वातंत्र्य गहाण ठेवतात तेव्हा भविष्यकाळात त्यांनी ते दोन्हीही गमावलेले असते. वैचारिक, भावनिक व बौद्धिक स्वातंत्र्य असल्याशिवाय सामाजिक अभिसरण होत नाही. सामाजिक समता असल्याशिवाय राजकीय समतेला अर्थ उरत नाही.

## ...म्हणून धर्मवेडे लोक निवडून येतात

भारताला स्वातंत्र्य मिळून पंच्याहत्तर वर्षे झाली तरी सामाजिक समता, आर्थिक समता आणि वैचारिक स्वातंत्र्य सामान्य माणसांना मिळालेले नाही. त्याचे मुख्य कारण भारतीय माणूस त्याच्या सामाजिक व धार्मिक गुलामगिरीतून मुक्त झालेला नाही. हे परंपरेचे, तथाकथित संस्कृतीचे जुनाट वर्णाधिष्ठित धर्माचे ओझे त्याने फेकून दिल्याशिवाय तो लोकशाहीला पात्र होणार नाही; परंतु आपली राजकीय व्यवस्था धर्म व जातीवरच उभी असल्याने ते जनतेला अधिक जातीयवादी व धर्मवादी करण्याचा धोका असतो. आधुनिक तंत्राधिष्ठित (चशलहरपळलरश्र) लोकशाही व हुकूमशाही यात फार थोडे अंतर असते. स्वच्छ, प्रामाणिक, तत्त्वनिष्ठ माणसे या व्यवस्थेत निवडून येऊ शकत नाहीत. भारतीय लोकशाहीला भ्रष्टाचार, जातीवाद, धर्मवाद याचे ग्रहण सुरुवातीपासूनच आहे; परंतु या व्यवस्थेचे गुन्हेगारीकरणही तितक्याच वेगाने झाले आहे. आपल्या लोकप्रतिनिधींची गुन्हेगारी पार्श्वभूमी माहिती असूनही लोक त्यांना भरभरून मते देतात, ते कुठल्यातरी विचारांच्या प्रभावामुळेच. माध्यमे, वृत्तपत्रे, प्रचारतंत्राची सर्व साधने, दमनकारी शासकीय यंत्रणा, प्रचंड काळे धन यांच्या सहाय्याने राज्यकर्ते आपण कसा विचार करावा ते ठरवत असतात. त्यांचे शेवटचे शस्त्र विचार करणाऱ्या मेंदूलाच नष्ट करणे हे असते. कलबुर्गी, पानसरे, डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या मेंदूतच गोळ्या झाडण्यात आल्या. वैचारिक दहशत निर्माण करणे हाच त्यांचा हेतू होता. जनतेच्या मानसिकतेचा (दुर्बलतेचा), श्रद्धांचा, समजुतींचा सखोल अभ्यास करून सत्ताधारी (येथे सध्या बीजेपी) प्रचाराची तंत्रे



ठरवित असतात. मुख्य म्हणजे जातीचे व धर्माचे ध्रुवीकरण केले जाते. त्यामुळेच गुन्हेगारी वृत्ती-प्रवृत्तीचे लोक किंवा तालिबानी मानसिकतेचे धर्मवेडे लोक निवडून येतात. त्याची अनेक उदाहरणे आपल्याला सांगता येतील. राष्ट्र, धर्म, जात या आपल्या आभासी अस्मिता असतात. तर्कशुद्ध विचार केला तर या कालबाह्य कल्पना आहेत. खरी देशभक्ती याच्या पलिकडे असते.

## हिंदू राष्ट्रवाद गुलामीचे तत्त्वज्ञान

खरा धार्मिक माणूस हा धर्मवादी असत नाही, तो मानवतावादी असतो. भारतात जन्मला तो 'हिंदू' अशी व्याख्या करणारे लोक स्वतः ला आणि देशालाही फसवीत असतात. धर्माचा राजकीय सत्तेसाठी फायदा करून घेणे हा त्यांचा हेतू असतो. हिंदू धर्मात हजारो जाती आहेत. त्यांचा सांस्कृतिक, सामाजिकदृष्ट्या परस्परांशी काहीही संबंध नसतो. कांचा इलाहै यांनी आपल्या 'व्हाय आय ॲम नॉट हिंदू' या पुस्तकात त्याचे सखोल विश्लेषण केले आहे. येथे उत्पादक म्हणून ज्या सर्व जाती आहेत, त्यांना शूद्र म्हटले आहे आणि अनुत्पादक आळशी वर्गाला उच्चवर्णीय वा ब्राह्मण म्हटलेले आहे. या शूद्र जाती राजकारणाच्या सोयीसाठी त्या बहुसंख्य असल्यामुळे हिंदू म्हणून त्यांना त्या हव्या आहेत. सत्तेच्या पालखीचे भारवाही हमाल म्हणून या शूद्रातिशूद्र जाती त्यांना हव्या असतात. त्यामुळे उच्चवर्णीयांच्या पकडीतून या शूद्र जाती अद्यापही मुक्त झालेल्या नाहीत. जातीय व धार्मिक दंगलीत याच जाती मरतात किंवा मारतात. बाबरी मशिद पाडण्यात याच जाती आघाडीवर होत्या; परंतु जेव्हा राममंदिराचा ट्रस्ट स्थापन झाला तेव्हा यापैकी एकही जात या ट्रस्टमध्ये नाही. तरीदेखील ते कडवे हिंदू आहेत ते मानसिक गुलामगिरीमुळेच. परधर्मियांची भीती दाखवून व त्यांच्याविषयी पराकोटीचा द्वेष मनात भरवून या बहुसंख्य जाती आपल्या राजकीय हेतूसाठी वापरत असतात. हिंदू राष्ट्रवाद अशा तऱ्हेने एक गुलामीचे तत्त्वज्ञान आहे. त्यात कुठच्याही प्रकारची देशभक्ती नाही, तर सामाजिक, सांस्कृतिक गुलामगिरी आहे. त्यामध्ये दलितांवर, भटक्या विमुक्तांवर, स्त्रियांवर अत्याचार करणेही वैध किंवा धर्मसंमत ठरते. आपण सवर्ण आहोत या आभासी मानसिकतेत राहून हेच लोक दलितांवर, दुर्बलांवर अत्याचार करीत असतात. भारतातील या सामाजिक, सांस्कृतिक व धार्मिक कलहाची कारणे खूप खोलवर आहेत. त्या कलहाचा फायदा घेऊनच येथील उच्चवर्णीयांनी आपली

सत्ता टिकवली आणि वाढवली आहे.

## दलितांची आर्थिक, सामाजिक नाकेबंदी

भारताला स्वातंत्र्य मिळाले; परंतु देशातील सामान्य, अतिसामान्य माणसाला खरोखरच मिळाले का, हा प्रश्न आजही विचारता येतो. स्वातंत्र्य कुण्या गाढवीचे नाव आहे, असे पन्नास वर्षांपूर्वी कवी नामदेव ढसाळांनी आपल्या कवितेतून विचारले होते. रोज वर्तमानपत्रे वाचताना हा प्रश्न मनात वारंवार येतो. रोज कुठेतरी दलित महिलांवर (तशा सर्वच मागास जातींच्या) अत्याचार होतात, दलितांवर हल्ले होतात, त्यांनी पोलिस केस केली तर बहिष्कार टाकला जातो, धमकी मिळाल्यामुळे गाव सोडून पळावे लागते. पोलिस यंत्रणा बहुसंख्याक जातीच्या हातातील खेळणे बनून राहतात. अत्याचाऱ्यांच्याच बाजूने त्यांच्या जाती उभ्या राहतात. त्या साधनविहीन दलितांची आर्थिक, सामाजिक नाकेबंदी करतात. हे चित्र बदलले नाही, ते पुढे बदलेल असेही वाटत नाही. भारत आनंदी देशांच्या यादीत तळाशी आहे. याची कारणे निव्वळ आर्थिक नाहीत तर ती सामाजिक, धार्मिक व सांस्कृतिक आहेत.

भारत हा तसा आध्यात्मिक देश आहे; परंतु नैतिकदृष्ट्या तो सर्वात भ्रष्ट देशही आहे. महात्मा गांधींनी राजकारणाचं आध्यात्मिकीकरण (डळीर्ळीींरश्रळूरींळेप) करण्याचा प्रयत्न केला. मात्र धर्माचा वापर राजकारणासाठी करण्यास त्यांनी सतत विरोध केला होता. गांधीजी स्वतःला सनातनी हिंदू समजत. तरी देशाच्या दीर्घकालीन हितासाठी त्यांनी धर्माला राजकारणात आणले नाही. राज्याचा कुठलाही धर्म असता कामा नये. जितक्या व्यक्ती तितके धर्म असू शकतात, याची सखोल आध्यात्मिक जाणीव म्हणजेच सहिष्णुता. सत्य बहुविध आहे. त्यामुळे सर्व धर्मांनी एकमेकांचा आदर करणे आवश्यक आहे. धर्म तशी जोडणारी शक्ती आहे; परंतु राजकारणातील धर्म विध्वंसक आणि विघटनकारी असतो. राजकारणात धर्म म्हणजे देशविभाजनाची नांदीच होती. सत्तेकडे जाण्याचा तो फार सोपा मार्ग होता, याची तीव्र जाणीव महात्मा गांधी, जवाहरलाल नेहरू, सरदार पटेल व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना होती. त्यांना भारताच्या निधर्मी प्रतिमेतच देशाचे वैभव दिसत होते; परंतु एक वर्ग असा होता, (ज्यांनी गांधीजींचा खून केला) ज्यांना हिंदुत्ववादातच सत्तेचे भवितव्य दिसत होते. त्यांचे सर्व आदर्श वेदकालीन ब्राह्मणी व्यवस्थेत होते. त्यात प्रच्छन्न वर्णवर्चस्ववाद होता. त्याला राष्ट्रवादाची फोडणी देऊन राष्ट्रवादाचे एक जहाल रसायन तयार केले. त्यांचा मुख्य हेतू निधर्मी घटनेला व घटनाप्रणित समतावादी समाजरचनेला छेद देणे हाच होता. विषमता हे हिंदू समाजरचनेचे व्यवच्छेदक लक्षण आहे. त्यामुळे त्यांचा मार्ग सोपा होता. मुळात ती बहुजनविरोधी विचारधारा आहे. ती लोकप्रिय होते ती धर्मवादामुळे. परधर्मियांचा द्वेष हे तिचे बलस्थान आहे. धर्म आजही अफूची गोळी आहे.

## बाबरीच्या पतनानंतर ध्रुवीकरण

बाबरी मशिद पाडल्यानंतर देशाचे राजकीय व सामाजिक चारित्र्य वेगाने बदलले. मशिद पाडल्यानंतर एक उपजिल्हाधिकारी पेढे वाटत



माझ्याकडे आले. ते म्हणाले, 'आज हिंदूंचा विजय झाला. बाबरी मशिद पडली. आपल्याला अभिमान वाटला पाहिजे.' मी म्हणालो, 'उलट आपल्याला याची शरम वाटायला पाहिजे. देशाची मान शरमेने खाली गेली आहे. बाबरी मशिदीचा हिंदू धर्माशी काय संबंध?' तेव्हापासून धार्मिक ध्रुवीकरणाला वेग आला. त्यामध्ये उच्च मध्यमवर्ग, इतर मागास जाती तर होत्याच; परंतु शूद्रातिशूद्र जातीही होत्या. राजकारणाचे धार्मिकीकरण वेगाने झालेच. प्रशासनाचे, प्रेसचे एवढेच नव्हे, तर वकिलांचे, डॉक्टरांचेही ध्रुवीकरण झाल्याचे मी पाहिले. बहुसंख्याकवाद, धार्मिक अस्मिता, राष्ट्रवाद या कल्पना आक्रमक पद्धतीने मांडण्यात आल्या. प्रचाराचे हिटलरी तंत्र वापरण्यात आले. पुरोगामी, सेक्यूलर, बुद्धिजीवी, डावे या शब्दांची घृणा निर्माण करण्यात ते यशस्वी झाले. बुद्धिवंतांवर हल्ले होऊ लागले. ते राष्ट्रद्रोही आहेत म्हणत वैचारिक व धार्मिक झुंडी त्यांच्यावर चालून आल्या.

नित्शेने म्हटले होते, की स्त्रिया या भोगण्यासाठी आणि मूल निर्माण करण्यासाठीच असतात. त्यांना कुठलाही अधिकार नसतो. अधिकार असतो तो फक्त पुरुषाचा पुरूषोत्तम. सामान्य माणसांना कुठलेही अधिकार नसतात. त्यांनी फक्त आज्ञा पाळायच्या असतात. सामान्य माणसे म्हणजे फक्त मुंग्यांची वारूळे. त्यांना लाथेनेच उडवायचे असते. नित्शेचे आदर्श पुस्तक मनुस्मृती होते. नित्शेचा प्रभाव हिटलरच्या वंशाधारित राष्ट्रवादावर आणि हिटलरचाच प्रभाव राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर आहे. हे एक वर्तूळ आहे. बौद्धिक व वैचारिक चक्रव्यूह आहे. तो परंपरागत मानसिकता असलेल्या हिंदूंना किंवा निधर्मिवाद्यांना भेदता येईल की नाही हाच प्रश्न आहे. हिटलरचा प्रभाव गोळवलकर, हेडगेवारांवर होता. भुंजे तर मुसोलिनी, हिटलरलाही भेटून आले होते. वंशाधारित श्रेष्ठत्वावर आपल्याला हिटलरसारखी सत्ता मिळवता येईल, तशी त्यांना खात्री वाटू लागली. आता त्यांचे यश त्यांच्या दृष्टीपथात आहे. भारतीय मानसिकता लोकशाहीला अनुकूल नाही. त्यामुळे घटना

व घटनात्मक मूल्यांपेक्षा त्यांना राममंदिराचा प्रश्न महत्त्वाचा वाटतो. पार्लमेंटमधील जय श्रीरामचा घोष हे बदलत्या देशाच्या भवितव्याचे भयसूचक चिन्ह आहे. मुस्लिमांना, दलितांना मारण्यासाठी ते याच घोषणेचा वापर करतात. त्यात तरूण मंडळी बहुसंख्य असतात. तारूण्य हे क्रांतिकारी असते, हे प्रतिक्रांतीचे वाहक झाले आहे. बहुसंख्याकवादाचा प्रत्यक्ष पुरावा म्हणजे सुप्रीम कोर्टाने बाबरी मशिद प्रकरणात दिलेला निकाल होय. सत्य हे नेहमीच अल्पसंख्याक असते, हे सुप्रीम कोर्टाने लक्षात घेतले नाही. बहुसंख्यांकांचे समर्थन हा सत्याचा निकष असत नाही, असे भगवान बुद्धांनी सांगितले आहे. संत तुकाराम म्हणतात, 'सत्य असत्याशी मन केले ग्वाही! मानियेले नाही बहुमता' या बहुसंख्यांकवादाच्या दबावामुळे राजकीय पक्षात कोण अधिक हिंदू अशी स्पर्धा सुरू झाली आहे. राहुल गांधी, प्रियंका गांधी निरनिराळ्या मंदिरांना आवर्जून भेटी देतात. त्यामागे त्यांची भयग्रस्त मानसिकता दिसून येते. राजकीय पक्ष निधर्मी घटनेच्या चौकटीत काम करतात. त्यांनी व्यक्तिगत धार्मिक असण्यात गैर नाही; परंतु ज्या घटनेशी आपण प्रामाणिक असल्याची शपथ घेतो, त्या घटनेशी सामाजिक व राजकीय जीवनात निष्ठा असणे आवश्यक आहे. हा साधा विवेकही राजकीय पक्षांना राहिलेला नाही.

## बुद्धिजीवींची तडजोडवादी भूमिका.....

आपल्या आर्थिक प्रगतीचा दर शून्यावर आला आहे. सरकार आकड्यांशी खेळ करून तो वाढत आहे असे दाखवण्याचा प्रयत्न करीत आहे. तरी ती वित्तीय हातचलाखी आहे, हे जाणकार लोकांना माहीत असते. रिझर्व बँकेच्या अहवालाप्रमाणे, लोकांनी सोने गहाण ठेऊन कर्जे घेतलेली आहेत. शेतकऱ्यांच्या आत्महत्या, कुपोषण व अर्भक मृत्यूदर, बेरोजगारीने गाठलेला कळस, कोविड मिसमॅनेजमेंटमध्ये किमान दहा कोटी लोकांचा बुडालेला रोजगार याविषयीच्या खऱ्या बातम्या सरकार येऊ देत नाही. रिझर्व बँकेची स्वायतत्ता अनिश्चित आहे. सरकारने रिझर्व बँकेच्या गंगाजळीतून तीन लाख कोटी रुपये उचलले; परंतु सरकारने त्याचे काय केले, हे विचारण्याची हिंमत रिझर्व बँकेत नाही. सरकारची निर्यात वाढली ती काही तांत्रिक घटकांमुळे, आयात वाढली ती सोने खरेदीमुळे व उच्च मध्यमवर्गीयांच्या लक्झरी आयटममुळे. सेन्सेक्स उसळतो आहे तो उच्च मध्यमवर्गीयांमुळे. उच्च मध्यमवर्गीयांचे उत्पन्न वाढले आहे ते सेवा क्षेत्रांमुळे. प्रत्यक्षात उत्पन्न वाढले आहे ते फक्त अदानी, अंबानींचेच. आर्थिक विषमतेने आभाळ गाठले आहे. दुसरीकडे, दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांची संख्या पन्नास टक्क्यांपर्यंत पोहोचली आहे. फार मोठी वृत्तपत्रे, चॅनल्स देशाचे खरे चित्र जनतेपुढे ठेवतात. कारण सरकारने दिलेली माहितीच ती सादर करीत असतात. शोधपत्रकारिता तर आता अस्तित्वातच राहिली नाही. पत्रकार शेवटी कॉर्पोरेट क्षेत्रात काम करतात. भारतात आहे ती कॉर्पोरेट भांडवलशाही. तीच सध्या सरकार चालवत आहे.

श्रमिकांना संप करण्याचा मूलभूत अधिकारही आता उरलेला नाही. डिमॉनेटायझेशन, सरकारी उद्योगांचे-बँकांचे खाजगीकरण, सरकारी संपत्तीचे रोखीकरण यामुळे भविष्यात तरूणांना नोकरी मिळणे अशक्य होणार आहे. विशेषतः मागासवर्गीयांचे आरक्षण संपुष्टात येत असल्यामुळे ते रस्त्यावर येतील. त्याची जाणीव ना त्यांच्या नेत्यांना आहे, ना तरूणांना. मालकाशी किंवा सरकारशी पंगा न घेता आहे तो रोजगार मालक ठरवतील त्या अटी-शर्तीवर टिकवून ठेवणे, रस्त्यावर न येणे, सरकारवर टीका न करणे हे सध्याच्या राजकीय व सामाजिक अपरिहार्यतेचे लक्षण आहे. जेव्हा समाजात काही बदल होण्याची शक्यताच नसेल तर अशा पद्धतीची मानसिकता तयार होते. ती सर्वच क्षेत्रात दिसून येते. एक संपादक खाजगीत म्हणाले, ''या स्पर्धेत टिकून राहणे आवश्यक आहे. न्याय, नीतिमत्ता, मूल्ये यांचा विचार करण्याची ही वेळ नाही. आहे त्या परिस्थितीत टिकून राहणे हेच महत्त्वाचे. त्यातही आपला फायदा होईल ते पाहिले पाहिजे.'' बुद्धिजीवी वर्गाने अशा तऱ्हेने परिस्थितीशी तडजोड केल्याचे आपल्याला दिसून येते. स्वतंत्र व निर्भय पत्रकारिता अभावानेच दिसते. अर्थात, काही पत्रकार जीवाची बाजी लावून खऱ्या बातम्या दाखवतात; परंतु आभासी जगात रमलेल्या समाजाला, सरकारला त्याची दखल घ्यावीशी वाटत नाही.



### मानसिक गुलामगिरी

रामराज्य हे कधीही आदर्श राज्य नव्हते. स्त्रियांनी, शूद्रांनी स्वप्नातही त्याचा विचार करू नये. कारण ते अधिक प्रतिगामी, विषमतामूलक व जुलमी राज्य होते, असे रजनीशांनी म्हटले आहे. पेरियार यांनी आपल्या 'सच्ची रामायण' मध्ये ते पुराव्यानिशी मांडले आहे. राम हे पितृसत्ताक व वर्णसत्ताक व्यवस्थेचे प्रतीक आहे. राममंदिराच्या शिलान्यासासमयी मोहन भागवतांनी मनुस्मृतीचेच श्लोक उद्धृत केले; परंतु बहुसंख्याकांच्या मानसिक गुलागिरीमुळे ते कुणाच्या लक्षातही आले नाही.

## सरकार टीकेला का घाबरते?

जनतेने स्वतंत्रपणे व निर्भयपणे विचार करू नये याची खबरदारी सर्व सरकारपुरस्कृत चॅनल्स दिवसरात्र घेत असतात. सर्वत्र देव, धर्म, मंदिर याचीच चर्चा. अन्यथा पाकिस्तान, मुस्लिम, अफगाणिस्तान याच प्रश्नांवर रणकंदण माजलेले असते. उत्तर प्रदेशात हजारो लोक कोविडमुळे मेले. गंगेमध्ये हजारो प्रेते वाहिली. गंगेचे रुप शववाहिनी

गंगा असे झाले. किती लोक ऑक्सिजनअभावी तडफडून मेले; परंतु सरकारांनी उत्तर दिले असे एकही प्रकरण सबंध भारतात घडले नाही. सरकार टीकेला इतके का घाबरते? वास्तविक, लोकशाहीत देश व सरकार यात अंतर असते. सरकारे येतात आणि जातात. त्यांना कोठेही पावित्र्य नसते. सरकारवर टीका करणे व सरकार बदलणे हा जनतेचा मूलभूत अधिकार असतो. तो दडपण्यासाठी राष्ट्रद्रोहासारखे कायदे तयार करणे किंवा यूपासारख्या कायद्याखाली त्यांना जामीन न मिळू देता वर्षानुवर्षे तुरुंगात टाकणे, अशी कामे कदाचित ब्रिटिश सरकारनेही केली नसतील. पुष्कळ राजद्रोह्यांना आजारपणात जामीन मिळून सुटका होत असे. आपल्याकडे मात्र फादर स्टॅनलेसारख्या वयोवृद्ध आजारी माणसाला तो मरेपर्यंत जामीन मिळाला नाही. आपले कायदे, कायद्याची अंमलबजावणी करणारी पोलिस यंत्रणा आणि कुंपणावर बसलेले आपले न्यायाधीश यांची पूर्णतः समीक्षा करून काही मूलगामी बदल घडविण्याची आवश्यकता आहे. सरकार किंवा सत्ताधारी आपला बचाव दोन पद्धतींनी करत आहेत. १) हे हिंदू राष्ट्र आहे. तुम्हाला आमच्या धार्मिक भावनांचा, आदर्शांचा, अस्मितांचा, प्रतिष्ठांचा आदर केलाच पाहिजे, अन्यथा देश सोडून जा. २) मुळात या देशातील (मुस्लिमांसह) सर्व नागरिक हिंदूच आहेत. परधर्मियांनी आमच्याशी जुळवून घ्यावे. आमचे धार्मिक, सांस्कृतिक आदर्श आपले मानावेत, अन्यथा देश सोडून जावे.

थोडक्यात, आम्हीच ते पवित्र सर्वांआधी जन्मलेले (यहुद्यांच्या भाषेत देवांचे आवडते लोक) आणि त्यामुळे आमच्यावर टीका करणे म्हणजे निव्वळ धर्मद्रोहच नाही तर देशद्रोहही आहे. यालाच आपण धर्माधिष्ठित सत्ता म्हणतो. तिला प्रश्न विचारणे म्हणजे ईश्वरालाच प्रश्न विचारण्यासारखे असते. खून किंवा अत्याचार म्हणून नेहमीच दैवी, धार्मिक असतात. हे आपण तालिबानी किंवा इसिससारख्या धार्मिक संघटनांकडे पाहून म्हणू शकतो; परंतु भारत हा मुळातच अनेक देवाधर्मांचा प्रदेश आहे. तिथे अशी एकसूरी, एककल्ली, हिंसक मनोवृत्ती क्षम्य म्हणता येणार नाही.

## प्रशासनाच्या गुन्हेगारीकरणामुळे अत्याचार

देशात सामाजिक, आर्थिक विषमता जगातील सगळ्या देशांपेक्षा जास्त आहे. त्याची चर्चा मात्र काही मोजक्या वर्तमानपत्रांशिवाय कुठे दिसत नाही. शाळा बंद आहेत आणि राजकारणी मंदिरे उघडण्यासाठी आंदोलने करत आहेत. सरकार गंभीर असते तर देशातील गरीब, ग्रामीण, दलित, मागासवर्गीय भटक्या जातीतील करोडो मुलांचे अपरिमित नुकसान झाले नसते. इंटरनेटवरून किंवा ऑनलाईन शिक्षण देणे म्हणजे या मुलांच्या भवितव्याशी खेळण्यासारखे होते. ही मुलं कुणा मंत्र्यासंत्र्यांची, पुढाऱ्यांची, अधिकाऱ्यांची किंवा श्रीमंतांची नव्हती. त्यामुळे त्यांचा कुठलाही विचार झाला नाही. या बाबतीत 'असर'सारख्या संस्थांकडून जे अहवाल आले आहेत, ते अत्यंत दुःखदायक आहेत. दोन वर्षे शिक्षणात खंड पडल्यामुळे मुलांच्या आकलनक्षमतेवर गंभीर परिणाम झाले आहेत. अत्यंत गरीब असलेल्या या मुलांकडे सरकारचे, शाळेचे आणि समाजाचेही दुर्लक्ष झाले आहे. भविष्यात ही मुलं शिकू



शकणार नाहीत, त्यासाठी त्यांच्याकडे विशेष लक्ष द्यावे लागेल. पालक अत्यंत दरिद्री, अशिक्षित तशात जातीय व सांस्कृतिक भेदांनीही ग्रस्त आहेत. त्यांच्यातील बऱ्याच पालकांनी आपली मुले शाळेतून काढून शेतावर किंवा मजुरीवर पाठवली आहेत. भारतात बालमजुरांचा प्रश्न गंभीर आहे. त्यातील ग्रामीण भागातील मुलींच्या लैंगिक शोषणाचा प्रश्नही तीव्र आहे. लहान मुलींवर बलात्काराचे प्रमाण भीषण आहे. बलात्कारी जात बघत नाही, हे जरी खरे असले तरी ग्रामीण भागातील बलात्कार हे जातीवरूनच होतात. ही मानसिकता बदलण्याचे प्रयत्न कुठल्याही सरकारने केलेले नाहीत. सध्याच्या भाजपच्या राजवटीत हे प्रमाण जास्त वाढण्याचे मुख्य कारण, जाती व धार्मिक द्वेष वाढविण्याचे त्यांचे धोरण तसेच प्रशासनाचे राजकीयीकरण, धार्मिकीकरण आणि गुन्हेगारीकरणही याच काळात झाले.

पोलिस सगळ्यात जास्त कुणाला घाबरत असतील तर ते राजकीय, सत्ताधारी गुंडांना. पोलिसांनी उत्तर प्रदेशसारख्या राज्यात या गुंडांचे समर्थन केले आहे. हाथरससारख्या प्रकरणात ते दिसलेच. आमदार सेंगरला वाचवण्यासाठी त्यांनी आटोकाट प्रयत्न केले. अशा नीतिधैर्य गमावून बसलेल्या व गलितगात्र झालेल्या पोलिसांना विकास दुबेसारख्या गुंडाने पोलिस स्टेशनमध्ये मारले. त्याचा बदला पोलिसांनी एनकाऊंटर करून घेतला. याला प्रशासन म्हणावे की जंगलराज? त्याला मारण्याचे मुख्य कारण पोलिसांनी केलेल्या विविध अमानवी गुन्ह्यांची त्याच्याकडे असलेली माहिती. भारताला स्वातंत्र्य मिळाले ते फक्त मतदानापुरतेच. माणूस गुलाम आहे, तो या ऐतिहासिक विषमतामूलक व्यवस्थेचा. सांस्कृतिक व धार्मिक संचितांचा हा वारसा जोपर्यंत आपण नाकारत नाही, तोपर्यंत राष्ट्रीय चेतना (उेश्रश्रशलींळींश उेपीलळेीपशीी) मुक्त होणार नाही तोपर्यंत हे कायदे निव्वळ शोभेसाठीच राहतील. सामूहिक मन बदलल्याशिवाय समता, स्वातंत्र्य, सामाजिक न्याय, धर्मनिरपेक्षता या मूल्यांना काही अर्थ उरणार नाही. कुठल्याही बदलाची सुरुवात आपल्यापासूनच झाली पाहिजे. अन्यथा, ज्यामुळे भारत ओळखला जातो ती दांभिकता, तत्त्वशून्यता, श्रमिकांना व श्रमाला तुच्छ लेखणारी मानसिकता वाढतच जाईल. समता, सामाजिक न्याय या मूल्यांचा अर्थ माणसातील तर्क आणि विवेकबुद्धीचा विकास होईल तेव्हाच कळेल.

## विद्यापीठे तरूणांना धर्मांध बनवत आहेत

परंपरेने आपल्याला धर्मविषमतामूलक नीतिमूल्ये शिकवले. त्यामुळे आपण समता, स्वातंत्र्य, बंधुता, सामाजिक न्याय या मूल्यांचा व्यक्तिगत आणि सामाजिक जीवनात आग्रह धरत नाही. आपल्याला या परंपरा नाकारायलाच लागतील. त्यासाठी नवीन शिक्षणव्यवस्था

उभी करावी लागेल. शिक्षणाबाबत हेल्विट (Helvit) या ब्रिटिश शिक्षणतज्ज्ञाने म्हटले आहे, की माणूस जन्मतः अज्ञानी असतो; परंतु शिक्षणामुळे तो मूर्ख होतो. हे विधान भारतीय शिक्षणपद्धतीला अधिक लागू होईल. आपल्या शिक्षणव्यवस्थेत जुनाट सरंजामशाही मूल्यांना, जात व धर्मवादाला, तथाकथित महान सांस्कृतिक अस्मितांना अधिक महत्त्व आहे. आपली संस्कृती प्राचीन आहे. याचा अर्थ ती कालबाह्य, सडलेली, विषमतामूलक, अविवेकी, अज्ञानवादी आहे, असेच म्हणावे लागेल. संस्कृतीच्या नावानेच आपण अत्याचार करीत असतो. सर्व प्राचीन म्हणजे पवित्र नसते. नुकतेच मध्य प्रदेश सरकारने अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या अभ्यासक्रमात रामायण आणि महाभारताचा समावेश केला. उच्चशिक्षणमंत्र्यांनी त्याचा खुलासा करताना म्हटले, की त्यामुळे विद्यार्थ्यांच्या व्यक्तित्वाचा विकास होईल. त्यांना अभ्यासक्रमात भारतीय राज्यघटनेचा समावेश करावासा वाटला नाही. कारण त्यातील प्रागतिक, आधुनिक, वैज्ञानिक मूल्ये सरकारला झेपणार नाहीत. विद्यार्थ्यांना (पर्यायाने जनतेला) आपले हक्क आणि अधिकारांची किंवा नव्या युगाची जाणीव होऊ नये यासाठी सरकार आटापिटा करीत आहे. विद्यापीठे तरूणांना मूर्ख (धर्मांध, फॅसिस्ट) बनवण्याच्या मागे आहेत. ही विद्यापीठे सध्या धार्मिक राष्ट्रवादाचे, असहिष्णुतेचे धडे देण्यात मग्न आहेत. त्यांना महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पेरियार यांच्या विचारांची भीती वाटते. सरकारचे नवे शैक्षणिक धोरण ग्रामीण भागातील मुलांच्या मुळावर येणारे आहे. त्यात तंत्रशिक्षणावर भर असला तरी गरीब मुलांना उच्चशिक्षण घेता येणार नाही, अशी व्यवस्था केली आहे. बाराबलुतेदारांनी गावातल्या त्यांच्या जुन्याच व्यवसायांचे शिक्षण घ्यावे; परंतु अत्याधुनिक उच्च शिक्षणासाठी त्यांना कुठल्याच सवलती ठेवलेल्या नाहीत. त्यामागील मानसिकता महाभारतातील द्रोणाचार्यांची किंवा शंभूकाचा वध करणाऱ्या रामाचीच आहे; परंतु त्यासाठी ते शस्त्र नव्हे तर, बौद्धिक, जातीय कोंडी करून ते त्यांना मारतील.

रामराज्य हे कधीही आदर्श राज्य नव्हते. स्त्रियांनी, शूद्रांनी स्वप्नातही त्याचा विचार करू नये. कारण ते अधिक प्रतिगामी, विषमतामूलक व जुलमी राज्य होते, असे रजनीशांनी म्हटले आहे. पेरियार यांनी आपल्या 'सच्ची रामायण' मध्ये ते पुराव्यानिशी मांडले आहे. राम हे पितृसत्ताक व वर्णसत्ताक व्यवस्थेचे प्रतीक आहे. राममंदिराच्या शिलान्यासासमयी मोहन भागवतांनी मनुस्मृतीचेच श्लोक उद्धृत केले; परंतु बहुसंख्याकांच्या मानसिक गुलागिरीमुळे ते कुणाच्या लक्षातही आले नाही. आंध्र, कर्नाटक, मध्य प्रदेशातील बीजेपी सरकारांनी ब्राह्मणांसाठी विशेष संस्था काढल्या, महामंडळे काढली, आरक्षणासकट कोट्यवधी रुपयांच्या सर्व सवलती दिल्या. ही घटनेची, सेक्यूलर जीवनपद्धतीची व सामाजिक न्यायसंतुलनाची क्रूर चेष्टा आहे, असे इंडियन एक्सप्रेसमध्ये (८ सप्टेंबर) प्रसिद्ध विचारवंत प्रताप भानू मेहता यांनी खेदाने लिहिले आहे. नव्या ब्राह्मणशाहीचा उदय झाला आहे, असे त्यांनी म्हटले आहे. भारताच्या मुख्य प्रश्नांकडे जशी गरिबी, बेरोजगारी, कुपोषण, बालमृत्यू, शिक्षण, आरोग्य, खाजगीकरण त्यातून मूठभरांच्या हातात आलेली देशाची ६० टक्के संपत्ती इत्यादींकडे पूर्ण दुर्लक्ष करण्यात आले आहे.




## मूल्यांचा आग्रह का नाही?

परंपरेने आपल्याला धर्मविषमतामूलक नीतिमूल्ये शिकवले. त्यामुळे आपण समता, स्वातंत्र्य, बंधुता, सामाजिक न्याय या मूल्यांचा व्यक्तिगत आणि सामाजिक जीवनात आग्रह धरत नाही. आपल्याला या परंपरा नाकारायलाच लागतील. त्यासाठी नवीन शिक्षणव्यवस्था उभी करावी लागेल.

## धर्माच्या नावे राजकीय व्यवस्थेचे गुन्हेगारीकरण

राजकीय व्यवस्थेचे गुन्हेगारीकरण धर्म व संस्कृतीच्या नावाने झाले आहे. मॉब लिंचिंगमध्ये अनेक मुस्लिम व अल्पसंख्य मारले गेले; परंतु एकावरही कारवाई झालेली नाही. उलट पक्षाने त्यांना उच्च पदे दिली. धर्माच्या नावाने बलात्कार करणारे तथाकथित हिंदू संत-महात्मे क्वचितच तुरुंगात जातात. लव्ह जिहादसारखे कायदे करणारी राज्य सरकारे ना घटना जाणत, ना नीतिमत्ता. दिल्ली, हाथरस, उन्नाव, राजस्थान, गोरखपूर, चेन्नई येथे आणि इतरत्रही लहान मुलींवर बलात्कार झाले. दर सोळा मिनिटांनी भारतात एक बलात्कार होतो. मुंबईसारख्या शहरातही दिवसाला दोन बलात्कार होतात. ही विकृत मानसिकता कोठून येते याचा गांभीर्याने विचार ना सरकार करतं, ना समाज. प्रशासकीय व्यवस्थेचे पूर्णतः राजकीयीकरण होत आहे. तसेच धार्मिक ध्रुवीकरणही होत आहे. जनतेने याचा गांभीर्याने विचार का करू नये? सरकार सत्तेसाठी कोणत्याही थराला जाऊ शकते; परंतु ते जनतेच्या हिताचे आहे का ते जनतेनेच ठरवावे लागेल. धर्म कधीही रानटी नसतात, त्यांचे अनुयायी रानटी असतात. आपल्याला कोणता धर्म हवा आहे? महात्मा गांधींचा, विवेकानंदांचा, हिंदू संतांचा की गोळवलकर, हेडगेवार, सावरकर, गोडसेंचा या प्रश्नांच्या समाधानकारक उत्तरावरच या देशाचे भवितव्य अवलंबून आहे. मूळ हिंदू (सिंधू) संस्कृती मात्र सहिष्णू, समन्वयवादी, सर्वसमावेशक होती व आहे. हे सर्व संबंधितांना लक्षात घ्यावेच लागेल, एवढे मात्र निश्चित. ●●●

**(लेखक निवृत्त सनदी अधिकारी आहेत)**

# अस्वस्थ होतेय देशाचे संविधान




**भाजप जेव्हा सत्तेवर येते, तेव्हा राज्यघटनेत मोडतोड करण्याचा प्रयत्न करते. १९९८ मध्ये वाजपेयी सरकार सत्तेत आल्यानंतर संविधानाचे पुनर्विलोकन पुढे आले.**



**प्रा. भगवान माने**

संविधान निर्मात्यांनी विविध देशांच्या संविधानाच्या अभ्यासाअंती भारताचे संविधान निर्माण केले. संविधानात न्याय, समता, कायद्याचे अधिराज्य, सत्तेचा समतोल आणि नियंत्रण, संसदेचे सार्वभौमत्व या लोकशाही तत्त्वांचा अंतर्भाव केला आहे. भारतीय संसदीय शासनपद्धतीमुळे सभागृहातील बहुसंख्य सभासदांचा विश्वास गमविल्याक्षणी राजीनामा द्यावा लागतो. संसदेचे कार्यकारी मंडळ संसदेतील बहुमतावर अधिक अवलंबून असते. त्यामुळे अमेरिकन अध्यक्षीय पद्धतीपेक्षा भारतीय संसदीय पद्धतीत जबाबदारीच्या तत्त्वाला अधिक प्राधान्य दिले आहे. संविधान दुरूस्तीनुसार संविधानाचे ताठर आणि लवचिक संविधान असे वर्गीकरण करता येते. वास्तविक, संविधानातील ताठरपणा आणि कायद्याची ताठरता कमी करण्यासाठी भारतीय संविधानाच्या मूळ ढाच्यात बदल न करता संविधानदुरूस्तीचा अधिकार आहे.



**तब्बल १० वर्षे पंतप्रधान कार्यालयात धूळखात पडून असलेल्या मंडल आयोगाच्या शिफारशींची अंमलबजावणी पंतप्रधान विश्वनाथ प्रताप सिंग यांनी १९९० साली केली.**

संविधानदुरूस्ती करण्यासाठी संविधानात अनुच्छेदांची दोन भागात विभागणी केली आहे. पहिल्या भागात (अ) केंद्र आणि राज्यांमध्ये कायदे करण्याच्या अधिकारांची विभागणी (ब) संसदेमध्ये राज्यांना दिलेले प्रतिनिधित्व आणि (क) न्यायालयाचे अधिकार यांच्याशी संबंधित अनुच्छेद आहेत. इतर सर्व अनुच्छेदांचा समावेश दुसऱ्या भागात केला आहे. दुसऱ्या भागातील अनुच्छेदांनी संविधानाचा बराच भाग व्यापलेला असून संसदेला दोन प्रकारच्या बहुमताने त्यात दुरूस्ती करता येईल. प्रत्येक सभागृहाच्या उपस्थित असलेल्या आणि मतदानात भाग घेतलेल्या सभासदांच्या दोन तृतीयांश बहुमताने आणि प्रत्येक सभागृहातील एकूण सदस्यसंख्येच्या बहुमताने या अनुच्छेदातील दुरूस्तीसाठी राज्यांच्या अनुसंमतीची आवश्यकता नाही. केवळ पहिल्या भागातील कलमांच्या दुरूस्तीसाठी मात्र अधिकची सुरक्षा म्हणून राज्यांच्या अनुसंमतीच्या अटींची तरतूद केली आहे. त्यामुळे ते लवचिक संघराज्य आहे. इतर संघराज्यांच्या तुलनेत भारतीय संघराज्याचे ठळक वैशिष्ट्य म्हणजे, 'संघराज्य' हे स्वतंत्र कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ आणि न्यायमंडळ यांच्या अधिकारांचे विभाजन झाल्याने प्रत्येक सत्ताकेंद्रात कायदा प्रशासन आणि न्यायालयीन संरक्षणात भिन्नता निर्माण होते.

## संसद आणि सर्वोच्च न्यायालय

भारतीय संविधानातील मूलभूत अधिकार हा जनतेच्या हाडामासांचा भाग आहे. भारतीय संसदेने बहुमताच्या जोरावर मूलभूत अधिकारांत बदल करून भारतीय जनता आणि संविधानाला अस्वस्थ केले आहे. मूलभूत अधिकारात बदल करण्याचा अधिकार संसदेला असावा की नसावा यासंबंधी वादग्रस्त चर्चा आणि निर्णय झालेले आहेत. शंकरप्रसाद विरूद्ध भारत सरकार (१९५१), सज्जनसिंग विरूद्ध राजस्थान सरकार (१९६५) या खटल्यांत सर्वोच्च न्यायालयाने मूलभूत हक्कांत संसदेने केलेल्या दुरूस्त्या कायदेशीर आहेत, असा निर्णय दिला; परंतु गोलकनाथ विरूद्ध पंजाब राज्य (१९६७) या खटल्यात सर्वोच्च न्यायालयाने मूलभूत हक्कात कोणताही बदल करण्याचा संसदेला अधिकार नाही, असा निर्णय दिला. या काळात काँग्रेसची केंद्रात सत्ता होती. केंद्र आणि घटक राज्यांत तणाव

आणि संघर्ष सुरू होता. पुढील काळात सामाजिक आणि आर्थिक न्यायाच्या प्रस्थापनेसाठी अडचणी निर्माण होऊ लागल्या. पुढील काळात बँकांचे राष्ट्रीयीकरण (१९६९), संस्थानिकांची तनखेबंदी याबाबतीत कायदेशीर अडचणी येऊ लागल्यामुळे २४ वी आणि २५ वी संविधानदुरूस्ती १९७१ मध्ये करण्यात आली. त्यामुळे मूलभूत अधिकारांत बदल करण्याचा अधिकार संसदेला पुन्हा प्राप्त झाला; परंतु केशवानंद भारती खटल्याचा (१९७३) निर्णय देताना सर्वोच्च न्यायालयाने असे मत नोंदविले, की संविधानाच्या ३६८ व्या कलमानुसार संसदेला मूलभूत अधिकाराच्या स्वरूपात बदल करण्याचा किंवा ती नाहीशी करण्याचा अधिकार नाही. १९७६ साली संसदेने केलेल्या ४२ व्या संविधानदुरूस्तीने केशवानंद भारती खटल्यातील सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय रद्द ठरविण्यात आला आणि संसदेला संविधानदुरूस्ती करण्याचा संपूर्ण आणि अमर्याद अधिकार देण्यात आला. मूलभूत अधिकारांच्या संविधानदुरूस्तीच्या अनुषंगाने प्रख्यात कायदेपंडित नानी पालखीवाला असे म्हणतात, की ''संविधानाच्या शिल्पकारांनी मूलभूत हक्कांचे महत्त्व ओळखून त्याआधारे संगमरवरी शिल्प उभारले होते; परंतु ४२ व्या संविधानदुरूस्तीने त्या संगमरवरी शिल्पाचे रुपांतर तांबड्या विटांच्या शिल्पात केलेले आहे.''

संविधानाची अस्वस्थता किंवा जनतेच्या मनात प्रक्षोभ निर्माण करण्याचे कार्य संसदेतील संविधानदुरूस्तीने केले जाते. तसेच जनहिताचे कल्याणकारी निर्णय घेतले जातात. यापूर्वी काँग्रेस पक्षाला संसदेत अनेकदा बहुमत प्राप्त झाले होते. आज भारतीय जनता पक्षालाही पाशवी बहुमत मिळाल्याने संविधानदुरूस्तीवर अधिक भर दिला जात आहे. जनतेच्या भावभावनाविरोधी संविधानदुरूस्ती केल्याने जनतेचा असंतोष वाढतो आणि समाजमन अस्वस्थ होते. या अनुषंगाने २६ नोव्हेंबर १९४९ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भविष्यातील राज्यकर्त्यांसमोर उद्बोधक भाषण केले होते. त्यामध्ये अमेरिकन मुत्सद्दी थॉमस जेफरसनचे विचार मांडताना ते म्हणतात, ''प्रत्येक पिढी बहुसंख्याकांच्या इच्छेप्रमाणे स्वतःला बांधून घेण्याचा अधिकार असलेल्या एका स्वतंत्र राष्ट्राप्रमाणे आहे. येणाऱ्या पिढीला कोणी बंदिस्त करू शकत नाही, जसे दुसऱ्या राष्ट्रातील लोकांना करता येत नाही.'' या चर्चेवेळी अलादी कृष्णास्वामी अय्यर आणि टी.टी. कृष्णम्माचारी यांनी संविधानाच्या गुणवत्तेचे समर्थन केले. त्यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर संविधानाच्या अंमलबजावणीसंबंधी म्हणतात, ''संविधान कितीही चांगले असो, ते राबविण्याची जबाबदारी ज्यांच्यावर आहे, ते जर अप्रामाणिक असतील तर ते वाईट ठरल्याशिवाय राहणार नाही. तसेच संविधान कितीही वाईट असो ते राबविण्याची जबाबदारी ज्यांच्यावर आहे, ते जर प्रामाणिक असतील तर ते संविधान चांगले ठरल्याशिवाय राहणार नाही. संविधानाचा अंमल हा संपूर्णतः संविधानाच्या स्वरूपावर अवलंबून नसतो.'' संविधान केवळ राज्याचे काही विभाग जसे कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ आणि न्यायमंडळ निर्माण करून देते. राज्याच्या या विभागांचे कार्य, लोक आणि लोकांनी स्वतःच्या आकांक्षा आणि राजकारणासाठी साधन म्हणून निर्माण केलेले राजकीय पक्ष कसे वागतील, हे कोण सांगू शकेल? आपल्या उद्दिष्टपूर्तीसाठी ते असंविधानिक मार्गाचा अवलंब करतील तर संविधान कितीही



## संविधानास वेठीस धरण्याचा प्रयत्न

भारतीय संविधानात दुरूस्ती करून केंद्रातील बहुमतवाल्या राजकीय पक्षांनी संविधानाची सतत छेडछाड केली आहे. केंद्रातील सत्ताधारी भाजपच्या राष्ट्रीय अधिवेशनात संविधानाची होळी केली होती. अरूण शौरीसारख्या भाडोत्री लेखकाने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांवर शिंतोडे उडविले होते. संविधान पुनर्विलोकनाचा प्रयत्नही अयशस्वी झाला. संविधानात्मक संस्थांना धक्का लावण्याचा प्रयत्नही संसदेकडून केला जातो. बहुमताच्या जोरावर संविधानास वेठीस धरण्याचा प्रयत्न केला जातो. या अनुषंगाने अमेरिकन विचारवंत जेफरसनचे विचार अधिक उद्बोधक वाटतात. ''देशहितासाठी स्थापन करण्यात आलेल्या संस्थांना स्पर्श करता येणार नाही किंवा त्यात फेरबदल करता येणार नाही, त्यांच्या उद्दिष्टपूर्तीसाठी त्यांना उत्तरदायी धरता येणार नाही. कारण लोकांच्या हिताची जबाबदारी विश्वस्तपणे त्यांच्यावर सोपविण्यात आली आहे. त्यासाठी त्यांना काही अधिकार बहाल करण्यात आले आहेत.'' यावरून असे स्पष्ट होते, की संविधानातील दुरूस्त्या कल्याणकारी राज्याच्या ध्येयपूर्तीसाठी झाल्या पाहिजेत, त्यामध्ये राजकीय स्वार्थ येता कामा नये.

चांगले असो, ते अयशस्वी होईल, हे सांगण्यासाठी कोणत्याही भविष्यवेत्याची गरज नाही. म्हणून भारतीय लोक आणि त्यांचे राजकीय पक्ष कसे वागतील हे जाणून घेतल्याशिवाय संविधानाबाबत कोणताही निर्णय घेणे निरर्थक ठरेल!


## संविधानाची वाढती अस्वस्थता

**१९७५ ची आणीबाणी :** १९५२ च्या निवडणुकीपासून काँग्रेस एक राष्ट्रीय पक्ष म्हणून केंद्रात सत्तेत बराच काळ राहिला होता. १९७१ च्या लोकसभा निवडणुकीत श्रीमती इंदिरा गांधींनी सरकारी यंत्रणेचा गैरवापर करून निवडणूक जिंकली म्हणून अलाहाबाद उच्च न्यायालयात खटला दाखल करण्यात आला होता. खटल्याचा निकाल लागून इंदिरा गांधींना सहा वर्षांची तुरूंगवासाची शिक्षा झाली. पुढे १९७५ च्या लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीत केंद्रात काँग्रेसला बहुमत प्राप्त होऊन इंदिरा गांधी पंतप्रधानपदी विराजमान झाल्या. त्यानंतर विरोधी पक्षांनी देशात अशांतता निर्माण केली. पोलिस आणि सैनिकांना भडकवले. त्यावर सरकारने कठोर भूमिका घेतली. देशातील लोकसंख्या नियंत्रणासाठी कठोर उपाय करणे, देशात स्थैर्य निर्माण करणे आणि देशात शांतता व सुरक्षितता प्रस्थापित करण्यासाठी पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांनी २६ जून १९७५ रोजी आणीबाणी घोषित केली. भारतीय संविधानात १९१९-१९३३ च्या वायमार संविधानातून आणीबाणीचे तत्त्व घेतले आहे. संविधानाच्या कलम ३५२ ते ३६८ मध्ये आणीबाणीची तरतूद आहे. आणीबाणीत देशातील विरोधी पक्षाच्या नेत्यांना तुरूंगात डांबण्यात आले. वृत्तपत्रे, आकाशवाणी, दूरदर्शन यांच्यावर सेन्सॉरशिप लादली. वृत्तपत्रांच्या जाहिराती आणि वीजपुरवठा तोडला. सर्वोच्च न्यायालयाचे ए.एन.रे हे ज्युनिअर असताना त्यांची प्रमुख न्यायाधीश म्हणून नेमणूक केली. तामिळनाडूचे मुख्यमंत्री करूणानिधी आणि त्यांचा मुलगा स्टॅलिन यांना तुरूंगात डांबले, सुब्रमण्यम स्वामी अमेरिकेत पळून गेले, जयप्रकाश नारायण, जॉर्ज फर्नांडिस आदी समाजवादी आणि जनता पक्षाच्या नेत्यांनाही अटक केली होती. नरेंद्र मोदींनी अटक होऊ नये म्हणून शिखांचा पेहराव परिधान केला होता. आणीबाणीच्या काळातील आंदोलनात ज्येष्ठ समाजवादी नेते जयप्रकाश नारायण यांनी एका वर्षात नवभारत निर्माण करण्याची घोषणा केली. लालूप्रसाद यादव, नितीशकुमार, जॉर्ज फर्नांडिस, गुजरातचे तत्कालीन विद्यार्थी नेते नरेंद्र मोदी आणि देशातील तरूण, सुशिक्षित वर्गाने जयप्रकाश नारायण यांच्या आंदोलनास पाठिंबा दिला होता. ३१ मार्च १९७७ पर्यंत आणीबाणी कायम होती. आणीबाणीच्या काळात नागरिकांच्या मूलभूत हक्कांवर गदा आली होती. याचा परिणाम म्हणजे १९७७ च्या लोकसभा निवडणुकीत श्रीमती इंदिरा गांधींचा झालेला पराभव. मार्च १९७७ मध्ये आणीबाणी हटविण्यात आली. काँग्रेसचा दारूण पराभव होऊन जनता पक्षाला स्पष्ट बहुमत मिळाल्याने मोरारजी देसाई पंतप्रधान झाले. पंतप्रधान मोरारजी देसाई यांनी आणीबाणीच्या चौकशीसाठी शाह कमिशन नेमले. जनता सरकारने आणीबाणीच्या कायद्यावर नियंत्रण आणण्यासाठी ४४ वी संविधानदुरूस्ती केली;



### संविधानाचे पुनर्विलोकन

१९९८ मध्ये भारतीय जनता पक्षाचे सरकार केंद्रात सत्तेवर आल्याबरोबर तत्कालीन पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी सरकारने २२ फेब्रुवारी २००० रोजी संविधानाची समीक्षा करण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायाधीश वेंकटचलय्या यांच्या अध्यक्षतेखाली संविधान पुनर्विलोकन समिती नेमली होती. समितीने आपला अहवाल ३१ मार्च २००२ रोजी सरकारला दोन खंडांमध्ये सादर केला. त्यामध्ये समितीने संविधानाच्या ११ भागांत पुनर्रचना करण्याची सूचना केली होती. वास्तविक, संविधान पुनर्विलोकन म्हणजे काय? संविधानाचे पुनर्विलोकन कशासाठी? संविधानातील कोणत्या तरतुदींचा पुनर्विचार करायचा आहे; याविषयी सविस्तर चर्चा झाली नाही. त्यामुळे भाजपचा हेतू संशयास्पद वाटत होता. त्यामुळे देशातील संविधानप्रेमी जनतेने मोठा विरोध केला. त्यामुळे भाजपचा संविधान पुनर्विलोकनाचा प्रयत्न फसला; परंतु सत्तेत आल्यानंतर आजही कालबाह्य कायदे रद्द करीत असताना राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि भाजप सरकारच्या अजेंड्यावर संविधानातील विविध कलमांची बहुमताच्या जोरावर मोडतोड सुरू आहे; परंतु विरोधी पक्ष प्रभावी नसल्याने जनतेमध्ये याविरूद्ध जनप्रक्षोभ दिसून येत नाही.



**पहिल्या मागासवर्गीय आयोगाचे अध्यक्ष काकासाहेब कालेलकर यांनी १९५५ साली अहवाल केंद्राला सादर केला.**

परंतु सर्वोच्च न्यायालयातील १९८० च्या मिनर्व्हा मिल्स खटल्यानुसार आणीबाणी ही न्यायालयीन पुनर्विलोकनामध्ये (ज्युडीशिअल रिव्ह्यू) आली.

## पहिला मागासवर्गीय आयोग (१९५३)

अनुसूचित जाती-जमातीच्या लोकांना सवलती दिल्या आहेत, त्याप्रमाणे मागासलेल्या समाजालाही आर्थिक न्याय मिळावा, अशी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची इच्छा होती. संविधान सभेचे सदस्य चंदापुरी यांनी मागास समाजाच्या सवलतीसाठी आग्रही भूमिका घेतली होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी १९३१ च्या जनगणनेनुसार मागासवर्गीयांना सवलत देण्याची सभागृहात मागणी केली होती; परंतु तत्कालीन ब्राह्मण्यवादी काँग्रेसने आणि पंतप्रधान पंडित नेहरूंनी जातीय अराजकता निर्माण होईल म्हणून मागासवर्गीयांच्या सवलतीवर कोणतीही प्रतिक्रिया दिली नाही. परिणामी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या केंद्रीय मंत्रिपदाचा राजीनामा दिला.

भारतीय संविधानाच्या कलम ३४० मध्ये सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या समाजाच्या सामाजिक आणि शैक्षणिक प्रगतीसाठी राष्ट्रपती आयोगाची नेमणूक करतात, अशी तरतूद आहे. पंडित जवाहरलाल नेहरूंनी १९५३ मध्ये काकासाहेब कालेलकर आयोग नेमला. आयोगाने ३० मार्च १९५५ रोजी ३,६०० हून अधिक मागासलेल्या जातींचा अहवाल सरकारला सादर केला.

## मंडल आयोग (१९७९)

पहिल्या मागासवर्गीय आयोगापेक्षा दुसरा मागासवर्गीय आयोग किंवा मंडल आयोगाने देशात जातीय दंगली आणि जातीय समीकरणे गतिमान केली. तत्कालीन पंतप्रधान मोरारजी देसाई यांनी बिहारचे माजी मुख्यमंत्री आणि ज्येष्ठ काँग्रेस नेते बिंदेश्वरी प्रसाद मंडल यांच्या अध्यक्षतेखाली दुसरा मागासवर्गीय आयोग १९७८ मध्ये स्थापन केला. आयोगाने १९८० मध्ये आपला अहवाल सरकारला सादर केला. त्यानंतर चरणसिंग, श्रीमती इंदिरा गांधी, राजीव गांधी यांची सरकारं आली आणि गेली. मंडल आयोगाचा अहवाल मात्र तब्बल १० वर्षे पंतप्रधान कार्यालयातच धूळखात पडून होता. २ डिसेंबर

## १०२ वी संविधानदुरूस्ती

भारतीय संविधान सभेत इतर मागासलेल्या जातींना (ओबीसी) आरक्षण देण्यासंदर्भात चर्चा झाली होती; परंतु त्यासाठी ओबीसी समाजाला पंच्याहत्तर वर्षे वाट पहावी लागली. केंद्रातील सत्ताधारी भाजपासह विरोधी पक्षही संसदेत शांत बसलेला होता. भाजपच्या ३८५ सदस्यांनी पाठिंबा देऊन विधेयक मंजूर केले आणि ओबीसी व्होट बँक सुरक्षित केली. इंद्रा सहानी विरूद्ध भारत सरकार (१९७२) या खटल्यात सर्वोच्च न्यायालयाने भारतीय संविधानाच्या मूळ ढाच्यानुसार ५० टक्क्यांपेक्षा अधिक आरक्षण देता येणार नाही. तसेच क्रिमिलेयरला आरक्षण देता येत नाही, असे निकालात म्हटले होते. त्यासाठी सरकारने राजनंदन समिती नेमली होती. सरकारने ओबीसींसाठी १९९३ मध्ये 'नॅशनल कमिशन फॉर अदर बॅकवर्ड क्लास' (NCBC) स्थापन केले आणि १०२ व्या संविधानदुरूस्तीने कलम ३३८ (ब) नुसार एनसीबीसीची संविधानात तरतूद केली. त्यानुसार एनसीबीसीची संविधानात्मक संरचना, कार्ये, कर्तव्य आणि कार्यपद्धती स्पष्ट केली आहे. तसेच कलम ३४२ अ नुसार ओबीसीमध्ये केंद्रात कोणत्या जाती असतील, त्यांचे प्रकटीकरण राष्ट्रपती काढणार असून ओबीसीमध्ये कोणत्या जातीचा समावेश असेल आणि कोणत्या जातीचा नसेल हे ठरविण्याचा अधिकार राष्ट्रपतींचा असेल. राज्यपालांच्या सल्ल्यानुसार ३ राज्यांतील ओबीसींच्या जातीची राष्ट्रपती घोषणा करणार अशी तरतूद आहे. त्यामुळे घटक राज्यातील जनता आणि राज्यकर्त्यांमध्ये संभ्रम निर्माण झाला. तत्कालीन सामाजिक न्यायमंत्री गेहलोत म्हणाले होते, की हे विधेयक संघराज्याच्या विरोधी असल्याचा सूर विरोधी पक्षांनी लावला होता; परंतु त्याचे रुपांतर 'मिले सूर मेरा तुम्हारा' मध्ये झाले.



**आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना सवलत देण्याची शिफारस बी.पी. मंडल यांच्या नेतृत्वाखालील आयोगाने केली होती.**

१९८९ रोजी पंतप्रधानपदी आलेल्या व्ही.पी. सिंगांनी १९९० मध्ये मंडल आयोग लागू केला. आयोगाने आपल्या अहवालात सर्वसाधारण समाजाला १० टक्के आरक्षण तसेच आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना सवलत देण्याची शिफारस केली होती. त्यामुळे मंडल आयोगामुळे वरिष्ठ जातींना आरक्षणाचा लाभ मिळणार नाही म्हणून जातीय दंगली उसळल्या. दिल्ली, उत्तर प्रदेश, जवाहरलाल नेहरू विद्यापीठ, बनारस विद्यापीठ तसेच पाटण्यामधील विद्यार्थ्यांनी स्वतःला पेटवून घेतले, रस्ते रक्तांनी माखले होते. सर्वत्र हिंसाचाराचा आगडोंब उसळला होता. विद्यार्थी, तरूणांवर गोळीबार करण्यात आला. याचवेळी लालूप्रसाद यादव, रामविलास पासवान, मायावती, शरद पवार यांनी मंडल आयोगाला पाठिंबा देऊन इतर मागासवर्गीय समाजाचा जनाधार वाढविला आणि त्याचा लाभ किमान तीन दशके झाला; परंतु भारतीय जनता पक्षाची दोन्ही बाजूंनी कोंडी झाली. ओबीसींना पाठिंबा दिला तर पारंपारिक वरिष्ठ हिंदूंची व्होटबँक नाराज होईल म्हणून ओबीसींचे लक्ष विचलित करण्यासाठी लालकृष्ण अडवाणींच्या नेतृत्वाखाली सोमनाथ ते अयोध्या राममंदिर रथयात्रा काढली. या यात्रेचे संघटन सध्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले होते. देशात रथयात्रेने जनाधार वाढला होता. सरकारपुढे रथयात्रा रोखण्याचे मोठे आव्हान होते. त्यावेळी पंतप्रधान व्ही.पी. सिंग म्हणाले होते, की लव आणि कुश रथयात्रा रोखतील. यामधील लव म्हणजे लालूप्रसाद यादव आणि कुश म्हणजे मुलायमसिंग. यापैकी बिहारचे मुख्यमंत्री लालूप्रसाद यादव यांनी बिहारच्या समस्तीपूर येथे २३ ऑक्टोबर १९९० रोजी रथयात्रा रोखली आणि लालकृष्ण अडवाणी यांना अटक केली. त्यामुळे भाजपने आपल्या ८५ लोकसभा सदस्यांचा पाठिंबा काढून घेतला आणि व्ही.पी. सिंग सरकार कोसळले. त्यानंतर चंद्रशेखर यांनी १० नोव्हेंबर १९९० ते २१ जून १९९१ या अल्पावधीत पंतप्रधानपदाचा कार्यभार सांभाळला. त्यानंतर काँग्रेसचे पी.व्ही. नरसिंहराव हे २१ जून १९९१ ते १६ मे १९९६ पर्यंत पंतप्रधान पदावर होते. त्यांनी खुल्या वर्गातील प्रवर्गासाठी १० टक्के आर्थिक आरक्षण जाहीर केले. १९९२ मध्ये इंद्रा सहानी विरूद्ध केंद्र सरकार या खटल्यात सर्वोच्च न्यायालयाने ५० टक्क्यांपेक्षा जास्त आरक्षण झाल्यामुळे केंद्र आणि राज्य सरकारला आरक्षण देता येणार नाही; परंतु सामाजिक व शैक्षणिक निकषांवर आरक्षण देता येईल, असा निकाल दिला. त्यामुळे केंद्र आणि राज्य सरकारपुढे आरक्षणाचा प्रश्न निर्माण झाला.

## नागरिकत्व सुधारणा कायदा २०१९

भारतीय संविधानाने एकेरी नागरिकत्वाचा पुरस्कार केलेला आहे. संविधानाच्या कलम ५ ते ११ मध्ये भारतीय नागरिकत्वाच्या तरतुदी दिलेल्या आहेत. भारतात विविध जाती, धर्म आणि पंथांचे, भाषांचे लोक राहतात. तेव्हा राष्ट्रीय ऐक्य व एकात्मता या दृष्टीने एकेरी नागरिकत्वाची पद्धती उपयुक्त आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी एकेरी नागरिकत्वाचे समर्थन करताना असे म्हटले होते, की ''प्रत्येक भारतीय व्यक्तीला मग ती कोणत्याही प्रदेशाची रहिवासी असो नागरिकत्वाचा अधिकार असेल, तसेच भारतीय नागरिकत्व प्राप्त झालेल्या व्यक्तीला भारतात कायद्याचे



समान संरक्षण व कायद्यासमोर समानता या गोष्टी नाकारल्या जाणार नाहीत.''

केंद्र सरकारच्या नागरिकत्व दुरूस्ती कायद्यावरून देशातील विविध ठिकाणी विशेषतः आसाममध्ये तीव्र आंदोलने झाली. भारतीय जनता पक्षाच्या निवडणूक जाहीरनाम्यात नागरिकत्व सुधारणा कायद्याचा समावेश होता. भारतीय संसदेच्या दोन्ही सभागृहांनी नागरिकत्व दुरूस्ती कायदा १२ डिसेंबर २०१९ रोजी लोकसभेत ३९९ मतांनी मंजूर केला; परंतु काँग्रेस पक्ष, डावे पक्ष, समाजवादी पक्ष आणि द्रमुकने याला विरोध केला. देशभर या कायद्याच्या विरोधात विद्यार्थ्यांनी आंदोलन छेडले. हा कायदा मुस्लिमांच्या विरूद्ध आहे, असा समज समाजामध्ये निर्माण झालेला होता. नागरिकत्व सुधारणा कायदा २०१९ नुसार बेकायदा निर्वासितांना भारताचे नागरिकत्व मिळत नाही. अशा व्यक्तींना विदेशी नागरिक कायदा आणि पारपत्र कायद्यानुसार तुरूंगात टाकता येते. बेकायदा निर्वासितांची आठ ते दहा हजार प्रकरणे न्यायप्रविष्ठ आहेत. या कायद्याने अफगाणिस्तान, पाकिस्तान, बांगलादेशातील हिंदू, शीख, बौद्ध, जैन, पारशी आणि ख्रिस्ती निर्वासितांना नागरिकत्व मिळणार नाही. बांगलादेशातून आलेल्या मुसलमान निर्वासितांना नागरिकत्व न देणे असा भेदभाव करणे भारतीय संविधानाच्या कलम १४ मध्ये मांडण्यात आलेल्या समतेच्या अधिकाराच्या विरूद्ध आहे. देशात राहणाऱ्या आणि नागरिकत्व प्राप्त झालेल्या मुस्लिमांवर या कायद्याचा कोणताही परिणाम होणार नाही, असे सरकारचे म्हणणे आहे. थोडक्यात, गेल्या सात दशकांहून अधिक काळ भारत आणि संविधानही अस्वस्थ आहे. •••

**(लेखक शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथील राज्यशास्त्र विभागाचे माजी प्रोफेसर आहेत)**

MIT-ADT UNIVERSITY
PUNE, INDIA
A leap towards World Class Education

MIT ART, DESIGN AND TECHNOLOGY UNIVERSITY, PUNE

Proud initiatives by MIT-ADT University

AIC-MIT ADT INCUBATOR FORUM, Atal Incubation Centre — The University for Entrepreneurship

School of HOLISTIC DEVELOPMENT — The University for Holistic Development

School of CORPORATE INNOVATION & LEADERSHIP — The University for Corporate Leadership

CRIYA, Centre for Research & Innovation for Young Aspirants — The University for Research and Innovation

MIT FuSE, MIT Centre for Future Skills Excellence — The University for Future Skills

School of INDIAN CIVIL SERVICES — The University for Public Governance

Follow us on

MIT Art, Design & Technology University
Vishwarajbaug, Loni Kalbhor, Pune, (INDIA) - 412 201
www.mituniversity.edu.in | 9595124234

# लाखाच्या पोशिंद्याची उपेक्षा न संपणारी



**समाजवादी राजवटीचा अंत व नवीन बदलांमुळे शेतकरी, कामगारांच्या अपेक्षांची दखल घेण्याची गरज शासनसंस्थांना वाटत नाही. यामुळे लाखाचा पोशिंदा अद्यापही उपेक्षित आहे.**



डॉ. भालचंद्र कांगो

आज सर्वत्र समाज झपाट्याने वेगवान बदलांचा सामना करीत आहे. तंत्रज्ञान झपाट्याने बदलत आहे. या तंत्रज्ञानाबरोबर जुने सामाजिक संबंधही बदलत आहेत. या बदलांमध्ये आपले हितसंबंध टिकून राहावेत म्हणून सत्ताधारी वर्ग व समूह धडपडत आहेत. दुसरीकडे, होणाऱ्या बदलांमध्ये आपल्या अपेक्षा पूर्ण व्हाव्यात म्हणून किंवा त्यांचा विचार व्हावा म्हणून समाजातील कष्टकरी व वंचित समूहही धडपडत आहेत. या धडपडीचे पडसाद समाजात उमटत आहेत. शासनव्यवस्था ही समाजात स्थैर्य व शांतता रहावी म्हणून कार्यरत असते. सत्तेची निर्मितीच मुळी समाजातील मतभिन्नता व हितसंबंधांचा टकराव आटोक्यात राहावा म्हणून झालेली आहे. त्यामुळे सत्ता ही सत्ताधारी वर्गाच्या दबावाखालीच काम करते.

## लोकशाहीपुढील मोठा प्रश्न

लोकशाहीत जरी लोकांचे राज्य ही संकल्पना असली व सर्वांना मतदानाचा अधिकार असला तरी 'मतदान' हे अनेक प्रभावाखाली होत असते. याचा फायदा प्रभाव पाडू शकणाऱ्या, समाजातील वर्चस्व असलेल्या शक्ती, वर्ग व समूह घेतो. त्यामुळेच 'मतदान' हे खरेच मत देणाऱ्या व्यक्तीचे मत असते का, हा लोकशाहीपुढील सर्वात मोठा प्रश्न झाला आहे. व्यवहारात, समाजविकासात झालेल्या संघर्षात, लोकांची शक्ती म्हणजेच लोकमत हे महत्त्वाचे ठरते व ठरले आहे. त्यामुळे लोकशाही ही आज तरी समाजमान्य व्यवस्था आहे. समाजातील विविध वर्ग व समूह सातत्याने संघर्ष करीत असतात किंवा त्यांच्यात तणाव असतो. बदल व्हावा यासाठी त्यांचा प्रयत्न असतो. या बदलांना समाज तेव्हाच स्वीकारतो, जेव्हा समाजातील भौतिक शक्ती या बदलाला अनुकूल असतात. समाजातील आहे रे वर्ग सातत्याने आपले वर्चस्व रहावे म्हणून जागरूक असतो. त्यासाठी वैचारिक, व्यावहारिक आणि इतर पातळ्यांवर आपले वर्चस्व राहावे म्हणून प्रयत्नशील असतो.

## आहे रे वर्गाच्या हितसंबंधांना अटकाव

१९ व्या व २० व्या शतकात कामगार, शेतकरी समूहाने अभिजन वर्गाशी संघर्ष करून आपल्या हितसंबंधांची दखल घेण्यास भाग पाडले. १९ व्या शतकातील फ्रेंच क्रांती व २० व्या शतकातील सोव्हिएत क्रांती ही त्याची उदाहरणे होत. १९३० च्या सुमारास निर्माण झालेल्या आर्थिक मंदीतून मार्ग काढण्यासाठी सत्ताधारी वर्गाने कष्टकरी समूहाच्या अपेक्षा, आकांक्षा यांची दखल घेतली; नव्हे ती त्यांना घ्यावीच लागली. त्यातूनच लोककल्याणकारी राजवटीचा जन्म झाला. कामगार संघटनांना मान्यता मिळाली, भविष्यनिर्वाह निधी, महागाई भत्ता, किमान वेतन, नोकरीची शाश्वती, निवृत्तीवेतन इत्यादी लाभ कामगारांना मिळाले. शिक्षणाची व आरोग्याची जबाबदारी शासनाला घ्यावी लागली. दुसरीकडे, जमीनदारविरोधी संघर्षात कसेल त्याची जमीन हे तत्त्व मान्य होऊन शेतकऱ्यांना शेतजमिनीचा हक्क मिळाला. या प्रक्रियेचा परिणाम लोकशाही वाढण्यात, लोकांची क्रयशक्ती वाढण्यात व भांडवलदारांचा नफा कमी होण्यात झाला. मक्तेदारीविरोधात कायदे झाले. मध्यमवर्गाची वाढ झाली व त्यांचा प्रभावही वाढला. थोडक्यात, वर्चस्ववादी आणि आहे रे वर्गाच्या हितसंबंधांवर अंकुश लावला गेला. हा बदल सहजासहजी सत्ताधारी वर्ग स्वीकारणे शक्यच नव्हते. कमी होणारा नफा व आपल्या अधिकारांवर म्हणजे वर्चस्वावर होणारे हल्ले परतवण्यासाठी 'इतिहासचक्र' उलटे फिरवण्याचाही प्रयत्न चालूच होता. त्याला आता झपाट्याने होणाऱ्या तंत्रज्ञान बदलाची साथ मिळाली. नवीन जागतिकीकरणाचे रणशिंग फुंकून मुक्त बाजारपेठेचे महत्त्व सांगण्यास सुरुवात झाली. सार्वजनिक क्षेत्र, कामगार संघटनांचे अधिकार यावर हल्ले चढविण्यात आले. याचा परिणाम नफा वाढण्यात व कष्टकऱ्यांचा नफा कमी होण्यात झाला. एकीकडे, मक्तेदारीवरील बंधने रद्द होऊन महाकाय कार्पोरेट कंपन्यांचा प्रभाव वाढला. तर दुसरीकडे, संघर्ष करणाऱ्या जनतेच्या एकजुटीवर हल्ला करण्यासाठी धर्म, वंश, रंग, भाषा, जात, इतिहासाची पुनर्मांडणी इत्यादींमार्फत समाजात फूट पाडून भ्रम निर्माण करण्यात सत्ताधारी वर्गाला यश



मिळाले; परंतु बदलत्या तंत्रज्ञानामुळे समाजात अनेक प्रश्न निर्माण झाले. सर्व पातळ्यांवर विषमता वाढली, बेरोजगारी वाढली. आजपर्यंत असलेली नोकरीची शाश्वती संपली, भविष्याविषयी प्रश्नचिन्ह निर्माण झाले, असुरक्षितता वाढली. याचा परिणाम समाजातील सर्व घटकांवर झाला. त्यामुळेच आज आपणांस सर्व समाज अस्वस्थ असल्याचे जाणवत आहे.

## शेतकरी आणि कामगारांची घोर उपेक्षा

आज भारतामध्ये शेतकरी आंदोलनाची चर्चा आहे. दहा महिन्यांपासून राजधानी दिल्लीच्या सीमेवर हजारो शेतकरी धरणे धरून बसले आहेत. केंद्र सरकारने घाईघाईने लोकसभेत मंजूर केलेले तीन कृषिविषयक कायदे रद्द करावेत ही त्यांची प्रमुख मागणी आहे. सर्वोच्च न्यायालयाने यासंदर्भात एक समिती नेमून या कायद्यांना तात्पुरती स्थगिती दिली आहे. केंद्र शासनानेही १८ महिन्यांकरिता या कायद्यांना स्थगिती दिली आहे. शेतकरी मात्र हे कायदेच रद्द व्हावेत म्हणून आंदोलन करीत आहेत. याचे खरे कारण म्हणजे, शेतकऱ्यांना आपण मोठ्या कार्पोरेट कंपन्यांच्या दावणीला बांधले जाऊ याची साधार भीती आहे. जगभर असेच घडले आहे. बारकाईने पाहिल्यास नवीन जागतिकीकरणाच्या सुधारणा म्हणून वर्णन करण्यात आलेल्या प्रक्रियेत कामगारांची शक्ती कमी झालेली आहे. दुसऱ्या टप्प्यात महाकाय कंपन्यांच्या सोयीसाठी शेतकऱ्यांच्या हक्कांवर व सोयीसवलतींवर गदा आणण्यात आली आहे. लोककल्याणकारी राजवटीच्या काळात कामगार व शेतकरी समूहाच्या दडपणाखाली, त्याकाळी जगात अस्तित्वात असलेल्या समाजवादी राजवटीच्या प्रभावामुळे शासनसंस्था ही कष्टकरी समूहाच्या अपेक्षांची दखल घेत होती. आता समाजवादी राजवटीच्या अंतामुळे व नवीन तंत्रज्ञानाच्या आधारे झालेल्या बदलांमुळे या समूहांच्या अपेक्षांची दखल घेण्याची गरज शासनसंस्थांना वाटत नाही. यामुळे प्रखर संघर्ष केल्याशिवाय कामगार, शेतकरी समूहाला पर्याय नाही. सध्या भारतात हेच घडताना आज आपण पाहत आहोत.

### बळीराजा दहा महिन्यांपासून वाऱ्यावर

दहा महिन्यांपासून राजधानी दिल्लीच्या सीमेवर हजारो शेतकरी धरणे धरून बसले आहेत. केंद्र सरकारने घाईघाईने लोकसभेत मंजूर केलेले तीन कृषिविषयक कायदे रद्द करावेत ही त्यांची प्रमुख मागणी आहे. सर्वोच्च न्यायालयाने यासंदर्भात एक समिती नेमून या कायद्यांना तात्पुरती स्थगिती दिली आहे. केंद्र शासनानेही १८ महिन्यांकरिता या कायद्यांना स्थगिती दिली आहे. शेतकरी मात्र हे कायदेच रद्द व्हावेत म्हणून आंदोलन करीत आहेत. याचे खरे कारण म्हणजे, शेतकऱ्यांना आपण मोठ्या कार्पोरेट कंपन्यांच्या दावणीला बांधले जाऊ याची साधार भीती आहे.

## भविष्याविषयी साशंकता

२० व्या शतकातील यशस्वी संघर्षांचा अनुभव व वाढत्या अपेक्षांचा दबाव हा समाजातील सर्व घटकांना आपल्या हक्कांसाठी संघर्षाचा मार्ग योग्य आहे हाच संदेश देणारा आहे. या संघर्षाला दाबण्यासाठी आपले अधिकार व नफा कायम ठेवण्यासाठी सत्ताधारी वर्ग सातत्याने धर्म, वंश, जात, भाषा, रंग व अतिरेकी राष्ट्रवाद यांचा आधार घेणार व या संघर्षात समाजात अस्वस्थता नांदणार, असे दिसत आहे. हे चित्र बदलणे आवश्यक आहे. पुरोगामी विचारांच्या संघटना आणि व्यक्ती यांच्यापुढे हे आव्हान आहे. ●●●

**(लेखक कामगार चळवळीतील ज्येष्ठ कार्यकर्ते आहेत)**

# स्त्रियांच्या वाट्याला विघातक स्थिती



**स्त्रियांचा खरा विकास व्हायचा असेल तर त्यांना राजकीय, सामाजिक, आर्थिक आणि आरोग्याच्या क्षेत्रांमध्ये स्वयंनिर्णयाचा व आत्मनिर्भर असण्याचा अधिकार मिळायला हवा.**



**प्रा. माया पंडित**

सध्याचा काळ महिलांसाठी मोठा कठीण दिसतो. राजकीय, सामाजिक, आर्थिक क्षेत्रांत एक विलक्षण अस्वस्थता दिसते आहे. कशामुळे आहे ही अस्वस्थता? धर्मांधता आणि धार्मिक उन्माद, उपासमार, युद्धे, भूक, रोजगार व आरोग्यसुविधांची कमतरता, ती साऱ्या जगभरातच आहे. मात्र तरीही आपल्या देशातील स्त्रियांचा इतिहास फार गौरवशाली कथा सांगतो, असे नाही. भारतात सर्वसाधारण जनता काही फार सुखात राहतेय, असेही नाही. दारिद्र्य, निरक्षरता, अंधश्रद्धांचा सर्वदूर फैलाव, रोगराई, आरोग्य सुविधांचा अभाव, बालविवाह आणि बालमृत्यू, उपासमारी, कमी उत्पन्न देणारे रोजगार, बेकारी, बाळंतपणात होणारे मृत्यू, कुपोषित बालके... हे सारे कैक शतकांपासून भारतीय स्त्रियांच्या पाचवीलाच पुजले आहे. घरादाराची, स्वयंपाकपाण्याची, जळणफाट्याची, पोराबाळांची व घरातल्या म्हाताऱ्या-कोताऱ्यांची जबाबदारी पेलत बाहेरची कामे करूनही स्त्रियांना कुटुंबातील निर्णयप्रक्रियेत फारसा सहभाग आणि अधिकार मिळालेला नाही, ही वस्तुस्थिती आहे. सती, केशवपनासारख्या चाली आज फार चलनात नाहीत हे खरे. (पण तरीही सती हा विषय आजही पितृसत्ताकतेला तितकाच महत्त्वाचा वाटते हे मध्यंतरी पद्मावती सिनेमाच्या निमित्ताने सिद्ध झाले, हेही लक्षात घेतले पाहिजे). पण सर्वसाधारण स्त्रियांचे जीवनमान, काही मोजक्या उच्च व मध्यमवर्गीय स्त्रिया सोडल्या तर फारसे सुधारलेले दिसत नाही. सत्ताधीशांच्या 'अच्छे दिन आयेंगे' या वचनाकडे डोळे लावून बसलेल्या बायकांची परिस्थिती सुधारली तर नाहीच, उलट जास्तच वाईट झाली, असे कशाच्या आधारावर म्हणता येते? जे काही घडते आहे ते खरोखरीच विलक्षण म्हटले पाहिजे. याची खोलात जाऊन चर्चा करायला हवी.

तुमच्या समाजातल्या स्त्रियांची परिस्थिती काय आहे, हे मला मला सांगा म्हणजे तुमच्या देशाचा भविष्यकाळ कसा आहे हे मी तुम्हाला सांगेन, असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते. परिस्थिती बिकट आहे व अधिकाधिक बिकट होत चालली आहे. काय असावीत याची कारणे? युनोने दिलेल्या संकेतानुसार आपण परिस्थिती तपासून पाहूया. राजकीय, सामाजिक, आर्थिक व आरोग्याच्या क्षेत्रात स्त्रियांना विघातक परिस्थिती आहे. कारण त्यांना अतिकाम करावे लागते, खायला प्यायला पुरेसे अन्नपाणी मिळत नाही, त्यांना मिळणारे अधिकार फार कमी आहेत. त्यांच्या स्थितीत सुधारणा व्हायला हवी असेल तर त्यांच्या प्रगतीसाठी सुयोग्य आर्थिक व सामाजिक धोरणे आखली जावीत, असे युनोने म्हटले आहे. हे आपण भारतातील परिस्थितीसंदर्भात तपासून पाहू.

भारत सरकारने, विशेषत: मोदींची राजवट आल्यापासून आर्थिक उदारीकरणाचे व खाजगीकरणाचे धोरण अधिक जोरात राबवायला सुरुवात केली आहे. याचा स्त्रियांवर होणारा विपरित परिणाम कोणता? उदारीकरणाचा अर्थ असा, की भांडवलदारांबाबत हे सरकार उदार आहे. त्यांना लोकांचा शाश्वत विकास करून देणे महत्त्वाचे वाटत नाही तर भरपूर नफा सातत्याने मिळवून स्वत:चा निरंतर विकास करून घेणे महत्त्वाचे वाटते. सरकारला लोकांच्या जीवनावश्यक बाबी-अन्नधान्य पुरवठा, आरोग्यसुविधा, रोजगार अशा योजनांवर होणारा खर्च कमी करणे आवश्यक वाटते. त्यामुळे लोकांना धान्यसुरक्षा देणे, स्वस्त धान्य, दुकानांमध्ये स्वच्छ व चांगल्या धान्याचा व तेल, अन्य जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा करणे सरकारला महत्त्वाचे वाटत नाही. रेशनची व्यवस्था बंद पडत चालली आहे; सरकारी दवाखान्यात औषधे उपलब्ध नाहीत, सुविधा नसतात; खाजगी डॉक्टरकडे जाणे परवडत नाही... कोरोनाकाळात ज्या पध्दतीने बिले आकारण्यात आली, ऑक्सिजनच्या व औषधांच्या कमतरतेमुळे ज्या प्रकारे माणसे मेली, ज्या पध्दतीने त्यांचे मृतदेह नद्यांमध्ये वाहवले गेले, त्यावरून आपण नेमक्या कोणत्या भयंकराच्या दारात उभे आहोत हे समजते. याचा विपरित परिणाम स्त्रियांच्या जीवनावर होतो. कारण त्यांना अगोदरच

कमी मिळणारे धान्य, पाणी, औषधोपचार आणि रोजगार हे सारे आता खाजगीकरणाच्या धोरणांमुळे आणखीच कमी होते. त्याचा विपरित परिणाम स्त्रियांच्या व बालकांच्या पोषणावर होतो.

सरकारच्या शेतीविषयक धोरणामुळे शेतकरी कर्जबाजारी झाला आहे; त्याला बँका दारातही उभ्या करत नाहीत आणि मग तो खाजगी सावकाराच्या दावणीला बांधला जातो. शेतीमालाला हमीभाव व बाजारपेठ न मिळणे, बियाणांचे सातत्याने चढे भाव, बियाणे व खते यांची अनुपलब्धता, पीकविमा उतरवण्याच्या नावाखाली शेतकऱ्यांची लूट करणाऱ्या विमाकंपन्या, पूर आणि दुष्काळांचे लहरी निसर्गचक्र आणि त्यात भरडल्या जाणाऱ्या शेतकऱ्यांना मिळणारी अतिशय कमी नुकसानभरपाई, यांसारख्या अनेक कारणांमुळे शेतकरी नागवला जातो, आत्महत्या करतो. याचा किती विपरित परिणाम त्याच्या घरातील स्त्रियांवरती होतो याचा विचारही धोरणे तयार करणारे लोक करत नाहीत. कारण त्यांना त्यांच्याशी काही देणेघेणे असत नाही. शेतीचे वाटोळे होते तेव्हा त्यात राबणाऱ्या शेतकरी स्त्रियांचेही वाटोळे होते. स्त्रिया शेतीत राबतात, पिकाच्या लावणीपासून कापणी व साठवणीपर्यंतची सारी कामे त्या जिवाची पर्वा न करता करतात. मात्र त्यांना कितीही वाटोळे झाले तरी आत्महत्या करण्याचा पर्याय कधीच उपलब्ध असत नाही. कारण घर, मुलेबाळे, म्हातारी-कोतारी आणि आजारी माणसे यांचा प्रतिपाळ त्यांच्यावरच अवलंबून असतो. अगोदरच घरातील स्त्री सर्वात कमी खाते; त्यात आता रेशनवरही धान्य मिळणार नाही, (मिळाले तर ते इतके सडके आणि वाईट वास येणारे की जनावरेही त्याला तोंड लावत नाहीत.) सरकारी दवाखान्यात औषधे मिळणार नाहीत, पाणी विकत घ्यावे लागणे आणि इस्पितळे व औषधोपचार इतके महाग, की सर्वसामान्यांना ते परवडूच नयेत, असे असताना अगोदरच या बाबी वाट्याला न येणाऱ्या स्त्रियांना बेकार होऊन जगणे, कुपोषित रहाणे, आजारी पडत जाणे आणि औषधोपचारांविना निमूटपणे मरणाच्या दारात प्रवेश करणे याव्यतिरिक्त अन्य कोणताच पर्याय रहात नाही. मग सरकार खाजगीकरणाचे डिंडीम भलेही मोठमोठ्याने वाजवो! सरकारच्या या आर्थिक धोरणांचे परिणाम स्त्रियांवर जितके दृश्य स्वरूपात दिसतात, तितकेच किंबहुना जास्तच ते अदृश्य रूपाने स्त्रियांना भोगावे लागतात, मात्र ते दिसत नाहीत.

## ग्रामीण भाग अजूनही नाही सावरला

जी गोष्ट आर्थिक धोरणांची तीच अन्य मनमानी धोरणांची. उदाहरणार्थ, नोटाबंदी असो वा कॅशलेस इकॉनॉमीची घोषणा असो, हे निर्णय भारतातील रोखीचा व्यवहार करणाऱ्या गोरगरीब जनतेच्या जिवावरच उठले. रोख रकमेच्या अभावाने बेकारी वाढली. पुन्हा विपरित परिणाम बायकांच्या रोजगारावर. शिवाय रोखीनं व्यवहार नि रोजगार बंद झाल्यामुळे बाजारहाट, पीठमिठाला लागणारी चिरीमिरी आणायची कुठून? कनिष्ठ मध्यमवर्गातल्या स्त्रियांनाही याचा चांगलाच फटका बसला. त्यातून ग्रामीण भागातील लोक व विशेषतः स्त्रिया अजूनही सावरलेल्या नाहीत, असे दिसते.

तीच गोष्ट कोरोनाच्या काळात घेतलेल्या निर्णयांची. या



लोकहितविरोधी बेताल धोरणांचे व निर्णयांचे उदाहरण कोरोनाच्या काळात आपण पाहिले आणि अनुभवले. मोदींनी पहिल्या लाटेत अचानक जो लॉकडाऊन जाहीर केला, त्यात लाखो लोकांना शेकडो मैलांची पायपीट करून घरी पोचावे लागले. त्यांचे व विशेषतः स्त्रियांचे, मुलांचे अपरिमित हाल झाले. कामाच्या शोधात शहरात आलेल्या असंख्य कष्टकऱ्यांना एका फटक्यात शहरांमधून त्यांच्या गावांकडे स्थलांतरित होणे भाग पाडलेल्या माणसांच्या आणि त्यांच्या स्त्रियांना जे अनन्वित हाल भोगावे लागले त्यांचे वर्णन करणेदेखील दुरापास्त आहे. ज्यांनी आपल्या घामातून इथल्या टोलेजंग इमारती बांधल्या, सिमेंट काँक्रीटची अगणित घमेली डोक्यावरून वाहून नेत मोठमोठाले मनोरे बांधले, त्यांना केवळ शहराबाहेर स्थलांतरित व्हायला भाग पाडून हे सरकार थांबले नाही. रस्त्यात त्यांना जनावरांसारखे फवारे मारून धुतले, रेल्वेच्या रुळांवरती झोपायला भाग पाडले, चालून थकलेभागलेले अभागी जीव क्षणार्धात धावत्या रेल्वेखाली होत्याचे नव्हते झाले, तरी त्याची पर्वा नाही. असे हे राज्यकर्ते! परंतु हे स्थलांतरित ज्या गावांमध्ये परत गेले तेथे त्यांच्या वाट्याला काय आले? बहुसंख्य लोक हे खालच्या जातींमधले होते, खेड्यांमधल्या छळांचे बळी होते म्हणून तर बहुसंख्यांनी खेडी सोडली होती. आता त्याच ठिकाणी परत जायचे म्हणजे तेच जातीय छळाचे दुष्टचक्र पुन्हा चालू! त्यात स्त्रियांची परिस्थिती अधिकच बिकट कारण वरिष्ठ जातींकडून होणाऱ्या आर्थिक, सामाजिक व लैंगिक अत्याचारांना बळी पडणाऱ्या पुन्हा या स्त्रियाच! उपासमार, रोजगार कमी मोबदल्याचा, मुखी दोन घास पडायची रोज विवंचना आणि त्याच्या जोडीला आता उच्चवर्णियांच्या मोकाट अन्यायांना बळी जाणे... दिवस कठीण नाहीत, तर काय म्हणावे?

## विवेक हरवून बसलेला 'तो' समाज

सरकारच्या नागरिक कायद्याच्या राजकीय धोरणात झालेला फरक, विशेषतः मोदी-शाहंनी आणलेले सीएए आणि एनआरए हे दोन निर्णय तर एकूणच महिलांवर अत्यंत विपरित परिणाम करणारे आहेत. नागरिक म्हणून नावनोंदणी करण्यासाठी नावावर जमीन हवी, काहीतरी संपत्ती हवी, घर वा किमान काही स्थावर चीज हवी. भारतात ज्या प्रचंड संख्येने गरीब लोक, तसेच भटक्या आणि विमुक्त जमाती व विशेषतः त्यांच्या



स्त्रिया आहेत, त्यांच्या नावावर कोणती स्थावर आणि जंगम संपत्ती त्या दाखवू शकतील? मुस्लिम स्त्रियांना व पुरूषांना तर कायद्याच्या चाबकाने संपूर्णपणे विदेशीदेखील नाही, तर त्यांच्या अस्तित्वातूनच परागंदा होणे भाग पडायला लावणाऱ्या या कायद्याने तर त्यांची जितकी ससेहोलपट करता येईल तितकी केली. आसाममध्ये जे काही घडले त्याच्या शितावरून अशा सर्व जनतेच्या भाताच्या विधुळवाटीची कल्पना करता येते. हे वास्तव स्त्रियांच्या मुळावरच उठणारे आहे आणि स्वतंत्र भारतात ज्यांच्या स्वातंत्र्यासाठी हिंदू-मुस्लिम सर्वांनीच आपल्या प्रणांची बाजी लावली होती, तेथे हे पहिल्यांदाच घडले आणि भविष्यात घडणार नाही याची कोण शाश्वती देऊ शकेल? ती टांगती तलवार सातत्याने त्यांच्या डोक्यावर राहीलच. या कायद्यांना विरोध करत उपोषणाला बसलेल्या दिल्लीच्या शाहीनबागमध्ये आणि देशातील अन्य अशा शाहीनबागांमध्ये आंदोलन करणाऱ्या स्त्रियांवर ज्या प्रकारचे भेकड हल्ले करण्यात आलेत आणि त्यानंतरच्या दिल्ली व अन्य ठिकाणच्या दंगलींमध्ये जो हिंसेचा नंगानाच घातला गेला त्याचे परिणाम या स्त्रियांवर झाले नाहीत असे म्हणणारा माणूस आपल्या सर्व विवेकाला हरवून बसलेला धर्मांध, हिंसाचारी, संधीसाधू नाही, असे कोण म्हणेल?

## मुलींच्या बाबतीत स्वतंत्र आचार-विचार अशक्य

स्त्रिया व मुलांसाठी असलेली 'गप्प बसा' संस्कृती इतकी प्रभावी आहे, की त्यांना दुर्लक्षित करणे सोपे जाते, त्यांचा आवाज दाबणे सहज शक्य होते आणि दुर्बलता हा त्यांचा अलंकार मानण्यात येतो. स्वतंत्रपणे विचार आणि आचार करणे हे अजूनही बहुसंख्य मुलींच्या बाबतीत अशक्य आहे. अधिकाधिक खाजगीकरणाचा पुरस्कार करणारे शिक्षण व सरकारची जबाबदारी झटकून तथाकथित उदारमनस्क धनदांडग्यांच्या हाती शाळा, कॉलेज सोपविण्याचे शैक्षणिक धोरण या मुलींना कशा प्रकारे शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देईल? पितृसत्ताकतेचा व्यवहार आणि विचार यांचे वाढते प्राबल्य अतिशय, हे या काळाचे आणखी एक चिंताजनक वैशिष्ट्य आहे. भारतीय समाजात अगोदरच जात आणि वर्ग यांच्या जोडीला पितृसत्ताकता हे त्रिकूट अभिन्न राहिलेले आहे. जातीय दृष्टिकोनातून तर सर्व खालच्या जातीतल्या स्त्रिया वरिष्ठवर्णीय पुरुषांच्या दृष्टीने काहीच किंमत नसलेल्या आहेत. शिवाय त्यात पितृसत्ताकतेला धर्माचा आशीर्वाद आहे. मग तो हिंदू धर्म असो, इस्लाम असो वा ख्रिश्चॅनिटी. सर्व स्त्रियांना नेहमीच असमान मानले गेले आहे. स्त्रिया शिकल्या, नोकऱ्या करू लागल्या वा काही उद्योगधंदे करू लागल्या, तरी बहुसंख्य स्त्रियांना अजूनही दुय्यमच मानले जाते. युनो ज्या आर्थिक, सामाजिक आणि राजकीय निर्णयस्वातंत्र्याबद्दल बोलते ते बहुसंख्य स्त्रियांना मुळात मिळतेच कुठे? हे खरे आहे, की स्त्रिया आपल्या हक्कांसाठी झगडताहेत, प्रतिकार करताहेत आणि लिंगभेदी विचारसरणीला न जुमानता काही मोजक्या स्त्रिया त्यांच्या क्षेत्रात आघाडीवर वाटचाल करताना दिसतही आहेत. मग त्या उच्चशिक्षित महिला प्राध्यापिका, डॉक्टर, इंजिनिअर वा कॉम्प्युटरतज्ज्ञ असोत, वा राही सरनोबत वा तेजस्विनी जाधवसारख्या खेळाडू असोत, वा आपल्या हक्कांसाठी आंदोलने करणाऱ्या शहरी व ग्रामीण स्त्रिया असोत, तीच कथा आदिवासी स्त्रियांची. जल, जंगल, जमीन या त्यांच्या अधिकारांपासून त्यांना वंचित ठेवणाऱ्या व्यवस्थेविरूद्ध लढणाऱ्या स्त्रियांची अवस्था सोनी सूरीसारखी होते. आजही पारधी, नंदीवाले आणि अशा प्रकारच्या अगणित भटक्या व विमुक्त जमातींमधील स्त्रियांना वरिष्ठवर्णीय व पोलीस आणि न्याय अशा तिन्ही दमनव्यवस्थांना सामोरे जावे लागते. पुन्हा दुसरीकडे, जातपंचायतींचा रेटाही त्यांना अंतर्गत पितृसत्ताकतेला सामोरे जायला भाग पाडतो. एकूण स्त्रियांवरच्या हिंसाचारात म्हणजे हुंडाबळी, बलात्कार आदी गुन्ह्यात ज्या पद्धतीने वाढ होताना दिसते आहे, त्यात स्वातंत्र्याची सोनेरी पहाट त्यांच्यापासून खूप काळपर्यंत उगवणार नाही, अशी शंकाच पैदा होताना दिसते. नागरिक म्हणून तर सोडाच, पण माणूस म्हणूनदेखील अधिकार त्यांना मिळत नाहीत, ही वस्तुस्थिती आहे. नॅशनल क्राईम ब्युरोच्या २०१६ सालच्या आकडेवारीनुसार, १,००० पुरूषांच्या मागे ९१४ स्त्रिया आहेत; अल्पवयीन मुलांवर होणाऱ्या बलात्कारांमध्ये ८२ टक्के वाढ झाली आहे. ४२ टक्के मुलींना लैंगिक छळाला सामोरे जावे लागते. दर तासाला एक हुंडाबळीची घटना घडते आणि दररोज किमान ८७ बलात्कार होतात. त्यातही दलित स्त्रियांवरच्या बलात्कारांच्या प्रमाणात लक्षणीय वाढ झाली आहे. २०१६ साली डेल्टा मेघवाल इथला दलित मुलीवरचा बलात्कार, २०१७ साली उन्नाव इथे कुलदीपसिंग सेंगर या भाजपच्या नेत्याने तरूणीवर केलेला बलात्कार व त्यानंतर तिच्या बापाचा पोलिस स्टेशनमध्ये मारहाण करून केलेला खून, यापुढे जाऊन पीडिता कोर्टात जाताना तिच्या गाडीवर ट्रक घालून तिच्या वकिलाला व खुद्द तिला गंभीर जखमी करून तिच्या दोन महिला नातेवाईकांचा घडवून

आणलेला मृत्यू, २०१८ साली जम्मू-काश्मीरमधल्या कथुआ इथे ८ वर्षांच्या भटक्या जमातीच्या आसिफावर केलेला बलात्कार आणि त्यात बलात्काऱ्यांच्या बाजूने उभे राहिलेले इतकेच नव्हे तर, त्यांचा जाहीर सत्कार करणारे भाजपचे दोन गंगण मंत्रीगण आणि अनेकानेक भगवे पाठीराखे; यावरही कडी केली ती हाथरस इथल्या १९ वर्षांच्या दलित मुलीवरती उच्चवर्णीयांनी केलेल्या अधम अत्याचाराच्या घटनेनं. चार उच्चजातीय तरूण एका दलित पोरीवर ती शेतात काम करत असताना बलात्कार करतात, तिची जीभ कापतात, पाठीच्या कण्याची हाडं मोडतात, तिला रक्तबंबाळ अवस्थेत सोडून पलायन करतात. अलिगड व दिल्ली इथल्या दवाखान्यांत पंधरा दिवसांच्या यमयातनांनंतर ती मरते. पण पोलिस तिचे प्रेत रातोरात जाळून टाकतात, तिच्या कुटुंबियांवर दंडेली करतात, वरिष्ठ पोलिस अधिकारी तिच्या बलात्काराच्या जबाबानंतरही तिच्यावर बलात्कार झालाच नाही असे माध्यमांमधून जाहीर करतात. भाजपचे माजी आमदार पहेलवान हे पीडितेच्या नातेवाईकांवर हल्लाबोल करतात आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे अजयसिंग बिष्ट हे स्वतःला योगी म्हणवणारे भाजपचे मुख्यमंत्री गप्प बसतात आणि तोंड उघडलेच तर उच्चवर्णीय गुन्हेगारांना आणि तितक्याच गुन्हेगार पोलिसांना पाठीशी घालतात. इतकेच नाही तर, हा नुसता त्यांचे सरकार उलथून पाडायचा राष्ट्रीयच नव्हे तर, आंतरराष्ट्रीय कट आहे असे निर्लज्ज दावे करतात. याला काय म्हणावे?

या साऱ्याचा अर्थ असा, की आपल्या पितृसत्ताक आणि जातींच्या उतरंडीत बांधलेल्या समाजात स्त्रिया सुरक्षित नाहीत आणि विशेष करून दलित स्त्रिया तर अजिबातच नाहीत. बाईचे मूल्य ते काय! हीच विचारसरणी बनलीय! कुठे आहे जातपात? कुठे आहे सवर्ण व दलित असा भेद? कोण म्हणतं स्त्रियांवर अन्याय अत्याचार होतात? पितृसत्ता म्हणजे काहीतरी फॅड आहे! बलात्कार इंडियात होतात, भारतात नाहीत, असे सरेआम होणारे बेशरम कांगावे किती तकलादू नि खोटे आहेत! भारतीय समाजात दलित, भटक्या जमातींच्या आणि आदिवासी स्त्रियांना कायमच उच्चवर्णियांच्या विशेषतः त्यांच्या पुरूषांच्याच अत्याचारांना सामोरे जावे लागले आहे. मनुस्मृतीच्या मगरमिठीचे विष इतके भिनलेले आहे, की त्यांना शिकण्याची वा विकासाची संधी मिळणे तर सोडाच, पायात चपला वा पूर्ण अखंड नवा कपडा वा साडीदेखील घालायची नाही, दागिनेही कथलाचे वा लोखंडाचेच, लग्नातदेखील गोडधोड खाणे वा नवरदेवाला घोड्यावर बसवणे वर्ज! खालच्या जातीतील स्त्रियांनी उच्चवर्णीय पुरूषांच्या वासनेची शिकार होणे हा जणू अलिखित नियमच आहे. देशाच्या अनेक भागांमध्ये ही स्थिती आजही आहे. राजस्थान, गुजरात, उत्तर प्रदेश, महाराष्ट्र, तामिळनाडू ही त्यांची काही ठळक उदाहरणे.

## धर्मांध शक्तींचा प्रभाव स्त्रियांच्या प्रगतीला मारक

राजकारणात उजव्या आणि धर्मांध शक्तींचा वाढता प्रभाव हा स्त्रियांच्या प्रगतीला मारक आहे, हे वरील आकडेवारी व माहितीवरून सिद्ध होते. हे केवळ भारतापुरते खरे आहे असे नाही. सर्व जगभरच त्याचे विपरित परिणाम स्त्रिया झेलताना दिसतात. अफगाणिस्तानात




तालिबान्यांनी पूर्वी शाळेत जाणाऱ्या मलाला युसुफजाई या पोरीवर बेछूट गोळीबार करून आपल्या विचारसरणीचे प्रत्यंतर दिले होते. आता ते आम्ही शाळा-कॉलेजात मुस्लिम पद्धतीचे शिक्षण देणार, बायांना शिक्षण वा नोकरी वा व्यवसाय करायची गरज नाही? पोरे विण्याचे काम सोडून इतर काहीही काम करायला परवानगी नाही, अशा विचारांचा व व्यवहारांचा ते उघडउघड पुकारा करताहेत! पाकिस्तानातही दहशतवादी आणि मुल्ला मौलवींच्या प्रभावाखाली स्त्रियांच्या ऑनरकिलिंग्जसारखे प्रकार नियमित होतात आणि आपल्याकडे ते होत नाहीत म्हणून पाठ थोपटून घ्यायची गरज नाही. कारण तामिळनाडूपासून राजस्थान आणि पंजाबपासून बंगालपर्यंत ही सारीकडे आढळणारी बाब आहे. धर्म आणि धार्मिक दहशतवादाला पोसणारे लोक जोपर्यंत सत्तेवर आहेत तोपर्यंत या प्रकारांना विराम मिळण्याची काही चिन्हे नाहीत.

आपले नेते ज्या बेताल पद्धतीने स्त्रियांवर बोलतात याची काही वानगीदाखल उदाहरणे पाहा : खुद्द आपले पंतप्रधान नरेंद्र मोदी स्त्रियांबद्दल किती अनुदारपणे आणि वाईट बोलू शकतात याची अनेक उदाहरणे आहेत. हिमाचल प्रदेशात एका निवडणुकीच्या जाहीर सभेत बोलताना शशी थरूर यांच्या पत्नीबद्दल 'वा! क्या गर्लफ्रेंड है!' म्हणणे; ममतादीदी या आपल्या प्रतिस्पर्धी स्त्री नेत्याला 'दीदी ओ दीदी' अशा एखाद्या टपोरी तरूणाप्रमाणे जाहीर सभेत हाका मारणे; कॉंग्रेस अध्यक्षा सोनिया गांधी यांचा उल्लेख सातत्याने 'कॉंग्रेसकी वो विधवा' असा करणे; रेणुका चौधरींचा उल्लेख भर लोकसभेत 'शूर्पणखा' असा करणे; ही काही वानगीदाखल उदाहरणे आहेत. यावरून त्यांची स्त्रियांबद्दलची मानसिकता स्पष्ट होते. त्यांचीच री ओढून त्यांच्यासारख्या गर्हनीय कॉमेंटस करणारे इतर महाभागही काही कमी नाहीत. अमित शाहंनी शाहीनबाग आंदोलनात मुस्लिम स्त्रियांबद्दल काढलेले 'त्या तुमच्या घरात येऊन तुमच्यावर रेप करतील' हे उद्गार कोणत्या संस्कृतीत बसतात? रा.स्व. संघाचे मोहन भागवत बिनधास्त म्हणतात, 'स्त्रियांना शिक्षण दिल्यामुळेच आज आपल्याकडे घटस्फोटांचे प्रमाण वाढले आहे.' भागवतांच्या मते, बायकांनी हुंड्यासाठी मार खाऊन वा छळ सोसून, उपाशी राहून वा हुंडाबळी होऊनदेखील त्याच नवऱ्याच्या पायाची दासी होऊन राहिले पाहिजे आणि दुसरे **(उर्वरित .../ पान ७० वर)**

# ‘नाही रे’ वर्गाची स्थिती गंभीर



**लोकांच्या हातातील क्रयशक्ती घटत आहे, बेरोजगारी वाढत आहे. लोकांकडे पैसा खेळता ठेवायचा तर त्यांचे उत्पन्न वाढले पाहिजे, रोजगार वाढला पाहिजे. विकासाचे प्रारूप बदलले तरच हे शक्य आहे.**



देविदास तुळजापूरकर

सध्या प्रसारमाध्यमांमधून प्रधानमंत्र्यांच्या छबीबरोबरच भारताच्या विकासाच्या खूप कहाण्या आपल्याला ऐकायला, पाहायला मिळत आहेत. देशात ४३.५० कोटी बँक खाती उघडली गेली. त्यात १.४५ लाख कोटी रुपये शिल्लक आहेत. बेरोजगारांसाठी स्वयंरोजगार निर्माण करणाऱ्या मुद्रा योजनेच्या माध्यमातून २१.५९ कोटी रोजगार निर्माण केले गेले. फेरीवाल्यांसाठीच्या स्वनिधी योजनेचे २७.९६ लाख लाभार्थी आहेत. या योजनेमुळे फेरीवाल्यांच्या जीवनात क्रांती घडून आली आहे. उज्ज्वला गॅस योजनेचे ५ कोटी लाभार्थी असून त्यांच्या घरात धुरामुळे महिलेच्या डोळ्यात येणारे अश्रू थांबले आहेत. प्रधानमंत्री आवास योजनेच्या ११३.५६ लाख लाभार्थी कुटुंबांना डोक्यावर छप्पर मिळाले. प्रधानमंत्र्यांच्या नावाने चालणाऱ्या दोन सुरक्षा योजना आहेत. यातील जीवन ज्योती योजनेचे ६.५२ कोटी लाभार्थी, तर जीवन सुरक्षा योजनेचे १७.३७ कोटी लाभार्थी आहेत. पीक विमा योजनेचे ५.५ कोटी लाभार्थी आहेत. या सर्व योजनांमुळे सामान्यजनांचे जीवन सुरक्षित बनले आहे. अटल पेन्शन योजनेचे २०६.९६ लाख लाभार्थी असून या कुटुंबांना वृद्धत्वात आधार मिळाला. प्रधानमंत्री वयवंदन योजनेच्या ४ लाख ज्येष्ठ नागरिक लाभार्थ्यांचं जगणं सुसह्य झालं आहे. ही सगळी आकडेवारी किती सुखाऊन जाते.

२००० ते २०१९ या काळात भारताचे दरडोई सकल घरेलू उत्पादन पाच पटीने वाढले. सार्वजनिक वितरण व्यवस्थेद्वारे कमी दरात पूर्वीपेक्षा जास्त लोकांना अन्नधान्य मिळू लागले, अनेक खेड्यात वीज जाऊन पोचली, पूर्वीपेक्षा जास्त मुले प्राथमिक शिक्षण घेऊ लागली. स्वच्छतागृहे मोठ्या प्रमाणात बांधली गेली. मोबाईलचा वापर वाढला. किती हे लोभसवाणे चित्र! स्वातंत्र्यानंतर प्रथमच भारतीय अर्थव्यवस्था इसवीसन २०२०-२१ मध्ये आकुंचन पावली, पण नेमके याच वर्षात अब्जाधीशांची संख्या १०२ वरून १४० पर्यंत वाढली. यांची एकत्रित संपत्ती ५९६ अब्ज डॉलर एवढी म्हणजे दुपटीपेक्षा अधिकने वाढली. अब्जाधीशांच्या संख्येत जगात भारताचा तिसरा क्रमांक आहे. अमेरिका, चीन आणि नंतर भारत. हाच तो काळ, ज्या काळात गरिबांच्या संख्येत ७५ दशलक्ष एवढी वाढ झाली. जगात गरिबांची जी वाढ झाली, त्यात सर्वाधिक ६० टक्के वाटा भारताचा आहे. जगातील गरिबीत सर्वाधिक २०.१७ टक्के म्हणजे १३९ दशलक्ष भारताचा वाटा आहे, तर जगातील लोकसंख्येत भारताचा वाटा १७.८ टक्के आहे.

## श्रीमंत आणि गरिबांच्या टक्केवारीत मोठी तफावत

सुरुवातीला संपत्तीतील विषमता आपण पडताळून पाहूया. सर्वाधिक संपत्ती धारण करणाऱ्या १% लोकांकडे १२% संपत्ती होती. जो आकडा १९६१ पासून स्थिर होता, पण १९९१ पासून तो सतत वाढत गेला. २०२० मध्ये १% टक्का लोकांकडे ४२.५% संपत्ती होती. भारतात १% अतिश्रीमंत आणि तळाशी असलेले ५०% गरीब यांच्यात फार मोठी तफावत आहे. हे झाले संपत्तीचे. आता आपण उत्पन्नाची आकडेवारी तपासून पाहूया. १९६१ मध्ये सर्वाधिक १% श्रीमंत लोकांकडे १३% उत्पन्न एकवटले होते. ते हळूहळू कमी होत १९८१ मध्ये ६.८९% वर पोहोचले. ते पुन्हा १९९८ पर्यंत चढत चढत १०.४% पर्यंत गेले, तर १९९१ ते २०१९ या कालावधीत ते चढत चढत जाऊन २१.७% पर्यंत पोहोचले. यातून संपत्ती ही उत्पन्नापेक्षा अधिक एकवटलेली दिसते. भारतात १% अतिश्रीमंत आणि तळाशी असलेले पन्नास टक्के गरीब यांच्या उत्पन्नात फार मोठी तफावत आहे. ती अमेरिका, चीन, रशिया, फ्रान्स आणि इंग्लंडपेक्षा जास्त आहे. याचाच अर्थ, नवीन आर्थिक धोरण वैश्वीकरण, उदारीकरण याचा लाभार्थी वर्ग एक तर श्रीमंत आणि कुशल मनुष्यबळ आहे. १९९८ ते २०१९ या काळात भारताचे दरडोई उत्पन्न ८.५ पटीने वाढले आहे, ग्रामीण भागातील मजुरी मात्र ५.४ पट वाढली आहे.

## मनमोहनसिंगांचा युक्तिवाद पोकळच सिद्ध झाला

१९९० नंतर गेल्या तीन दशकांत भारताचे सकल घरेलू उत्पादन, राष्ट्रीय उत्पन्न, विकासाचा दर जरी वाढला, तरी ५० टक्के जनता गरिबीरेषेखाली आहे, हे कटू वास्तव आहे. याचाच अर्थ, आर्थिक



विकास झाला की गरिबी आपोआप दूर होईल असा जो युक्तिवाद मांडण्यात येत होता तो सपशेल खोटा ठरला आहे. आठवून पहा, नवीन आर्थिक धोरणाचा मार्ग स्वीकारल्यानंतर तत्कालीन अर्थमंत्री डॉ. मनमोहनसिंग सतत हा युक्तिवाद मांडत होते, की थोडी कळ सहन करा, एकदा का आपण विकासाची गती वाढवली की हा विकास झिरपत जाईल आणि गरिबी नष्ट होईल. नंतर एक दशक ते प्रधानमंत्री होते. त्यांचा युक्तिवाद किती पोकळ होता, हे आता काळाच्या कसोटीवर सिद्ध झाले आहे.

आर्थिक प्रगतीच्या निकषांवर जगात भारताचा क्रमांक एक आहे. तसा तो आर्थिक विषमतेच्या निकषांवरदेखील क्रमांक एकच आहे. गेल्या तीन दशकांत पिढीजात श्रीमंत तसेच क्रॉनि भांडवलदार दोघांच्या संपत्तीत वेगाने वाढ झाली आहे. यामुळे श्रीमंत अधिक श्रीमंत होत आहेत. दुसरीकडे, गरिबांना मात्र किमान वेतन, शिक्षण, आरोग्य यासाठी तीव्र संघर्ष करावा लागतो आहे. याचा महिला आणि बालकांवर तर अधिक विपरित परिणाम होत आहे.

## अब्जाधीशांची संख्या वाढली दहा पटीने

देशातील एकूण संपत्तीपैकी ७७% संपत्ती १०% श्रीमंतांकडे एकवटलेली आहे. २०१७ साली निर्माण झालेल्या संपत्तीत ७३% वाटा १% श्रीमंतांकडे गेला आहे, तर ६७ दशलक्ष भारतीय जे गरिबातल्या ५०% आहेत त्यांच्या संपत्तीत यावर्षी वाढ झाली आहे ती फक्त १%. इसवीसन २००० मध्ये भारतात फक्त ९ अब्जाधीश होते. त्यांची संख्या २०१३ मध्ये १०१ पर्यंत जाऊन पोहोचली आहे. २०१८ ते २०२१ या कालावधीत दरवर्षी ७० लोकांच्या संपत्तीत रोज दशलक्ष रुपयांची भर पडत आहे. गेल्या दशकात अब्जाधीशांची संख्या दहापटीने वाढली आहे. त्यांची संपत्ती भारताच्या केंद्रीय अर्थसंकल्पातील एकूण रकमेपेक्षा जास्त आहे. याच वेळी सामान्य भारतीयांना वैद्यकीय इलाज परवडेनासा झाला आहे, ज्यामुळे ६३ दशलक्ष लोक गरिबीच्या खाईत लोटले गेले आहेत.

इसवीसन १९९० मध्ये १% श्रीमंत लोकांकडे एकूण उत्पन्नाच्या तुलनेत ११% संपत्ती होती. ही २०१९ मध्ये २१% पर्यंत जाऊन पोहोचली. इसवीसन २०१९ मध्ये १०% श्रीमंत लोकांचे उत्पन्न होते ५६% तर तळाशी असलेल्या १०% लोकांचे उत्पन्न होते ३.५%. इसवीसन २०१९ मध्ये १०% श्रीमंत लोकांचे उत्पन्न ८०.७% होते.

भारतात शेती हे उपजीविकेचे प्रमुख साधन आहे. देशात २६.३ कोटी कुटुंब शेती करतात. त्यातील ११.२ कोटी लोकांकडे स्वतःची जमीन आहे, तर १४.४ कोटी लोक शेतीवर मजूर म्हणून काम करतात. २०१५-१६ च्या शेतीतील जनगणनेच्या आकडेवारीनुसार, ८६.२% शेतकऱ्यांकडे ४७.३% शेतजमीन आहे. कोरोना महामारीच्या काळात भारतीय अर्थव्यवस्था जेव्हा उणे दहा टक्के विकासदर दाखवत होती, तेव्हा त्यांच्या संपत्तीत मात्र ३५% वाढ झाली.

## बेरोजगारीमुळे आर्थिक विषमता

आर्थिक विषमतेला कारणीभूत एक घटक आहे बेरोजगारी. आंतरराष्ट्रीय श्रम संस्थेने प्रसिद्ध केलेल्या आकडेवारीनुसार, २०२० मध्ये बेरोजगारी ७.११% पर्यंत जाऊन पोहोचली आहे. बेरोजगारीचा हा दर गेल्या तीन दशकांतला सर्वाधिक आहे. हा असा वर्ग आहे जो उत्पन्न नाही म्हणून बचत करू शकत नाही. तसा तो खर्चदेखील करू शकत नाही. त्यामुळे गुंतवणूक तसेच बाजारात मालाला उठाव येण्यासाठी क्रयशक्ती, या दोन्ही आघाड्यांवर देशाच्या आर्थिक विकासात या घटकांचे योगदान नाही. कोरोना महामारीमुळे परिस्थितीची भयावहता आणखीच वाढली, पण मुळात परिस्थिती गंभीरच होती. भारतात गेल्या तीन दशकांत नवीन आर्थिक धोरण राबविल्यानंतर विकासाचा दर वाढत राहिला आहे. पण त्यातून रोजगारनिर्मिती होत नाही. सरकारी क्षेत्र, सार्वजनिक क्षेत्र आकुंचन पावले आहेत. अर्थव्यवस्थेच्या अनेक क्षेत्रातून सरकारने काढता पाय घेतला आहे, उत्पादन क्षेत्रदेखील आकुंचन पावले आहे. कारण भारतीय उत्पादन क्षेत्र चीनच्या स्पर्धेत उभे राहू शकले नाही. सेवा आणि किरकोळ क्षेत्र मात्र वाढले आहे. सेवा क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर यांत्रिकीकरण झाले आहे.

गेल्या तीन दशकांत सर्वसाधारणतः सर्वच क्षेत्रात यांत्रिकीकरण झाले आहे. त्यामुळे रोजगार नष्ट झाले आहेत. याचबरोबर या कालावधीत कामगारविषयक धोरणातदेखील आमूलाग्र बदल करण्यात आले आहेत. कायदे विकासाच्या आड येतात किंवा उद्योगांना प्रोत्साहन द्यावयाचे झाले तर उद्योगस्नेही कामगारधोरण आणले पाहिजे, या समजुतीतून जी धोरणे गेल्या तीन दशकांत राबविली गेली आहेत त्यामुळे कंत्राटी पद्धती, बाह्य स्त्रोतपद्धती मोठ्या प्रमाणावर लागू करण्यात आली. यामुळे

संघटित कामगार आकुंचन पावला आहे. त्याला उपलब्ध असलेल्या सुरक्षिततेचे कवच हिरावून घेतले गेले आहे. याचा परिणाम म्हणून त्याची सौदेबाजीची शक्ती खूपच क्षीण झाली आहे. संघटित रोजगार हिरावून घेतला गेला आहे. किरकोळ क्षेत्रात तर कंत्राटी कामगारच जास्त आहेत. या सगळ्या धोरणांचा परिपाक एकीकडे रोजगार आकुंचित होण्यावर झाला आहे तर दुसरीकडे, तो कामगार दारिद्र्यरेषेच्या खाली लोटला गेला आहे. यातून आजच्या या भयावह विषमतेने जन्म घेतला आहे.

## शेतीक्षेत्रातील वाढत्या अडचणी

भारतातील ५०% लोकांचा रोजगार शेतीवर अवलंबून आहे, हे लक्षात घेता शेतीचे अर्थव्यवस्थेतील स्थान अधोरेखित होते. शेतीचा सकल घरेलू उत्पन्नातील, राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा कमी झाला असला तरी रोजगारातील शेतीचा वाटा मात्र कायम आहे. अशा या शेती क्षेत्रातील २.८९ लाख शेतकऱ्यांनी १९९५ ते २०१९ या कालावधीत आत्महत्या केल्या आहेत. ही नोंद झालेली आकडेवारी आहे. ही भयावह स्थिती आहे. हा केवळ शेती क्षेत्रातील पेचप्रसंग नाही, तर योग्य शब्दात वर्णन करावयाचे झाले तर या शतकातील मानवी जीवनातील ही सगळ्यात मोठी शोकांतिका आहे. शेतीचे पावसाच्या पाण्यावर अवलंबित्व, वाईट हवामान, उदार आयातविषयक धोरण, शेतीला देण्यात येणाऱ्या अनुदानात कपात, अजूनही सावकारी (आधुनिक सावकारी) कर्जावर अवलंबित्व, सरकारतर्फे शेती क्षेत्राच्या विकासासाठी करण्यात येणाऱ्या गुंतवणुकीत घट अशी अनेक कारणे आहेत, ज्यामुळे शेतीक्षेत्रातील पेचप्रसंग दिवसागणिक अधिकाधिक वाढत आहेत.

## आर्थिक धोरणांचा परिपाक

उत्पादन क्षेत्रातला पेचप्रसंग, शेती क्षेत्रातला पेचप्रसंग, बेरोजगारी आणि सरतेशेवटी भयावह विषमता हा गेल्या तीस वर्षात राबविलेल्या चुकीच्या आर्थिक धोरणांचा परिपाक आहे. १९९१-९२ मध्ये भारत सरकारने जागतिक बँक आणि आंतरराष्ट्रीय नाणे निधीतर्फे रचनात्मक फेरबदलाच्या नावावर जे खाजगीकरण, उदारीकरण तसेच जागतिकीकरणाचे जे धोरण अवलंबिले आहे, त्याचे हे परिणाम आहेत. गेल्या ३० वर्षात एकानंतर एक आलेली सरकारं जरी विविध राजकीय पक्षांची अथवा आघाडीची असली तरी त्यांनी आर्थिक धोरणात सातत्य ठेवले आहे. २०१४ साली तीस वर्षात प्रथमच निर्विवाद बहुमत घेऊन भारतीय जनता पक्षप्रणित सरकार अधिकारारूढ झाले. हे सरकार २०१९ मध्ये अधिक बहुमताने निवडून आले, ज्यामुळे नवउदार धोरणे या सरकारने गेल्या सात वर्षात अधिक दृढतेने राबविली आहेत. याशिवाय या सरकारने पहिल्या टप्प्यात सुरुवातीला निश्चलनीकरण राबविले, नंतर जीएसटीचा प्रकल्प राबविला. यामुळे कमालीची आर्थिक अस्थिरता निर्माण झाली, अर्थव्यवस्थेची घडी विस्कटली. आज खरी गरज आहे ती ज्या नवउदार आर्थिक धोरणाचा परिपाक म्हणून हे आर्थिक अरिष्ट निर्माण झाले आहे, त्या आर्थिक धोरणांबाबत फेरविचार करण्याची. पण विद्यमान सरकारवर भांडवलदारांची अशी घट्ट पकड आहे, की ते विद्यमान सरकारकडे असलेल्या बहुमताचा वापर करून आपला आर्थिक कार्यक्रम राबवून घेत आहेत. पण दर दिवशी गहिरा होत जाणारा पेचप्रसंग अर्थव्यवस्थेला, देशाला खोल गर्तेत घेऊन जात आहे. या परिस्थितीत सरकार राक्षसी चेहरा असलेल्या नवउदार धोरणाला मानवी चेहरा देऊन हा पेचप्रसंग ढकलू पाहत आहे. पण यामुळे सरकारला आजच्या या पेचप्रसंगावर मात करणे शक्य होईल काय?

आज बाजारात मालाला उठाव नाही. कारण लोकांच्या हातातील क्रयशक्ती घटत आहे, बेरोजगारी वाढत आहे किंवा वेतनात घट झाल्यामुळे लोकांचे उत्पन्न घटले आहे. लोकांच्या हातात पैसा खेळता ठेवायचा तर लोकांचे उत्पन्न वाढले पाहिजे, रोजगार वाढला पाहिजे. पण हे तेव्हाच शक्य आहे जेव्हा विकासाचे प्रारूप बदलेल. त्यासाठी गरज आहे आजच्या नवउदार धोरणाबाबत फेरविचार करण्याची. मालाला उठाव नसल्यामुळे उत्पादन घटत आहे. त्यामुळे रोजगार घटत आहे. बँकातील थकीत कर्जे वाढत आहेत. त्यामुळे सरकारचे करसंकलन घटत आहे. यामुळे सरकारला कल्याणकारी योजनांवरील खर्चात काटकसर करावी लागत आहे. या दोन्ही बाजूंनी विचार केला, तर शेवटी या नवउदार धोरणाचा भक्ष्य होत आहे तो सामान्य माणूसच! बेरोजगारीमुळे रस्त्यावर येणारी तरुणाई आणि त्यांचे रिकामे हात आणि रिकामी डोकी ही समाजजीवनात अस्थिरता आणल्याशिवाय का राहतील? पराकोटीची विषमता ही नाही रे वर्गातील वाढीच्या असंतोषाला कारणीभूत ठरत आहे. या वाढत्या असंतोषाला नीट वाट मोकळी करून दिली गेली नाही, तर समाजात अनेक विकृती निर्माण होतील, त्याचे काय? आज भारतीय राजकारणात सत्ताधारी असो की प्रमुख विरोधी पक्ष, आर्थिक धोरणांवर त्यांची सहमती आहे. तपशिलात फरक आहे. या नवउदार धोरणांच्या विरोधातील शक्ती विभाजित आहेत. जोपर्यंत पर्यायी धोरणे आणि पर्यायी राजकीय शक्ती आकार घेत नाही तोपर्यंत नवउदार धोरणांचे तारू असेच भरकटत जाणार. पण जसजसे या धोरणातील अंतर्विरोध अधिकाधिक टोकदार बनतील, तसतसे स्वतःच्या भारामुळे ही व्यवस्था कोलमडल्याशिवाय का राहील? •••

**(लेखक बँकिंग क्षेत्रातील ज्येष्ठ तज्ज्ञ आहेत)**

### अनेक विकृती निर्माण होण्याचा धोका

पराकोटीची विषमता ही नाही रे वर्गातील वाढीच्या असंतोषाला कारणीभूत ठरत आहे. या वाढत्या असंतोषाला नीट वाट मोकळी करून दिली गेली नाही, तर समाजात अनेक विकृती निर्माण होतील, त्याचे काय? आज भारतीय राजकारणात सत्ताधारी असो की प्रमुख विरोधी पक्ष, आर्थिक धोरणांवर त्यांची सहमती आहे. तपशिलात फरक आहे. या नवउदार धोरणांच्या विरोधातील शक्ती विभाजित आहेत. जोपर्यंत पर्यायी धोरणे आणि पर्यायी राजकीय शक्ती आकार घेत नाही तोपर्यंत नवउदार धोरणांचे तारू असेच भरकटत जाणार.

# वर्तमानातील अस्वस्थता... भविष्यातील चिंता



**कशाची आहे अस्वस्थता? मी विचार करत होते. रात्री गच्च झालेलं डोकं आणि घशाला पडणारी कोरड, त्रास देत राहतात. कशाचा? मग मीच उत्तर देते. त्रास होतो अस्वस्थतेचा.**



कॉ. मुक्ता मनोहर

रोजच जाणवतात, अवतीभवती दिसतात साक्षात, ज्यांना डांबलं आहे तुरुंगात, ते सगळे. खूप काही कलमं, देशद्रोहासकटची. म्हणे खोटेच पुरावे घुसवले त्यांच्या संगणकात, त्यांच्याच न कळत. पण ज्यांच्याकडे नाहीत कॉम्प्युटर्स असेही खूपच आहेत संख्येनं, ज्यांनी केली आंदोलनं काही तरी जगण्याचे हक्क मागण्यासाठी. ते तर नाडलेले गरीब. कधी कधी आदिवासी, वर्षानुवर्षे तुरुंगवासी झालेले.

आता तर सगळंच पितळही उघड पडलं आहे. पेगॅससकांडाच्या माध्यमातून. मेहेरबान सर्वोच्च न्यायालयाने नेमली आहे म्हणे कमिटी, होईल चौकशी. तोपर्यंत कितीजणं देतील सोडून प्राण स्टेन स्वामींसारखे माहीत नाही. मी विचार करत असते नेहमीच..

एक सनातन सत्य आहे, खाकी वर्दी तर नेहमी सत्तेच्या बाजूचीच असते. पण दिवसेंदिवस वाढताहेत पार्लमेंटमध्ये कायदे करणारे जे आहेत अस्सल अधिकृत गुन्हेगार. त्यांना आता खाजगी सेना नेमण्याची गरज नाही. पब्लिकच्या करातून पोसलं जाणारं अख्खं पोलीस दल आता निर्विवादपणे त्यांच्याच बाजूचं आहे. खाकी वर्दीला आता मुभा आहे, काही निकष ठरवून दिले आहेत, बाकी कोणालाही ठोका, मारा, कलम लावा पण लोकप्रतिनिधींना ताप नको, कायदा सुव्यवस्था बघण्याचा. दहशतीखाली सगळेच असतात चिडीचूप. मोईनूल, मनिष,जयराज किती तरी केसेस कस्टोडियल डेथ आणि एनकाऊन्टरच्याही. पण आता या झाल्या नॉर्मल बातम्याच. किती तरी झाले अभ्यास, छापली पुस्तकं पण कुठेच काही कमतरता नाही. लोकशाहीचा टेंभा मिरवणाऱ्या अमेरिकेत नाही का पोलिसांनी भर लोकांसमोर खुशाल गळा दाबून मारून टाकला जॉर्ज फ्लॉइडला.

आम्हाला हे मान्य नाही, असं म्हणत हातात संविधान आणि डॉ. बाबासाहेबांचा फलक घेऊन बुरखा दूर सारून येऊन बसल्याच की हजारो महिला रस्त्यात. कशानीच हटत नाहीत आणि परिणाम होत नाही त्यांच्यावर बंदुकीच्या दहशतीचा, तेव्हा नाही का प्रसंगोपात्त घडवली गेली एक लक्षणीय दंगल. मग किती नुकसान झालं, कोण मोजणार? ते तर करायचंच होतं. उजाड झालेली घरं, दुकानं आणि मालमत्ता. पण काहींना तर गमवावे लागले हात, पाय, डोळे आणि प्राणही. पोलिसांनी पिटलं मरेस्तोवर, म्हणत असताना वंदेमातरम.

आम्हाला मान्य नाही असं म्हणत जेव्हा उतरला शेतकरी समुदाय रस्त्यात, तेव्हाही आपण ऐकत राहिलो, कसे आहेत ते दहशतवादी खलिस्तानी, देशद्रोही, आंतरराष्ट्रीय कटकारस्थानी इत्यादी वगैरे सगळंच. पाण्याचे फवारे भर थंडीत आणि खिळे, खंदकं अवतीभोवती. केली नाही त्यांनी पर्वा कशा कशाचीच. अजूनही त्यांना चिरडून टाकण्याचे प्लॅन सुरूच आहेत ना? त्यांना साथ करायला निवांत शहरवासियांना कुठे आहे फुरसत? रिलायन्स मॉलमध्ये मिळतील की निवडून चिरलेल्या भाज्यांची तयार पाकिटं.

आमच्या सुरक्षित हाऊसिंग सोसायट्यांमध्ये नव्हता प्रवेशला पहिल्या लाटेतला कोरोना. तरीही सगळेच झाले साशंक एकमेकांविषयी लिफ्टमधून येता जाता. ऑनलाईन जरी केली खरेदी तरी डिलिव्हरी बॉय कशावरून घेऊन येणार नाहीत कोरोना सोसायटीमध्ये, म्हणून किती काळजी होती त्यांना केवळ स्वतःचीच. मग विचारणाही व्हायची हळूच, वाजवली ना थाळी-टाळी आणि लावले ना दिवे? पण तुमच्या बाल्कनीत तर अंधारच दिसला आणि आवाजही ऐकला नाही तुमच्या टाळीचा. तुम्ही नक्की कोण आहात?

दुसऱ्या लाटेने सगळ्यांनाच घेतलं कवेत. तेव्हा वाढली अजूनच घबराहट. गंगा नदीमध्ये वाहून गेलेली हजारो प्रेतं, स्मशानात लागलेल्या रांगा, प्राणवायू नाही, बेड नाहीत, व्हेंटिलेटर नाहीत... व्हेंटिलेटर जे दिले गेले सरकारकडून तेही नादुरूस्त, कोणतंच सत्य समोर यायला धजावत नव्हतं. मग मृतकांचे आकडे बेदरकारपणे लपवून सुरू झाला टीकाउत्सव. विश्वगुरू, व्हॅक्सीन गुरू भारताचा. उत्सवच उत्सव. शाही स्नानाचेही उत्सव! काही वाढत नाहीये कोरोना. येऊ द्यात लाटांवर लाटा.

पायपीट करत संसाराचं चंबूगबाळं डोक्यावर घेऊन आणि तान्ही



## झाडावर चढून रेंजचा शोध

शिक्षण, आरोग्य आणि इतर सगळ्या सगळ्यांचंच झालं संपूर्ण खाजगीकरण, की खरा विकास होणारच आहे. विद्यापीठात, कॉलेजात शिक्षकच नाहीत आणि परीक्षाही होतात सावकाश सावकाश. चार वर्षाच्या कोर्सला कधी लागतात सहा वर्ष, तर कधी आठ. ज्यांना परवडतं ते करतात पलायन परदेशात आणि ठोकतात दावे स्वतःच्या देशभक्तीचे एनआरआय म्हणून. विद्यापीठांवर हल्ले आणि आवारात गोशाळा. विद्यार्थी झाडावर चढून रेंज शोधतात ऑनलाईन शिक्षणाची.

लेकरंही काखोटीला मारून किती चालत गेले, किती मेले, नाहीत आकडे त्याचेही आणि कोर्टाकडे नाही गेलं रेकॉर्डही कधीच. कोर्ट म्हणालं, असं काही झालेलंच नाही.

शिक्षण, आरोग्य आणि इतर सगळ्या सगळ्यांचंच झालं संपूर्ण खाजगीकरण, की खरा विकास होणारच आहे. विद्यापीठात, कॉलेजात शिक्षकच नाहीत आणि परीक्षाही होतात सावकाश सावकाश. चार वर्षाच्या कोर्सला कधी लागतात सहा वर्ष, तर कधी आठ. ज्यांना परवडतं ते करतात पलायन परदेशात आणि ठोकतात दावे स्वतःच्या देशभक्तीचे एनआरआय म्हणून. विद्यापीठांवर हल्ले आणि आवारात गोशाळा. विद्यार्थी झाडावर चढून रेंज शोधतात ऑनलाईन शिक्षणाची.

कधी काळी झाली राजेशाही खालसा. सगळे झाले दाखल लोकशाहीच्या दरबारात. पण धर्मसत्तांचे आखाडे अबाधित. आधुनिक विज्ञान-तंत्रज्ञाच्या मदतीनं करतात प्रचार आमच्याकडल्या जुन्या तथाकथित विज्ञानाचा आणि होते हत्या विज्ञान प्रचारकांची. पाताळात खोल खोल जाऊन ३३ कोटी देवांमधून एका भाग्यवंताची झाली आहे निवड हिंदू धर्माचा प्रमुख देव म्हणून. त्यानं त्यागली होती पत्नी सीता. पण रामपंचायतनांत ती असते रामाच्या मांडीवर स्थानापन्न. या भव्य मंदिरात सीतामाईचं नक्की काय स्थान? केवळ मंदिरच नाही बांधणार आम्ही. होणार आहेत खूप भव्य भव्य पुतळे आणि शिवाय पार्लमेंटसाठी आणि प्रधान सेवकासाठी नवी इमारत.

मुळीच विचारू नका प्रश्न हाथरसच्या आणि अनेक ठिकाणच्या बलात्कार पीडितांबद्दल. तसं काहीही घडलेलं नसतं, असं सांगतात समोर येऊन सरकारी अधिकारीच. पण आहेतच ना खूप जीवघेण्या घडामोडी. झुंडींनी स्वतःच घेतले आहेत अधिकार अल्पसंख्याकांना भोसकून किंवा पिटून कसंही ठार मारण्याचे. दाखवायला कारण कोणतंही असेल. एक नक्की प्रश्न न विचारता मान्य करा, की अन्याय्य काही झालेलं नाही. तर मग माझी अस्वस्थता कशासाठी? मी विचार करते.

परवाच म्हणे बायडेन म्हणाले आपल्या प्रधान सेवकाला. तुमच्याकडला मिडिया किती छान आहे! तेव्हा अमेरिकेतले तमाम पत्रकार संतापले, प्रेस स्वातंत्र्यामध्ये जे आहेत १८० मध्ये १४२ वे, त्यांच्याशी कशाला करता तुलना आमच्या यूएसएच्या पत्रकारांची? आपण कशी अपेक्षा करणार? रोज वाढत जाणाऱ्या बेकारांच्या इंडेक्स आणि सरकारकडून मोफत धान्य, शिवाय फोटोसकटची थैली, घ्याव्या लागणाऱ्या जनतेकडून की त्यांनी उठवावा आवाज?

अस्वस्थ करणाऱ्या वर्तमानातील अस्वस्थतेचा मी जेव्हा विचार करते, तेव्हा भूतकाळ येऊन बसतो समोर आणि हसतो छद्मीपणे... शोधा शोधा, आहेत का कुठे आशेचे किरण? का सुटून गेले सगळेच वर्तमानाच्या प्रवाहाकडे येता येता..सांभाळा अवनीसह.. नद्या, डोंगर, झाडं, जंगलं, खनिजं, प्राणी-पक्षी, जीव-जंतू-किडेमकोडे आणि सुंदर फुलपाखरं.. न जाणो नाही तर भविष्यच होऊन जाईल विलीन वर्तमानाच्या ऱ्हासात. ●●●

**(लेखिका पुणे महानगरपालिका कामगार युनियनच्या जनरल सेक्रेटरी आणि लेखिका आहेत)**



# दहशतवाद अन् धार्मिक राष्ट्रवादाने जग अस्वस्थ



**दहशतवादाने त्रस्त असलेल्या जगाची आर्थिक नाडी कोरोना महामारीने आवळली. त्यातच धार्मिक राष्ट्रवादही फोफावला. हे सारं चिंताजनक, म्हणून अस्वस्थ करणारं आहे.**

भास्कर नाशिककर

एकविसाव्या शतकातील एकवीस वर्षांची वाटचाल आपण पूर्ण करत आलो आहोत. एक पंचमांश शतक संपत आले आहे. त्यामुळे सिंहावलोकनासाठी हा कालावधी निश्चितच पुरेसा ठरू शकतो. आतापर्यंत जग आणि भारत यांचा विचार करत राजकारण, समाजकारण, संरक्षण, विज्ञान आणि तंत्रज्ञान, पर्यावरण आणि नैसर्गिक आपत्ती, सरकारी यंत्रणा, व्यवस्थात्मक बाबी, दहशतवाद, महिला अशा अनेक आघाड्यांवर नजर टाकली तरी आगामी उर्वरित सत्तर-ऐंशी वर्षातील या शतकातील वर्षे कशी जाऊ शकतात, माणसाचे जगणे कसे बदलू शकते, त्याच्यासमोरची आव्हाने कशी आक्राळविक्राळ होऊ शकतात, तंत्रज्ञान वेगाने कूस बदलत असताना त्याच्यासमोर माणूस खुजा तर होणार नाही ना, या बाबींची उकल होऊ शकते. दोन दशकांच्या वाटचालीतील प्रश्न, त्यावर निघालेले तोडगे, जगण्यात आलेली स्थित्यंतरे पाहिली तरी खूप काही बाबींचा अन्वयार्थ लावता येऊ शकतो.

## परंपरागत ढाच्याला क्रांतीचे हादरे

मुळात एकविसावे शतक उगवले तेच राजकीय, सामाजिक, सामरिक, तंत्रज्ञान आणि विज्ञान तसेच पर्यावरण, अर्थकारण, सुरक्षिततेसमोर दहशतवादाची नवनवी आव्हाने घेऊन. गेल्या वीस वर्षांत त्यानिमित्ताने जगाची फेरमांडणीच केली गेली. ही प्रक्रिया अद्याप थांबलेली नाही. सध्याची परिस्थिती लक्षात घेता आगामी काही वर्षात ही प्रक्रिया अधिक गतिमान होईल. त्यानिमित्ताने राष्ट्रा-राष्ट्रांतील ध्रुवीकरणाची प्रक्रिया अधिक पक्की होईल. पश्चिम आशियात, त्यातही अनेक अरब राष्ट्रांत सोशल मिडियाच्या परिणामकारक वापरामुळे विविध प्रकारच्या क्रांत्या होऊन तेथे सत्तांतर झाले. राष्ट्रा-राष्ट्रांतील संबंधांची फेरमांडणीही यानिमित्ताने घडत गेली. नोव्हेंबर २००३ मध्ये रोझ रिव्होल्युशनने जॉर्जियातील गणित बदलले. दारफूर युद्ध झाले. डिसेंबर २००४ मध्ये युक्रेनमध्ये ऑरेंज रिव्होल्युशन झाले. याच दरम्यान किरगिझिस्तानात टुलिफ रिव्होल्युनशन झाली. ऑक्टोबर २०११ मध्ये अरब स्प्रिंग रिव्होल्युशन झाली, या क्रांतीचे लोण अन्य देशांतही पसरत गेले. त्याने ट्युनिशिया, इजिप्त, लिबियानंतर येमेन, बहारीनमध्ये हातपाय पसरले. सत्तांतराचे नवे पर्व आणि लोकशाही मूल्यांची रुजवात करत एकाधिकारशाहीला मूठमाती दिली गेली. या क्रांतीपर्वाने जगाच्या नकाशावर मोकळे अवकाश निर्माण केले. २०१३ मध्ये इजिप्तचे अध्यक्ष मोहंमद मोर्शी यांना लष्कराने पदच्युत करून सत्तेची सूत्रे हाती घेतली होती. अनेक राष्ट्रांत असे सत्तांतरपर्व जगाने अनुभवले.

## चीन - ध्रुवीकरणाचा नवा आयाम

शीतयुद्धोत्तर काळात रशियाचे आव्हान कमकुवत होत जात असतानाच चीन रशियाच्या जागी येत गेल्याचे दिसत असून गेल्या दहा वर्षात ते अधिक तीव्रतेने जाणवू लागले आहे. एकध्रुवीय अंमल करू पाहणाऱ्या अमेरिकेने पश्चिम आशियापासून अफगाणिस्तान आणि इंडो-पॅसिफिक क्षेत्रात आपला एकछत्री अंमल निर्माण केला होता. सीरिया, लिबिया, इजिप्त, इराण ते अगदी ऑस्ट्रेलियापर्यंत अंकुश निर्माण केला होता. त्याला चीनने हादरे देणे सुरू केले. अमेरिकेने अफगाणिस्तानशी युद्ध आरंभलेले असतानाच, मार्च २००३ मध्ये इराकवर दहशतवादाला थारा देत जगाला त्यापासून धोका आहे, असे सांगत युद्ध पुकारले. अध्यक्ष सद्दाम हुसेनने त्याला कडवा प्रतिकार केला, पण अमेरिकेच्या जोडीला अन्य मित्र देशही युद्धात उतरल्याने प्रतिकाराची धार कमी झाली. अखेर, ३० डिसेंबर २००६ रोजी सद्दाम हुसेन परागंदा झाल्यानंतर त्याला शोधून ठार केले गेले. या युद्धाचा अमेरिकेने २०११ मध्ये शेवट केला. पण इसिसचे आव्हान निर्माण होण्याआधी काही महिने २०१४ मध्ये अमेरिकेने पुन्हा इराकमध्ये हस्तक्षेप केला होता. २९ मार्च २०११ रोजी अशाच स्वरुपाची कारवाई अमेरिकेने नाटो संघटनेच्या फौजांना हाताशी धरून, संयुक्त राष्ट्राच्या ठरावाचा आधार घेऊन लिबियाशी युद्ध पुकारले होते. २० ऑक्टोबर २०११ रोजी लिबियाचा सर्वेसर्वा मुअम्मर गद्दाफीला पकडून ठार केले. यानंतर सीरियातील यादवीला

सुरुवात झाली, ती अद्याप संपलेली नाही. थोडक्यात, अमेरिका आणि तिच्या मित्र देशांचा असा जगभर एकछत्री अंमल सुरू झाला होता.

## आक्रमक, विस्तारवादी शी जिनपिंग

अमेरिकेच्या या एकछत्री अंमलाला ब्रेक लागला तो चीनने २०१० नंतर स्वीकारलेल्या सक्रियतेच्या धोरणाने. चीनमध्ये शी जिनपिंग यांनी १४ मार्च २०१३ रोजी चीन कम्युनिस्ट पक्षाचे सर्वे सर्वा बनले. अध्यक्षपद स्वीकारल्यानंतर, चीनचे आक्रमक आणि विस्तारवादी रूप दाखवायला सुरुवात केली. तोपर्यंत चीनने विविध क्षेत्रात प्रगतीची नवी शिखरे पादाक्रांत केली होती. त्याद्वारे जगाला आपली ताकद दाखवून वाकवण्याचा प्रयत्न शी जिनपिंग यांनी सुरू केला. आजच्या घडीला आधुनिक चीनचे शिल्पकार माओ त्से तुंग यांच्याइतकेच बळकट आणि आदराचे स्थान शी यांनी निर्माण केले आहे. तहहयात चीनचे सर्वेसर्वा राहू, अशी व्यवस्था त्यांनी करून घेतली आहे. चिनी कम्युनिस्ट पक्षावर त्यांची मांड पक्की आहे. पूर्व, मध्य आशिया आणि युरोप यांना जोडण्यासाठी त्यांनी सुरू केलेला वन बेल्ट वन रोड प्रकल्प चीनच्या आर्थिक, सांस्कृतिक, सामरिक, व्यापारी विस्तारवादाचे प्रतीक आहे. अनेक देशांत रेल्वे, रस्त्यांसह बंदरे, विमानतळ, पायाभूत प्रकल्पांच्या उभारणीतून त्या देशात गुंतवणूक, त्याद्वारे सवलती, त्यांना कर्जे देऊन व्यवसाय आपल्या नियंत्रणाखाली ठेवले आहेत. पाकिस्तानातील ग्वादर बंदर ते शिनजियांग प्रांतादरम्यान असाच चीन-पाकिस्तान इकॉनॉमिक कॉरिडॉर ६० अब्ज डालर खर्चातून उभारला आहे. श्रीलंकेतील हंबनटोटा बंदर त्यांनी असेच विकसित करून भारताला नाविक आव्हान दिले आहे. विस्तारवादी चीनने दक्षिण चीन समुद्रात भराव टाकून बेटे निर्माण करून तेथे नाविक तळ उभारला आहे. आफ्रिकेतील अनेक गरीब देशांत बेल्ट, रोड उभारणी करून आणि त्या देशांना कर्जे देऊन बटीक केले आहे. अनेक अजस्त्र चीनी कंपन्या अमेरिकेला आव्हाने देऊ लागल्या आहेत. त्यात अमेरिकेच्या अध्यक्षपदी येत असताना डोनाल्ड ट्रम्प यांनी अमेरिका फर्स्टचा नारा दिला होता. त्यांनी सूत्रे हाती घेतली तेव्हा अमेरिकेची व्यापारातील तूट ७३५ अब्ज डॉलर होती, ती वाढून २०२० मध्ये ९१० अब्ज डॉलर झाली. त्यांनी ६ जुलै २०१८ रोजी चिनी मालावर अतिरिक्त कर लावण्याचा निर्णय घेतला आणि तेथून अमेरिका-चीन व्यापार युद्ध पेटले, ते अद्याप कायम आहे. ट्रम्प जाऊन ज्यो बायडेन अमेरिकेचे अध्यक्ष झाले तरी परिस्थिती बदलली नाही. दुसरीकडे, चीनचे हे वाढते सामरिक, आर्थिक आव्हान लक्षात घेऊन अमेरिकेने त्याला इंडो-पॅसिफिकसह आशियात रोखण्यासाठी व्यूहरचनात्मक मांडणी सुरू केली आहे. त्याअंतर्गत क्वॉड, एशियन क्वॉड अशा निवडक कमी संख्येने देशांची मोट बांधत चीनला रोखणे चालवले आहे. शीतयुद्धोत्तर काळात रशिया नव्हे तर चीन हाच जगात आपला प्रमुख स्पर्धक आहे, हे ओळखून त्यांनी संरक्षणाची कडी उभारणे चालवले आहे. त्याने भारत आणि ऑस्ट्रेलियाला अनेक ठिकाणी हाताशी धरले आहे.

### कोरोना आणि जग

२०१९ च्या अखेरीस चीनमधून कोरोनाचा विषाणू जगभर पसरला. (की पसरवला गेला, हाही प्रश्न अनुत्तरीत आहे. जागतिक आरोग्य संघटना अंतिमतः त्याबाबत निष्कर्षप्रत आलेली नाही). त्यानंतर ट्रम्प यांनी अध्यक्षीय निवडणुकीच्या तोंडावर त्याला चिनी विषाणू असे नामाभिधान दिले. कोरोनाने जगासमोर नवे आव्हान निर्माण केले आहे. त्यावर लसी सापडल्या. तरीही तो अद्याप आटोक्यात आलेला नाही. त्याने जागतिक अर्थव्यवस्थेचे तीन तेरा वाजवले. २५ कोटींवर लोकांना त्याची बाधा आणि ५० लाखांवर नागरिकांचा त्याने बळी घेतला. भारतातही लाखोंचा बळी घेतला आहे. सुमारे शंभर वर्षांपूर्वी फ्ल्यूच्या साथीने असाच हाहाकार माजला होता. रुग्णालये कमी पडली होती, लाखोंचा बळी गेला. त्याची पुनरावृत्ती २०२०-२१ मध्ये जगभर झाली. दर १०० वर्षांनी महामारी येते, हा समजही दृढ झाला. यानिमित्ताने व्यवस्थात्मकदृष्ट्या सत्ताधारी अधिक बलवान झाल्याचे, समाजाची सूत्रे त्यांच्या हाती एकवटल्याचे, त्यांनी काहीशी मनमानी केल्याचे, सरकारने अमर्याद अधिकार जाणीवपूर्वक हाती घेतल्याचे निदर्शनाला आले. त्यामुळेच लोकशाही धोक्यात आल्याची चिंताही जाणकारांनी व्यक्त केली.

## बुश ते बायडेन

एकविसाव्या शतकाच्या सुरुवातीला अमेरिकेच्या अध्यक्षपदी जॉर्ज बुश होते. त्यांनी दहशतवादाविरुद्ध पुकारलेल्या लढ्याला अमेरिकी जनतेने बळ दिले. ते २००९ पर्यंत पदावर होते. त्यांच्यानंतर अमेरिकेच्या इतिहासात पहिल्या आफ्रो-अमेरिकन वंशाचे बराक ओबामा अध्यक्ष झाले. ते २००९-२०१६ या कालावधीत अध्यक्षपदी राहिले. 'वुई कॅन विन' ही त्यांची घोषणा खूप गाजली. ओबामा यांनी इराणवरील निर्बंध शिथील करून चर्चेचे प्रयत्न केले. त्यांच्यानंतर 'अमेरिका फर्स्ट'चा नारा देत डोनाल्ड ट्रम्प अध्यक्षपदी आले. बेछूट, बेताल, खोटारडी विधाने करणे, सगळ्या गोष्टी सोशल मीडियाद्वारे लोकांना सांगण्यावर त्यांचा भर होता. त्यांनी अमेरिका हिताला अग्रक्रम देत चीनशी व्यापारयुद्धाला तोंड फोडले. उत्तर कोरियाचे हुकुमशहा कीम यांच्याशी चर्चेचाही प्रयत्न केला. अमेरिकेच्या इतिहासात लाजिरवाणा पराभव त्यांच्या वाट्याला आला. तथापि, लोकशाहीची लक्तरे वेशीला टांगत जनमताच्या कौलाचा आदर करण्याऐवजी त्याला नाकारणे आणि दडपशाहीने 'कॅपिटॉल हिल'ला वेढा घालून व्यवस्थेला ओलीस धरण्याचाही प्रयत्न त्यांनी केला. त्यांच्या जागी ज्यो बायडेन २०२१ मध्ये अध्यक्षपदी आले. त्यांनी ट्रम्प यांचा निर्णय मान्य करत दोहा करारानुसार

अफगाणिस्तानातून सैन्यमाघारी घेतली, नामुष्कीही पत्करली. तथापि, चीन हाच प्रतिस्पर्धक मानून त्याला घेरण्यासाठी तीन-चार, तीन-चार देशांची आघाडी करून त्यांची संघटना उभी करण्यावर त्यांचा भर आहे. मानवी हक्कांची बूज राखण्याला त्यांचे प्राधान्य आहे. पुन्हा एकदा आंतरराष्ट्रीय संघटनेत, समुदायात अमेरिकेचा सहभाग असण्यावर त्यांनी भर दिलाय, ट्रम्प यांनी घेतलेली माघार त्यांनी रोखली.

## सबकुछ पुतीन

कम्युनिस्ट राजवटीने खिळखिळा झालेला रशिया सबकुछ व्लादिमीर पुतीन असा जप करत आहे. सोव्हिएत संघराज्याच्या काळात केजीबी ही गुप्तचर संघटना होती. तिचे प्रमुख राहिलेले पुतीन रशियाला गतवैभव आणून देऊ पाहात आहेत. तथापि, अध्यक्ष, पंतप्रधान, पुन्हा अध्यक्ष आणि आता २०३६ पर्यंत त्या पदावर राहण्यास घटनात्मक अधिष्ठान मिळवून सर्वेसर्वा झालेल्या पुतीन यांनी पश्चिम आशिया, सीरियात अमेरिकेला आव्हान दिले आहे. चीनशी जवळीक वाढवली आहे. विरोधकांना तुरुंगात डांबणे, विषप्रयोग करून त्यांना संपवणे या मार्गाने ते एकखांबी तंबू होऊ पाहात आहेत. याचे उदाहरण म्हणजे पुतीनचे कट्टर विरोधक नवान्ली हे होत.

## आण्विक कार्यक्रम

अमेरिकेच्या नेतृत्वाखाली इराणचा अणूकार्यक्रम रोखण्यासाठी दोनदा प्रयत्न झाले. बराक ओबामा असताना तोडग्याचेही प्रयत्न झाले, पण त्यांच्यानंतर सत्तेवर आलेल्या ट्रम्प यांनी कडक भूमिका घेतली. त्यामुळे पुन्हा संबंध बिघडले. २०१९-२० मध्ये पुन्हा इराणवर निर्बंध घातले गेले. असेच प्रयत्न उत्तर कोरियाच्या आण्विक कार्यक्रमाबाबत झाले. त्यावर मुळात निर्बंध आहेतच, पण चर्चेने तोडग्याचे प्रयत्न झाले. डोनाल्ड ट्रम्प यांनी उत्तर कोरियाचे सर्वेसर्वा किम जोंग ऊन यांच्याशी शिखर वार्ता केली. पण त्यांनी अमेरिकेला आपल्या अण्वस्त्राच्या टापूखाली आणणे सोडले नाही.

## दहशतवादाविरुद्धचा लढा अपुरा

या कालावधीत जगाने दहशतवादाचा आक्राळविक्राळ चेहरा पाहिला. ज्या अमेरिकेने दहशतवाद संपवण्याचा निर्धार करून युद्धारंभ केला, त्याच अमेरिकेला दहशतवादी ठरवल्या गेलेल्या तालिबान्यांच्या हाती अफगाणिस्तानची सत्ता देऊन काढता पाय घ्यावा लागला. याच काळात मूलतत्त्ववाद अधिक टोकदार व्हायला लागला होता. युरोप आणि विशेषतः ब्रिटन, फ्रान्स, उत्तरकाळात जर्मनी, न्यूझीलंड ते अगदी ऑस्ट्रेलिया, श्रीलंकेसारख्या देशांनाही त्याचा फटका बसला. त्याने तेथील जनतेत अस्वस्थता वाढीला लागली. ओसामा बिन लादेनच्या नेतृत्वाखालील अल कायदा ही दहशतवादी संघटना अधिक प्रबळ झालेली होती, तिचा सगळीकडे गवगवा होता. तिच्याशी कडव्या प्रतिकाराचा प्रयत्न अमेरिकेने केला होता, काही कारवायाही केल्या होत्या. अल कायदाने अमेरिकेचा मानबिंदू असलेल्या न्यूयार्क शहरातील ट्विन टॉवर या बिझनेस सेंटरवर अपहरण केलेली विमाने धडकवली. तीत जगभरातून आलेल्या तीन हजारांच्या आसपास नागरिकांचा बळी गेला.

### कोरोना आणि जग

२०१९ च्या अखेरीस चीनमधून कोरोनाचा विषाणू जगभर पसरला. त्यानंतर ट्रम्प यांनी अध्यक्षीय निवडणुकीच्या तोंडावर त्याला चिनी विषाणू असे नामाभिधान दिले. कोरोनाने जगासमोर नवे आव्हान निर्माण केले आहे. त्यावर लसी सापडल्या. तरीही तो अद्याप आटोक्यात आलेला नाही. त्याने जागतिक अर्थव्यवस्थेचे तीन तेरा वाजवले.

## अल कायदा आणि इसिस

अमेरिकेत अद्यापही त्या हल्ल्याची दहशत असल्याचे अनेकदा स्पष्ट झाले आहे. तत्कालीन अध्यक्ष जॉर्ज बुश यांनी लादेनला आश्रय देणाऱ्या अफगाणिस्तानवर हल्ला चढवला. अफगाणिस्तानात दोन दशकांच्या युद्धात तीन ट्रिलीयन डॉलर खर्चूनही दहशतवाद संपला नाही, उलट नवनवी रुपं धारण करून तो सतावतच राहिला. अमेरिका आणि मित्रराष्ट्रांच्या नाटोचे पाच हजारांवर सैनिक, अफगाणिस्तानचे सैनिक आणि नागरिक असे काही लाख मारले गेले. अखेर, ओसामा बिन लादेनला २ मे २०११ रोजी पाकिस्तानातील अबोटाबाद येथे अमेरिकी सील पथकाच्या सैनिकांनी त्याला ठार केले. त्याची पाकिस्तानला काणकुणही नव्हती. २००२ मध्ये चेचेन्याच्या दहशतवाद्यांनी रशियाची राजधानी मॉस्कोतील थिएटरमध्ये घडवलेल्या हिंसाचारात २०० वर नागरिक ठार झाले. १-३ सप्टेंबर २००३ दरम्यान रशियातीलच शाळेवर दहशतवाद्यांनी हल्ला करून ३३४ जणांना ठार केले होते. अशाच स्वरुपाचा हल्ला १६ डिसेंबर २०१४ रोजी पाकिस्तानातील शाळेवर करून तेहरीक-ए-तालिबानने १३० जणांचा बळी घेतला होता. इसिस (इस्लामिक स्टेट ऑफ इराक अँड सीरिया) या दहशतवादी, इस्लामी मूलतत्ववादी संघटनेचा उदय आणि अस्तही या शतकाच्या दुसऱ्या दशकात झाला. जगभरातील युवक त्यात सामील झाले होते. महिलांवर त्यांनी अनन्वित अत्याचार केले. त्यांना पशूसमान वागणूक दिली होती. त्यांच्या पावलावर पाऊल टाकून २०१७ मध्ये इस्लामिक स्टेट ऑफ इराक अँड लेवांट (आयएसआयएल) ही संघटना इराक, इजिप्तमध्ये कार्यरत राहिली. २०१५ च्या जानेवारीत नायजेरिया आणि परिसरात बोको हराम या दहशतवादी संघटनेने आयएसआयएलशी नाते सांगत दोन हजार लोकांचे शिरकाण केले. याच वर्षी फ्रान्सची राजधानी पॅरिस अनेक दहशतवादी कृत्यांनी हादरले.

जगभरातील अनेक दहशतवादी संघटनांनी विविध भागात पाय पसरले आहेत. त्यांना पोसणाऱ्या पाकिस्तानच्या माजी पंतप्रधान बेनझीर भुत्तो याही २००८ मध्ये दहशतवादी हल्ल्यात बळी गेल्या. तरीही पाकिस्तानने तालिबान, अल कायदा, भारतात दहशत माजवणारे जैश-ए-महंमद, हिज्बुल मुजाहिदीन, लष्करे तैय्यबा यांसारख्या



संघटनांना पोसणे सुरूच ठेवले. पाकिस्तानचा बलुचिस्तान, अफगाणिस्तानशी सीमावर्ती असलेला भाग अद्यापही धुमसत आहे.

## मानवी हक्कांची खंदी पुरस्कर्ती

मलाला युसुफझाई या पाकिस्तानी शाळकरी मुलीवर दहशतवाद्यांनी हल्ला चढवून तिला मृत्यूच्या वाटेवर ढकलेले होते. पण सुदैवाने ती वाचली. तिचे पुढील शिक्षण ब्रिटनमध्ये झाले. नंतर तिला शांततेसाठीचे नोबेलही देण्यात आले. आता ती मानवी हक्काची खंदी पुरस्कर्ती आणि दहशतवादाची कट्टर विरोधक आहे.

## यूपीएची कारकीर्द

एकविसाव्या शतकात प्रवेश केलेल्या भारतानेदेखील अनेक आव्हानांवर मात करत प्रगतीची नवनवी शिखरे काबीज केली. सक्षम, समर्थ लोकशाही आणि आपले सामर्थ्य या काळात सिद्ध करून दाखवले. आर्थिक आघाडीवर झेप घेतली तर सामरिक आव्हानांना तोंड देत शत्रूला प्रसंगी सुनावले. त्यानेही न बधल्यास त्याच्या भूमीवरही त्याला आपण धडा शिकवू शकतो, हे दाखवून दिले. विसाव्या शतकाच्या अखेरीला सुरू असलेला आघाडी सरकारचा प्रयोग पुढे चौदा वर्षे चालला, पण त्यानंतर भारतीय जनता पक्षाच्या रुपाने देशाला एकपक्षीय सरकारही मिळू शकले. २०१९ च्या सार्वत्रिक निवडणुकीत भाजपच एकमेव अशी स्थिती निर्माण झाली.

२००१ च्या जुलैमध्ये तत्कालीन पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी आणि पाकिस्तानचे लष्करशहा परवेझ मुशर्रफ यांच्यात झालेल्या आग्रा बैठकीने मैत्रीचे नवे पर्व सुरू झाल्यासारखे वाटले. तथापि, संसदेवर झालेल्या दहशतवादी हल्ल्याने सारे प्रयत्न पाण्यात गेले. त्यानंतरही पाकिस्तानने भारताच्या प्रयत्नांना खीळच घातली. वाजपेयी सत्तेवर असताना, २००४ मध्ये लोकसभेची निवडणूक झाली. शायनिंग इंडिया अशी घोषणा देत निवडणूक लढली गेली, पण जनतेने भाजपच्या नेतृत्वाखालील वाजपेयी सरकारला नाकारले. त्यानंतर संयुक्त पुरोगामी आघाडीचे (यूपीए) मनमोहनसिंग यांच्या नेतृत्वाखालील काँग्रेस आघाडीचे सरकार सत्तेवर आले. २००९ च्या सार्वत्रिक निवडणुकीतही जनतेने यूपीएच्या बाजूने कौल दिला. पण त्यांची कारकीर्द गैरव्यवहारांनी गाजली. टू जी स्पेक्ट्रम, कोळसा खाण वाटप, राष्ट्रकुल स्पर्धा आयोजन अशा अनेक गैरव्यवहारात मंत्री अडकल्याने सरकारची प्रतिमा डागाळली. तथापि, याच काळात शिक्षण हक्क, ग्रामीण भारतासाठी महात्मा गांधी रोजगार हमी योजना, ईशान्य भारताच्या विकासाला चालना, पर्यावरण रक्षणाला अग्रक्रम, आधार योजना, अन्न सुरक्षा अशा योजना सुरू केल्या होत्या. याच काळात ज्येष्ठ समाजसेवक आण्णा हजारे यांनी लोकपाल आणि माहितीचा हक्क यासाठी सरकारकडे पाठपुरावा केला होता. त्यासाठी दिल्लीतील रामलीला मैदानावर आंदोलन केले. परिणामस्वरुप नंतरच्या काळात दोन्हीही हक्क जनतेला मिळाले.

## नरेंद्र मोदी पर्व

२०१४ च्या सार्वत्रिक निवडणुकीत भाजपच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे सरकार सत्तेवर आले. त्याआधी दोन वर्षे भाजपमध्ये नेतृत्व निश्चितीचे पर्व सुरू होते. वाजपेयी वार्धक्याने दूरच होते. लालकृष्ण अडवानी, मुरली मनोहर जोशी ही ज्येष्ठ मंडळीही दूर होत गेली आणि सूत्रे तरुणांकडे गेली. नरेंद्र मोदी गुजरातचे मुख्यमंत्री होते. त्यांनी तेरा वर्षे सलग राज्याचे नेतृत्व करून देशाला विकासाचे गुजरात मॉडेल दिले होते. त्यांनाच भाजपने पंतप्रधानपदाचे उमेदवार घोषित केले. त्यांनी 'सबका साथ, सबका विकास' ही घोषणा देत सत्ता काबीज केली. २०१९ मधील सार्वत्रिक निवडणुकीनंतर भाजपला आणखी भरभरून प्रतिसाद जनतेने दिला. मोदी दुसऱ्यांदा पंतप्रधान झाले. त्यांच्या कारकीर्दीत त्यांनी बेटी बचाव-बेटी पढाव, स्वच्छ भारत अभियान, स्मार्ट सिटी योजना, अमृत योजना, पायाभूत सुविधांच्या विस्तारासाठी कोट्यवधी रुपयांच्या योजना, नियोजन आयोगाच्या जागी निती आयोग, स्वतंत्र रेल्वे अर्थसंकल्प बंद करून त्याला नेहमीच्या अर्थसंकल्पात स्थान देणे, लष्कराच्या आधुनिकीकरण आणि बळकटीकरणासाठी कमांडर इन चिफ आणि कमांड थिएटरची निर्मिती, वस्तू आणि सेवाकर (जीएसटी), काळा पैसा बाहेर काढण्यासाठी नोटबंदी (डिमॉनिटायझेशन) आणि त्यानिमित्ताने लोकांना डिजीटल व्यवहाराची सवय लावली. पण अपेक्षेप्रमाणे काळा पैसा बाहेर आलाच नाही. मात्र त्याने देशाच्या अर्थकारणाला हादरा बसला, तो अद्यापही कमी-अधिक प्रमाणात जाणवत आहे.

## कोरोनाचे कडवे आव्हान

गेल्या दीड वर्षाहून अधिक काळापासून कोरोनामुळे अर्थकारणापासून आरोग्यापर्यंत अनेक अडचणी निर्माण झाल्या. अर्थचक्र थांबल्याने उद्योग डबघाईला, बेरोजगारीत वाढ, रोजीरोटीचा प्रश्न, बंद उद्योगांना पॅकेजची गरज भासू लागली. सरकारने वीस लाख कोटींचे पॅकेज दिले. दुसऱ्या लाटेच्या हालामुळे सरकारवर टीकेची झोड उठली. बेड, आक्सिजन, तज्ञ डॉक्टर, आरोग्य कर्मचारी, प्रतिबंधात्मक औषधे, म्युकरमायकोसीसवरील औषधांचा तुटवडा

होता. स्मशानात अंत्यसंस्कारासाठी प्रतीक्षा करावी लागत होती. लसीकरणातही गोंधळ झाल्याने न्यायालयाने हस्तक्षेप करून केंद्राला त्याची सूत्रे हाती घ्यायला भाग पाडले. आता सर्व आघाड्यांवर सरकारने केलेल्या प्रयत्नांना यश आले आहे. मोदी सरकारच्या दुसऱ्या कारकीर्दीत शेतकरी, शेतमाल विक्रीबाबत तीन कायदे केले गेले. त्यामुळे शेतकरी देशात कोठेही शेतमाल विकायला मोकळे झाले, ते कंपन्यांशी करार करून शेतमाल घेऊन विक्री निश्चित करू शकतील, अशी मुभा दिली गेली. तथापि, त्याला शेतकऱ्यांनी विरोध केला आहे. गेले वर्षभर हे कायदे रद्द करावेत यासाठी शेतकरी दिल्लीच्या सीमेवर आंदोलन करत आहेत. अयोध्येतील बाबरी मशिदीची जागा श्रीराममंदिरासाठी देण्याचा निवाडा सर्वोच्च न्यायालयाने दिला. तसेच त्यापासून काही अंतरावर मशिदीसाठीही जमीन देण्याचा आदेश न्यायालयाने दिला. त्यानुसार दोन्हींच्याही कामांना सुरुवात झाली आहे. अयोध्येतील राममंदिरासाठी गेल्या ५ ऑगस्टला पंतप्रधान नरेंद्र मोदींनी भूमिपूजन केले. मंदिराचे काम वेगात सुरू आहे. आयोध्येत उत्तर प्रदेश सरकारने व्यापक विकासकामे सुरू केली आहेत.

## कलम ३७० रद्द करून केंद्रशासित प्रदेश

मोदींचे सरकार दुसऱ्यांदा सत्तेत आल्यानंतर जम्मू-काश्मीरला वेगळा दर्जा देणारे राज्यघटनेतील कलम ३७० तसेच मालमत्तेबाबतचे कलम ३५ ए रद्द करण्यात आले. तसेच जम्मू-काश्मीर आणि लडाख असे दोन केंद्रशासित प्रदेश करण्याचा निर्णय ५ ऑगस्ट २०१९ रोजी घेतला. त्याचे तीव्र पडसाद तेथे उमटले, पण सरकारने कडक प्रतिबंधात्मक उपाय योजल्याने परिस्थितीवर नियंत्रण ठेवता आले. या काळात तेथील निवडक राजकीय नेत्यांना स्थानबद्ध केले होते, तसेच दूरसंचार सेवा मर्यादित ठेवल्या होत्या. तेथे लोकशाही प्रक्रिया सुरू करण्यासाठी सरकारने पावले उचलली आहेत. तथापि, काही महिन्यांपासून काश्मिरात वाढलेल्या दहशतवादी कारवाया चिंतेत भर घालत आहेत. पाकिस्तान दहशतवादाला प्रोत्साहन देत आहे.

## डोकलाम ते लडाख

चीनने डोकलाम या भारत, भूतान आणि चीन यांच्या सीमेवरील भूभागावर २०१७ मध्ये घुसखोरी केली होती. भारताने भूतानच्या रक्षणार्थ कारवाई केली. ७३ दिवस भारत-चीनचे सैन्य आमनेसामने होते. तथापि, चीनने भारताला एप्रिल २०२० मध्ये कोरोनाचा कहर सुरू असताना लडाखमध्ये आव्हान दिले. भारताचा काही भूभाग बळकावला, उभय देशांच्या सैनिकांत शस्त्रविहीन चकमक झाली. दोन्हीही देशांना जीवितहानी सोसावी लागली. चर्चेच्या तेरा फेऱ्या होऊनही मार्ग निघू शकला नाही.

## दंगलींचे गालबोट

गुजरातमध्ये फेब्रुवारी २००२ मध्ये गोध्रा येथे साबरमती एक्सप्रेसवर हल्ला करून डबे पेटवले गेले. तेथून हिंदू-मुस्लिम दंगलीचा भडका उडाला. दोन हजारांवर लोक मारले गेले. सुमारे १५-२० दिवस राज्य दंगलीने धुमसत होते. नरेंद्र मोदी गुजरातचे मुख्यमंत्री होते. त्यांना तत्कालीन पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयींनी राजधर्म पाळण्याची सूचना केली होती. याच कारणावरून अमेरिकेने मोदींना व्हिसा नाकारला होता. २०१३ मध्ये उत्तर प्रदेशातील मुजफ्फरनगरच्या दंगलीतही सत्तरच्या आसपास लोक मारले गेले. सरकारने घेतलेल्या सीएए, एनआरसीविषयीच्या निर्णयाला विरोध झाला. यावरून राजधानी दिल्लीत फेब्रुवारी, मार्चमध्ये उसळलेल्या दंगलीत ५३ लोक मारले गेले. त्यानंतर शाहीनबाग आंदोलन झाले.

### आपत्तींवर आपत्ती

सध्या सगळीकडे चर्चा आहे ती क्लामेंट चेंज आणि ग्रीन हाऊस गॅसेसची, त्याच्या विपरित परिणामांची. गेल्या काही वर्षात आपण या समस्येला अधिक तीव्रतेने तोंड देत आहोत. २६ जानेवारी २००१ चा गुजरातमधील भूकंप आणि २६ डिसेंबर २००६ रोजी दक्षिण किनारपट्टीवर महाकाय त्सुनामी आदळल्यामुळे आपण लाखो लोकांना गमावले. नंतरच्या काळातही चक्रीवादळे, अतिवृष्टी, महापूर, भूकंपाच्या घटनांनी जनजीवन विस्कळीत झाले. हजारो कोटींची हानी झाली आणि हजारो जीव गेले.

## निर्भया ते मी टू... आणि मंदिर प्रवेश

१६ डिसेंबर २०१२ रोजी दिल्लीत घडलेल्या निर्भया घटनेने देशात संतापाची लाट उसळली होती. बलात्कार करणाऱ्या नराधमांना धडा शिकवण्यासाठी कडक कायदा करणे, तसेच महिलांचा लैंगिक छळ रोखण्यासाठी कायदा करण्यासाठी पावले उचलली गेली. त्यासाठी नेमलेल्या न्यायमूर्ती जे.एस. वर्मा यांच्या नेतृत्वाखाली समितीच्या बहुतांश शिफारशी न्यायालयाने स्वीकारल्या. बालकांवरील अत्याचाराला आळा घालण्यासाठीही सरकारने कडक कायदे केले. तरीही २०२० मध्ये उत्तर प्रदेशातील हाथरसमध्ये युवतीवर बलात्कार झाला. हे प्रकरण दडपण्यात आल्याने देशभर संतापाची लाट उसळली होती.

केरळमधील शबरीमाला मंदिरात महिलांना प्रवेश मिळावा यासाठी आंदोलन आणि न्यायालयीन लढाई लढली गेली. अखेर महिलांचा घटनात्मक हक्क मान्य करत सर्व वयाच्या महिलांना सर्वोच्च न्यायालयाने सप्टेंबर २०१८ मध्ये परवानगी दिली. त्यानंतर काही महिलांनी मंदिरप्रवेशाचा प्रयत्न केला, पण त्याला विरोध केला गेला.

महिलांवर झालेल्या अत्याचाराची जाहीर वाच्यता करून तोंड फोडण्याचे काम 'मी टू' या चळवळीद्वारे २००६ मध्ये तराना बर्कस्ट या महिलेने केले. हीच चळवळ जगात २०१७ मध्ये वेगाने फोफावली. विविध क्षेत्रातील महिला पुढे येऊन आपल्यावर झालेल्या अत्याचाराची कहाणी सांगून दाद मागू लागल्या. भारतातही त्याचे लोण पसरले होते. हॉलीवूडचा निर्माता हार्ले विन्स्टनविरोधात

डझनभर महिलांनी लैंगिक छळाच्या तक्रारी केल्या होत्या.

## संसद आणि मुंबईवर हल्ला

भारत तर दहशतवादी कारवायांनी सातत्याने होरपळत होता. १९९३ च्या मुंबई दंगलीपासून भारतात छोटे-मोठे दहशतवादी कृत्ये घडत होती. त्याची दाहकता भारताला एकविसाव्या शतकात चांगलीच जाणवली. १३ डिसेंबर २००१ रोजी संसदेवर जैश-ए-महंमद या दहशतवादी संघटनेने अतिरेकी हल्ला केला. त्यात ११ जणांना हौतात्म्य आले, पाच दहशतवादी मारले गेले. त्याचा सूत्रधार गाझीबाबा काश्मिरातील चकमकीत २००३ मध्ये मारला गेला, तर कटाचा सूत्रधार अफझल गुरूला २०१३ मध्ये फाशी दिली. भारतीयांच्या मानबिंदूवरील या हल्ल्याने पाकिस्तानबरोबरचे संबंध अधिक ताणले गेले, सीमेवर युद्धाचे ढग जमा झाले होते. अशीच परिस्थिती २६ नोव्हेंबर २००८ रोजी दहशतवाद्यांनी मुंबईत घुसखोरी करून विविध ठिकाणी केलेल्या हल्ल्याने निर्माण झाली होती. त्यातही मुंबई पोलिस दलातील तुकाराम ओंबळे, अधिकारी हेमंत करकरे, अशोक कामटे, विजय साळसकर तसेच लष्करातील अधिकारी उन्नीकृष्णन मारले गेले. ओंबळे यांनी रक्ताच्या थारोळ्यातही पकडलेल्या अजमल कसाबमुळे हल्ल्यामागील बोलविता धनी पाकिस्तान असल्याचे सिद्ध करता आले. त्यानंतरही पठाणकोट, पुलवामा, उरी अशा लष्कराच्या ठिकाणांवर, फौजांवर हल्ले केले गेले. आपणही सर्जिकल स्ट्राईक करून पाकिस्तानला धडा शिकवला. या सर्व अलीकडील पाच-सात वर्षातील घटना. एकूणच जगासमोरील दहशतवादी कारवाया काही थांबलेल्या नाहीत. दहशतवादी विविध स्वरूपात अस्थिरता माजवत आहेत.

दहशतवाद्यांचा पाठीराखा ही आपली प्रतिमा पाकिस्तानने दाखवून दिली. उत्तरोत्तर ती अधिक गडद होत गेली. सध्या काश्मिरात दहशतवाद्यांनी जे थैमान घातले आहे, त्याचा बोलविता धनी पाकिस्तानच आहे. पठाणकोट, पुलवामा, उरी येथील भारतीय सैन्यावर त्यांनीच दहशतवादी हल्ले नंतरच्या काळात घडवून आणले. त्यामुळेच उरीवर दहशतवाद्यांनी केलेल्या हल्ल्यात आपले १९ जवान हुतात्मा झाले. त्याला २८ सप्टेंबर २०१६ रोजी आपण सर्जिकल स्ट्राईक करून पाकव्याप्त काश्मिरातील ठाणी उद्ध्वस्त करून पाकिस्तानला धडा शिकवला होता. पुलवामा येथे १४ फेब्रुवारी २०१९ रोजी भारतीय सैनिकांवर दहशतवादी हल्ला झाला, त्यात ४० जवानांना हौतात्म्य आले होते. त्यामुळे पाकिस्तानला धडा शिकवण्यासाठी आपण २६ फेब्रुवारी रोजी बालाकोट, खैबर, पख्तुनवा या पाकिस्तानातील दहशतवादी प्रशिक्षण तळावर हवाई हल्ला करून ते उद्ध्वस्त केले होते. •••

**(लेखक समकालीन विषयाचे अभ्यासक आहेत)**

---

पान ५९ वरून

## स्त्रियांच्या वाट्याला विघातक स्थिती

म्हणजे स्त्रियांचे शिक्षण बंद केले पाहिजे! वा मोहनजी! महात्मा फुले, सावित्रीबाई, आगरकर, कर्वे, पंडिता रमाबाई वगैरे साऱ्या समाजसुधारकांनी झक मारली असेच म्हटले पाहिजे. नाही का? याच संस्थेत वाढलेल्या कृष्णस्वरूप दास महाराज यांनी तोडलेले तारे तर त्यांची कोणत्या प्रकारे पाद्यपूजा करावी, असा प्रश्न विचारायला उद्युक्त करतात. हे महाराज मुलींसाठी भूज या गावी स्वामी नारायण मंदिर नावाच्या एका संस्थेतर्फे एक कॉलेज चालवतात. त्यांनी असे म्हटले, की जर मासिक पाळी असलेल्या बाईने स्वयंपाक केला तर त्या पुढच्या जन्मात कुत्र्यांच्या जन्माला येतील आणि त्यांचे नवरे बैल होतील. इतकेच म्हणून ते थांबले नाहीत, त्यांच्या कॉलेजात शिकणाऱ्या पोरींची अंतर्वस्त्रे त्यांच्या महिलांनी उतरवावीत आणि त्यांची मासिक पाळी तर चालू नाही ना हे तपासून पहायचे आदेश दिले.


आपल्याकडेही निवृत्तीबुवा नावाच्या महाराजाने पोरगा हवा असेल तर समागम कधी करावा याबद्दल सखोल मार्गदर्शन केले होतेच. व्यक्तींचे सोडा, खुद्द भारत सरकारने स्त्रियांना सैन्यात परमनंट नेमणुका देण्यावरून असे निवेदन केले होते, की स्त्रियांना शारीरिक मर्यादा असतात आणि घरच्या जबाबदाऱ्याही असतात. त्यामुळे त्यांना सैन्यात परमनंट नेमणुका देण्यास आपला विरोध आहे. (या साऱ्या गदारोळात एक सन्माननीय



कामगारांसारखेच स्त्रियांजवळ गमावण्यासारखे काय असते तर पायातील श्रृखंला! म्हणून त्यांना न्याययंत्रणेत अधिकाधिक संधी द्यायला हव्यात. **– सरन्यायाधीश एन. व्ही. रमणा**

अपवाद भारताचे सरन्यायाधीश न्यायमूर्ती रमणा यांचा आहे. त्यांनी म्हटले आहे, की कामगारांसारखेच स्त्रियांजवळ गमावण्यासारखे काय असते तर पायातील श्रृखंला! म्हणून त्यांना न्याययंत्रणेत अधिकाधिक संधी द्यायला हव्यात.) अशा साऱ्या विपरित वातावरणात, या अस्वस्थ वर्तमानात स्त्रियांनी आपला समान आणि नागरी हक्कांचा लढा दृढ आत्मविश्वासाने चालू ठेवला तरच काही बदल होण्याची शक्यता संभवते! नाही तर पुन्हा पहिल्यापासून सुरुवात करावी लागेल. •••


**(लेखिका ज्येष्ठ कवयित्री, दलित साहित्याच्या अनुवादक आणि महिला चळवळीतील कार्यकर्त्या आहेत)**


HAPPY
Diwali
WITH BEST WISHESH
AFCONS
INFRASTUCTURE LIMITED

POSTAL REGISTRATION NO. ABD/492/2019-21
RNI REG. NO. MAHMAR/2018/76460

जय भीम
शॉर्ट वीडियो ऐप

बनाईये, दिल को छू लेने वाली शॉर्ट वीडियोज़ और ख़ुद को बनाइये सुपरस्टार!




शॉर्ट वीडियोज़ का ख़ज़ाना,
यहाँ हैं आपके फ़ेवरेट वीडियोज़

अपनी प्रोफ़ाइल बनाईये और
पूरी दुनिया के दर्शकों तक पहुंचिंये

ऐप फ़िलटर्स की मदद से
ख़ूबसूरत वीडियोज़ बनाइये

चुनिए, परफ़ेक्ट मिक्स के लिए,
एक से बढ़ कर एक ट्रेन्डिंग ऑडिओज़

अपना यूनीक कॉन्टेंट बनाइये
और जम के कमाइये

दिसंबर 04, 2021
को हो रहा है
भारत में लॉन्च